म. प्र. सं. वर्णी
विषय
सं. क्र.

म. ग्रं. सं. ठाणें

I

No.

प्रस्तावना.

शके १८८१च्या चैत्र महिन्यांत मी आपल्या मुलाबाळांस घेऊन महाबळेश्वरास गेलों होतों. तेथें असतांना अनेक वेळ सहज करण्यासाठीं त्या पर्वताच्या निरनिराळ्या टोंकावर जात असें. कधीं डोमेश्वरावर तर कधीं मुंबई टोकावर असे जाऊन तेथून सभोंवतालच्या रमणीय देखावा पहात असतां आमचें मन प्रसन्न होई;व त्या मंद शीतल आणि आल्हादकारक अशा वाऱ्यावर बसलों असतां, मुलें आपल्या बाळस्वभावामुळें अनेक गोष्टी विचारून हैराण कंटाळा आणीत. त्या सर्वांत, तेथील अनेक उंच ठिकाणांवरून समोर आकाशांत जणूं उभा दिसणारा असा प्रतापगडचा किल्ला पाहून तर त्या किल्या संबंधाच्या आणि शिवाजीमहाराजांच्या पराक्रमांच्या गोष्टी तर तीं फारच आवडीनें विचारीत. केव्हां केव्हां तर या गोष्टींच्या भरांत आम्हाला वेळेचेंही भान राहत नसे. व उठून परत येतांना अगदीं काळोख होई. तेथें राहत असतांना प्रतापगडची हकीगत सांगणारीं एक दोन पुस्तकें मीं त्यांस आणून दिलीं. पण तेवढ्यानीं त्यांचें समाधान झालें नाहीं. व अखेर तो किल्ले प्रतापगडची हकीगत तुम्ही आम्हास लिहून द्या असा त्यांनीं आळा घातला. आळा कशाचा! हुकुमच तो. एखाद्या अधिकार संपन्न राजानें जर हा हुकुम केला असता तरीही मी तो मान्य केला नसता. पण माझ्या मुलांचा हा हुकूम माझ्याच्यानें अमान्य करवेना. अखेर ती प्रतापगडची गोष्ट लिहीण्याचे मी थोडेसें कबूल केलें.

त्या नंतर पुढील सालीं मी जेव्हां पुन्हा महाबळेश्वरास गेलों तेव्हां ही प्रतापगडची हकीगत लिहिण्याची जुळवाजुळव करूं लागलों. मला मिळाले ते ग्रंथ वाचले. अस्सल कागदपत्रही थोडेफार पाहिले. कानावर आल्या त्या हकीगती ऐकिल्या आणि मग स्वतः प्रतापगड किल्यावर जाऊन राहिलों. व वे. शा. स. तातंभटजी हाडप पुजारी आणि रा. बाळकृष्णपंत ताडफळे फडणीस याचे मार्फत तेथिल संस्थान-संबंधीचे कागदही नीट चाळून पाहिले व मग तेथें राहिलों असतां केव्हां बालेकिल्यावर प्रत्यक्ष शिवाजी महाराज राहत असत त्या ठिकाणीं, व केव्हां जेथे अफजखानाची झटापट झाली त्या ठिकाणच्यावर बसून मनांतल्या मनांत या विषयाची मांडणी योजिली. आणि अखेर तेथील श्री अंबा भवानीच्या देवळांत टिपणें करून कांहीं कांहीं भाग वरददायिनी व संकट हारिणी मातुश्रीच्या संन्निध सभामंडपांत बसून लिहून

काढले आणि ही माझी वेडया वाकुड्या शब्दानीं सांगितलेली हकीगत मग कांहीं दिवसानीं पुन्हां एकवार तेथें जाऊन नीट पुरी केली.

आणि अशा रितीनें पुरी केलेली ही हकीगत श्री शिवाजी महाराजांचे जेथें बाळपण गेलें त्या पुण्य नगरींत भारत इतिहास मंडळासमोरील श्री शिवाजी महाराजांच्या स्मारक मंदिरांत, त्यांच्या पुण्य तिथीच्या दिवशीं, ज्या जागेंत त्यांचा आत्मा सूक्ष्म देहानें सदैव वावरत आहे, त्या जागेंत त्यांच्या मूर्तीपुढें सादर केली. व आतां त्या थोर विभूतीचा तीर्थप्रसाद म्हणून मी आज आपणापुढें ठेवीत आहे. या पुण्यनगरींतल्या थोर विद्वानाना हें तीर्थ फारसें गोड न लागलें, तरी हें त्या महाभागाचे तीर्थ म्हणून तरी त्याचा अनादर करणार ताहींत अशी खात्री वाटते.

या पुढील हकीगतीच्या वाचकानें कोणालां कांहीं नवीन माहिती मिळाली नाहीं तरी हरकत नाहीं. पण तिच्या वाचनानें जुन्या गोष्टींची पुन्हां एकदा उजळणी झाली, व तापानें तापलेल्या माझ्या महाराष्ट्राच्या मनाला या निवेदनानें थोडा विरंगुळा वाटला तरी मला तेवढेंच पुरें. पण लांकडाच्या किंवा पाषाणाच्या एखाद्या निर्जिव तुकडयाला तोही न वाटला, तरीही या पासून मला वाईट वाटणार नाहीं. कारण त्याचे करतां ही लिहीण्याची दगदग मी केलेलीच नाहीं.

विनायक लक्ष्मण भावे.

प्रस्तावना.

"स्किमिट्झ हिस्टरी ऑफ् ग्रीस" नामक इंग्रजी पुस्तकाचें हें मराठी भाषांतर असून तें श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेर बहादर यांच्या आज्ञेवरून तयार करण्यांत आलें आहे. यांत पौराणीककालापासून तों अखेर सन १८९२ पर्यंतचा वृतांत संक्षिप्त रीतीनें दिला आहे.

ज्ञानभांडारांत इतिहास अमुल्य रत्न असल्याचें सर्वसंमत असल्यामुळें त्या बाबतींत ज्यास्त लिहिण्याचें कारण नाहीं. तरी इतर सर्व देशांच्या इतिहासापेक्षां ग्रीस देशाच्या इतिहासाच्या ज्ञानाची किंमत आपल्या देशाच्या प्रस्तुत स्थितींत ज्यास्त आहे. ज्ञात जग बहुतेक अज्ञानावस्थेंत घोरत पडलें होतें, अशावेळीं या देशांत सर्व प्रकारच्या विद्येचा, कलाकौशल्याचा बराच पूर्ण विकास झाला होता. त्याचप्रमाणें युरोपाचा इतर भाग शुद्ध रानटी स्थितींत असल्यांवेळीं ग्रीस देशाचा ज्ञान सूर्य माध्यानीच्या प्रखर तेजानें प्रकाशत होता. पाश्चात देशांतील राजकीय, सामाजीक व व्यावहारीक सुधारणांस केवळ आधारभूत जी रोमची सुधारणा ती तरी ग्रीसच्या सुधारणेचें अपत्यच आहे. शिवाय त्या देशांतील पुरातन धर्म-समजुती, परलोक संबंधीं कल्पना, प्राचीन काळची भरभराट व पुढें प्राप्त झालेलें पारतंत्र्य व दैन्य यांचें आमच्या स्थितीशीं जितकें साम्य आढळतें तितकें दुसऱ्या कोणत्याही देशाच्या स्थितीशीं आढळण्याचा संभव

नाहीं. तेव्हां त्या देशाच्या इतिहासापासून आपणास होणारा लाभ अमूल्य होय असें म्हणण्यास चिंता नाहीं.

परंतु आमच्या लोकांच्या नष्टचर्यामुळें ह्मणा किंवा अन्य कांहीं कारणानें ह्मणा, तें ज्ञान प्राप्त करून देण्याचीं साधनें तादृश उपलब्ध नाहींत. खालसा मुलुखांत पूर्वी हायस्कुलां तून तरी ग्रीस व रोम या देशांच्या इतिहासाचीं मूलतत्वें शिकवीत असत, परंतु युनिव्हर्सिटीनें आपल्या अवश्य क्रमांतून हा विषय अजिबात गाळल्यामुळें आतां तिकडे फारसें कोणी ढुंकून ही पाहिनासें झालें आहे. आपखुषीनें कोणी विद्यार्थी तो विषय पसंत करील, त्या खेरीज इतरांस त्याची गरज राहिलेली नाहीं. तेव्हां अशावेळीं ज्याच्या वाचनानें ग्रीस देशाच्या इतिहासाचें अल्पस्वल्प ज्ञान होईल अशा पुस्तकाची फार गरज होती. ती श्रीमन्महाराज साहेबांच्या कृपेनें अंशतः तरी भरून आल्या वांचून राहणार नाहीं. शिवाय गायकवाड सरकारच्या शाळांतून हें लहान पुस्तक चालू केल्यास त्यापासून बराच फायदा होईल, या गोष्टीकडे इकडील विद्याधिकारी यांचें लक्ष पोंचेल अशी अपेक्षा आहे.

हें पुस्तक केवळ भाषांतररूप असल्यामुळें त्याच्या योग्यायोग्यतेविषयीं कांहीं विशेष सांगण्यासारखें नाहीं. शाळांतील लहान लहान मुलांसही त्याचा उपयोग व्हावा या उद्देशानें साधलें तितकी सोपी भाषा योजण्याचा प्रयत्न केला आहे; तो कितपत साधला आहे तें ठरविणें सुज्ञ वाचकाचें काम आहे.

हें पुस्तक छापण्यास आरंभ होण्यास वं भाषांतर कर्ता आजारी पडण्यास एकच गांठ पडली. यामुळें प्रुफ तपासण्याचें काम कांहींवेळ दुसऱ्यांवर सोंपवावें लागले. या व अशाच अन्य अडचणींमुळें कांहीं ठिकाणीं अशुद्धें राहिलीं गेलीं, त्यास इलाज नाहीं. तरी प्रुफ तपासण्याच्या कामीं रा. विष्णू शामराव चंद्रात्रे, असिस्टंट मास्तर फत्तेसिंह स्कूल यांची बरीच मदत झाली, तिजबद्दल भाषांतर कर्ता त्यांचा फार आभारी आहे.

श्री.

उपोद्घात.

युरोपखंडाच्या इतिहासमंदिरांत प्रवेश करितांना प्रथमच दृष्टीस पडणारे लोक ह्मटले ह्मणजे त्या खंडांतील आग्नेयी दिशेच्या द्वीपकल्पांत राहणारे ग्रीक लोक होत. हे आपणांस हेलनीस ह्मणत असत. हे लोक इतिहासांत प्रथम चमकूं लागले त्यावेळीं त्यांस सर्व साधारण अगर राष्ट्रीय संज्ञा नव्हती; प्रत्येक टोळीस निरनिराळें नांव असे. उत्तरेकडील क्याबूनीयन नामक पर्वतराजीपासून तहत दक्षिण टोंकापर्यंतच्या प्रदेशांतिल व आसपासच्या बेटांतील सर्व राष्ट्रास हेलनीस ही संज्ञा ख्रिस्ती शकाच्या पूर्वी ८०० व ७०० वर्षांच्या दर्म्यान प्राप्त झाली. अगदीं प्राचीन काळीं त्या प्रदेशांतील बऱ्याच मोठ्या भागांत पिलासजियन नांवाच्या लोकांनीं वसाहत केली होती. या लोकांविषयीं बरेच वेळां उल्लेख केलेले आढळतात, पण त्यांची माहिती फारच थोडी आढळते. तथापि एवढें खचित आहे कीं, हे लोक हेलनीस लोकांहून विशेष भिन्न नसून त्याचवर्गांतिल होते. कारण कालांतरानें व लढाया अगर अनर्थकारक गडबड न होतां हे लोक हेलनीस लोकांत मिळून जाऊन सर्वांचें एक राष्ट्र बनलें. ते सर्वत्र बहुतांशीं एकच भाषा बोलूं लागले व देवांविषयीं त्यांचे विचार बहुतकरून एकच बनले. भाषेच्या संबंधानें निरनिराळ्या भागांत जो भेद दिसत होता तो स्थानिक भाषाविकार होता. तसेंच कांहीं भागांत कांहीं देवांची

विशेष पूजा होत होती, तरीपण सर्व देव सर्व प्रदेशांत मानिले जात होते.

हे हेलनीस लोक जगांतील सुधारलेल्या लोकांत अतिविख्यात म्हणतां न आले तरी त्यांची गणना अतिविख्यात लोकांमध्यें करितां येते यांत संशय नाहीं; आणि तत्समकालीन राष्ट्रांवर व पुढील पिढ्यांवर त्यांनीं जो पगडा बसविला त्याचें मोल करावें तितकें थोडेंच. त्यांचे अंगीं जाज्या मानसिक व शारीरिक उत्तम गुण वसत होते. त्यांचीं मनें तरतरीत असून सद्यःस्थिति सुधारण्याच्या कामीं त्यांचा प्रयत्न चालू असें. धर्म, तत्वज्ञान, कला व भाषाविषय यांविषयींचे अति गहन प्रश्न सोडविण्याचा त्यांनीं यत्न केला होता. पूर्वींच साध्य झालेल्या गोष्टींनीं त्यांचें समाधान न होतां पुढें पाऊल टाकण्यास व सुधारणा करण्यास ते सदा तत्पर असत. विद्यमान स्थितीसच चिकटून राहणें त्यांस आवडत नसे. अर्थात् प्रत्येक बाबतींत त्यांची एकसारखी सुधारणा चाललेलीच असे. परकीय प्रत्येक गोष्टीचा ते तिरस्कार करीत व तीस रानटी ही संज्ञा देत; तरी पण परकीयांत जें कांहीं उपयोगी अगर हितावह दिसे तें स्वीकारण्यास ते कधींही मागें पुढें पहात नसत, व त्यास आपलेंसे करून घेऊन त्यावर आपल्या गुणाची व बुद्धिमतेची छाप बसवीत. पूर्णत्व मिळविण्याविषयीं जी त्यांची उत्कट उमेद असे तींत त्यांस नेहमीं यश मिळत नसे हें खरें; कारण धर्माचे बाबतींत जग निर्माण करणारा व त्याचें रक्षण करणारा ईश्वर एक आहे ही कल्पना त्यांस झाली नव्हती. तत्वशास्त्रांत ज्या प्रश्नांचा अद्यापिही उलगडा होत नाहीं, अशा गहन प्रश्नांचा निर्णय करण्यांतही त्यांचें पाऊल पुष्कळच पुढें गेलें होतें. स्वातंत्र्याच्या आवडीमुळें एकछत्री राज्यापासून तों अनियंत्रित व स्वैर

अशा प्रजासत्ताक राज्यपद्धती पावेतों सर्व स्थितींचा त्यांनीं अनुभव घेतला, व शेवटीं रोमच्या सर्वग्रासी सामर्थ्यामुळें त्यांचे राजकीय अस्तित्व लयास गेलें, तरी कलाकौशल्य व विद्या यांत त्यांनीं एवढी प्रौढी मिळविली होती कीं, तिच्यावर ताण होण्याची गोष्ट तर दूरच राहिली परंतु तिची बरोबरीही आजपर्यंत इतर लोकांकडून क्वचित्च झाली असेल. या कारणामुळें मनुष्य वर्गाचा बहुतेक भाग बाल्यावस्थेंत आहे अशा समयींही कौशल्य व व्यासंग यांच्या योगानें मनुष्य काय करूं शकेल याचें ग्रीक लोक हे धडधडीत उदाहरण होत. शिवाय यांची भाषा इतकी वृद्धिंगत झाली आहे कीं, तिचें सौंदर्य, मार्मिकता व शब्दलालित्य यांच्या योगानें मनोविकारांचे अतिसूक्ष्म तरंगही त्या भाषेनें जाणविले जातात. आज तागायत या भाषेचें सर्वांस आश्चर्य वाटतें.

हे हेलनीस लोक कोण होते व ते युरोपांत केव्हां व कोठून आले हा प्रश्न सहजी आपल्या मनांत येतो. आपलें वस्तिस्थान हीच आपली जन्मभूमी असें ते मागाहून मानूं लागले, इतकेंच नाहीं तर आपण चंद्रापेक्षांही पुराणे आहोंत असेंही कित्येक प्रतिपादन करूं लागले. इतका आपल्या मुळाविषयीं व मागील इतिहासाविषयीं त्यांस पूर्ण विसर पडला, परंतु त्यांच्या भाषेवरून व धर्ममतांवरून असें निर्विवाद दिसतें कीं हिंदु, पार्शियन (इराणी), आरमेनियन, इटालियन, स्लाव्होनियन, जर्मन आणि केल्ट या राष्ट्रांचा ज्यांत समावेश होतो त्या आर्यन लोकांची ते शाखा होत. ग्रीक भाषेचे धातु तर काय पण विभक्ति, प्रत्ययही आतां निर्दिष्ट केलेल्या लोकांच्या भाषांशीं थोडे बहुत जुळतात आणि या वरून त्या सर्व भाषांचें मूळ एकच असावें असें सिद्ध होतें. हे लोक आशियाखंडांतून युरोपांत गेले आणि उत्त-

रेच्या बाजुनें ग्रीसमध्यें उतरले, अशी जी सर्वत्र समजूत आहे तिला सर्व गोष्टींनीं वळकटी येते हे तिकडे केव्हां गेले हें निश्चित् करणें अशक्य आहे; परंतु यांच्या युरोपांतील प्रयाणाचा काळ खिस्ती शकाचे पूर्वीं दोन हजार वर्षांच्या दरम्यान असावा अशी अटकळ होते.

हेलनीस लोकांचे अति जवळचे आप्त झटले झणजे इटालीच्या बऱ्याच मोठ्या भागांत राहणारे लोक झणजे लाटीन अगर तिची पोट भाषा बोलणारे **इटालियन** लोक होत. कारण लाटीन व ग्रीक भाषाचें एवढें मोठें व ढळढळीत साम्य आहे कीं त्या भाषा बोलणारे सर्व लोक एकाकाळीं एकच असून मागाहून त्यांच्या दोन शाखा झाल्या व एक शाखा ग्रीसमध्यें व दुसरी इटालींत वसाहत करून राहिली असें मानणें भाग पडतें आणि त्या प्रत्येक देशांत आणखी पोटभेद होऊन त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या बनल्या व त्यांचे निरनिराळे भाषाभेद झाले. हेलनीस लोकांचा राहण्याचा देश हेलास अगर ग्रीस हा फार लहान असून बहुतेक डोंगराळ आहे, तरी त्यांत कांहीं फार सुपीक मैदान मुलूख आहेत, त्यांत गलबतें चालविण्याजोगी नदी क्वचित्च आढळते; परंतु उत्तम अखातें व बंदरें यांची रेलचेल असल्यामुळें ही उणीव भरून आली आहे व त्यांच्या योगें बेटांशीं व भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्याशीं दळणवळण सुलभ झालें आहे. या लोकांची मूळ जन्मभूमीही हिंदुस्थानाच्या वायव्य दिशेस असली पाहिजे असें अनुमान आहे. ही "जन्मभूमि हे लोक सोडून गेले तेव्हां त्यांनीं आपली भाषा व धर्म हीं बरोबर नेलींच, पण शिवाय आपल्या मूळ भूमींत ज्या सुधारणेच्या गोष्टी घडल्या होत्या त्याही सर्व त्यांनीं बरोबर नेल्या.

ही सुधारणा कशा प्रकारची होती हें सजातीय भाषांची तुलना केल्यानें उघड दिसून आलें आहे आणि ग्रीक लोक युरोपांत प्रथम आले त्या वेळीं ते रानटी असून गुहांत राहणारे आणि ओक झाडाच्या फळांवर चरितार्थ करणारे होते व त्यांस शेतकी व गुरें ढोरें पाळण्याचें बिलकूल ज्ञान नव्हतें अशी जी कित्येक प्राचीन व अधुनिक इतिहासकारांची समजूत आहे ती ह्या तुलनेनें निखालस दूर होते. रानटी अवस्थेहून बऱ्याच वरच्या पायरीच्या स्थितीचे दर्शक असे पुष्कळ निरनिराळे शब्द ग्रीक भाषेंत व आशियाखंडांत राहिलेल्या त्यांच्या आप्तांच्या भाषेंत सारखे आढळतात; आणि ग्रीक लोकांनीं विभक्त होऊन पाश्चिमेकडे प्रयाण करण्यापूर्वीं ते बऱ्याच सुधारणेस पोंचले होते याचा हा सबळ पुरावा आहे.

ग्रीक लोकांस त्यांच्यांत येऊन राहिलेल्या परकीयांपासून सुधारणा प्राप्त झाली अशी एका वेळीं समजूत होती. उदाहरणार्थ केक्रोपिया अथवा आथेन्सचा किल्ला हा केक्राप्स यानें मिसर देशांतून येऊन बांधिला; पळवून नेलेल्या बहिणीचा शोध करितां करितां फिनीशियन राजपुत्र क्याडमॉस हा बिओशियांत येऊन पोंचला व तेथें त्यानें थीब्सचा किल्ला बांधिला; आपला भाऊ ईजिप्तास याच्या क्रोधापासून सुटण्याकरितां डनाऊस आपल्या पन्नास मुलींसह हेलासांत येऊन राहिला व त्याचेपासून कांहीं हेलनीक लोकांस डनाई हें नांव प्राप्त झालें; टान्टालसाचा एक पुत्र पेलाप्स हा आशियामायनार मधील फ्रीजिया अगर लीडीया प्रांतांतून आला व त्यानें हेलासच्या दक्षिण भागचा कांहीं प्रदेश बळकाविला, आणि त्यास पेलापोनिसस अथवा पेलाप्सचें बेट असें नांव दिलें, अशा प्रकारच्या कित्येक लोकांच्या सम-

जुती आहेत; तरी पण ह्या सर्व गोष्टी हेलासांतच निघून हेलनीसांच्या सुधारणेचें श्रेय घेऊं पाहणाऱ्या ईजिप्शियन वगैरे कांहीं परकी लोकांच्या वृथाभिमानाच्या योगानें पसरल्या, व पेलाप्स-च्या गोष्टीप्रमाणें हेलास व आशियामायनर यांचा जो प्राचीन काळीं संबंध होता त्याची अस्पष्ट आठवण असल्यानें कांहीं निघाल्या असाव्या असें दाखवितां येतें. क्याडमॉसाच्या दंतक-थेला मात्र इतिहासाचा खरा पाया असावासें दिसतें. कारण फार प्राचीनकाळीं फिनीशियन लोक व्यापाराकरितां अगर चांचेपणा करण्याकरितां हेलासच्या किनाऱ्यावर येत असत असा पुष्कळ पुरावा आहे व लेखनकला हेलासांत फिनीशियन लोकांनीं आ-णिली अशी सर्वत्र सारखी दंतकथा आहे. सभोंवतालच्या लो-कांचा हेलनीस लोकांवर कांहींच परिणाम घडला नाहीं असें मा-नणें वेडगळपणाचें होईल; कारण कोणतेंही राष्ट्र स्वतःचें नुकसा-न करून घेतल्याविना अगदीं अलग राहूं शकणार नाहीं. परंतु परकीयांनीं--मग ते व्यक्ति असोत अगर समूह असोत.--हेलासांत ज्या कल्पना व संस्था आणिल्या असतील त्या हेलनीस लोकां-च्या बुद्धिमतेनें इतक्या पालटल्या व इतक्या भिन्नरूप बनल्या कीं, कालानें त्यांत परकीपणाचा लवलेश राहिला नाहीं. हेल-नीस लोकांच्या भूमींत ईजिप्सियन अगर दुसऱ्या परकी मातेचा गंधही नाहीं. त्यांचा धर्म मुख्य बाबतींत त्यांच्या आर्यबंधू-च्या धर्माप्रमाणें आहे. मात्र देव व त्यांचे गुण यांचा खरा अर्थ विसरून गेल्यामुळें त्यांच्या कल्पनेनें त्या धर्मांत बदल झाला आहे. अगदीं आरंभीच्या आडाणी स्थितीपासून तों अति पूर्ण स्थिती पर्यंतच्या त्यांच्या सर्व कलाकौशल्याचें मूळ त्यांच्या जन्मभू-मींत सांपडतें. त्यांच्या राजकीय व सामाजिक संस्थांतही त्या ईजि-

फ्सियन अगर दुसऱ्या सेमिटिक* लोकांपासून घेतल्या असें मानण्याजोगें कांहीं दिसत नाहीं. वस्तुतः त्या दोहोंमध्यें फार विरोध दिसतो, किंबहुना हेलनीस लोकांची सर्व सुधारणा त्यांची त्यानंचि केलेली व वाढविलेली आहे अशींही बिनचूक चिन्हें दिसतात.

---

* आशिया खंडांतील लोक यांत हिब्रू (यहुदी) आरब, आरामिनयिन, फिनीशियन, आशिरीयन आणि इथिओपियन इतक्या लोकांचा विशेषें करून समावेश होतो.



भाग १ ला.

पौराणिक काल.

हा काल—ह्मणजे ज्यावेळीं देव भूतलावर येऊन माणसांत मिसळत असत आणि त्यांच्या कामांत स्वतः जातीनें पडत असत तो—अति प्राचीनकाळापासून तों ख्रिस्ती शकाचेपूर्वी सुमारें ११०० वर्षेपर्यंत समजला पाहिजे. ह्या कालाविषयीं खुद्द ग्रीक लोकांस जी माहिती होती ती तोंडातोंडी चालत आलेल्या दंतकथांवरून मिळालेली होय. कवींची सन्हृदयता यांच्या अंगीं वसत होती; यामुळें प्रत्यक्ष गोष्ट घडून गेल्यानंतर पुढें निर्माण झालेल्या कवींनीं त्या गोष्टींचें स्वरूप इतकें बदललें, व तीस इतकें सौंदर्य आणिलें कीं, या जुन्या गोष्टींस खरा आधार किती आहे हें सांगणें पुष्कळदां अशक्य होतें; परंतु ज्याअर्थीं ग्रीक व लाटीन ग्रंथकारांनीं या गोष्टींचा वारंवार उल्लेख केला आहे, व ज्या अर्थीं त्यांच्या बहुतेक काव्यांना त्यांचाच आधार आहे, इतकेंच नाहीं तर अर्वाचीन राष्ट्रांच्या कवितेंतही त्या गोंविल्या आहेत, त्याअर्थीं त्यांतील विशेष महत्वाच्या गोष्टींचें थोडक्यांत दिग्दर्शन करणें जरूर आहे.

सर्वांत विशेष महत्वाची दंतकथा हिराक्लीस अथवा हरक्युलीस याची होय. तो गोष्ट अशी--ईजिप्तांतून आलेला डनाउस याला डनाई नांवाची नात होती. हेलनीस लोकांच्या देवांत अतिश्रेष्ठ जो झियस अथवा ज्युपिटर त्यापासून तिला परसियस नांवाचा

पुत्र झाला. परसियसची नात अल्कमेना हिला झियस पासून हिराक्लीस हा मुलगा झाला. हेलासांत जे पौराणिक वीर झाले त्या सर्वांत हिराक्लीस हा श्रेष्ठ व विख्यात आहे; ह्याची शक्ति भीमसेनासारखी असून यानें अति विलक्षण पराक्रम केले असें मानितात. त्यानें बारा अचाट कृत्यें केलीं; प्रत्यक्ष राक्षसाच्या हातूनही कधीं न होणाऱ्या कृत्यांचें श्रेय ग्रीकलोकांनीं या आपल्या मोठ्या वीराला दिलें आहे; तथापि तीं कृत्यें निर्जन व जेथें सर्व प्रकारच्या अडचणी उभ्या आहेत अशा प्रदेशांत आलेल्या लोकांच्या बऱ्याच पिढ्यांकडून घडलीं असावीं असें उघड दिसतें. उदाहरणार्थ त्यानें खडक फोडिले, नद्यांचे प्रवाह बदलले, सरोवराच्या पाण्याकरितां जमिनींतून कालवे काढिले आणि रानटी व त्रासदायक पशूंचा नायनाट केला असें सांगतात. तो गरीब व निराधार लोकांचा आधार आणि निर्दय व जुलमी लोकांचा शास्ता असून पुष्कळ परदेशांत जाऊन तेथेंहीं अशाच प्रकारचीं विलक्षण कृत्यें त्यानें केलीं असेंही त्याचें वर्णन आहे. ग्रीक लोकांच्या कल्पनेनें त्याला देवाच्या तोडीस पोंचविलें; व ते त्याचीं देवळें बांधून त्याच्यापुढें बलिप्रदानही करीत; तो मजबूद व जोमदार हातांत गदा घेतलेला व सिंहाचें कातडें पांघरलेला असा चित्रांतून दाखविलेला असतो.

दुसरा मोठा वीर झटला ह्मणजे इजियस आणि ट्रिझनच्या राजाची कन्या ईथ्रा यांचा पुत्र थीसीयस हा होय. ह्याला आटिकाचा हिराक्लीस झटलें तरी चालेल. हा एक प्राचीन राजा असून त्यानें आटिकांतील निरनिराळीं शहरें एकत्र करून एक संस्थान बनविलें, व त्या संस्थानाच्या राजकीय व्यवस्थेचा पाया घातला असें मानितात. त्यानें धाडशी व दुष्ट चोरांचें निर्दाळण

करून प्रवासी लोकांस कोरिन्थच्या सामुद्रधुनीचा मार्ग सुरक्षित केला, व राक्षस आणि घातकप्राणी यांचा नाश केला अशी समजूत आहे. परंतु त्याची विशेष ख्याती पाहूं गेल्यास क्रटचा बलाढ्य राजा मिनास याला आथेन्साकडून जी वार्षिक खंडणी मिळत होती तिजपासून त्यानें आथेन्सास युक्तीनें सोडविलें याबद्दल होय. ही खंडणी अशीतशी नसून कांहीं तरुण पुरूष व कुमारी यांस दरसाल क्रेट येथें पाठवावें लागे, व तेथें एका व्यूहाकार गुहेंत राहणारा मिनोयर नांवाचा राक्षस त्यांस भक्षण करी. हे बळी पाठविण्याची वेळ आली तेव्हां त्यांत आपण जाण्यास तरूण थिसियस तयार झाला. क्रेट येथें पोंचल्यानंतर तेथील राजाची कन्या आरियाड्री हिची त्यानें प्रीति संपादन केली; तिनें त्याला सुतगुंडी दिली व तिच्या योगानें मिनोयरला ठार मारून तो त्या व्यूहाबाहेर आला. अशा रीतीनें आथेन्सास या दुष्ट खंडणीपासून मुक्तकरून तो आरियाड्री बरोबर बेट सोडून निघाला; परंतु परदेशच्या स्त्रीला आपल्या घरीं आणण्याची त्याची छाती न झाल्यामुळें त्यानें तिचा त्याग केला. त्याचा बाप त्याच्या येण्याची मार्गप्रतिक्षा करीत होता. गलबतावरील काळें शीड पाहून मुलगा मरण पावला अशा समजुतीनें निराश होऊन त्यानें समुद्रांत उडी टाकिली; तेव्हांपासून त्याला ईजियन समुद्र (इजियसचा समुद्र) असें नांव पडलें. बापाच्या मागें थिसियस आथेन्सांचा राजा झाला व सर्व प्रदेश एक छत्राखालीं आला म्हणून पानआथेनिया (सर्व अथिनियनांचा) नांवाचा वार्षिक उत्सव त्यानें स्थापन केला. आथिनियन लोकांनीं त्याच्या सन्मानार्थ थिसिअम नांवाचें देऊळ बांधिलें, व त्यामुळें त्याचें नांव राहिलें आहे.

मिनास याज जवळ त्यावेळच्या आरमारांत अति बलाढ्य आरमार होतें व **थिशियस** प्रमाणेंच हाही शहाणा कायदेकर्ता होता, असें त्याचें वर्णन केलें आहे. परंतु त्यानें ज्या संस्था स्थापिल्या असें ह्मणतात त्या पुष्कळ काला नंतर डोरियन लोकांनीं क्रेट बेटांत वस्ती करून स्थापिल्या असें दाखवितां येईल.

क्यालिडोनियासंबंधानें शिकारी वगैरे अनेक चित्तवेधक गोष्टी सांगतां येतील. या गोष्टींचा मुख्य नायक **मेलिग्रास** यानें **कालिडानूच्या** मोंवतालच्या प्रदेशांत धुव्वा उडाविणाऱ्या एका क्रूर डुरकास मारिलें. परंतु त्या सर्वच गोष्टी सांगत न बसतां त्यांतील ज्या तीन गोष्टी पौराणिक कालांत विशेष महत्वाच्या व मनोवेधक आहेत त्यांचें दिग्दर्शन करून आटोपतें घेतलें पाहिजे.

पहिली गोष्ट--**आरगोनाटांची** स्वारी ही होय. ती अशी; जे सन हा थेसलींतील **अयोलकास**च्या गादीचा खरा वारस होता **पेलियस** यानें ती गादी बळकाविली होती. परंतु **जेसन**चा पूर्व-**इओलास** याच्या वंशांतील पुरूष गादीवर बसेल असा काळै मिळाल्यामुळें **पेलियस** यास जेसनची नेहमीं धास्ती असे. ह्मणून पेलियसानें त्या राजपुत्राचें मन वळवून एका धोक्याच्या कामागिरीकडे त्याची योजना केली. त्याचा आशय कीं, तो त्या कामगारींत मराव. जेसन हा दुसरे पुष्कळ वीर बरोबर घेऊन काळ्या समुद्राच्या पूर्वकिनाऱ्यावरील **कोलचीस** येथील एका एरीस उर्फ *मार्सच्या राईत ठेविलेली सोनेरी लोंकर आणण्याकरितां आरगास

---

* हा देव युद्ध कलेचा स्वामी व देवांचा सेनानी आहे असें ग्रीक लोक मानीत असत.

(या वरूनच आरगोनाट नांव पडलें,) नांवाच्या मोठ्या गलबतांतून निघाला. वाटेंत बरेच प्रसंग सोसून ते एकदांचे कोलचीस येथें पोचले; तेथेंतर जास्तच संकटें आडवीं आलीं. परंतु कोलचीसचा राजा इटस याची कन्या मेडिया हिचें मन जेसनावर बसलें. तिला सर्व जादूविद्या अवगत होती व तिच्या सहायानें तेंदुष्कर काम तडीस गेलें. मेडियेशीं विवाह करून तिच्यासह वर्तमान जेसन निघाला. आपल्या बापानें शेंवटपर्यंत पाठलाग करूं नये म्हणून मेडियेनें आपला लहान भाऊ अबसरटास यास मारून त्याचे तुकडे रस्त्यावर टांकिले. ते जमाकेल्यावर बापानें पाठलाग सोडिला. या वीरांनीं जातांनां जशीं साहसें केलीं तशींच परत येतांनांही केलीं. जेसन इओल्का येथें पोंचला; परंतु पेलियस त्याला गादी देईना. अखेर पेलियसाचा खून झाला आणि जेसन इओल्काचा राजा झाला. पुढें कांहीं वर्षांनीं मेडियेपासून त्याला दोन मुलें झालीं असतांहीं कोरिन्थच्या राजाची कन्या क्रीसा हिजवर त्याची प्रीति बसली. तेव्हां मेडिया मत्सरानें चवताळून तिनें आपली जादू चालविली, आणि आपल्या सवतीचें वस्त्र विषांत बुडवून काढिलें. त्यायोगानें तिचें आंग सडून जाऊन ती मरण पावली. मग मेडियेनें आपलीं दोन मुलें मारून टांकिलीं व सपक्ष ड्रेगन* जोडिलेल्या रथांत बसून ती गुप्त जाहली.

ह्या गोष्टीवरून ग्रीकलोक प्राचीन काळीं लांबचा जलप्रवास करीत असावे असें वाटण्याजोगें आहे. तथापि ती तशीच खरी

---

* हा भयंकर काल्पित प्राणी उरग कोटींतील असून यास पक्ष होते अशी ग्रीक लोकांत समजूत होती.

मानितां येत नाहीं हें उघड आहे; परंतु कोणत्या ऐतिहासिक गोष्टीवर तिचा पाया आहे हें सांगणें अशक्य आहे. आहे ह्या स्थितींत ती गोष्ट या बालस्वभावाच्या ग्रीक लोकांचा विश्वास कोणत्या प्रकारच्या गोष्टींवर बसवितां येत होता याचा पुरावा आहे असें मानावें लागतें.

थीब्सचें राजघराणें– थिब्सचा राजा **लाबेडकास** याच्या मागून त्याचा मुलगा **लाऊस** गादीवर बसला. लाऊस यानें **जोकास्टा**शीं लग्न केलें व तिजपासून त्याला **ईडियस** नांवाचा पुत्र झाला. ह्या इडियसच्या हातून आपला मृत्यु आहे असा लाऊस यास कौल मिळाल्यावरून तें मूल हिंस्र पशूंच्या भक्ष्यस्थानीं पडावें अशा हेतूनें त्यानें त्या मुलाला किथिरान पर्वतावरील अरण्यांत टाकिलें; परंतु तें एका घनगराला सांपडलें, व घनगरानें त्याला कोरिन्थचा राजा पालीबासकडे नेलें त्या राजाच्या राणीला संतान नसल्यामुळें तिनें त्या मुलाला पोटच्या मुलाप्रमाणें पाळिलें, पुढें तो वयांत आला तेव्हां आपले खरे आईबाप कोण हें जाणण्याची त्याला सहजच उत्कंठा लागली, व तो डेल्फाई येथें कौल घेण्यास गेला. आपल्या हातून बापाचा मृत्यु आहे असें तेथें त्याला समजलें. तेव्हां न जाणो पालिबस आपला खरा बाप असेल असें समजून पितृहत्येचें पातक घडण्याचा संभवच टाळावा अशा हेतूनें त्यानें कोरिन्थ येथें परत न जाण्याचा निश्चय केला. फिरतां फिरतां एका अरुंद दरींत त्याची व त्याचा बाप लाऊस यांची गांठ पडली. त्या दोन प्रवाशांच्या लवाजम्याच्या लोकांत तंटा उत्पन्न झाला. पुढील मारामारींत लाऊस ईडियसच्या हातून मारला गेला. आपल्या गुन्ह्याचें स्वरूप न जाणून ईडियस थिब्सकडे गेला. तें शहर या

वेळीं मोठ्या संकटांत पडलें होतें; कारण स्फिन्क्स नांवाचा एक राक्षस—ज्याचा निमे देह सिंहाकृती व निमे स्त्रीच्या आकृतीचा होता- एका टेंकडीवर रहात असे.त्या बाजूनें जाणाऱ्या लोकांस तो एक कोडें घाली, व ज्यास तें सुटत नसे त्याचा कडेलोट करी. ईडियसानें तें कोडें सोडविलें, व त्यामुळें स्फिन्क्सानें आपला कडेलोट करून घेतला. जो त्या राक्षसापासून थीब्स सोडवील त्याला मी वरीन व तो गादीचा मालक होईल, असें थीब्सची गतभर्तृका राणी जोकास्ता हिनें जाहीर केलें होतें. जोकास्ता आपली आई आहे हें न जाणून ईडियसानें तिच्याशीं विवाह केला, व तिच्यापासून त्याला **इटिओक्लीस** आणि **पोलिनिकस** असे दोन मुलगे आणि **अन्टीगोन** व **इसमीन** अशा दोन मुली झाल्या.

हा दुर्दैवी विवाह झाल्यापासून थीब्सवर सर्व प्रकारचीं संकटें ओढवलीं. त्याचें कारण कोणालाही कळेना. शेवटीं कौल लावून त्या सर्व भयंकर गोष्टी (पितृवध व मातृविवाह) बाहेर आल्या. तेव्हां हताश होऊन जोकास्तानें आत्महत्या केली. ईडियसनें आपले डोळे फोडून घेतले, आणि आपली ममताळू मुलगी अन्टीगोन हिला बरोबर घेऊन एकाद्या भिकाऱ्याप्रमाणें परदेशांत भटकूं लागला. कांहीं काळानें **आटिकांतील कोलोनास**च्या डोंगरावर तो मरण पावला. त्याच्या मागें त्याचे दोन मुलगे त्याच्या गादीवर बसले, परंतु लवकरच त्यांचा आपसांत कलह माजला. प्रत्येकाला कुमक मिळून युद्धास आरंभ झाला. ह्याला ' थीब्सबरोबर सातांचें युद्ध' असें म्हणतात. शहराला वेढा पडला.युद्ध फारवेळ चाललें होतें. शेवटीं द्वंद्वयुद्ध होऊन इटिओक्लीस व पोलिनिकस यांनीं एकमेकांच्या शरीरांत भाले खुपसले व त्यामुळें ते मरण

पावले. त्यांच्या वंशजांनींही वडिलांचें उसनें उगविण्याकरितां थीब्स बरोबर युद्ध चालविलें व थीब्स शहराचा नाश झाला.

'ट्रॉयचें युद्ध' हें पौराणिककालांतील सर्व युद्धांत अति प्रख्यात आहे. ही ख्याती होमरकृत ईलियड नांवाच्या अमर काव्यानें झाली आहे. ट्रॉयच्या वीरांचे पराक्रम गाण्याकरितां जीं विररसप्रधान काव्यें झालीं त्यांतील हेंच एक हा कालपावेतों राहिलें आहे. ट्रॉयच्या युद्धाची कथा थोडक्यांत अशी आहे;-- हेरा (जुनो) अथेना (मिनरव्हा) आणि आफ्रोडाइट (व्हिनस) या तीन देवतांचा सौंदर्यावरून वाद लागला. त्याचा निकाल करण्याकरितां ट्रॉयचा राजा प्रायम याचा मुलगा पारीस याची निवड झाली. सौंदर्याची व प्रीतीची देवता आफ्रोडाइट हिच्यातर्फे त्यानें निकाल केला, व तिनेंही उलट त्याला अति रूपवती बायको देण्याचें वचन दिलें- झियस आणि लेडा यांची कन्या हेलन इतकी लावण्यवती होती कीं तिला वरण्याकरितां ग्रीस देशांतील सर्व राजांनीं मागणी केली. स्पार्टाचा राजा मेनेलॉस यास हेलननें वरिलें; आणि तिच्या योगानें कधीं कांहीं संकट ओढवल्यास मेनेलॉसचा पक्ष घेऊन त्याला मदत करण्याविषयीं तिच्या पोसक्या बापानें सर्व ग्रीक राजांकडून शपथ घेवविली. एका प्रसंगीं पारीस स्पार्टा येथें गेला, आणि आफ्रोडाइटच्या सहायानें त्यानें हेलनची प्रीति संपादून केली; इतकेंच नाहीं तर आतिथ्याच्या नियमाच्या अगदीं विरुद्ध वर्तन करून तिला पुष्कळ द्रव्यासह पळवून नेलें. तिला परत पाठवावें अशी मागणी केली असतां ट्रोजनलोकांनीं ती मानिली नाहीं. तेव्हां आपल्या शपथा आठवून मेनेलॉसाच्या अपमानाचा मूड

उगविण्यास सर्व ग्रीक राजे सिद्ध झाले. मेनेलॉसाचा भाऊ जो मायकेनीचा राजा आगामेमनान यास अधिपती करून त्यानीं ट्रॉयवर स्वारी केली. आलीस बंदरांतून १२०० गलबतांनिशीं ते निघाले. आगामेमनन सेनानी होता खरा; परंतु थेटीस देवीचा पुत्र आकिलीस त्याच्याहून व सर्व ग्रीक सरदारांहून धैर्यानें व शौर्यानें अधिक होता. ट्रोजन सैन्यांतील मुख्य योद्धा प्रायमचा मुलगा हेकटर होता. एका प्रसंगीं आगामेमनान यानें आकिलीसाचा मोठा अपमान केला व त्या मुळें आकिलीसनें युद्धांतून आपलें अंग काढिलें, आणि ट्रोजनलोकांनीं ग्रीकलोकांस बहुतेक आपल्या देशांतून घालवून दिलें. परंतु निकराच्या वेळीं जेव्हां आपला मित्र पेट्रॉक्लास पडला असें आकिलीसानें पाहिलें तेव्हां तो पुनः युद्धांत शिरला व शेवटीं हेकटराला त्यानें मारिलें. नंतर त्याच्या शवाचा पाय आपल्या रथाला बांधून त्यानें तीनदां तें शहरा-भोंवतीं फिरविलें. हें युद्ध दहा वर्षें चाललें, आणि लांकडी घोड्याच्या प्रख्यात युक्तीनें ग्रीकलोकांनीं ट्रॉय शहर घेतलें. आशिया मायनर व त्या पलीकडील प्राच्यदेशांतील लोकांची ट्रोजनांस मदत होती असें म्हणतात. ट्रॉय शहर जिंकिलें तें ख्रिस्ती शकापूर्वी ११८४ व्या वर्षीं असें बहुतेक मानितात.

ही कथा व तत्संबंधाच्या होमराच्या व इतर काव्यांतून ज्या दुसऱ्या लहान सहान विस्मय वाटण्याजोग्या गोष्टींचें वर्णन आहे त्या सर्वच एतिहासिक आहेत असें मानितां येत नाहीं. तथापि एका काळीं युरोपांतील ग्रिक आणि आशिया मायनराच्या वायव्य दिशेस राहणारे लोक यांमध्यें खरोखर मोठें युद्ध झालें, असें मानण्यास हरकत नाहीं. हें युद्ध ग्रिकलोकांनीं आशियाखंडाचा तो भाग

जिंकण्याचा यत्न केल्यामुळें झालें असावें; कारण ग्रीकलोकांच्या पहिल्या वसाहती त्याच प्रदेशांत झाल्या, आणि शिवाय या वसाहतींचा स्थापक आगामेमनान होता असें मानिलें आहे.

हे वीर टॉयहून परत आले त्या वेळीं पूर्वस्थिति बदलून नवीन स्थितीस आरंभ झाला होता. त्यांपैकीं पुष्कळ असामी ढाईत पडले होते, कांहीं मार्गांत मरण पावले होते व कांहींना देशीं पोंचण्या पूर्वी बरीच वर्षें भटकावें लागलें होतें. ते देशीं पोंचले तेव्हां आपली गादी दुसऱ्यांनीं बळकाविली आहे, व आपल्या राज्यांत बेबंदशाई माजली आहे असें त्यांस आढळून आलें. या प्रमाणें आगामेमनान मायकेनीस परत आला तेव्हां त्याची स्त्री क्लिटमनेस्ट्रा हिचें प्रीतिपात्र ईजिस्थास यानें त्याचा खून केला. आडीसियस यास आपली गादी व स्त्री पेनिलोप यांस मिळवूं पाहणाऱ्या पुष्कळ लोकांशीं झगडा करावा लागला. किंवहुना ट्रोजन लढाईवरील पवाड्यांसारखेच हे वीर ट्रॉयहून परत आल्या वेळच्या गोष्टींचे पवाडे ग्रीक काव्यांत आहेत. या नंतर हे वीर इतिहासांत अगदीं आढळत नाहींत; व या पुढील ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत त्यांस मात्र खरोखर इतिहासाचें स्वरूप आहे असें वाटूं लागतें.

भाग २ रा

पौराणिक कालांतील सुधारणेची स्थिति.

ट्रोजन युद्ध व त्या वरून घडलेले तात्कालिक परिणाम यां बरोबर पौराणिक काल संपतो; तेव्हां त्या वेळच्या सुधारणेच्या स्थितीचें-युरोपियन भाषांतील अति प्राचीन ग्रंथ, म्हणजे इलियड व ओडेसे, या काव्यांतून जेवढी माहिती दृग्गोचर होतेतेवढीचें-सिंहावलोकन करणें योग्य दिसतें.

या पौराणिक कालाचें विशेष लक्षण झटलें म्हणजे देव व मनुष्यें यांमधील विलक्षण संबंध होय. हे देव थिसलीच्या ईशान्येस जो ओलिम्पस पर्वत आहे त्यावर वास करीत असें मानीत असत. तेथून ते पुष्कळदां खालीं उतरून नश्वर मनुष्यांत मिसळत व त्यांच्या व्यवहारांत पडत. लढाईच्या प्रसंगीं कांहीं देव एका पक्षास व कांहा दुसऱ्या पक्षास हमेप मिळत असत. ते मनुष्यांत अवतीर्ण होतांनां एखादें मानवस्वरूप धारण करीत; आपलें दैवी दैदीप्यस्वरूप क्वचितच दाखवीत, कारण तें मनुष्याच्या निर्बळ इंद्रियांस सहन झालें नसतें. तथापि ते देव पुरुप अथवा स्त्री जातीच्या नराकृतीचे होते असें सर्वत्र समजत असत. परंतु देवांच्या रूपांतराची ही कल्पना पौराणिक कालांत धर्मा-विषयींचे विचार वृद्धिंगत होतां होतां बऱ्याच कालानंतरची असावी. कारण अगदीं प्राचीन ग्रीक लोक अथवा पिलासजियन लोक हे सृष्टींतील जीं निरनिराळीं तत्वें सूर्य, चंद्र, मेघ, वायु, समुद्र, धरणीकंप, वीज व तिचा कडकडाट यांमध्यें दिसतात; त्यांची पूजा करीत. किंबहुना जेव्हां जेव्हां एखाद्या सृष्टींतील तत्वांचें कर्तृत्व त्यांचे

दृष्टीस पडे तेव्हां तेव्हां तें एखाद्या देवतेचा आविर्भाव आहे असें मानून ते त्यास पूज्य समजत. ह्या बाबतींत जुन्या ग्रीक धर्मा-चें त्यांच्या प्राच्य आर्यबंधूंच्या धर्माशीं फार साम्य आहे. येणें प्रमाणें झियस पासून तेजाची उत्पत्ति, आपोलो पासून सूर्याची, आरटेमीस ऊर्फ डायनापासून चंद्राची, प्राँसीडान ऊर्फ नेपचून (वरूण) पासून सागराची असें मानीत, आणि आथेना ही ज्ञान व शौर्य यांची प्रतिमा आहे असें समजत. परंतु देव मनुष्याकृती असून त्यांच्या अंगी मर्त्य मनुष्यांचे सर्व दोष व मनोविकार वास करितात अशी कल्पना लोकांच्या मनांत एक वेळ शिरली तेव्हां पासून देवांविषयींच्या जुन्या प्रगल्भ कल्पना हळूहळू सुटत चालल्या. तरी त्यांच्याविषयींच्या पुष्कळ गोष्टींत प्राचीन उदात्त कल्पनांचें प्रतिबिंब दिसतें; आणि पुष्कळदां ज्या गोष्टी आपणांस पोरकट व बीभत्सही वाटतात, त्यांत देखील सृष्टपदार्थांची शक्ति व परिणाम यांविषयीं प्रौढ विचार गोंविलेले आढळतात. प्रत्येक देव अमर असून तो प्रत्येक आपापल्या विषयांत अगर गुणांत सर्वशक्तिमान आहे अशी समजूत होती, परंतु त्यांचेवरही एक शक्ति आहे.व ती कर्म होय. ह्या कर्माच्या गहन व निर्विकल्प सामर्थ्यापुढें देवांनांहीं नमावें लागे; व ह्या कर्माच्या चक्रांतून मनुष्यानें कांहीं केलें तरी त्याची सुटका होणें नाहीं हें इडिपसच्या गोष्टीवरून दिसतें. देवतांस बळि द्यावे व त्यांची प्रार्थना करावी, म्हणजे ह्यायोगानें देवांचा क्षोभ घालवून त्यांस प्रसन्न करितां येत असे. बळी जितका उंची तितकें त्याचें फळ जास्त अशी समज असल्यामुळें बळीमध्यें मनुष्याचीही गणना होत होती. कांहीं कालानंतर या देवांच्या संगमरवरी व ब्राँझ धातच्या (तांबें व पितळ यांचें मिश्रण) मूर्ति झाल्या, व त्यांची

देवळांतून स्थापना झाली. परंतु कधीं कधीं तर एखादी ओबड धोबड मूर्ति अगर धोंडा आकाशांतून पडला असें मानून त्याची देवांचें चिन्ह म्हणून पूजा होई. इतकें झालें तरी ग्रीक लोक खरोखर मूर्तिपूजक होते असें समजतां नये. त्यांच्यांत मूर्तिपूजा असेल तर ती फार अर्वाचीनकाळीं प्रचारांत आली असावी, आणि देव आणि त्यांचीं चिन्हें यांतील भेदाभेद न समजणाऱ्या मूढ लोकांतच ती प्रचलित असावी असें दिसतें.

ह्या देवांचें अंगीं कित्ता घेण्याजोगें वर्तन व चांगुलपणा असल्याचें कवींनीं वर्णन केलेलें नाहीं. तथापि मनुष्यांच्या दोषांबद्दल ते इहलोकीं व परलोकीं शासन करीत अशी समजूत होती. कारण एक प्रकारें आत्मा अमर आहे असें ते लोक मानीत. परंतु त्यांच्यामतें पाताळलोकीं आत्म्याचें जीवित इतकें कष्टमय होतें कीं, पाताळांत राजा होण्यापेक्षां इहलोकीं भिकारी होऊन राहण्यासही आपण कबूल आहों असे मोठ्या वीरानें उद्गार काढिले होते. सर्वांत श्रेष्ठ देव जो झियस तो आदरातिथ्याची देवता असून परकीय लोक व भिकारी लोकांचा प्रतिपाल करणारा असें मानीत. शपथेचा भंग केल्यास झियस शासन करी असेंही मानीत.

भावी स्थितीचें कांहीं तरी ज्ञान आपणास मिळावें अशी साहजीकच सर्व मनुष्यांची इच्छा असते. हें ज्ञान आकाशांतील नक्षत्रें, स्वप्नें व दुसऱ्या सृष्टिचमत्कारांपासून अनेक तऱ्हेनें मिळवितां येतें अशी ग्रीक लोकांची समजूत होती. किलकस, टिरेशियस इत्यादि कित्येकांस भविष्यवादाची देणगी ईश्वरापासून मिळाली आहे असें ते मानीत. शिवाय अशीं कांहीं स्थळें होतीं

कीं जेथें देवच माणसांस भविष्याची प्रेरणा करीत. त्यांपैकीं अति जुनाट व अति विख्यात स्थळ एपिस मधील डोडोना, ज्यांत झियसचा गाभारा होता, तें होय. परंतु हें स्थळ डेल-फाई येथील विख्यात आपॉलोच्या गाभाऱ्यानें मागें पडलें. डेलफाई येथें राजेरजवाडे व खासगी गृहस्थ प्रसाद व कौल घेण्या करितां जात, व तेथें देवांचा कौल घेतल्याशिवाय मोठ्या कार्यास कधींही आरंभ करीत नसत.

युद्धकला व नौकाशास्त्र यावेळीं बाल्यावस्थेंतच होतें. ग्रीकलोक ज्या गलबतांतून ट्रॉय येथें गेले तीं उघड्या होड्यां सारखीं असून कांहींत १२० माणसें व कांहींत अवघीं ५० माणसें बसण्या जोगी जागा होती. ह्या युद्धांत सैन्यें असल्याचें वर्णन आहे खरें; परंतु कवींनीं बहुशः वीरांच्या झगड्याचेंच वर्णन केलें आहे व देवांनीं हात घातला नाहीं तर लढाईचा निकाल नेहमीं द्वंद्वयुद्धांतच लागत असे. इतरलोक बहुतेक शोभेपुरतेच असत. प्रत्येक वीर तरवार, भाला आणि धनुष्यबाण यां निशीं सज्ज होऊन सारथ्यासह दोन घोड्यांच्या रथांत बसून युद्धास जाई. शरणांगतास प्राणदान मिळत नसे, आणि पुष्कळदां शत्रूच्या शवाचीही क्रूरपणें निर्भत्सना होत असे. लढाईतील कैदी व विशेषेंकरून बायका विजयीलोकांत गुलाम म्हणून वांटल्या जात, व पुरुषांस जिवें मारीत.

यावेळीं सर्व ग्रीस देशाला एक नांव नव्हतें: या देशाचे विभाग होऊन पुष्कळ संस्थानें झालीं होतीं. प्रत्येक संस्थानांत एक पिढीजाद राजा असे. महत्वाच्या प्रसंगीं राजा थोर घराण्यांतील लोकांची सभा भरवी. ह्या सभेंत राजा म्हणजे केवळ

पहिल्या मानाचा एक सभासद असे. (या पेक्षां त्याची सत्ता जास्त नव्हती). इतर प्रजा--म्हणजे बड्या घराण्यांत ज्यांची गणना नव्हती असे लोक--खिसगणतींत नव्हते. आपण समजतों त्या प्रकारचे कायदे नव्हते. प्रत्येक बाबतीचा निर्णय जुनी पद्धत व दाखले यांवरून होत असे.

त्या वेळचें गृहवर्तन फार साधें होतें हें उघडच दिसतें. स्थिती मिडॅल* एजीस मध्यें इंग्लीश लोकांची जशी होती तशीच त्या वेळच्या लोकांची स्थिति असे. राण्या व राजकन्याही पाणी आणणें व कपडे धुणें येथपर्यंत घरांतील सर्व कामें करीत. ऐतिहासिककालापेक्षां याकालीं स्त्रियांस जास्त मोकळीक असे. बडे-लोकांची मुख्यत्वेंकरून शौर्याबद्दल, कधीं कधीं शहाणपणाबद्दल ख्याती असे; त्यांचे जवळ पुष्कळ गुलाम असत; हे गुलाम बहुशः लढाईंत सांपडलेले कैदी, परदेशी व्यापाऱ्यांकडून विकत घेत-लेले लोक, अगर यजमानाच्या घरांत गुलामांच्या पोटीं जन्मलेले असत. ग्रीकलोक जरी गुलामांस कडकरीतीनें वागवीत तरी स्वार्था शिवाय इतर ठिकाणीं ते विनाकारण त्यांच्याशीं निष्ठूरपणा व उद्दामपणा दाखवीत नसत. बडेलोक आपल्या जमिनीची लागवड पैऱ्यांकडून अथवा गुलामांकडून करवीत; परंतु गुला-मांचा उपयोग बहुतकरून घरगुती कामाकडे जास्त करीत. ग्रीकलोक नेहमीं व विशेषतः पौराणिक कालांत मितव्ययी होते. दारूबाजीचें वर्णन क्वचितच आढळतें.

त्यावेळचा सर्व व्यापार ऐनजिनशी मालाच्या उलट सुलट देवघेवीनें होत असे. आणि सोन्या रुप्याची रेलचेल असतां व ब्रोन्झ आणि लोखंड सर्वत्र उपयोगांत असतांही नाण्याचें कोठें नांव नाहीं. चांचेपणाचा धंदा अप्रतिष्ठित समजत नसत; व तो धंदा पुष्कळ लोक करीत. किनाऱ्यावरील प्रांतांत चांचेलोक

---

* मिडल एजीस =

मनुष्यांस व गुरांढोरांस चोरून नेत, व माणसांस गुलाम म्हणून विकीत. या धंद्यांत चातुर्य व शौर्य दाखवून एखाद्याला नांव-लौकीकही मिळवितां येई.

शस्त्रांचा उपयोग करण्यांत कौशल्य, पळण्यांत चपळता, व चांगला खणखणीत आवाज या तीन गोष्टींचें नांव युद्धकला असें त्यावेळीं मानीत असत. या वेळचें भूगोलज्ञान ग्रीस व सभोंवतीचीं बेटें आणि आशियामायनरचा वायव्य किनारा या पलीकडे नव्हतें. इतर देश, इटली आणि सिसिली सुद्धां, बिलकूल माहीत नव्हते, आणि ह्या दोन देशांविषयीं व दुसऱ्या जवळील देशांविषयीं चमत्कारिक समजुती होत्या. प्राचीनकाळीं विद्येचे ग्रंथ म्हणण्याजोगे नव्हते. कारण लेखनकला ग्रीस देशांत जरी फार प्राचीनकाळीं आली होती, तरी हल्लीं उपलब्ध असलेल्या गोष्टींत तिचें नांवही नाहीं. परंतु पवाडे यावेळीं बरेच असावे असें मानण्यास सबळ कारण आहे. ह्या पवाड्यांत वीरांच्या पराक्रमांचें वर्णन व देवांच्या स्तुती आहे. खुद्द इलियड हा ग्रंथ पुष्कळ पवाडे मिळून झालेला असावा, व हे पवाडे पुढें कोणी एकानें अगर पुष्कळांनीं चातुर्यानें गुंफून एक काव्य बनविलें असावें. इलियड व ओडेसी या काव्यांचा कर्ता मानिलेला होमर ख्रिस्ती-शकापूर्वी ९०० वर्षांच्या सुमारास होऊन गेला असें बहुतेक समजतात. कांहींसा पाठीमागून झालेला दुसरा कवी हेसिअड याची भाषा कांहींशीं होमरच्या भाषेसारखी आहे, पण त्याच्या काव्याचे विषय फार भिन्न आहेत. कारण त्यानें देवाच्या उत्पत्तीविषयीं व प्रचारांतील नेहमींच्या व्यवसायांचें वर्णन केलें आहे. हेलनीक देवांविषयींच्या कल्पना व मतें नक्की करण्याचे कामीं या दोन ग्रंथकारांची पुष्कळ मदत झाली आहे.

भाग ३.

ट्रॉयच्या लढाईपासून स्पार्टन लोकांनीं मेसिनिया प्रांत जिंकला एथपर्यंतची हकीकत.

ट्रॉयच्या लढाईनंतरचें पहिलें शतक ग्रीकलोकांत स्वदेश सोडून परदेशांत एकामागून एक अशा अनेक वसाहती करण्यांत गेलें. स्वमुलखीं रहात असलेले ग्रीकलोक जरी एकाच वंशाचे होते, तरी त्यांच्या भाषेंतच नाहीं तर लोकांच्या स्वभावांत आणि निरनिराळ्या कुळींच्या रीतिभातींत कांहीं विशेष भेद होते, हें येथें सांगणें अवश्य आहे. यांची बरीच पसरलेली आकियन नांवाची एक शाखा होती ती थेसली व पेलापोनिसाच्या बहुतेक भागांत होती. कालांतरानें या लोकांचे डोरियन, आयोनियन आणि इओलीयन असे तीन मोठे विभाग झाल्याचें दिसून येतें. प्रत्येक विभागाचे लोक हेलासाच्या निरनिराळ्या भागांत रहात होते, तरी ते सर्व आपली उत्पत्ति हेलन नांवाच्या पौराणिक पुरुषापासून आहे असें समजत असत. डोरियन शाखेचे लोक आरंभीं माँट पारनेससच्या इशान्येकडील लहानशा प्रदेशांतच रहात होते. ते मेहनती, शूर असून त्यांची बोली कर्कश व हेळयुक्त होती. आयोनियन लोकांची बोली मधुर असून तींत स्वरोच्चारांचा भरणा विपूल होता. ते कुशाग्रबुद्धि व सहास या गुणांबद्दल विख्यात् होते. सदा कांहींना कांहीं सुधारणा करण्याकडे त्यांचा कल असे. परंतु डोरियन लोक विशेषतः रुढीचे भक्त असल्यामुळें बहुतेक बाबतींत त्यांची मूळ स्थिति सुटली नाहीं. आयोनियन लोक पश्चिमग्रीसांत पेलापोनिसाच्या उत्तरभागांत व अटीका प्रांतांत

रहात होते. बोली व स्वभाव या कामांत इटोलीयन लोकांचीं या दोहोंच्या दरम्यानची स्थिति होती; तथापि त्यांच्या भाषेंत शब्दांचें अगदीं प्राचीन रूप दिसून येत होतें. या तीनही प्रकारच्या लोकांत जी जी सुधारणा झाली तिचा दुसऱ्या लोकांच्या सुधारणेशीं संबंध नसून, ती स्वतःसिद्ध होती; यामुळें त्यांचीं कलाकौशल्यें व ग्रंथरचना यांचीं स्वरूपें अगदीं भिन्न झालीं. प्रत्येक विभागांतिल लोकांत प्रसंगानुसार त्यांच्या त्यांच्यांतले नैसर्गीक गुण विकास पावले. ग्रीसदेशांत एकसारखी पद्धत किंवा एकतंत्री कारभार आढळत नाहीं याचें कारण हेंच होय.

ग्रीक लोकानीं परमुलखांत पहिली वसाहत केली ती, ट्राय शहराचा नाश झाल्यापासून सुमारें साठ वर्षांनीं, एपिरसचे रहिवाशी जे थेसालियन लोक ते पर्वत ओलांडून ज्या प्रदेशांत गेले त्यास त्यांच्या वरूनच थेसली हें नामाभिधान पुढें मिळालें. तेथें जाऊन तेथील कांहीं लोकांस त्यांनीं दास बनविलें व कांहींस देश सोडून जाण्यास लाविलें. ह्या दुसऱ्या वर्गापैकीं बिओशियन लोक दक्षिणेकडे गेले व ज्याला पुढें त्यांचे वरून बिओशिया नांव पडलें तो देश त्यांनीं बळकाविला. ह्या देशांत तेथपावेतों काडमीयन व मिनयन लोक रहात असत. त्यांस आतां तेथून हांकविल्यामुळें ते आशियामायनरच्या वायव्यदिशेच्या किनाऱ्यावरील प्रदेशाकडे गेले. त्यांना पेलापोनीससहून एकियन लोक मिळाले. तेथें त्यांनीं निरनिराळ्या वसाहती केल्या. या वसाहतींस इओलियन वसाहती ह्मणतात.

यापेक्षां बरेंच जास्त महत्वाचें देशांतर झालें तें पेलापोनीससमध्यें डोरियन लोक गेले तें होय. त्याप्रांताचा बराच मोठा

व सर्वांत सुपीक भाग त्यांनीं जिंकिला. हें ख्रिस्ती शका पूर्वी ११०४ यावर्षी झालें असावें. हें होण्यास कारण पेलापोनीसस-च्या कांहीं भागांवर हेराक्लीसच्या वंशजांनीं हक्क सांगितला हें होय असें सांगतात. ह्या देशांतर करणाऱ्या लोकांत डोरियनांची संख्या थोडीच असली पाहिजे; परंतु ईटोलिया व दुसऱ्या देशांतील साहसी लोक मिळाल्यानें त्यांच्या सहायानें त्यांनीं हळुहळू मूळच्या राहिवाश्यांस जिंकिलें व त्यांस दास्यत्वास मिळविलें व कित्येकांस परदेशांत जावयास लाविले. पेलापोनि-ससचा मधला उंच प्रदेश जो आरकेडिया तो मात्र जिंकिला गेला नाहीं व बराच काळ पावेतों त्याचें पूर्वीचें पिलासजियन स्व-रूप गेलें नाहीं. त्या विजयी सरदारांनीं जिंकिलेला प्रदेश आप-सांत वांटून घेतला. एलिस प्रांत स्वारी करणाऱ्या लोकांचा नायक इटोलियन आक्सीलास याच्या वांट्याला आला. त्यानें शहाण-पणानें व दक्षतेनें कारभार केला. मूळच्या लोकांच्या जमिनीचा कांहीं भाग मात्र त्यानें घेतला. आगेमेमनानचा नातू टिसामेनास यानें पेलापोनीससच्या उत्तरकिनाऱ्यावर आयोनियन लोकांत लढाई न करितां ठाणें देण्याचा यत्न केला; पण तो फुकट गेला तेव्हां त्यानें त्यांच्याशीं लढाई केली व तींत त्याला यश आलें. त्यानें आयोनियन लोकांस घालवून बरोबरील एकियन लोकांनिशीं कबजा केला. तेव्हां पासून त्या किनाऱ्यावरील प्रदे-शास एकाईआ हें नांव पडलें. हे घालवून दिलेले आयोनियन लोक आटिका प्रांतांतील आपल्या बांधवांत जाऊन राहिले; परंतु आटिकांत सुपीक प्रांत थोडा व लोकवस्ती जास्त असें पाहून आयोनियन लोकांनीं हें आश्रयस्थान सोडिलें व दुसऱ्या साह-सीलोकांस बरोबर घेऊन ते आशियामायनरच्या किनाऱ्याकडे गेले; तेथें त्यांनीं इयोलियनलोकांच्या दक्षिणेस वसाहती केल्या.

मध्यंतरी पेलापोनीससमधील डोरियन सरदारांनीं जिंकलेल्या प्रदेशांची आपसांत वांटणी करण्याचा सपाटा चालविला. डोरियन सरदार आरिस्टोडेमास, जो देश जिंकितांना मरण पावला होता, याचे जुळे मुलगे यूरिस्थेनेस व प्रोक्लीस यांच्या वांट्यांस ल्याकोनिया प्रांत, मेसेनियांतील क्रेसफाटेन्स व आरागासमधील टेमेनास हीं स्थळें आलीं. या दोघांनीं स्पार्टा आपली राजधानी केली व जिंकिलेल्या एकियनलोकांस जिंकणाऱ्या डोरियन लोकांप्रमाणेंच हक्क दिले. परंतु त्यांच्या एका वंशजानें जुन्या लोकांस जिंकिलेल्या लोकांच्या स्थितीस पोंचविलें. हेलास शहरांतील लोकांनीं स्वातंत्र्या करितां निकरानें झगडा केला; परंतु शेवटीं त्यांचा पराभव होऊन त्यांस गुलामाची दशा प्राप्त झाली; तेव्हां पासून ल्याकोनियांतील सर्व गुलामांस हेलट ह्मणूं लागले. हे देश थोड्याच वेळांत जिंकिले ह्मणतात; परंतु ल्याकोनिया, मेसेनिया व इतर ठिकाणचीं पुष्कळ शहरें पुष्कळ वेळ आपल्या स्वातंत्र्या करितां लढलीं असें मानण्यास भरपूर पुरावा आहे. डोरियन लोक या पलीकडेही देश कावीज करीत गेले; आणि आलेटेस नांवाच्या हेराक्लीसच्या वंशजानें कोरिन्थ हस्तगत करून नव्या राजघराण्याची स्थापना केली. देश जिंकण्याच्या कामीं झालेल्या लढायां मुळें पेलापोनीससचे बरेच भाग उजाड झाले व त्याच्या योगानें कावीज करणाऱ्या लोकांस दुसऱ्या भागांत जावें लागलें. कोरिन्थ घेतल्यानें ते आटिकाच्या सीमेला येऊन भिडले. या वेळीं आटिकांत कोद्रोस नांवाचा राजा राज्य करीत होता. आलेटेसनें आटिकावर स्वारी केली. डोरियन लोकांनीं त्या आथेनियन राजाचा प्राण वांचविला तर त्यांस यश येईल असा कौल झाला होता. ही गोष्ट आथेनियन लोकांस समजली तेव्हां

आपल्या देशा करितां आपला जीव वळी देण्याचा त्यांच्या उदार बुद्धीच्या राजानें एकदम निश्चय केला. एका लांकूड तोड्याचा वेश घेऊन तो शत्रूंत शिरला व त्या पैकीं एकास त्यानें ठार केलें. हें कृत्य पाहून डोरियन लोक त्याच्या आंगावर घुसले व त्याचा त्यांनीं प्राण घेतला. आथेनियन राजाला आपण मारिलें हें उमगतांच डोरियन लोकांस धडकी बसली व त्यांनीं आपलें सैन्य आटिकांतून काढिलें.

या प्रमाणें आटिकाप्रांत डोरियन लोकांच्या हातून सुटला. परंतु त्याच्या एका भागांत, (ज्याला मागाहून मिगारा नांव पडलें) कोरिन्थाहून गेलेल्या डोरियन लोकांनीं वसाहत केली. तसेंच ईजिनावेट डोरियन लोकांनीं वळकाविले. या पेक्षां फार महत्वाचा जय या लोकांस मिळाला तो क्रेटवेट त्यांनीं जिंकिलें हा होय. पेलापोनीसस जिंकितांना बराच काळ पावेतों बंडाळी चालली होती. या वेळांत पुष्कळ साहसी डोरियन लोक आपणांस जें मिळालें त्यानें संतुष्ट न होतां, लुटीचा वांटा मिळवितां न आल्यामुळें र्‍होडस आणि क्रेट या वेटांत गेले. क्रेट मध्यें त्यांस फारसा अडथळा झाला नाहीं; कारण रोग व दुष्काळ यांनीं तें वेट बहुतेक निर्जन झालें होतें. या मुळें त्यांनां बिनहरकत तेथें वसाहत करून आपलें जुनें राष्ट्रीय स्वरूप व संस्था कायम ठेवितां आल्या. ह्या संस्थांविषयीं विशेष पूज्य बुद्धि उत्पन्न होण्याकरितां प्राचीन राजा मायनास यानें त्या स्थापिल्या असें साधारणपणें समजतात; तरी त्या डोरियन लोकांनींच तिकडे नेल्या हें खचीत. कारण ग्रीसच्या ज्या ज्या मागांत डोरियन लोकांनीं वसाहती केल्या, त्या त्या भागांत क्रेट प्रमाणेंच अथवा त्या सारख्या संस्था आढळतात. त्या संस्थांचें साधारणतः बाह्य

स्वरूप असें आहे:—देशांतील सर्व लोकांचे तीन वर्ग केलें होतें; (१) स्वतंत्र लोकांचा, (२) उदमी लोकांचा (पेरिइसी) (३) आणि गुलामांचा. शेवटच्या दोन वर्गांतिल लोक बहुतकरून मूळच्या रहिवाश्यांचे वंशज असावे. पेरिइसी (उदमी) लोकांस उघड्या (तटबंदीशिवाय) शहरांत रहावें लागे. त्यांस व्यक्ति स्वातंत्र्य होतें, परंतु त्यांना राज्यकर्त्या डोरियन लोकांस खंडणी द्यावी लागे. सर्व राजसत्ता डोरियन लोकांच्या हातीं होती. बरीच जमीन मूळ मालकांपासून हिसकावून घेतली होती; कांहीं खुद्द डोरियन लोकांनीं बळकाविली व कांहीं सरकारी म्हणून निराळी ठेवून सरकारी गुलामांकडून तिची लागवड करवीत. राज्य कर्ते डोरियन लोक युद्ध व शिकार यांत धुंद असत व जमिनीची लागवड पेरिइसी व गुलाम करीत. खुद्द क्रेटचे विभाग करून त्यांचीं लहान लहान संस्थानें केलीं होतीं. प्रत्येकाचा कारभार दरवर्षी निवडलेल्या १० धर्माधिकाऱ्यांच्या हातीं असे. ह्या अधिकाऱ्यांस कासमाय म्हणत. आपल्या अधिकाराची मुदत संपल्या नंतर त्यांस सिनेटचे सभासद होतां येई. ही सिनेट तीस लोकांची असून तिला "जेरोनिया" अथवा "ब्युल" ही संज्ञा होती. अमुक वयावरील सर्व स्वतंत्र लोकांची एक सभा असल्याचें वर्णन आहे. परंतु सरकारास जीं कामें त्या सभेपुढें मांडणें रास्त वाटे त्यांस संमती देण्या पलीकडे त्या सभेस कांहीं सत्ता होतीसें दिसत नाहीं.

क्रेट बेटांतिल रहाण्याच्या पद्धतींतील विशेष चमत्कारिक गोष्ट ही होती कीं सर्व स्वतंत्र डोरियन लोक (म्हातारे व तरुण) सरकारी खर्चानें एकत्र जेवीत असत. ही पद्धत इतर डोरियन संस्थानांतही आढळते. क्रेट मध्यें ह्या जमावास आन्ड्रीया ही

संज्ञा आहे व इतर डोरियन संस्थानांत सिस्सिशिया संज्ञा आहे. ह्या चालीमुळें स्वतंत्र लोकांत एक प्रकारचा जात्याभिमान उत्पन्न झाला होता; आणि तरुण लोक वृद्ध लोकांच्या आचारविचारांचें अनुकरण साहजिकच करीत असत. मुलांचें शिक्षण कडक व सक्तीनें अमलांत आणिलेलें असे; हेंच लक्षण दुसऱ्या सर्व डोरियन संस्थानांतून आढळतें.

डोरियन लोकांचें स्वरूप ल्योकानियांत जितकें दृढ बसलें व जितका वेळ टिकलें तितकें दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं. सर्वत्र शांतता व निवांत होण्यास कांहीं शतकें लोटलीं खरीं, परंतु ल्याकोनियाची राजधानी स्पार्टा हें शहर सर्व ग्रीक देशांत पहिल्या प्रतीस पावलें. स्पार्टांतील कायदे व राज्यसंस्था विख्यात कायदे करणारा लायकरगस यानें केल्या असें बहुतेक मानितात; परंतु त्या तपासून पाहतां व इतर डोरियन संस्थानांतील कायदे व संस्थांशीं ताडून पाहतां असें दिसून येतें कीं त्यांचा पाया तरी सर्वत्र एकच होता. यावरून आपल्या देशबांधवांत असलेल्या जुन्या चाली एकत्र करून त्यांचा निबंध रचण्या पलीकडे लायकरगसनें कांहीं केलें नाहीं असें अनुमान काढावें लागतें. लायकरगसचा वृत्तांत खात्रीपूर्वक मिळत नाहीं. त्यानें केलेल्या कायद्याची वेळ खिस्ती शका पूर्वी ८८४ वें वर्ष आहे असें बहुत करून मानितात; परंतु त्यापूर्वी दोनशें वर्षें तो कायदा झाला असेंही कित्येक समजतात. स्पार्टांत नेहमीं एकदम दोन राजे राज्य करीत. ते यूस्थेनेस व प्रोक्लीसच्या वंशांतले असत. लायकरगसचा या राजघराण्या पैकीं एकाशीं संबंध होता. त्याच्या राणीच्या मनांत लायकरगसशीं विवाह करण्याचें होतें, म्हणून त्याला राज्य मिळवून देण्याकरितां आपल्या मुलास मारण्याची तिनें

मसलत केली, परंतु लायकरगसच्या न्यायबुद्धीला असली मसलत खपेना. तेव्हां त्या राणीच्या दुराग्रहांतून आपण सुटावें व तरुण राजपुत्रास गादी मिळावी ह्मणून तो स्पार्टा सोडून निघाला. त्यानें आपले तारुण्याचे दिवस परदेशांत घालविले. तेथें त्यानें ज्ञान व माहिती संपादन केली. आपल्या देशबांधवांच्या आग्रहास्तव तो शेवटीं स्पार्टांत परत आला, स्पार्टांत येऊन पाहतो तों तेथें अतिशय अंदाधुंदी दृष्टीस पडली. त्यास अनुकूळ असलेल्या पक्षानें हा सर्वांत शहाणा आहे असा डेलफाईचा कौल मिळविला. त्या कौलाच्या जोरावर जरूर त्या सुधारणा व कायदे करण्याचें काम त्याला सोंपण्यास नगरवासी लोकांस त्याच्या मित्रांनीं सहजच उद्युक्त केलें; तरी त्याला पुष्कळ अडथळा सोसावा लागला. तो सोसूनही त्यानें बरेच कायदे केले, त्यांच्या योगानें राज्याची दिवाणी व लष्करी पद्धत, मालमत्तेची वांटणी, लोकांचें शिक्षण व गृहस्थिती हीं सुधर झालीं. काम पुरें होतांच तो डेलफाई येथें गेला. जातेवेळीं आपण परत येईपावेतों केलेल्या कायद्यांत फेरफार न करण्याविषयीं त्यानें लोकांकडून कडकडीत शपथ घेवविली. तो मुळींच परत आला नाहीं. जोंपर्यंत लायकरगसचे कायदे पाळाल तोंपर्यंत स्पार्टाची भरभराट होईल असा डेलफाईचा कौल झाला; या प्रमाणें त्याचे कायदे कायमचे झाले व त्या कायदे करणाराकडे लोकांचें दुर्लक्ष्य झालें परंतु त्याच्या सन्मानार्थ स्पार्टन लोकांनीं देऊळ बांधिलें व उपदेवता ह्मणून बलिप्रदानानें त्याची वार्षिक पूजा होऊं लागली.

लायकरगसच्या कायद्यानीं ल्याकोनियाच्या स्थितींत फार बदल होऊन नव्या स्थितीस आरंभ झाला. कारण

तोपर्यंत तेथें अगदीं अव्यवस्था व झोटिंग पादशाई चालली होती त्याऐवजीं आतां सुव्यवस्था व स्थायिक राज्यपद्धत चालू होऊन फार वेळ टिकली. त्या कायद्यांचा सर्व देशभर व लोकांच्या गृहस्थितीवर परिणाम झाला; आणि ज्या ठिकाणीं त्या वेळेपावेतों केवळ चाली रीतीवर कारभार चाले त्या ठिकाणीं आतां मुक्रर झालेले कायदे आले व ह्या कायद्यांस डेलफाईच्या कौलाची मंजुरी मिळाल्यानें ते पवित्र मानिले गेले. सर्व ल्याकोनियावर स्पार्टाचें वर्चस्व स्थापावें व होईल तितकी सर्व स्पार्टन लोकांची एकी करावी असा एक लायकरगसाचा मोठा हेतु होता. जमिनी संबंधाचे तंटे बखेडे मोडण्याकरितां त्यानें देशांतील सर्व स्थावर मिळकतीची अगदीं नवीन वांटणी केली असें सांगतात. येथें एवढें सांगितलें पाहिजे कीं लायकरगसाच्या मागून एक वर्षपावेतों सर्व ल्याकोनिया प्रांत पूर्णपणें डोरियनलोकांच्या अमलाखालीं आला नव्हता. परंतु त्यावेळीं जेवढा भाग त्यांचे हातीं होता तेवढ्याचे त्यानें ३९००० विभाग केले. यांपैकीं ९००० स्पार्टन लोकांस लावून दिले व बाकीचे ३०००० देशांतील स्वतंत्र असलेल्या ल्याकोनियन लोकांत वांटून दिले. दुसऱ्या माहिती वरून ही स्थावर मिळकतीची वांटणी मागाहून ह्मणजे मेसेनिया स्पार्टाच्या अमलांत आल्यावेळीं झाली असें दिसतें.

राज्यकर्त्या स्पार्टनलोकांनीं जामिनीचे उत्तम तेवढे भाग घेतले असावें हें साहाजिकच वाटतें. असें दिसतें कीं सर्व लोकांचे तीन वर्ग केले होते. ते असे:--(१) स्पार्टन अथवा राज्यकर्ते डोरियन लोक (२) गुलाम अथवा हेलट आणि (३) ल्याकोनियांतील इतर प्रजा; ह्या शेवटच्या वर्गांतील लोक मुख्यत्वें जुने एकियन रहिवाशी होते. हे लोक आपल्या विरुद्ध

बंडावा करितील अशी डोरियन लोकांस भीति असल्यामुळें त्यांना उघड्या. (तटबंदी नाहीं अशा) शहरांतून व खेड्यांतून रहावें लागे. ते स्वतः स्वतंत्र असत, परंतु त्यांना राजकीय हक्क नव्हते. त्यांना पुष्कळ भार वाहवा लागे; राज्यकर्त्यां करितां लढाया माराव्या लागत. उलटपक्षी देशांतील सर्व व्यापार धंदे व कारखानें फक्त त्यांच्याच हातीं असत; कारण हे उद्योग हलके असें राज्यकर्ते स्पार्टन मानीत. हेलट हे बहुधा जे जुने एकियनलोक आपल्या स्वातंत्र्याकरितां निकरानें लढले. व शेवटीं हतवीर्य होऊन गुलामगिरीस पोंचले ते असावे. त्यांची स्थिति ग्रीसदेशांतील इतर भागांतील गुलामांच्या स्थितिपेक्षां फार निकृष्ट होती; त्यांच्या विषयीं मनांत भीति व द्वेष बाळगीत व त्यांची झालेली मानहानी त्यांच्या मनाला लागावी व त्यांची धमक जिरून जावी ह्मणून पुष्कळदां त्यांना अमानुष क्रूरतेनें वागवीत. जमिनीशीं संबंध असल्यामुळें (ह्मणजे ज्याकडे जमीन जाईल त्याकडे जमिनीबरोबर हे गुलाम जात असत; जमीन सोडून यांस वेगळें राहतां येत नव्हतें.) त्यांस दुसऱ्या देशांत नेऊन विकितां येत नसे. तथापि उद्योग व कार्य तत्परता यांच्या योगानें आपलें स्वातंत्र्य त्यांस मिळवितां येत होतें; आणि धन्याबरोबर नेहमीं लढाईस जात असल्यामुळें लूट मिळवून ते गबरही होत असत.

राज्यकर्त्या स्पार्टनलोकांनां सर्वांस सारखे हक्क असत. रोमनलोकांतील बड्या घराण्याप्रमाणें (प्याट्रीसियन) हे लोक एक प्रकारें सरदार मंडळ बनले होते, आणि हेच कायते खरोखर स्वतंत्र लोक असत. मागें सांगितल्याप्रमाणें स्पार्टनलोकांवर दोन पिढीजाद राजे राज्य करीत. त्यांची राज्यव्यवस्था देवानें पसंत केलेली असल्यामुळें अगदीं अर्वाचीन कालापर्यंत

चालत आली होती. पुढें तिजमधील तथ्य व इंगीतच नाहींसे झालें. सार्वजनिक समा, जींत फक्त स्पार्टनलोकांसच वसण्याचा हक्क होता, ती नियमित वेळीं न्यायाधीश भरवीत. आपल्यापुढें आलेलीं कामें पसंत अगर नापसंत करण्याचा मात्र हींस अधिकार होता. शिवाय एक अठ्ठावीस लोकांची ह्मणजे राजासुद्धां तीस लोकांची सभा असे. तिला जरूसिया अथवा वयोवृद्ध संसद हें नांव होतें. हे सभासद राजांनीं निवडलेले असत. साठ वर्षांचें वय होईपावेतों या सभेचा सभासद होण्यास कोणी पात्र होत नसे. लोकांपुढें जीं कामें मांडण्याचीं तीं पूर्वी तयार करण्याचें काम सिनेट सभेचें होतें. वस्तुतः सर्व कारभार दोन राजे व सिनेट यांच्याच हातीं होता. पुढें कांहीं कालानें एफोर नांवाचे न्यायाधीश नेमिले गेले व त्यामुळें राजे व सिनेट यांचें प्राबल्य बरेंच कमी झालें. आरंभीं सैन्याचें आधिपत्य राजाकडे होतें. राजे हेच लोकांचे शंकराचार्य व तेच वरिष्ठ न्यायाधीश, मुख्य अधिकारी आणि हेराक्लीसचे वंशज ह्मणून ते पूज्य मानिले जात. त्यांची बरीच मोठी स्थावर मिळकत असून त्यांनां गल्लच्याच्या रूपानें नेमणूक असे; त्यामुळें त्यांना बऱ्याच चैनीनें राहतां येई. एफोरच्या उत्पत्तीविषयीं कांहीं खात्रीलायक माहिती नाहीं. ते पांच असत व प्रथमतः त्यांच्याकडे फक्त दिवाणी सत्ता होती. पुढें रोमन ट्रिब्यून (लोकनियुक्त फौजदारी न्यायाधीश) प्रमाणें त्यांची सत्ता हळूहळू वाढत जाऊन तेच राज्यकर्ते बनले.

स्पार्टन गृहस्थांचे सर्व जीवित संस्थानाच्या हिताकरितां असे; त्याची मालमत्ता, वेळ, मानसिक व शारीरिक शक्ति व त्याची ममता सर्व देशसेवेला अर्पण केलेली असे. आणि

स्वदेशाचें कल्याण व उत्कर्ष हेंच त्याचें परम सुख व हीच त्याची मोठी प्रतिष्ठा. स्पार्टन सरदार घराण्यांत दुसऱ्यांचा प्रवेश बिलकूल होत नसे. यामुळें त्यांची संख्या हळूहळू कमी होत गेली. त्यांच्यांत मालमत्ता विकण्याची चाल नव्हती. ती नेहमीं वडील मुलाला, अगर मुलगा नसल्यास वडील मुलीला मिळे; यामुळें शेवटीं स्थावर मिळकत थोड्याशा अति श्रीमान जमीनदारांच्या हातीं राहिली. स्पार्टनलोकांस नाणें पाडण्याची मोकळीक नव्हती, यामुळें अगदीं अर्वाचीनकालापर्यंत लोखंडाच्या लगडी व तुकडे हेंच काय तें त्यांचें कायदेशीर चलन होतें. पण हा नियम लयाकोनियन लोकास लागू नव्हता, यामुळें त्यांचें इतर संस्थानांशीं व्यापारासंबंधीं दळणवळण अगदीं स्वेच्छ असे. ग्रीसदेशांतील इतर भागापेक्षां स्पार्टांत स्त्रियांची प्रतिष्टा व मान विशेष असे. देशसेवेला उपयोगी पडावें म्हणून तरूण लोकांस फार आस्थापूर्वक शिक्षण देत. आपणास नेहमीं संकटांत व अडचणींत रहावें लागणार व आपण त्यांस पाठ देण्यास तयार असलें पाहिजे, आणि हुकूम देण्यास व हुकूम पाळण्यास सारखेंच तत्पर असलें पाहिजे; एवढेंच शिकविण्याचा त्या सर्व शिक्षणाचा हेतु होता. रोगी व अपंग मुलांस रानांत टेगेटास-पर्वतावर उघड्यावर टाकीत; वीरकाव्य व तालीम यांची मोटी प्रतिष्ठा असे.

वरील हकीकतीवरून आपणांस असें दिसून येतें कीं स्पार्टन लोकांच्या संस्था व कायदेकानू एककल्ली असून त्यांची जी वारंवार अति वाखाणणी होते तीस त्या संस्था व ते कायदे पात्र नव्हते. सर्व कामांत स्पार्टन लोक धिमे व सावध असत. लढाई हेंच त्यांचें जीवन; आणि सगीन शस्त्रांच्या पायदळांतील नोकरी

हीच कायती स्पार्टनच्या लायक नोकरी असें ते समजत. हल-क्या शस्त्रांचें पायदळ हेलट लोकांची भरती करून बनलेलें असे. लायकरगसाच्या मागून पांचशें वर्षेंपावेतों स्पार्टाचें समुद्रांत प्राबल्य नव्हतें.

लायकरगसच्या कायद्यानें स्पार्टाला सुव्यवस्थित व शिस्तवार राज्यपद्धति प्राप्त झाली. आणि पुढें शंभर वर्षांनीं सर्व ल्याकोनिया सरतेशेवटीं जिंकिल्यावर त्यांना स्वास्थ्य मिळालें असतें; परंतु जुन्या एकियनलोकांशीं पुष्कळ वर्षे लढल्यामुळें त्यांना देश जिंकण्याची आवड लागली होती; त्यामुळें व त्यांच्या आंगच्या वीरश्रीमुळें आरगासाच्या ताब्यांतील ल्याकोनियाचा पूर्वकिनारा मिळाविण्यासाठीं त्यांनीं आरगास बरोबर लढाई करून तो प्रदेश शेवटीं जिंकिला.

ल्याकोनियाच्या पश्चिमेस मेसेनिया नांवाचा प्रदेश होता. त्या प्रदेशाची लालसा उत्पन्न होऊन त्यांस हांव सुटली. तो प्रदेश जास्त सुपीक व उत्पन्नाचा होता. शिवाय तेथील एकियन-लोकांस ल्याकोनियांतील लोकांपेक्षां राज्यकर्तें जास्त सौम्यतेनें वागवीत असल्यामुळें, ते लोक ल्याकोनियांतील लोकांपेक्षां अधिक सुखी होते. जिंकणाऱ्या व जिंकिलेल्या लोकांत मिलाफ होऊन सर्वांस सारखे हक्क व अधिकार असत. या कारणांमुळें तो प्रदेश मरमराटींत होता. युद्धकलेपेक्षां शांततेंतील कलाकौशल्यें त्यांनीं जास्त वाढाविल्यामुळें हा देश सहज काबीज करितां येईल असें स्पार्टन लोकांस वाटलें. युद्धाला कारण सहज सांपडलें. उभयपक्षांतील सरहद्दीवरील लोक वारंवार एकमेकांची आगळीक करीत. या वेळीं एका स्पार्टनानें मेसेनियनांचा कांहीं खानगी अपराध केला. त्यावरून तंटा माजून त्या दोन देशांमध्यें युद्ध

जुंपलें; तें खिस्ती शकापूर्वी ७४३ पासून ७२४ पावेतों चाललें होतें. तो प्रदेश हस्तगत होईपर्यंत शस्त्र खालीं ठेवावयाचें नाहीं अशी स्पार्टन लोकांनीं शपथ वाहिली होती. त्यांनीं त्या देशावर स्वारी करून तेथील निराधार लोकांची कत्तल केली व मेसेनियांतील ईशान्येकडील आम्फिया शहरांत ठाणें दिलें. या युद्धाची जी माहिती उपलब्ध आहे ती रसभरीत कविता व मनोरम दंतकथा यानीं भरलेली आहे. पण एवढें खरें कीं पुष्कळ वर्षेपर्यंत स्पार्टन लोक आम्फियांतून निघून त्या प्रदेशाचा चोहोंकडून विध्वंस करीत. मेसेनियनलोकांस अति कष्ट सोसावे लागले; त्यानीं इथोमडोंगरावर मोरचेबंदी केली. पाताळांतील देवतांस एक पवित्र कुमारिका बळी दिल्यास तुह्मांस यश येईल असा त्यांस कौल मिळाला होता. आरिस्टोडेमास नांवाचा एक कुलीन मेसेनियन आपली मुलगी बळी देण्यास कबूल झाला. कौलानुज्ञे प्रमाणें त्यांच्याकडून वर्तन झाल्याचें स्पार्टन लोकांस समजतांच त्यांचे हातपाय गळाले; आणि कांहीं कालपर्यंत त्यांनीं आपल्या शेजाऱ्यांबरोबर युद्ध करण्याचें सोडून दिलें. कांहीं वर्षांनीं स्पार्टाचा राजा थिओपाम्यस यानें पुनः मेसेनियावर आपलें सैन्य नेलें. त्यानें मेसेनियनाबरोबर जी मोठी लढाई केली तींत मेसेनियाचा राजा मारला गेला. त्याच्या मागें देशभक्तआरि स्टोडेमास गादीवर बसला. तो फार लोकप्रिय होता; त्यानें फार शहाणपणानें राज्य केलें व आरकेडियन लोकांशीं सलोखा केला. लढाई चालूच राहिली. मुख्यत्वें करून कापणीच्या हंगामाला स्पार्टन लोक मेसेनियावर स्वारी करून पिकाचा विध्वंस करीत. अशा रीतीनें दुष्काळ पाडून त्यांस जेरीस आणण्याचा प्रयत्न चालला होता. शेवटीं आरिस्टोडेमासच्या कारकीर्दीच्या पांचवें वर्षी इथोमडोंगराच्या पायथ्याशीं एकमेकाशीं सामना करून जी लढाई झाली

तींत स्पार्टन लोकांचा मोठा पराजय झाला. परंतु शेवटीं प्रतिकूळ कौलांमुळें व लहान सहान लढायांत स्पार्टन लोकांस यश आल्यामुळें मेसेनियन लोकांचें धैर्य खचलें, आणि हताश होऊन आरिस्टोडेमास यानें जीव दिला. ह्या आपत्तिमुळें मेसेनियन लोकांची सर्व आशा खुंटली; परंतु त्यांनीं धैर्य सोडिलें नाहीं. पुन्हा एकदां त्यांनीं इथोम डोंगरावरून नेटानें हल्ला केला; परंतु त्यांचे मुख्य अमलदार पडल्यामुळें ते किल्ला सोडून पळाले. त्यांच्या जमिनी विजयी स्पार्टनलोकांच्या हातीं लागल्या आणि युद्धाचा शेवट झाला.

बहुतेक लोक आपआपल्या घरीं गेले. परंतु पुष्कळांनीं परमुलुखाची वाट धरिली. स्पार्टन लोकांनीं त्या जमिनीची वाटेल तशी व्यवस्था केली. जे मेसेनियन घरीं राहिले त्यांस गुलामाच्या दशेस मिळाविले. त्यांना आपल्या जमिनीचें अर्धें उत्पन्न धन्यास द्यावें लागे. हें युद्ध ख्रिस्ती शकापूर्वी ७०८ वर्षीं टारेंटम शहराची वसाहत होण्यास कारणीभूत झालें. मेसेनियन युद्ध चाललें असतां स्पार्टन व ल्याकोनियन लोकांचे परस्पर शरीरसंबंध झाले; त्या संबंधापासून जी प्रजा झाली तिनें तें शहर वसविलें. एफोरलोकांची सत्ता फार वाढली ती ह्याच सुमारास.

याप्रमाणें स्पार्टा मेसेनियनलोकांशीं संग्राम करण्यांत गुंतलें असतां, फीडन नांवाच्या मोठ्या राजाच्या अमला खालीं आरगासानें ल्याकोनियाच्या पूर्व किनाऱ्याचा भाग परत मिळविला, इतकेंच नाहीं तर कित्येक बेटही जिंकिलें. परंतु फीडनाच्या मरणानंतर आरगासचें सुदैव संपलें आणि एका टोंकापासून तों दुसऱ्या टोंकापर्यंत स्पार्टा दक्षिण पेलापोनीससचें धनी बनलें. तथापि जिंकिलेल्या प्रदेशाचा शांतपणें उपभोग घेण्याचें

त्याच्या नशिबीं नव्हतें. कारण गुलाम केलेले मेसेनियनलोक व त्यांचे हद्दपार केलेले देशबांधव हे स्वातंत्र्य पुनः मिळविण्याविषयीं मनांत जळत होते. एका कुलीन व फार शूर आरिस्टोमेनेस नांवाच्या मेसेनियनानें त्या कार्यीं उद्योग करण्यास आपल्या बांधवांस प्रोत्साहन दिलें आणि आरगास, आरकेडिया व एलिस ह्या शहरांशीं स्नेह जोडिले. मेसेनियन लोकांनीं शस्त्र उचालिलें आणि दुसऱ्या युद्धास आरंभ झाला. ह युद्ध ख्रिस्ती शकापूर्वीं ६८५ पासून ६६८ पर्यंत चाललें. ह्या लढाईच्या वर्णनांत तर पूर्वीच्याहूनही जास्त रचीव गोष्टी व रसभरीत कंथा आढळतात; तथापि हें युद्ध झालें यांत अंदेशा नाहीं. आरिस्टोमेनेस यानें आपल्या देशबांधवांस एकत्र जमवून स्पार्टाहून कुमक पोंचण्या पूर्वीच शत्रुशीं मोठी लढाई केली. जय दोघांतून एकासही मिळाला नाहीं; परंतु ह्या अनपेक्षित बंडाळीमुळें स्पार्टनांत धडकी बसली. मेसेनियनलोकांच्या मनांतून आरिस्टोमेनेसाला राजा करावयाचें होतें परंतु त्यानें तो गोष्ट नाकारिली व असें सांगतात कीं, एका रात्रीं विलक्षण धाडस करून तो स्पार्टाशहरांत शिरला आणि आथेनाच्या देवळांत एक विजयसूचक चिन्ह देवास अर्पण केलें. स्पार्टनलोकांनीं डेलफाई येथें कौल लाविला तेव्हां त्यांस असा जबाब मिळाला कीं, त्यांनीं एखाद्या आथेनियन मंत्री मिळवावा. त्यांस लढाईंत मदत करण्याकरितां आथेनियनलोकांनीं रणशूर कवी टायरशियस यास पाठविलें. इकडे मेसेनियनलोकांस त्यांचें देशपार केलेले बांधव व भविष्यवादी थिओक्लीस धीर देत असत. स्टेनिक्लेरास जवळ एक मोठी लढाई झाली, तींत स्पार्टनलोकांचा पूर्ण पराभव झाला, आणि थोडा वेळ मेसोनिया शत्रूपासून मुक्त झालें. नंतर आरिस्टोमेनेस यानें ल्याकोनियांतही लढाई चाल-

विली आणि पुष्कळ शहरांचा व खेड्यापाड्यांचा उच्छेद केला; शेवटीं जखम लागल्यामुळें त्याची गति खुंटली. पुढें कांहीं वर्षांनीं आरकेडियनलोकांच्या विश्वासघातामुळें स्पार्टनलोकांस जय मिळाला. नंतर आरिस्टोमेनेस ईरा डोंगरावर तटबंदी करून तींत राहिला. तेथें शत्रूनीं त्यास वेढा दिला व मोंवतालचा प्रदेश उजाड केला. मेसेनियनलोक पुनः पुनः किल्ल्यांतून झपाट्यानें निघून शत्रूला त्रास देतच होते. आरिस्टोमेनेस यानें ल्याकोनियांत रात्रीच्याही स्वाऱ्या केल्या. अशा प्रकारें कांहीं जय मिळाले; पण शेवटीं तो आपल्या सोबत्यांसह स्पार्टन लोकांच्या हातीं लागला. स्पार्टन लोकांनीं त्यांना एखाद्या नीच गुन्हेगाराप्रमाणें वागवून कीडास नांवाच्या खोल खाड्यांत टांकिलें. परंतु अद्भुत रीतीनें आरिस्टोमेनेसाचे प्राण वांचून तो ईरा येथें आपल्या लोकांस येऊन मिळाला. त्यानें पुष्कळ साहसें करून जय मिळविले; परंतु कांहीं कारणानें त्याच्यावर देवांचा क्षोभ झाला. ईराला अकरा वर्षें वेढा पडला होता. आणि शेवटीं विश्वासघातानें तें ठिकाण शत्रूच्या हातीं लागलें. कांहीं लोकांनिशीं आरिस्टोमेनेस वेढा देणाऱ्या लोकांची फळी फोडून बाहेर पडला व आरकेडियांत गेला. तेथून त्यानें ल्याकोनियावर स्वारी केली व लढत असतां मारला गेला.

या युध्दानंतर जे मेसेनियन त्या देशांत राहिले त्यांस हेलटच्या दर्शास पोंचविले. बाकीचे परदेशांत गेले व त्यांपैकीं कांहीं जलमार्गानें दक्षिणइतालींत ऱ्हेजियम येथें गेले. तेथें गेल्यानंतर समोरील सिसलीच्या किनाऱ्यावरील झांकले शहर त्यांनीं घेतलें; तेव्हांपासून त्यास मेसाना अगर नवीन मेसिना ह्मणतात.

अखेरीस मेसेनिया जिंकिल्यानंतर ग्रीसमध्यें स्पार्टा फार सपाट्यानें मुख्य पदास चढलें; दुसऱ्या संस्थानांच्या कारभारांत तें ढवळाढवळ करूं लागलें व त्यांच्यावर एक प्रकारें वर्चस्व मिरवूं लागलें व लहान लहान संस्थानांस खुषी नाखुषी बाजूस ठेवून हें वर्चस्व सहन करावें लागलें.

भाग ४ था.

पर्शियन लढायांच्या आरंभापर्यंतचा आथेन्सचा इतिहास.

पेलापोनीससचा दक्षिणभाग जिंकण्यांत स्पार्टा संस्थान गुंतलें होतें, व ग्रीसदेशांतील प्रत्येक भागांत आपलें वजन वाढवीत चाललें होतें; असा त्या वेळचा आथेन्सचा इतिहास पाहतां राजा आणि बडेलोक व बडेलोक आणि बाकीची प्रजा, ह्यांच्या मधील झगड्याखेरीज महत्वाचें व लक्ष्यांत ठेविण्याजोगें त्यांत कांहीं दिसत नाहीं. जेव्हां साधारण लोकांस संस्थानाच्या कारभारांत योग्य स्थळ मिळालें, आणि राज्यव्यवस्थेला नियमित स्वरूप प्राप्त झालें, तेव्हांपासून आथेन्स विलक्षण झपाट्यानें इतक्या महत्वास चढलें कीं, ग्रीस देशांतील इतर संस्थानें त्याच्यापुढें फिकीं पडलीं.

थेसियस हा आथेन्स संस्थानाची स्थापना करणारा होय असें लोक मानीत असल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. त्याचे पूर्वी आटिकाप्रांताचे विभाग होऊन निरानिराळे लहान आणि स्वतंत्र समूह बनले होते. हे समूह एकत्र करून थेसियसनें एक संस्थान बनविलें व आथेन्स ही त्याची राजधानी केली. याशिवाय त्या देशांतील सर्व मोठाल्या राजकीय संस्था त्यानेंच स्थापिल्या असें लोक मानितात. त्यानें जी राज्यव्यवस्था केली असें समजतात, (परंतु ही बहुतकरून निरानिराळ्या प्रसंगांनीं आपोआप घडून आली असावी.) तींत युप्याट्रिडांत (ह्मणजे बडेलोकांत) सर्वांस सारखे हक्क असत. राज्यसत्ता काय ती त्यांच्याच हातांत, धर्म संबंधीं नियम करणारे तेच, आणि नुसते कायदे करणारेंच नव्हे तर त्यांचा अंमल करणारेही तेच. साधा-

रण लोक, ह्मणजे स्वतंत्र शेतकरी आणि हुन्नरी लोक, हे सर्वथैव राजा व वडेलोक यांच्या कह्यांत पूर्णपणें असत. राजा पिढी-जाद असे खरा, परंतु त्याची योग्यता बडेलोकांत पहिला गणला जाण्यापलीकडे नव्हती.

इतर जुन्या संस्थानाप्रमाणें आटिकांतील लोकांच्या पुष्कळ टोळ्या झाल्या होत्या. ह्या टोळ्या चार होत्या. प्रत्येक टोळीचे तीन पोटभाग होते व प्रत्येक पोटभागांत तीस घराणीं असत. राज्यकारभारांत राजाच्या मदतीस वयोवृद्ध लोकांची एक सभा आणि बड्या लोकांची एक सभा, अशा दोन सभा असत. ह्या सभांत साधारण लोकांस बसण्याचा अधिकार नसे. जेथें जेथें अशा प्रकारची व्यवस्था असेल तेथें तेथें राज्यकर्ती मंडळी आणि प्रजा यांत केव्हां तरी तंटे उपस्थित व्हावयाचेच. आथे-न्सांत जो प्रथम तंटा उपस्थित झाला तो बडेलोक आणि साधा-रण प्रतीचे लोक यांच्यांत नसून वडेलोक व राजा यांमध्यें झाला. त्याची हकीकत अशी आहे. देशभक्त राजा कोद्रोस मरण पावल्यावर त्याच्या मुलांत गादीविषयीं भांडणें उत्पन्न झालीं, ही संधि साधून बड्या लोकांनीं राजा हा किताब कमी केला व त्याचे ऐवजीं कमी मानाचा आरकन हा हुद्दा नवीन काढिला. आरकन ह्मणजे कारभार पाहणारा. तथापि हा हुद्दा कोद्रो-साच्या वंशांत परंपरेनें चालावा असें ठरविलें; मात्र आरकनची निवड बड्यालोकांनीं आपल्या हातांत ठेविली. याप्रमाणें निव-डलेला इसम जन्मभर त्या हुद्यावर राही. एवढ्यानें बड्यालो-कांची महत्त्वा-कांक्षा तृप्त झाली नाहीं. राजसत्तेंत आपला सारखा हिस्सा असावा असा त्यांचा बेत होता. असे बारा तहांहयात आरकन झाल्यानंतर ख्रिस्ती शकापूर्वी ७५२ व्या

वर्षीं त्या जागेची मुदत दहा वर्षांची करण्याचा बड्या लोकांनीं ठराव केला. परंतु आरकनची निवड अजूनही कोद्रोसाच्या वंशजांतूनच होत असे. ही नवी व्यवस्था ६९ वर्षेंच टिकली. पुढें ख्रिस्ती शकापूर्वी ६८३ व्या वर्षीं ती मुदत एक वर्षाची झाली; आणि आजपर्यंत जी सत्ता एका आरकनच्या हातांत होती ती नऊ अधिकाऱ्यांमध्यें वांटून दिली गेली. याप्रमाणें यापुढें पुष्कळ बड्यालोकांस रासजत्तेचा विभाग मिळण्याची आशा उत्पन्न होण्याचें साधन उत्पन्न झालें. या नऊ अधिकाऱ्यांपैकीं पहिल्यास मुख्य आरकन ही संज्ञा असे दुसऱ्यास नुसतें 'आरकन' ह्मणत. हें नांव ठेविण्याचें कारण असें होतें कीं त्याला धर्मकृत्यें करावीं लागत व धर्मकृत्यें करण्याचा अधिकार पूर्वी राजाचा असे. तिसऱ्या आरकनाला पोलेमारकास ही संज्ञा होती व त्याच्याकडे सैन्याचें अधिपत्य होतें. इतर सहानां थेसमाथेटी ह्मणजे कायदेपंडीत व न्यायाधीश ही संज्ञा होती.

कोद्रोसाच्या कारकीर्दीपासून ख्रिस्ती शकापूर्वी ६८३ वर्षेंपर्यंत आथेन्सच्या इतिहासांत ज्या महत्वाच्या गोष्टी झाल्या त्यांचें स्वरूप पाहूं जातां आथेन्सच्या राज्यकारभारांत एकामागून एक फेरफार झाले हेच काय ते होत. ज्यांवर आतां राजाचा दाब राहिला नव्हता अशा महत्वाकांक्षी व आपलपोट्या बड्यालोकांच्या अंमला खालीं साधारण लोकांची स्थिति सुखाची नव्हती हें सहज दिसतें. कायदे करणारे व त्यांचा अर्थ करणारे तेच असल्यामुळें विशेषेंकरून न्यायाच्या कामांत गरीब लोकांना बडे लोकांचा जुलूम सोसावा लागे. कायदे लेखी नसल्यामुळें त्यांचा अर्थ करण्यांत व अंमल करण्यांत

हे लोक मनसोक्त वागत, यामुळें कायद्यांचा लेखी ग्रंथ असण्याची अवश्यकता विशेष भासूं लागली. ह्मणून ख्रिस्ती शकापूर्वी ६२४ व्या वर्षीं सर्व लोकांस जाहीर होण्याकरितां कायद्यांचा ग्रंथ करण्यासाठीं ड्रेकनचो नेमणूक झाली. साधारण-लोकांच्या मागणीस मान देऊन ही योजना करणें वड्यालोकांस भाग पडलें; परंतु ड्रेकनानें केलेले कायदे इतके कडक होते कीं ते रक्तानें लिहिले होते असें एका अलीकडील आथेनियनानें ह्मटलें आहे. असें सांगतात कीं ड्रेकनच्या मतानें सर्व अपराधांस योग्य अशी काय ती एक देहांत शिक्षाच. त्याच्या कायद्यांच्या अशा कलामुळें तो इतका अप्रिय झाला कीं त्याला देश सोडून ईजिना बेटांत राहवें लागलें व तेथें तो लवकरच मरण पावला.

ड्रेकनच्या सरसकट एकच शिक्षा सांगणाऱ्या कायद्यांनीं लोकांचीं क्षुब्ध झालेलीं मनें शांत होण्यासारखीं नव्हतीं. वस्तुतः त्यांच्या मनाची स्थिति अशा थराला जाऊन पोंचली होती कीं, बड्यालोकांच्या जुलमी अंमलापेक्षां दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला ते कबूल झाले असते, ही गोष्ट कित्येक बड्यालोकांच्या लक्षांत तत्काळ आली. व आपल्यापैकीं कायलन नांवाच्या एका गृहस्थास सर्व सत्ताधीश (टायरंट) करण्याचा त्यांनीं घाट घातला. ही गोष्ट ख्रिस्ती शकापूर्वी ६१२ व्या वर्षी घडली. यावेळीं पुष्कळ ग्रीक संस्थानांत असले सर्व सत्ता-धीश अधिकारी उत्पन्न झाले होते. लोकांतील अस्वस्थतेवर व मिगाराचा सर्व सत्ताधीश थिआजेनेस याच्या मदतीवर कायलनाची फार मिस्त होती; परंतु निश्चयात्मक असें कांहीं करण्यापूर्वी त्यानें डेलफाईच्या देवस्थानांत कौल लाविला व त्या कौलास दुटप्पी जबाब मिळाल्यामुळें मलत्याच दिवशीं

त्यानें आपल्या कामास आरंभ केला. तरी आपल्या सोबत्यांच्या सहाय्यानें त्यानें आथेन्सचा किल्ला हस्तगत करून घेतला. परंतु इतर बड्यालोकांनीं देशांतील सर्व सैन्य जमवून त्यास तेथें कोंडिलें. कचाट्यांत सांपडल्यामुळें व जयाषिवर्यी निराश होऊन कायलन तेथून निसटला. त्याच्या अनुयायांस प्राण वांचविण्याच्या अटीवर आक्कमीयनाचा मुलगा आरकन मिगाक्लीस यास शरण जावें लागलें. परंतु हें वचन गुंडाळून ठेवून त्या विजयी लोकांनीं हातीं सांपडलेल्या लोकांस जिवें मारिले. कित्येकांनीं युंज्मेनिडेसच्या यज्ञशाळेचा* आश्रय केला होता; त्यांनांही तेथें मारिलें. हा भ्रष्टांकार मिगाक्लीसच्या मंजुरीनें झाला, ह्मणून तो व त्याचें घराणें शापग्रस्त आहे अशी लोकांची समजूत होऊन त्याचा त्यास तिटकारा आला. आपल्या शत्रू विषयीं झालेल्या लोकांच्या ह्या ग्रहांत कायलनाचे सोबती निःसंशय भर घालीत होते. या पुढें आथेन्सावर जें जें संकट ओढवलें तें तें मिगाक्लीसाच्या अपराधामुळें देवाच्या झालेल्या कोपाचें सूचक असें मानीत. याप्रमाणें स्थिती चालू राहिली असती तर निःसशंय आपसांत भयंकर लढाई माजती.

अशास्थितींत लोकांत उत्पन्न झालेली खळबळ शांत करून सर्वांस मान्य होईल अशी नवी व्यवस्था करण्याजोगा मनुष्य शोधून काढण्यास सरकार व लोक उत्कंठित झाले होते. असा मनुष्य कोद्रोसाच्या राजघराण्यांतील सोलन हा होता. त्यानें पुष्कळ देशाटण करून प्रत्येक ठिकाणीं माहिती मिळविली होती;व त्या काळ-

---

* ग्रीकलोक देवतांस ज्या जागीं बळी देत त्यास आलटर किंवा यज्ञशाळा अशी संज्ञा असे, ही जागा पवित्र मानली जात असल्यामुळें तिचा आश्रय करणाऱ्याच्या केसास धक्का लावण्याची कोणाची छाती नसे.

च्या अति विख्यात् लोकांचा स्नेह संपादन केला होता. कायलनानें केलेला कट मोडल्यानंतर लौकरच तो आथेन्सांत परत आला. तेथें आपसांत फळ्या होऊन आपल्या देशांत अगदीं निर्बल संस्थानाशीं टिकाव धरण्याचें त्राण राहिलें नाहीं, असें त्याच्या नजरेस आलें. मिगेरियनांनीं आथेनियन लोकांकडून सालामिस बेट घेतलें; तें परत मिळण्याविषयीं अनेक प्रयत्न केले, परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां इतःपर लढाई पुनः चालविण्यास लोकांनां जो कोणी उद्युक्त करील त्याला कडक शासन केलें जाईल अशीही धमकी दिली होती. सोलन हा मोठा कवीही होता; त्यानें एक उत्तम कवन करून आपल्या लोकांस चेव आणिला; यामुळें त्याला आथेनियन सैन्याचा नायक नेमिला, आणि ख्रिस्ती शका पूर्वी ६०४ या वर्षीं त्यानें मिगेरियन लोकांस सालामिसमधून घालवून दिलें. ह्या जयामुळें त्याचें सामर्थ्य व वजन हीं फार वाढलीं. बड्यालोकांतील शांत व विचारी मंडळीच्या सहाय्यानें आपल्या अपराधांची पंचांमार्फत चौकशी करण्याविषयीं मिगाक्लीसाची व त्याच्या साथीदारांची त्यानें संमती मिळविली. मिगाक्लीस व तत्पक्षीय लोकांनीं भ्रष्टाकार केला असें पंचांनीं ठरविलें, व ख्रिस्ती शकापूर्वी ५९७ व्या वर्षीं आक्कमियनच्या सर्व वंशजांना हद्दपार केलें. एवढ्यानें देवांचा राग शांत होणार नाहीं असें वाटल्यावरून सोलननें क्रेट येथील एपिमेनिडेस यास बोलावून आणिलें. हा मनुष्य पवित्र असून त्याचे अंगीं अमानुष शहाणपण असल्याविषयीं त्याची सर्वत्र ख्याती होती. कांहीं धर्मसंस्कार करून त्यानें शहर शुद्ध केलें व त्यामुळें लोकांचें समाधान झालें. नंतर एपिमेनिडेस स्वदेशीं परत गेला.

याप्रमाणें लोकांच्या मनांतील ही धर्मवेडी भीति नाहींशी झाल्यावर ख्रिस्ती शकापूर्वी ५९४ या एका वर्षाकरितां

आर्कनच्या जागीं सोलनची निवड झाली व सर्वानुमतें त्याला नवीन कायदे व नवीन राज्यव्यवस्था करण्याचा पूर्ण अखत्यार मिळाला. त्याच्या कायद्यांचें घोरण लक्षांत येण्याला त्या वेळच्या त्या देशाच्या स्थितीचे पर्यावलोचन करणें जरूर आहे. शेतकरी प्रजेपैकीं बहुतेक सर्वस्वी जमीनदारांवर अवलंबून होते. त्यांना राजकीय हक्क बहुशः नव्हतेच; कर्जाचा कायदा इतका कडक होता कीं रिणकोला धनकोचा पैसा देण्याचें सामर्थ्य नसल्यास त्याला धरून परदेशांत गुलाम म्हणून विकीत. ज्यानां या प्रकारचा त्रास सोसावा लागे ते साहजिकच कांहीं फेरफार करण्यविषयीं उत्सुक होते. बडेलोकांची इच्छा तर सद्यःस्थिति कायम ठेवण्याची होती. धनगर लोक आणि डोंगरी प्रदेशांतील गरीब शेतकरी यांस त्रास कमी होता, पण तेही ह्या जुलमी लोकांच्या लुटारूपणापासून सुटका होईल असा कांहीं फेरफार करण्याची वाटच पहात होते. किनाऱ्यावरील लोक म्हणजे बहुशः व्यापार उदमी लोक असले कडक उपाय योजण्याच्या विरुद्ध होते खरे; परंतु लोकांचीं सर्व खरीं दुःखें नाहींशीं होतील अशी सुधारणा झाली पाहिजे असें इतरांप्रमाणें त्यांचेंही मागणें होतें. म्हणून सोलनाला दोन प्रकारची कामगारी बजावण्याची होती. पहिली साधारण लोकांचीं दुःखें निवारण करण्याची व दुसरी तशा प्रकारचीं दुःखें पुनः न उद्भवतील अशा प्रकारचे कायदे करावयाची-ही कामगिरी बजावण्यासाठीं त्यानें प्रथम पुढील उपाय योजिले. सावकाराचें विशेष नुकसान होऊं न देतां त्यानें देणेकऱ्यांचें कांहीं कर्ज माफ केलें; गहाण ठेविलेल्या जमिनी मालकांस परत देवविल्या; आणि देणेकऱ्यांना पकडून विकण्याची सावकारांस मनाई केली.

ह्या फार जरूरीच्या बाबतींचा निकाल लाविल्यानंतर त्यानें ड्रकनचे कायदे रद्द केले, कांहीं देशपार केलेल्या लोकांस परत आणिलें,—यांत बहुतकरून मिगाक्लीसचें घराणें असावें —आणि आटिकांत बरेच परकी लोक येऊन राहिले होते, त्यांच्यासंबंधानें कांहीं नियम केले. ह्या क्षुल्लक बाबतींचा निकाल लावून सर्व राज्यव्यवस्था नवी करण्याचें काम त्यानें हातीं घेतलें. हा वेळपर्यंत एखाद्या मनुष्याचे हक्क व अधिकार त्याच्या कुळावर अवलंबून होते; परंतु यापुढें स्थावर मिळकत अथवा स्थावर मिळकतीच्या उत्पन्नावरून एखाद्याचे हक्क व त्याचीं कर्तव्यें ठरावीं असा सोलनानें नियम केला. या हेतूनें त्यानें आटिकांतील लोकांचे चार वर्ग केले; यापैकीं पहिल्या तीन वर्गांत जमीनदार, ह्मणजे ज्यांची थोड्याबहुत उत्पन्नाची जमीन होती, अशा लोकांचा समावेश केला होता; चौथ्या थेटेस नांवाच्या वर्गांत बहुधा हुन्नरीलोक व स्वतंत्र मजूर लोक यांची गणना होती. राज्यांतील मोठ्या हुद्याच्या जागा पहिल्या ह्मणजे सर्वांत धनाढ्य वर्गांतील लोकांसच मिळावयाच्या असें ठरविलें. हलक्या दर्जाच्या जागा दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांतील लोकांस मिळण्यास हरकत नव्हती. मनुष्य जितका श्रीमंत तितकीं त्याचीं कर्तव्यें जास्त जबाबदारीचीं; दुसऱ्या वर्गांतील लोकांस रिसाल्यांत नोकरी करावी लागे, तिसऱ्या वर्गांतील लोकांची भरती सज्जड शस्त्रांच्या पायदळांत केली जात असे आणि चवथ्या वर्गांतील लोकांकडे हलक्या शस्त्रांच्या पायदळाचें काम होतें व पुढें त्यांजवर आरमारावरील शिपायांचें काम पडलें. यांतील तत्व पाहूं गेलें तर हा फेरफार फार महत्वाचा होता; परंतु प्रथमतः त्याच्या योगानें वस्तुस्थिती बदलली नाहीं;

पण त्यामुळें एखादा बुद्धिवान व उद्योगी मनुष्य कालेंकरून हलक्या स्थितींतून उच्च स्थितीला पोंचण्यास हरकत नव्हती; व असा तो उच्च स्थितीला पोंचला ह्मणजे मोठ्या हुद्याच्या सरकारी जागा मिळण्यास तो पात्र होई. सार्वजनिक सभेंत तर सर्व वर्गाचे लोक अगदीं सारख्या दर्जाचे गणले जात. या नंतर आपल्या पुढें आलेलीं कामें मंजूर अगर नामंजूर करण्यापुरताच या सभेचा अधिकार नव्हता, तर तिला जरूर वाटल्यास त्यांत फेरबदल व सुधारा करण्याचा अधिकार प्राप्त झाला. वीस वर्षांच्या वयाच्या प्रत्येक मनुष्याला सर्व बाबतींत बोलण्याची व मत देण्याची परवानगी होती. नवीन व्यवस्थेंत न्यायाधिशांचे (माजिस्ट्रेट) अधिकार कायम राहिले; परंतु आपल्या कामाचा सार्वजनिकसभेपुढें त्यांस जाब द्यावा लागे व त्यांनीं केलेल्या निवाड्यांवर लोकांच्या वरिष्ठ न्यायासनापुढें विवाद मांडण्यास मोकळीक ठेविली होती.

याप्रमाणें सोलनानें साधारण लोकांचें प्राबल्य पुष्कळ वाढविलें, परंतु त्यांच्यावर दाब राहण्याकरितां त्यानें ४०० लोकांची एक सभा (सेनेट) स्थापन केली. या सभेंत तीस वर्षांच्या वयाच्या आंतील लोकांस बसण्याचा अधिकार नव्हता, व सभासद होण्यास मालमत्तेचीही अट ठेविली होती. ह्या सभेचे सभासद एक वर्षापुरते नेमिलेले असत. वर्षाचे शेवटीं आपल्या वर्तनाचा जाब देण्याची त्यांस गरज पाडितां येत होती. सार्वजनिकसभेपुढें जाण्याचीं कामें तयार करण्याचें या सभेचें मुख्य कर्तव्य होतें; पण तिचें काम एवढेंच नव्हतें. याच प्रमाणें लोकांच्या सत्तेला आळा घालण्याकरितां एरिओपेगास नांवाची दुसरी संस्था कोढिली. ही संस्था अति प्राचीनकाळींही होती

असें सांगतात; परंतु सोलनानें तींत नवीन सुधारणा केली व तिला राजकीय कामांत अधिकार दिले. ही संस्था खून, दुस-च्यास अपंग करणें, विषप्रयोग व आग लावणें या अपराधांची चौकशी करी हें सुप्रसिद्ध आहे.

कोणतीही सुधारणा, मग ती कितीही चांगली व उपयोगी असो, कायमची होऊं शकणार नाहीं. स्थित्यंतर होईल त्याप्रमाणें वेळोवेळीं तींत फेरफार झालाच पाहिजे हें सोलन पूर्णपणें जाणून होता; आणि म्हणूनच कायद्यांचीं नियमित वेळीं तपासणी होऊन त्यांत सुधारणा केली पाहिजे असें त्यानें ठरवून ठेविलें. प्राचीनकालच्या सर्व कायद्यांप्रमाणें सोलनाच्या कायद्यांतही राज-कीय बाबतींबद्दल व तसेंच लोकांच्या गृहास्थितीबद्दल नियम होते. या प्रमाणें सोलनानें मुलांच्या शिक्षणाबद्दल नियम केले आणि स्त्रियांविषयीं फार कडक कानू केले. स्त्रीशिक्षणास उत्तेजन न मिळतां उलट त्यास धक्काच बसला. आथेनियन आरमाराकडे-ही त्याचे लक्ष पोंचलें. लोकांनीं आपल्या खर्चानें ३८ गलबतांचें आरमार सज्ज ठेवावें असें ठरविलें. परदेशी लोकांस आटिकांत वसाहती करण्यास वळवून व्यापार व शिल्पकलेस उंत्तेजन दिलें; त्यापैकीं पुष्कळांस नागरीकपणाचे हक्क मिळाले व इतरांस लहानसा कर देऊन स्थानिक कायद्यांचा लाभ मिळत असे. गुलामगिरी आटिकांत पूर्ववत् चालू राहिली, परंतु ग्रीसदेशांतील इतर संस्थानांत आणि मुख्यत्वेंकरून स्पार्टांत गुलामांस जितकें निष्ठुरपणानें वागवीत तितकें आटिकांत कधींही वागवींत नसत.

कायदे करण्याचें काम पुरें झाल्यावर सोलन आथेन्सांतून निघाला आणि त्यानें दहा वर्षें देशाटण केलें असें म्हणतात.

त्याची लिडियाचा राजा क्रीसस याजबरोबर ओळख झाली. क्रीसासाला गर्व झाला होता, ह्मणून आयुष्याचा शेवटचा दिवस येई पर्यंत कोणीही आपणांस सुखी ह्मणून घेऊं नये असें सांगून त्याचा गर्व मोडण्याचा सोलनानें यत्न केला. ख्रिस्ती शकापूर्वी ५६२ व्या वर्षीं तो आथेन्सांत परत येऊन पाहतो तों तेथें पुनः दुही माजली आहे व आपण केलेलें मोठें कार्य ढांसळण्याच्या बेतांत आहे असें त्यास आढळलें. लोकांच्या तीन फळ्या झाल्या होत्या; प्रत्येक फळीवर एक एक बड्या लोकांपैकीं गृहस्थ होता. एक फळी मैदान मुलखांतील लोकांची, दुसरी डोंगरी लोकांची व तिसरी किनाऱ्यावरील लोकांची. तिसऱ्या फळीचा मुख्य सोलनाचा मित्र व आप्त पीसीस्ट्रेटस होता. या कायदे करणारानें समेट करण्याची शिकस्त केली, पण व्यर्थ. पिसीस्ट्रेटस हा मोठा महत्वाकांक्षी व मोठा वक्ता होता; त्यानें आपण आथेन्साचा सर्व सत्ताधीश होण्याचा निश्चय केला. आपण प्रजेचा मित्र अशी बतावणी करून एक दिवस त्यानें आपणाला जखमा करून घेतल्या आणि त्या लोकांना दाखवून 'मी तुमच्या हक्कांकरितां भांडतों ह्मणून माझे शत्रू मजवर असे तुटून पडले' असें त्यानें सांगितलें. या युक्तीनें त्याच्या जिवांचें रक्षण करण्याकरितां पाहरा देण्याविषयीं त्यानें लोकांचीं मनें वळविलीं. ह्या पाहाऱ्यानिशीं त्यानें किल्ला घेतला. त्याचा एक प्रतिस्पर्धी मिगाक्लीस शहर सोडून चालता झाला. दुसरा लायकरगस यानें त्याची सत्ता मुकाट्यानें कबूल केली; ही गोष्ट ख्रिस्ती शकापूर्वी ६६० व्या वर्षीं घडली.

पिसिस्ट्रेटसानें एखाद्या निव्वळ नागरीकाप्रमाणें आपलें वर्तन ठेविलें; आपलें खरें सामर्थ्य त्यानें बाह्यत्कारीं बिलकूल लोकांच्या नजरेस येऊं दिलें नाहीं. सोलन थोड्याच वेळानें मरण

पावला. लायकरगस मिगाक्लीसला मिळाला व त्यांनीं पिसिस्ट्रेट-साला आथेन्समधून घालवून दिलें. याप्रमाणें त्याचा जुलूम एक वर्षावर फारसा टिकला नाहीं. या दोन मिलाफ्यांनीं पिसिस्ट्रेटसा प्रमाणेंच सत्ता चालविली; परंतु त्यांच्या मनांत परस्परांविषयीं मत्सर होता व ते एकमेकांचा नाश करण्याच्याच विचारांत होते. ही स्थिति असह्य वाटून मिगाक्लीसानें देशापार केलेल्या पिसिस्ट्रेटसाबरोबर सलोख्याचें बोलणें लाविलें; पूर्वीची योग्यता मिळवून देण्याच्या कामीं हरप्रयत्न करण्याचें वचन देऊन आपली मुलगीही त्यानें त्याला दिली. पिसिस्ट्रेटसालो आथेन्सांत परत आणिले आणि तें अशा रीतीनें कीं त्या योगानें भोळ्या लोकांच्या मनावर परिणाम व्हावाच; त्याला एका रथांत बसवून त्याचे बाजूस आथेन्सची इष्ट देवता जी आथेना तिचा पोषाख घालून एक स्त्री बसविली होती; अशा थाटानें तो शहरांत आला; परंतु या दोघां मिलाफ्यांचा स्नेह फार वेळ टिकला नाहीं; कारण पिसिस्ट्रेटसानें आपला अपमान केला असें मिगाक्लीसाला वाटून त्यानें लायकरगसाबरोबर सख्य केलें आणि फिरून पिसिस्ट्रेट-साला आथेन्सांतून घालवून दिलें. तो यूबियांतील एरेट्रिया येथें गेला. तेथें त्यानें आपलें राहिलेलें आयुष्य स्वस्थपणें कंठिलें असतें, परंतु त्याचा वडील मुलगा हिपियस यानें फिरून यत्न करण्याविषयीं आग्रह केला, ह्मणून आटिकावर स्वारी करण्याच्या तयारीस तो लागला; त्यानें ग्रीसदेशांतील इतर ठिकाणच्या सर्व सत्ता बळकाविलेल्या संस्थानिकांशीं संधि केला. दहा वर्षें बाहेर काढिल्यानंतर तो सैन्य घेऊन म्याराथान येथें उतरला. त्याच्या शत्रूंचा कारभार लोकांस फारसा प्रिय नव्हता. त्यांनीं शहराबाहेर येऊन लढाई दिली; परंतु त्यांचा अगदीं मोड

झाला. आपले शत्रू फुटून जिकडे तिकडे गेल्यास त्यांस माफी आहे असा त्यानें एकदम जाहीरनामा काढिला. या कृत्यामुळें पुढील अडथळ्याचें बीज नाहींसें झालें. आतां पिसिस्ट्रेटस आथेन्सचा निर्विवाद धनी झाला, आणि त्याचे प्रतिस्पर्धी लायकरगस व मिगाक्लीस यांस देश सोडून जावें लागलें.

आपण बळकाविलेली सत्ता आपल्याकडे कायम राहण्याकरितां त्यानें सर्व साधनें योजिलीं. त्यानें आपल्याजवळ रक्षणाकरितां भाडोत्री परदेशी शिपाई ठेविले. आपल्या शत्रूचीं मुलें ओलीस घेऊन त्यांस न्याक्सास बेटांत पाठविलें. तसेंच पुष्कळ लोकोपयोगी व सौंदर्याचीं सार्वजानिक कामें काढून त्यानें गरीब लोकांस उद्योगास लाविलें व या योगें त्यानें त्यांची प्रीति संपादिली. अशाच दुसऱ्या उपायांनीं त्यानें मरेपर्यंत चवदा वर्षें म्हणजे ख्रिस्ती शका पूर्वी ५२७ व्या वर्षापर्यंत आपली सत्ता अव्याहत राखिली. तथापि विपरीत प्रकार घडण्याचा संभव होता हें तो विसरला नाहीं; प्रसंग पडल्यास टेंकण्याला जागा असावी म्हणून मिटिलेनियन लोकांकडून घेतलेलें सिगियन शहर त्यानें आपल्या दासीपुत्राला देऊन ठेविलें होतें. राज्य कारभारांत त्याने सोलनाचे कायदे कायम राखिले. देवळें व सार्वजनिक इमारती बांधण्यांत होणाऱ्या खर्चा करितां त्यानें श्रीमंत लोकांवर कर बसविला; म्हणजे गरीब लोकांच्या कल्याणार्थ श्रीमंतांकडून कर घेतला. असेंही सांगतात कीं, होमराच्या कविता प्रथम त्यानें गोळा केल्या. त्याला विद्येची अभिरुचि होती खरी; कारण ग्रीकलोकांत सार्वजानिक पुस्तकालय प्रथम त्यानेंच स्थापिलें. एकंदरीनें त्यानें बळकाविलेल्या सत्तेचा सदुपयोग केला. एकंदरींत आथेन्स शहरावर त्याच्या हातून जसे उपकार झाले, तसे प्रायः दुसऱ्या कोणाच्याही हातून झाले नाहींत.

पिसिस्ट्रेटसाचा सौम्य कारभार आथेनियनलोकांना इतका प्रीय झाला कीं, त्याच्या तीन मुलांना त्याच्यासारखीच सत्ता वापरण्याची सर्वानुमतें परवानगी मिळाली. ते बापाप्रमाणें शहाणे असते व आपण जी सत्ता वापरीत आहों ती आपण बळकाविली आहे ही गोष्ट त्यांचे मनांत वागली असती तर पुष्कळ पिढ्यांपर्यंत आथेन्स पिसिस्ट्रेटसाच्या वंशजांच्या अंमलाखालीं सुखानें राहतें. त्यांपैकीं वडील मुलगा हिपियस हा कारभारांत मुख्य होता. ज्यांच्या वैराची अथवा वजनाची त्यांस भीति वाटे. त्यांच्यावर हात टाकण्यास (त्यांच्याशीं दुष्टपणानें वागण्यास) ते मागें पुढें पहात नसत. शेवटीं अशी गोष्ट घडली कीं तिच्या योगानें चालू असलेला कारभार नाहींसा झाला व राज्यव्यवस्थेंत महत्वाचा फेरफार झाला. त्या तीन बंधूपैकीं हिपार्कस यानें हार्मोडियस नांवाच्या तरुण आथेनियनाचा मोठा अपमान केला. हार्मोडियस याला त्याचा मित्र आरिस्टोजिटन मिळाल्यावर त्यानें सूड उगविण्याचा निश्चय केला. त्या दोघांनीं पिसिस्ट्रेटसाच्या मुलांचा विध्वंश करण्याचा बेत केला व हा बेत सिद्धीस नेण्याकरितां प्यान आथेनिया नांवाच्या सणाचा दिवस योजिला. ख्रिस्ती शकापूर्वी ५१४ व्या वर्षीं वरघोडा थाटानें चालला असतां त्या दोन फितुरांनीं आपल्या मित्रांनिशीं पिसिस्ट्रेटसाच्या मुलांवर हल्ला केला. हिपार्कस गर्दींत मारला गेला, हारमोडियसही पडला, आणि आरिस्टोजिटन पुष्कळ मित्रांसह शत्रूंच्या हातीं लागला व त्यांनीं त्यास ठार मारिलें. ह्या प्रसंगावरून आपलें घराणें किती अप्रिय आहे हें हिपियसाला कळून चुकलें. भीति व संशय यांच्या त्याला वेदना लागल्या; त्यामुळें त्यानें ज्यांचा त्याला संशय आला असे पुष्कळ लोक मारिले व स्वतःची

तुंबडी भरण्याकरितां त्यानें कर वाढविले. आपली बळकटी वाढविण्याकरितां त्यानें दुसऱ्या जुलमी राजां बरोबर तह केला केला आणि पर्शियाच्या राजाचा मित्र जो ल्याम्से कासचा राज्यकारभारी त्याला त्यानें आपली मुलगी दिली. हें करण्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. हिपियस दिवसें दिवस जास्त अप्रिय होत चालला. हें पाहून देशापार झालेल्या अल्कमियनाच्या मुलांनीं फिरून स्वदेशीं येऊन आपल्या शत्रूंस घालविण्याचा निश्चय केला. क्लीस्थेनिस ह्यापक्षाचा मुख्य झाला व पुष्कळ द्रव्य खर्च करून त्यानें डेलफाईचा अनुकूल कौल मिळविला. आणि स्पार्टन लोक कौल मागण्यास गेले ह्मणजे आथेन्साला जुलमी अंमलापासून सोडवा असा त्यांस जबाब मिळे; पुनः पुनः अशी आज्ञा झाल्यामुळें आटिकावर सैन्य पाठविण्याचें एकदांचें स्पार्टन लोकांच्या मनांत आलें. हिपियाच्या भाडोत्री शिपायांचा पराभव झाला. त्यामुळें घाबरून त्यानें आपल्या मुलांस देशाबाहेर पाठविलें; परंतु तीं स्पार्टन लोकांच्या हातीं लागलीं. हिपियस आटिका सोडून गेल्यास त्या मुलांना परत देण्याचें स्पार्टनलोकांनीं कबूल केलें. हें ह्मणणें कबूल करून हिपियस सिगियम येथें गेला आणि पिसिस्ट्रेटसा-च्या घराण्यांतील सर्वांस कायमचें हद्दपार केलें. देशाची या प्रमाणें सुटका केल्याबद्दल हार्मोडियस आणि आरिस्टोजिट्टन यांचा बहुतेक देवांप्रमाणें सन्मान झाला.

याप्रमाणें क्लीस्थेनिस दरबारांत मुख्य पदास चढला. तो प्रजापक्षास मिळाला, आणि वडेलोकांची सत्ता निखालस मोडून टांकण्या करितां त्यानें राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्याचा घाट घातला. साधारण लोकाच्या संमतीनें व डेलफाईच्या कौलाच्या मं-

जुरीनें त्यांने जुने चार वर्ग मोडून टांकिले आणि आटिका प्रांतांचे दहा विभाग केले (यांस ट्राईब ही संज्ञा होती); प्रत्येक विभागाचे पोट विभाग (डेमी) केले; या प्रत्येक विभागाच्या मध्यभागीं एक शहर अथवा गांव असे; प्रत्येक पोट विभागावर एक डेमार्कस नांवाचा अंमलदार असे. ह्या पोट विभागांत ज्याची गणना नाहीं त्याला आथेन्साचा नागरीक होण्याचा हक्क नव्हता. याप्रमाणें साधारण लोकांची नवीन वर्ग रचना होऊन त्यांनां बडे-लोकांचें जूं उडवून देतां आलें. सेनेटच्या सभासदांची संख्या ४०० च्या ऐवजीं ५०० केली. दहा पैकीं प्रत्येक वर्गाचे ९० सभासद या सभेंत असत; यामुळें तीं साधारण लोकांचीच सभा बनली. ही सर्वाजानिक सभा यापुढें नेमानें महिन्यांतून चारदां भरूं लागली. क्लीस्थेनिसानें आस्ट्रेसिझमची चाल सुरु केली असेंही सांगतात; हिच्यायोगानें जो कोणी आपल्या वजनानें अथवा लोकप्रियतेनें प्रजा स्वातंत्र्याला धोका आणणारा असा वाटेल त्यास हद्दपार करतां येई.

हे फेरफार बडे लोकांस अर्थातच उल्कापात करणारे असे वाटले व त्यांनीं स्पार्टनलोकांस आपल्या पक्षाला मिळवून घेण्याची खटपट चालविली; कारण स्पार्टनलोक नेहमीं प्रजासत्ते विरुद्ध बडेलोकांच्या सत्तेलाच पाठबळ देत. आल्कामियनाच्या घराण्याला शाप होता; तेव्हां त्या घराण्यांस हांकून द्यावें असा त्यांनीं (स्पार्टनलोकांनीं) आथेनियन लोकांस निरोप पाठविला. स्पार्टासारख्या बलाढ्य संस्थानाबरोबर लढाई करण्यांत आपल्या देशानें गुंतूं नये ह्मणून क्लीस्थेनिसनें आथेन्स सोडिलें. परंतु स्पार्टाचा राजा एवढ्यानें संतुष्ट झाला नाहीं. त्याच्या मनांत क्लीस्थेनिसाचा कट्टा शत्रू जो इसागोरास याला सर्व सत्ता

द्यावयाची होती; म्हणून त्यानें आटिकावर स्वारी केली, आणि इसागोरासानें दाखविलेल्या ७०० कुटुंबांस देशपार केलें. सर्व कारभार थोड्याशा बडेलोकांच्या हातीं देण्याच्या बेतांत तो होता. परंतु ह्या बेताला आथेनियन लोकांनीं आपलें सर्व सामर्थ्य खर्ची घालून अडथळा केला, आणि स्पार्टनराजाला बरोबरच्या लोकांसह किल्यांत कोंडिलें. थोड्या दिवसांत कोंडलेल्या लोकांस शरण जावें लागलें. राजा व इसागोरास यांस न दुखवितां जाण्याची परवानगी मिळाली; परंतु त्यांच्या आथेनियन साथीदारांस ठार मारिलें. क्लीस्थेनिस ख्रिस्ती शकापूर्वी ५०८ व्या वर्षी थाटानें आथेन्सांत परत आला.

ह्या पराजयामुळें स्पार्टाच्या राजास फार वाईट वाटून त्यानें बिओशियन, कोरिन्थियन आणि चाल्किडियन लोकांबरोबर संधी केला आणि आटिकावर दुसरी स्वारी करण्याचा निश्चय केला. परंतु आपणांस जें काम करावें लागणार त्याची कोरिन्थियन लोकांस लाज वाटली आणि स्वारींत मिळण्याचें त्यांनीं नाकारिलें; यामुळें तो बेत टाकून द्यावा लागला. ह्या संकटाचे वेळीं आथेनियन लोकांनीं इराणची मदत मिळविण्याचा यत्न केला, पण तो व्यर्थ गेला. परंतु शत्रूंनीं माघार घेतली हें पाहून बिओशियन व चाल्किडियन लोकांना शासन करण्याच्या उद्योगास ते लागले. दोन्हीं ठिकाणीं त्यांस यश आलें. आथेन्साला आतां आपसांतील अगर परकी कोणी शत्रु राहिला नव्हता. राजकीय स्वातंत्र्याच्या भरांत ते मजबूद व बलाढ्य होत चालले व त्याचें पाऊल इतकें संपाद्यानें पुढें पडत चाललें कीं लवकरच त्यानें सर्व स्पर्धा करणाऱ्या संस्थानांस मागें टाकिलें.

परंतु आथेन्साचे परशत्रु तेवढ्या वेळपुरते मात्र स्वस्थ बसलें होते. बिओशियनलोक झालेल्या पराभवाचें उसनें उगवि-

ण्यासाठीं आंतून जळत होतें. यासाठीं त्यांनीं आथेन्साचे पुरातनचे शत्रु ईजिना बेटांतील लोक यांच्याशीं सलोखा केला. त्या लोकांजवळ बलाढ्य आरमार होतें. याप्रमाणें युद्धास आरंभ झाला; त्यांत आपलें आरमार वाढविण्याची अवश्यकता आथेनियन लोकांस दिसून आली. हें युद्ध सुमारें ५० वर्षें चाललें. शेवटीं ख्रिस्ती शकापूर्वी ४५६ व्या वर्षीं ईजिना बेट जिंकिलें जाऊन त्याच्या आरमाराचा नाश झाला.

दरम्यान पिसिस्ट्रेटसाच्या घराण्याला घालवून देण्याच्या कामीं मदत करण्यास लावून डेलफाईच्या कौलानें आंपणांस फसविलें असें स्पार्टनलोकांस उमगून आलें. त्यांनीं हिपियसाला परत आथेन्सांत जाण्यास सांगितलें. हिपियसाला परत जातां येईल अशी तजवीज काढण्याकरितां स्पार्टा व स्पार्टाचे स्नेही यांची सभा भरली. या समेंत कोरिन्थाच्या वकिलानें स्पष्ट सांगितलें कीं स्वतंत्र लोकांवर जुलमी राजा लादणें अयोग्य होय. त्याच्या वक्तृत्वाची अशी छाप बसली कीं इतर वकिलांनींही त्या बेताविरुद्ध मत दिलें; यामुळें तो टाकावा लागला. नंतर लौकरच हिपियस हा इराणच्या दरबारीं गेला, आणि तेथील राजाला स्वदेशाशीं लढाईकरण्यास उद्युक्त करण्याचा त्यानें यत्न केला.

भाग ५.

राष्ट्रीयसंस्था--वसाहती ग्रंथरचना वगैरेबद्दल, इराणी लढायां पर्यंत.

युरोपाच्या आग्नेयदिशेकडील प्रदेशाचे स्वतंत्र रहाणें, अथवा तो आशियांतील एखाद्या राष्ट्राचा प्रांत बनणें हें आशिया आणि युरोप यांच्या दरम्यानच्या ज्या महत्वाच्या झगड्यावर अवलंबून होतें, त्याचें निरूपण करण्यापूर्वी, ग्रीकलोकांच्या कांहीं संस्था, त्यांच्या वसाहती व होमराच्या कालानंतरची त्यांच्या भाषेची वृद्धि यांचे सिंहावलोकन करणें आपणांस सोईचें होईल.

ग्रीकलोकांचे स्वतंत्र राष्ट्र असें कधींही नसून त्यांत अनेक लहान लहान संस्थानें होतीं. डोरियन लोकांच्या विजयानंतर स्पार्टानांवाचे संस्थान बाकीच्या सर्वांहून मोठें व वजनदार बनलें होतें हें पूर्वी सांगितलेंच आहे. सर्व संस्थानांची भाषा व धर्म हींच काय तीं त्यांच्यांत ऐक्य राहण्याचीं साधनें होतीं; पण त्या बाबतींतही निरनिराळ्या भागांत बराच फेरफार आढळे. तथापि फार प्राचीन काळापासून त्यांच्यांत धर्मप्रकरणीं व कांहीं-अंशीं राज्यप्रकरणींहीं कित्येक अशा संस्था होत्या कीं शेवटीं त्यांस राष्ट्रिय कटाचें स्वरूप प्राप्त झालें. यांतील अत्यंत महत्वाच्या संस्थेस आम्फीक्टीनियस अशी संज्ञा होती. या शब्दाचा ग्रीकभाषेंत अर्थ निरनिराळ्या वर्गांच्या लोकांचा मध्यस्थळी संघ होणें असा आहे. असें स्थळ बहुधा एखादें देवस्थान असे. असली सर्वांत प्रसिद्ध आम्फीक्टीयानी (सभेचें स्थळ) झटली झणजे डेल्फाय येथें भरत असे, ती होय.

इच्या सभा वसंतऋतूंत डेल्फाय येथें व वर्षाऋतूंत थरमापिली येथें भरत असत. डेल्फायच्या देवस्थानाचें संरक्षण करणें, व लढाईच्या प्रसंगीं जुलूम व क्रूरपणा होऊं न देणें हे तिचे उद्देश होतें; परंतु हा दुसरा हेतु लोक अजिबात विसरून गेल्याचें दिसतें. कारण या कटांतील लोकांनीं युद्धापासून होणाऱ्या आपत्तीं पैकीं, अत्यंत दुःखद आपत्ति एकमेकांवर लादल्याचीं उदाहरणें आपणांस आढळून येतात. याप्रमाणें कटांतील लोकांच्या दूषणास पात्र झालेल्या किसा शहरास शिक्षा करण्याकरितां त्याजबरोबर सुरू केलेली लढाई दहा वर्षेपर्यंत चालून, शेवटीं इसवी सना पूर्वी ५८५ वे वर्षीं तें जमीनदोस्त करण्यांत आलें; त्यांचीं बंदरें होरून टाकिलीं व आजूबाजूचा प्रदेश उद्वस्त करून टाकिला.

दुसऱ्या प्रकारच्या राष्ट्रीय संस्थांत उत्सवाच्या वेळच्या खेळांचा समावेश होत असे. हे खेळ नियमित वेळीं नेमलेल्या जागीं होत असून पृथ्वीच्या कोणत्याही मागावर राहणाऱ्या ग्रीकलोकांस तेथें येण्याची मोकळीक असे. यांत आलिम्पिक नांवाचे खेळ फार प्रख्यात असत. ते दर चौथ्या वर्षीं एलिस प्रांतांत आलिम्पिया येथें होत असत. ते फार प्राचीन काळापासून अस्तित्वांत असून मध्यें बरींच वर्षें बंद पडल्यावर इसवी स. पूर्वी ७८६ त पुनः चालू झाल्याचें सांगतात. या सालापासून ते अव्याहतरीतीनें दर चौथ्या वर्षीं होत असून काल 'गणणेस ग्रीकलोक तेथपासूनच आरंभ करीत असत. भीति अगर धोक्या वांचून लोकांस आलिम्पिया येथें जातां यावें ह्मणून हे खेळ चालू असलेल्या मुदतींत ग्रीकलोकांच्या आपसांतील कलागती व लढाया तकूब असत. या वेळीं पायीं धांवण्याच्या शर्यती,

घोडा अगर गाडींच्या शर्यती, उड्या मारणें, कुस्त्या खेळणें या सर्वांचा त्यांत समावेश होत असे. या खेळांच्या प्रसंगीं सर्व प्रकारचे डाव पेंच, शारीरिक चपळाई व कुशलता प्रगट करण्यांत येत असे. असल्या शर्यतींत बक्षीस ह्मणून जरी रानवट ओलिव्ह झाडाच्या पानांची माळच असे तरी ती प्राप्त करून घेणारा मनुष्य थोर सन्मानास पात्र होत असे; इतकेंच नाहीं तर त्याची सर्व कुळी योग्यतेस चढे. कवित्व व खोदीव काम यांस अशा प्रसंगीं मोठें उत्तेजन मिळे; कारण यावेळीं विजयी झालेल्या लोकांतच **पिंडार** कवीप्रमाणें उत्तम वीररस काव्यें करण्याची स्फूर्ति एखाद्यास होई. त्यांचे पुतळे **आलिंम्पिया** येथेंच नव्हत तर त्यांचे गांवींही पुष्कळदां उभारण्यांत येत असत. कधीं कधीं या प्रमाणें एकत्र जमलेल्या मंडळींत नूतन ग्रंथाचें वाचन सर्व समुदायापुढें होत असे. सर्व ग्रीकांस या खेळांत यथाशक्ति उद्योग करण्याची मोकळीक होती, तरी तेवढ्यानें राष्ट्रीय ऐक्याची भावना त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली होती असें दिसत नाहीं; तर उलट त्यापासून स्थानिक कोत्या अभिमानास मात्र प्रोत्साहन मिळत गेलें असें दिसतें.

अति प्राचीन काळीं सर्वत्र राजसत्ताक सरकार पद्धतीच चालू झाली होती. मात्र निरनिराळ्या ठिकाणच्या रूढी व पुढारी लोक आणि सरदारमंडळ यांजकडून सरकारची सत्ता नियंत्रित झालेली असे. परंतु ट्रॉयच्या लढाईनंतर गेलेल्या तीन चार शतकांच्या मुदतींत ग्रीसदेशाच्या बहुतेक भागांत "राजा" ही पदवी रद्द करण्यांत आली होती; आणि प्रत्येक ठिकाणीं महाजनवर्गाची सत्ता वृद्धिंगत होत जाऊन राजसत्तेच्या जागीं या वर्गाच्या सत्तेचा पगडा बसला होता. यांचीं कारणें पाहूं

गेल्यास तीं ग्रीकिलोकांची हिंमत व नानाप्रकारच्या विषयांत चालणारी त्यांची तैलबुद्धि हीं होत. कारण अशा स्वभावामुळें एक तर त्यांची गति खुंटली नव्हती, आणि दुसरें, कोणत्या एखाद्या प्रकाराचा उपक्रम झाल्यावर त्याच्या सर्व पर्यायांचा अनुभव पाहिल्यावांचून त्यांच्यानें स्वस्थ बसवतच नसे. असला फेरफार केवळ राजक्रांतीनेंच होत असे असें नाहीं, तर एकामागून एक सुधारणा होत जातां अखेरीस सर्व सत्ता महाजनांच्या हातीं गेली. साधारण जनसमूह संख्येनें वाढत चालला; परंतु महाजनांची संख्या इतरांपासून अलग राहण्याच्या त्यांच्या स्वभावामुळें कमी कमी होत चालली. त्यांनीं सर्वत्र जबरी व दांडगाई यांच्यायोगानें जनसमुहास आपल्या कह्यांत ठेविण्याचे व त्यांची अभिवृद्धि न होऊं देण्याचे प्रयत्न केले, परंतु ते सर्व प्रयत्न निष्फळ झाले. व्यवस्था व शांतता रहावी याकरितां कधीं कधीं जनसमूहावरोवर तोडजोड करणें, कधीं सर्वांचा भरवंसा ज्यावर आहे असा इसम अधिकारावर नेमणें त्यांस भाग पडे. आटिका प्रांतांत मानकरी वर्गाची सत्ता त्यांच्या आपसांतील कलहामुळें कशी नष्ट झाली व त्यांच्यापैकींच एक असामी जनसमुहाचा कैवारी म्हणून पुढें सरसावून नंतर अनर्गल सत्ताधीश कसा बनला हें आपण पाहिलेंच आहे. आथेन्सांत घडलेला प्रकार थोड्या बहुत प्रमाणानें ग्रीसच्या इतर संस्थानांतील प्रकारासारखाच होता.

ग्रीसदेशांतील लोकांच्या परदेशगमनानें आशियामायनरचा पश्चिमकिनारा व त्याच्या आजूबाजूचीं बेटें यांत वसाहातीचे तीन मोठे समूह स्थापन झाल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. तरी ग्रीकिलोकांच्या चंचल व भटकण्याच्या स्वभावाचें तित-

क्यानें समाधान झालें नाहीं. यानंतर त्यांचें लक्ष इटालीचा दक्षिणभाग, ज्याला असंख्य ग्रीक वसाहतीमुळें **म्याग्राग्रि-सिया** ह्मणजे मोठें **ग्रीस** असें नांव पडलें आहे, त्याकडेस व सिसिली बेटाकडे गेले. आफ्रिकेच्या उत्तरकिनाऱ्यावरील **किरेनीलोकां**च्या मुलखाकडेही त्यांच्या मनानें ओढ घेतली. **फ्रान्स** व **स्पेन** या देशांचे दक्षिणभाग व त्याच प्रमाणें **इजियन** व **प्रोपान्टीस**चा समुद्रकिनारा व **युक्साईन** नदीतीर हीं सर्व ग्रीक वसाहतींनीं व्यापून टांकिलीं. सारांश भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्या-जवळ असा एकही देश उरला नाहीं कीं, ज्यांत ग्रीकलोकांच्या सुधारणेच्या व बुद्धिसंस्काराच्या सौम्य स्वरूपाचा पगडा बसून त्यापासून लोकांचें कल्याण झालें नाहीं. यांतून भरभराटीस आलेल्या पुष्कळ वसाहतींनीं आपल्या मूळच्या देशापासून फार अंतरावर दुसऱ्या वसाहातींची स्थापना केली.

स्वतः ग्रीसांतील ग्रीकलोकांपेक्षां **आशियामायनरां**तील **आयोनियन** सारख्या कित्येक ग्रीक वसाहातींनीं ग्रंथरचनेंत व शांततेच्या काळांत उदयास येणाऱ्या विद्येंत फारच जलदीनें गति मिळविली. फार प्राचीन काळीं भव्य देवालयें बांधण्यांत आलीं तीं आयोनियांतील ग्रीक वसाहतवाल्यांनीं बांधिलीं धातूचे पुतळे ओतण्याची कलाही तेथेंच निघाली. संगमरवरी दगडाचे पुतळे खोदण्याचा प्रकार फार वढाला, त्याचें कारण अशा पुतळ्यांचा इमारतीशीं असलेला संबंध होय. देवालयें व इतर सार्वजनिक इमारतींवर शोभेसाठीं पुतळे व नकशीकाम करण्यांत येत असे. सार्वजनिक खेळांत विजयी होणारांचे पुतळे करण्याच्या प्रघातानेंही दगडी पुतळे खोदण्याच्या कामीं जलद सुधारणा

होण्यास बरीच मदत झाली. या कलेंत ग्रीकलोकांचा हात धरणारे कोणी अजून झाले नाहींत.

होमराच्या काळानंतर ग्रंथरचनेचा क्रम एकसारखा चालू राहिला आणि त्या वेळच्या संगीत कवितेंत सृष्टीच्या उत्पत्तीपासून तों अवतारीपुरुषांच्या कालापर्यंत सर्व प्रकारच्या दंतकथांचा समावेश झालेला आहे. ताल सुरावर ह्मणाववयाच्या संगीत कवितेचें अध्ययनही फार प्राचीनकाळापासून चालू होतें. होमराच्या पूर्वकाळचे अशा कवितेचे मासले फारसे उपलब्ध नाहींत; तथापि ज्या मानानें वीररस कविता मंदावत चालली त्याच मानानें याप्रकारची संगीत कविता विशेष पूर्णत्वास येत चालली. ग्रीसांतील संगीतकवींचे ग्रंथ पिंडारच्या कवनाखेरीज सर्व नष्ट झाले आहेत ही फार शोचनीय गोष्ट होय.

याप्रकारच्या कवितेचे जे थोडे चुटके आढळतात त्यांजवरून जात्या ग्रीकलोक तिचें फार महत्व मानीत, तें यथायोग्य होतें असे मानण्यास सबळ कारणें आहेत. डोरियन व इओलियनलोकांत असलीं कवनें मुख्यत्वेंकरून धर्म अथवा युद्ध अगर राज्यकारभार प्रकरणीं असत. पण इतरांत तीं मानासिकवृत्तीचीं द्योतक असत. संगीत कवींत उत्कृष्ट कवी ह्मटले ह्मणजे **आर्चिलोकस, हिपोन्याक्स, अल्कीओस**, अन्याक्रीयन, इबिकास, मिम्नर्मास आणि स्याफो हे होते. गद्य ग्रंथरचनेस इराणी लढायांच्या आरंभापर्यंत सुरुवात झाली नव्हती.

ग्रीकलोकांचा धर्म व कविता यांजवरूग असें स्पष्ट दिसून येतें कीं, फार प्राचीनकाळीं देखील ते फार शोधकस्वभावाचे असून त्यानीं अति गहन व खोल विषयांचा पत्ता लावण्याचा

प्रयत्न केला होता. सहाव्या शतकाच्या अर्धाच्या सुमारास सात शहाणे ह्मणून काहीं पुरुषांचें वर्णन केलेलें आढळतें. ते केवळ तर्क लढाविणारे तत्ववेत्ते नसून स्वतः राज्यकार्यधुरंधर, कायदे करणारे व न्यायाधिशाचें काम करणारे होते. याचवेळीं कित्येक धीट पुरुषांचें मन सृष्टिरचनेचा मुख्य आधार काय याचा पत्ता लावण्याकडे वळलें होतें. या सर्वांत **मिलिटस**चा थेल्स हा अति जुनाट होता. हा **सोलनाशीं** समकालीन असून आर्द्रता ही सर्व वस्तूंचें बीज आहे, असें प्रतिपादन करीत असे. त्याच्या पाठीमागून त्याच देशांत **आन्याक्झामिनीस** हा उत्पन्न झाला. वायूच सर्व वस्तूंचें आद्यकारण आहे असें तो मानीत असे; पण **इफिसास** येथें राहणारा **हिराक्लीयस** हाही शक्ति ऊष्णतेच्या अंगीं आहे असें प्रतिपादन करूं लागला. यावरून असें दिसून येतें कीं, ज्या गोष्टींचा निर्णय अद्यापि चालू कालांतील तत्ववेत्यांसही झाला नाहीं अशांचा उलगडा करण्याचा यत्न ह्या तत्वज्ञानाच्या बाल्यावस्थेंत उदय पावलेल्या तत्ववेत्यांनीं केला होता. दुसऱ्या प्रकारच्या तत्वविद्येचे उत्पादक इटालीच्या दक्षिणेस **इलिया** प्रांतांत जन्मले. तिचा मुख्य उत्पादक **झेनाफनीस**, हा या जगताच्या उत्पत्तीस सर्वोत्कृष्ट ज्ञानशक्ति आधारभूत असावी असें समजत असे. त्याच्या मागून झालेल्या तत्ववेत्त्यांनीं अगदीं निराळ्याच दिशेनें शोध चालविले. हे इलियांतील तत्ववेत्ते आपल्या मताचें प्रतिपादन काव्यरूपानें करीत असत, ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. अति प्रसिद्ध पाश्चात्य तात्विकविद्येचा उत्पादक **स्वामास** येथील रहाणारा **पिथ्यागोरस** हा असून तो इसवी सनापूर्वी सुमारें ५७० वर्षांच्या सुमारास उदयास आला. तत्वज्ञानी अथवा ज्ञानाच्या ठायीं प्रेम ठेवणारा हें उपपद प्रथम त्यानें धारण केलें असें

ह्मणतात. तो मोठा गणिती असून गणितविद्येंतील पुष्कळ शोध त्यानेंच केले असें ह्मणतात. ब्राह्मणाप्रमाणें आत्मा अमर असून त्यास अनेक जन्म घ्यावे लागतात असें तो ह्मणत असे. त्यानें परदेशीं पुष्कळ प्रवास केला होता. प्रवासांतून परत आल्यावर इटालींत क्रोटान येथें तो राहूं लागला असें ह्मणतात. तेथें उदार मनाच्या तरुणांची त्यानें एक मंडळी स्थापन केली, तिचें सर्व ग्रीक वसाहतीवर वजन पाडून त्या योगानें **महाजनसत्ताक** राज्यपद्धती सर्वत्र चालू करतां येईल अशी त्याची उमेद होती. परंतु तो प्रयत्न निष्फळ झाला. महाजनांच्या आत्महितपर बुद्धी-मुळें साधारण जनसमूहानें त्याजवर हत्यार उपसलें; आणि ज्या घरांत **पिथ्यागोरसा**चे अनुयायी जमत असत तें सन ५६४ त° (इसवी सनापूर्वी) जाळून टाकिलें. या प्रसंगीं त्यांतील पुष्कळ असामी मृत्युमुखीं पडले. स्वतः **पिथ्यागोरस** मेत्यापांटम येथें पळून गेला व पुढें तो तेथेंच मरण पावला असें ह्मणतात. **पिथ्यागोरसा**च्या अनुयायांच्या पराभवानंतर लवकरच दक्षीण इटालींतिल सर्व शहरांतून प्रजासत्ताक राज्यपद्धती चालू झाली.

भाग ६ वा.

इराणी लढयापासून आथेन्साचें वर्चस्व स्थापन झालें तेथपर्यंतचा वृतांत.

आशियामायनराच्या किनाऱ्यावरील ग्रीक वसाहतींस प्राच्य जुलमी राजांकडून हल्ले होण्याची व त्यांच्या ताब्यांत जाण्याची भीति फार होती. त्यांच्या अगदीं जवळचें राज्य लिडियाचें होतें. . तेथील राजांनीं एका मागून एक ग्रीक शहर जिंकण्याचा सपांटा चालविला. आणि शेवटचा लिडियाचा राजा क्रिसस याच्या वेळीं तर सर्वांस त्याची सत्ता मान्य करावी लागली होती. परंतु त्याच्या अंतःकरणांत ग्रीकलोकांविषयीं लोभ व पूज्यबुद्धि वास करीत होती. यामुळें त्यानें ग्रिकलोकांस आपला कारभार मनास येईल त्या रीतीनें चालवूं दिला. यामुळें त्यास खंडणी द्यावी लागत असे, या खेरीज क्रिससाचा अंमल आपणावर असल्याचें त्यांच्या मनांत येण्यासही जागा नव्हती. शेवटीं इराणीराज्याची स्थापना करणारा जो कायरस त्याजबरोबर क्रिससाचें युद्ध होऊन कायरासानें त्यास कैद करून आपण. लिडिया व त्याच्या ताब्यांतील ग्रीक वसाहतींचा धनी बनला ही गोष्ट खिस्ती शकापूर्वी वर्ष ५४६ यांत घडली. क्रिससानें त्यांस ज्या सौलती दिल्या होत्या त्या कायरसानें दिल्या असत्या तर ग्रीकशहरें आपल्या नव्या धन्याच्या अंमलास तेव्हांच राजी झालीं असतीं. परंतु कांहीं अटी न ठरविता त्यांनीं शरण यावें असें त्याचें म्हणणें पडल्यामुळें त्याजबरोबर टक्कर देण्याचा त्यांनीं निश्चय केला. बरोबरीचे नव्हत अशा दोन पक्षांच्या या भांडणांत आपणांस यश येणार नाहीं हें जाणून कां-

हींनीं देशत्याग करण्याचा विचार करून ते दूरच्या किनाऱ्यावर म्यासिलिया (मारसेल्स) व्होजियम (रेगिओ) व थ्रेसांत आवडेरा येथें जाऊन राहिले. आशियांतील बाकीच्या ग्रीकलोकांस कायरसाच्या सरदारांनीं एकामागून एक जिंकिलें व त्यांस इराणचें वर्चस्व कबूल करावें लागलें. तरी ह्या नवीन धन्याचा अंमल लिडियाच्या राजाच्या अंमलापेक्षां अधिक त्रासदायक झाल्याचें दिसत नाहीं; कारण खंडणी वेळच्यावेळीं येत असे तो पर्यंत ग्रीसच्या कारभारांत त्यांनीं फारशी ढवळाढवळ केली नाहीं. याप्रमाणें इराणच्या राजापासून विशेषसा त्रास न पोंचता इराणचा तिसरा राजा डरायस याच्या कारकीर्दीपर्यंत ग्रीकलोकांनीं शांतता व भरभराट यांचा अनुभव घेतला. परंतु या कारकीर्दीत एका बदफैली पुढाऱ्याच्या चिथावणीवरून आपल्या धन्याविरुद्ध उघड बंडावा करण्यास ते उद्युक्त झाले आणि तेणें करून आपल्या मातृभूमीसही इराणाबरोबरील भांडणांत ओढून घेतलें.

ड्यानुब व डान ह्या नद्यांमधील प्रदेशांतील सिथियनलोकांवर केलेल्या प्रचंड स्वारींत मिलिटसच्या हिस्टीयस नामक एका ग्रीक स्वतंत्र राजानें डरायस राजा व त्याचें सैन्य यांचा बचाव केला होता. यामुळें परत स्वदेशीं गेल्यावर डरायसानें त्यास थ्रेसांत स्ट्रीमाननदीच्या कांठावरील विस्तीर्ण प्रदेश जहागीर दिला. यावेळीं मिलिटस येथें हिस्टीयसाच्या जागीं त्याचा चुलत भाऊ आरिस्टागोरस स्वतंत्र राजा झाला. दरम्यानच्या मुदतींत डरायसाच्या सरदारांनीं थ्रेस जिंकून त्याच्या किनाऱ्यावरील ग्रीक वसाहतींस व आजूबाजूच्या बेटांस आपल्या अंमलाखालीं आणिलें. म्यासिडोनियाचा राजा आम्रिन्टास यास

ही इराणच्या राजास खंडणी द्यावी लागली. तरी आपण ग्रीसाचे धनी होण्याच्या कल्पना अद्याप इराणी राजाच्या मनांत आल्याचें दिसून येत नाहीं. त्यानें पूर्वेकडील मुलख जिंकण्याचा आपला क्रम तसाच सुरू ठेविला. यामुळें ख्रिस्ती शकापूर्वीचे वर्ष ५०९ च्या सुमारास इराणी राज्याची हद्द हिंदुस्थानच्या सीमेपासून इजियन समुद्रापर्यंत पसरली असून तींत थ्रेस व म्यासिडोनिया यांचा समावेश होत होता.

इकडे असा प्रकार चालला असतां थ्रेसांत स्वतंत्र राज्य स्थापण्याचा हिस्टीयस प्रयत्न करीत असल्याचा डरायस यास संशय येऊं लागला. यामुळें त्याचे बेत हाणून पाडावे ह्मणून डरायसानें आपल्या सारखा मौल्यवान स्नेही नेहमीं जवळ असावा असें मनांत वागतें, या साठीं आपण इराणांतच येऊन रहावें, असा त्यास निरोप पाठविला. त्याप्रमाणें तो तिकडे गेल्यावर लवकरच आपण येथे अटकेंत पडल्याचें त्याच्या लक्षांत आलें. आपल्या देशबांधवांच्या बंडाव्याशिवाय येथून निसटून जाण्याचें दुसरें कांहीं साधन त्यास दिसून येईना. तशा बंडाव्यास ती वेळ अनुकूळ आहे असेंही त्यास वाटलें.

न्याक्सास येथील लोकांनीं हद्दपार केलेल्या महाजनपक्षानें त्याचा चुलत भाऊ आरिस्ट्यागोरस याचे सहाय्य मागितलें होतें. ही गोष्ट त्या बेटाचें स्वामित्व संपादण्याच्या कामीं आपणांस अनुकूल आहे असें समजून पश्चीम आशियाचा क्षत्रप किंवा सुभेदार आर्टाफर्नीस यांचे सहाय त्यानें मागितलें. तें बेट सहज घेतां येण्यासारखें असून त्यासंबंधीं सर्व खर्चदेण्यास आरिस्टागोरस तयार आहे असें कळल्यावरून एका इराणी नौकाधिका-

ऱ्याच्या हाताखालीं मोठें आरमार देऊन त्यास आरिस्टागोरस याच्या स्वाधीन केलें. याप्रमाणें सर्व गोष्टींची अनुकूळता दिसली; परंतु आरिस्टागोरस व सदरील नौकाधिकारी यांजमध्यें लवकरच वेबनाव उत्पन्न झाला. यामुळें सूड उगविण्याच्या हेतूनें त्यानें न्याक्सासलोकांवर येणाऱ्या अरिष्टाची सूचना त्यांस दिली. अशा रीतीनें हा सर्व उद्योग निर्फळ झाला व कांहीं लभ्यांशावांचून आरिस्टागोरस यास मिलिटस येथें परत जावें लागलें. आपलें वचन आतां पाळितां येत नाहीं यामुळें आपले दिवस भरले असें त्यास समजून चुकलें. आपल्या बचावास आतां काय युक्ति योजावी याच्या विवंचनेंत तो असतां, आपल्या बंदीवासास अगदीं कंटाळून गेलेल्या हिस्टियसाकडून त्यास निरोप गेला. इराणच्या अंमलास नाखुष असलेल्या सर्व लोकांस ही बिडी तोडून टाकण्यास काय उपाय करावयाचा विचार करण्यासाठीं आरिस्टागोरसानें एकत्र जमविलें, आणि स्वदेशबांधवांचा लोभ संपादन करण्याच्या उद्देशानें त्यानें आपल्या हुद्याचा स्वतः बेदावा दिला; इतकेंच नाहीं तर इराणच्या राजाशीं स्नेहभावानें वागणारे म्हणून जितके स्वतंत्र अधिकारी त्यास माहीत होते त्या सर्वांस त्यानें कैद करविलें.

इतकें केल्यावर स्वदेशांतील ग्रीकलोकांचें सहाय मिळविण्याचा विचार आरिस्टागोरास यानें केला–तो प्रथम स्पार्टाकडे गेला. तेव्हां त्यानें मोठमोठीं वचनें दिल्यामुळें त्याचा हेतू बहुतेक सिद्धिस गेल्यासारखें झालें होतें. पण इतक्यांत राजकन्येकडून कांहीं सूचना झाल्यामुळें या कामांत पडण्याचें राजानें नाकबूल केलें. आथेन्सांत त्यास यापेक्षां बरें यश आलें. हद्दपार झालेला बेबंद राजा हिपीयस यास पुनः स्थानापन्न कर-

ण्याचा इराणच्या राजाचा उद्देश असल्याचें वर्तमान आथेन्सां-तील लोकांस समजलें होतें; ह्मणून आपल्या आशियांतील बांधवाच्या सहायार्थ वीस गलबतें पाठविण्याचा आथेनियन लोकांनीं बेत केला. हें आरमार व युबियांतील इरिट्रिया श-हरांतील पांच गलबतें मिळून ख्रिस्ती शकापूर्वी वर्ष ४९९ यांत नांगर उठवून निघालीं. आशियांत येऊन दाखल झाल्यावर आयोनियन लोकांकडून त्यांस कुमक मिळून हीं लढाऊ गलबतें एकदम साराडिस शहरावर रोंख ठेऊन गेलीं. तेथील इराणी सुभेदारानें मजबूत किल्लयाचा आश्रय केला. नंतर ग्रीकलो-कांनीं शहराचा खालील भाग लुटून व जाळून फस्त केला; परंतु किल्ला घेतां न आल्यामुळें ते परत इफिसस येथें गेले. आ-पला पाठलाग होईल असें त्यांच्या ध्यानीं मनीं नव्हतें. परंतु इराणच्या राजानें मोठें सैन्य जमाकरून त्यांस इफिसस येथें गांठून त्यांचा अगदीं हिरमोड करून टांकिला. यापुढें आयो-नीयन लोक जिकडे वाट फुटेल तिकडे गेले व आथेनियन व इरिट्रीयन लोक स्वदेशीं चालते झाले.

हें वर्तमान डरायस यास कळतांच त्यास अतिशय संताप आला. असल्या भिकारड्या परकी लोकांनीं आपल्या बंडखोर प्रजेस मदत करावी, हें विशेषें करून त्यास खपलें नाहीं; व आथेनियन लोकांचें आपणास नित्य स्मरण करीत जावें असा आपल्या एका गुलामास त्यानें हुकूम केला. इकडे आयो-नियन लोकांचें बंड दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चाललें. आपणास आयोनियांत पाठविल्यास फारशी अडचण न पडतां जिकडे तिकडे शांतता करून देईन अशी मोठ्या शिताफीनें हिस्टियस यानें राजाची समजूत केली व तसा हुकूम मिळाविला. इराणी

सरदारांनीं बंडखोर शहरें एकामागून एक घेतलीं. आपला जय होण्याची आतां आशा राहिली नाहीं असें आरिस्टागोरस यास वाटतांच तो थ्रेसांत गेला; व तिकडे लवकरच मारला गेला. हिस्टियस आशियामायनरांत जाऊन पोंचल्यावर या बंडाच्यांत त्याचें अंग असावें असा संशय त्याजविषयीं आला. तेव्हां चियास बेटांत पळून जाणें बरें असें त्यास वाटलें. तेथें गेल्यावर सर्व ग्रीकलोकाचें धूरिणत्व मिळविण्याचा त्यानें बेत केला. परंतु कोणाचाही त्याजवर विश्वास नसल्यामुळें कांहीं कालपर्यंत एकाद्या निराश्रित उपटसुळाप्रमाणें त्यास भटकत रहावें लागलें. शेवटीं त्यानें लहानसें आरमार जमविलें, व त्याच्या सहायानें आपण आयोनियाचा राजा असल्याचें कबूल न करणाऱ्या सर्व शहरांच्या व्यापारी गलबतांकडून कोंवडी पट्टी घेऊं लागला.

आयोनियन लोकांच्या बंडाचा आतां शेवट होत आला होता. ग्रीकलोकांची आपसांत फूट झाली होती; व ख्रि. शका पूर्वी वर्ष ४९४ यासालीं त्यांचा पराभवही झाला. पुढील वर्षीं सर्व ग्रीक शहरें पुनः इराणच्या ताब्यांत गेलीं. परंतु कांहीं ठिकाणच्या लोकांनीं आपणांस जिंकणाराच्यां भीतीनें घरें दारें सोडून युक्झाईन नदीच्या कांठीं मेसेंब्रिया येथें वस्ती केली.

या निर्फळ झालेल्या बंडानंतर आशियांतील लोकांवर पूर्वीपेक्षां जास्त सक्ति होऊं लागली. व्यवस्था व शांतता पुनः प्राप्त झाली; परंतु त्यांचें स्वातंत्र्य नष्ट झालें. आरटयाफरनीसा मागून आलेला अधिकारी मारडोनीयस यानें पहिली सक्ति थोडीशी कमी केली; परंतु अथेन्स व इरिट्रीया यांस त्यांच्या उद्दामपणाबद्दल चांगलें शासन करण्याविषयीं त्यास हुकूम झालेला होता, यामुळें

एक मोठें आरमार त्यांजवर पाठविण्यांत आलें. परंतु आथास नामक डोंगरा लगत त्यांस जबर तुफानानें गांठिलें. यामुळें ३०० गलबतें व २०००० लोक नष्ट झाल्याचें सांगतात. खुष्कीवरील खुद्द मारडोनीयस याच्या हाताखालचें सैन्य थ्रेसांतून चाललें असतां त्याजवर हल्ले होऊन त्याचें इतकें मोठें नुकसान झालें कीं, त्यामुळें आशियांत परत जाणें हाच उत्तम मार्ग होय असें त्यास वाटलें. पण या संकटामुळें डरायसाचा निश्चय यत्किंचितही ढळला नाहीं. त्यानें नवें सैन्य उभें केलें, व ताबेदारी सूचक 'जल व मृत्तिका' यांची मागणी करण्यासाठीं त्यानें ग्रीक शहरांतून जासूद (हेरल्ड) पाठविले. आथेन्स व स्पार्टा येथें गेलेले जासूद ठार मारले गेले. परंतु इजिना व इतर बेटें व शहरें यांणीं ती मागणी मान्य केली. यामुळें एकंदर ग्रीसदेशाच्या हितास विघातक असा राजद्रोहाचा अपराध ईजिनियनांनीं केला अशी आथेनियन लोकांनीं स्पार्टा येथें कागाळी नेली. त्यावरून स्पार्टन लोकांनीं ईजिनियन लोकांवर सैन्य पाठविलें; तेव्हां आथेनियनाकडेस आपल्यांतील दहा पुढारीलोकांस ओलीस देणें त्यांस भाग पडलें, यामुळें आथेनियन व इजियन यांच्या दरम्यान झटपटी सुरू झाल्या असतां तिकडे इराणच्या राजानें युरोपावर स्वारी करण्याची तयारी चालविली.

सन ४९० त (खि. पू.) एक मोठें इराणी आरमार तयार होऊन त्याचें अधिपत्य डेटिस व आरट्याफरनीस यांजकडेस देण्यांत आलें. सैन्य गलबतावर चढल्यानंतर या आरमारानें युबियाकडे चाल केली व तें बेट ताब्यांत आणिलें. इराणी सैन्य इरिट्रीया येथें येऊन पोंचल्यावर त्यानें त्या शहरास वेढा दिला. तेथील कांहीं फितुरी लोकांनीं शहराचे दरवाजे खुले

करून शत्रूस आंत घेतल्यामुळें शत्रूनें तें शहर लुटलें आणि त्यास आग लाऊन दिली; तेथील लोकांस बंदीवान करून गुलाम ह्मणून आशियांत पाठविले.

यानंतर हिपीयसाच्या हाताखालीं सर्व आरमार आटिकाच्या किनाऱ्याकडे गेलें, व सैन्य माराथानच्या मैदानांत गलबतांतून उतरलें. हें वर्तमान आथेन्सांत समजतांच शस्त्र धारणकरण्याचें सामर्थ्य असणाऱ्या प्रत्येक पुरुषानें व आपली मुक्तता करून घेऊं इच्छिणाऱ्या गुलामांनीं सुद्धां देशाचें रक्षण करण्यास सिद्ध असल्याचें सांगितलें. या सर्वांच्या शत्रूबरोबर टक्कर देण्यास मदत मिळावी ह्मणून स्पार्टाकडेही एक जासूद पाठविला.. आपणांस कांहीं धास्ती नाहीं असें स्पार्टन लोक समजत होते; यास्तव धर्माची कांहींतरी सबब दाखवून तत्काळ जाण्याचें त्यांनीं नाकारिलें, व पुढेंमागें आपण मदत करूं असें आश्वासन देऊन त्यांनीं त्या जासुदाची बोळवण केली. स्पार्टानें दाखविलेल्या ह्या बेपर्वेमुळें किंचितही न डगमगतां आपले जुने स्नेही जे प्लाटीयन त्यांच्या एका टोळीशिवाय दुसऱ्या कोणाचें सहाय नसतां चाल करून येणाऱ्या शत्रूवर हल्ला करण्याचा आथेनियन लोकांनीं निर्धार केला. मिल्टायाडिसासुद्धां एकंदर दहा सरदार या लष्करांत अधिकारी होतें; पोलमार्क कालीमेकस हा या सर्वांवर मुख्य होता. एकदम लढाई करावी किंवा स्पार्टनलोकांकडून कुमक येईपर्यंत वाट पहावी याबद्दल त्यांच्यांत वाद लागला. दिरंगाईपासून घात होईल असें मिल्टायडिस यास वाटत असल्यामुळें शत्रूवर एकदम तुटून पडणें आवश्यक असल्याबद्दल त्यानें सोबतीच्या इतर सरदारांची खात्री केली. सूचना होतांच आथेनियन लोक अनिवार झपाट्यानें

शत्रूवर घुसले. आपणावर चाल करून येणारे लोक इतके थोडे आहेत असें पाहून इराणी सैन्यानें प्रथम अवहेळणाच केली. परंतु लवकरच हातघाईच्या लढाईचा प्रसंग आला, व मिल्टायडिसाच्या शहाणपणाच्या व्यवस्थेमुळें इराण्यांची दाणादाण उडून पराजय झाला; त्यांची फार धांदल होऊन त्यांनीं किनाऱ्याकडे पळ काढिला. तेव्हां त्यांचे हजारों लोक लढाईंत, दलदलींत, व आपलीं गलबतें गांठण्याच्या प्रयत्नांत असतां मरण पावले. नंतर सुमियनच्या भूशिरास प्रदक्षणा घालून आटिकवर पंश्चीम अंगानें हल्ला करण्याच्या इराद्यानें इराणी आरमार दक्षिणेकडे वळलें. असा प्रकार घडेल यार्चीं आथेनियनांनीं पूर्वीच अटकळ केली होती. ह्मणून धोक्याच्या ठिकाणाकडे त्यांनीं एकदम चाल केली. यामुळें असें झालें कीं इराणी सैन्य तेथें जाऊन पोंचलें तेव्हां शत्रु आपली वाट पहात हजर असल्याचें त्यास आढळून आलें. याप्रमाणें आपला बेत फसला असें पाहून ग्रीस बरोबर जास्त लढण्याचा बेत रद्द करून ते आशिया खंडांत माघारे गेले. ही गोष्ट सन ४९० त (ख्रि. पू.) घडली.

दुसऱ्या कोणाचें सहाय नसतां म्यारांथानच्या लढाईंत आथेनियन लोकांनीं शत्रूच्या अपार सैन्याचा पराभव करून सोडल्यामुळें त्यांच्या अंतःकरणांत योग्य प्रकारचा उदात्त अभिमान उत्पन्न होऊन आपलें सामर्थ्य किती आहे हेंही त्यांस कळून आलें. लढाई आटोपल्यावर थोडीशी फौज घेऊन स्पार्टनलोकही आले. परंतु आतां त्यांची कांहीं जरूरी नव्हती; यामुळें आपलें कर्तव्य बजाविण्यास चुकलों, व आशियांतील जुलमी राष्ट्राचा एक प्रांत होऊन राहण्याचा ग्रीसावर आलेला प्रसंग टाळ-

ण्याच्या महत्कृत्यांत आपलें मुळींच अंग नव्हतें ह्मणून शरमिंदे होऊन त्यांस परत जावें लागलें. आपल्या सैन्यास जय प्राप्ती करून देणाऱ्या मिल्टायडिसाचा अखेर परिणाम दुःखद झाला; पण त्यास तो अगदीं पात्रच नव्हता असें केवळ ह्मणतां येणार नाहीं. जय प्राप्तीनें चढून जाऊन राज्याचा विस्तार वाढविण्याकरितां ह्मणून आपल्या ताब्यांत एक भव्य आरमार देण्यास त्यानें स्वदेश बांधवांस उद्युक्त केलें. परंतु तें मिळविण्यांत वस्तुतः त्याचा हेतु खासगी शत्रूस शासन करण्याचा होता. तो तर सिद्धिस गेला नाहींच; परंतु त्यास गुडग्यांत जखम मात्र लागली. यामुळें त्यास कांहीं एक कार्य तडीस नेल्या. वांचून स्वदेशीं परत जावें लागलें. तेथें लोकांस निरर्थक खर्चांत घातल्याचा आरोप त्याजवर करून त्यानें पन्नास ट्यालेंट (ह्मणजे ९००० पौंड) दंड द्यावा असा हुकूम झाला. तो देतां न आल्यामुळें त्यास कैदेंत टांकिलें; व तेथें लवकरच तो जखमेच्या व्यथेनें मरण पावला.

म्याराधान येथें पराजय झाल्यामुळें इराणच्या राजास उलट जास्त खटाटोप करण्याची हुरूप आली; कारण आपला पराजय झाला तो युरोपांत जितकें सैन्य पाठविणें अवश्य होतें तितकें न पांठविल्यानें झाला, अशी त्याची समजूत झाली. यासाठीं आपल्या सर्व सैन्यानिशीं ग्रीक लोकांस पुरता हात दाखविण्याचा त्यानें संकेत केला. त्याच्या सर्व राज्यभर एकसारखी तीन वर्षे तयारी चालली होती. इतक्यांत मिसर देशांत बंड उद्भवल्यामुळें त्याचें लक्ष एकदम तिकडे गेलें. यावेळीं मिसर-देश इराणी राष्ट्रांत मोडत होता. या बंडाचा मोड होण्यापूर्वी सन ४८६ व (खि. पू.) तो मरण पावला. त्याच्या मागें

त्याचा मुलगा झरक्सीस हा सिंव्हासनावर बसला. आपल्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी त्यानें मिसर देश पुनः आपल्या अंमलांत आणिला. नंतर ग्रीसावर नवीन स्वारी करण्याचा विचार झाला. मिळवेल तेवढें मोठें सैन्य जमविण्याकरितां सर्व आशियाखंड चार वर्षेपर्यंत धुंडाळिलें. मारडोनीयसाच्या आरमाचा ज्या लांबपर्यंत पाण्यांत गेलेल्या टेंकडाच्या आजूबाजूस नाश झाला होता, त्यास प्रदक्षणा घालून जाण्याचा प्रसंग पडूं नये म्हणून मौंट एथासच्या सखलवट संयोगीभूमीवर कालवा काढून हेल्लिस्पोन्ट नदीवर नावेचा पूल केला.

सन ४८० (ख्रि. पू.) च्या वसंत ऋतूंन झरक्सीस सारडीस येथून निघाला; त्यावेळीं त्याचे बरोबर सर्व वर्णाचे, सर्व प्रकारच्या पेहेरावाचे, सर्व जातीचीं शस्त्रास्त्रें वापरणारे, व सर्व भाषी बोलणारे मिळून जवळजवळ दोन लक्ष लोक होते असें सांगतात. आबिडास नामक शहरा नजीक ते हेलिस्पान्ट नदी उतरले, आणि थ्रेस व म्यासिडोनीया यांतून किनाऱ्या किनाऱ्यानें थेसलीकडे गेले. आरमारांत १२०७ थोर सीबाडी व ३००० लहान गलबतें होतीं, तीं याच किनाऱ्यवर खुष्कींतील लष्करा सोबत चालली.

आपला बचाव कायतो आतां, ऐक्यांत आहे असें सर्व खऱ्या देशाभिमानी पुरुषांस वाटूं लागलें. तथापि उत्तरेकडील बहुतेक सर्व संस्थानांनीं शत्रूच्या मागण्या कबूल केल्या. याचें एक कारण तीं भेदरून गेलीं होतीं हें होय. दुसरें कारण सत्ता हातीं असणाऱ्या महाजनांनीं त्यांस तसें करणें भाग पाडिलें. फोकियन आणि थेसपी व प्लचाटी हीं दोन बिओशियन लोकांचीं नगरें मात्र

इमानानें ग्रीस देशाचा पक्ष धरून राहिलीं. या आलेल्या अरिष्टास तोंड देण्याची पेलापोनीसांतील हुबतेक सर्व लोक व आथेन्स आणि स्पार्टा यांनीं शर्थ करून सोडिली. यावेळीं आथेन्सांत थेमीष्टाक्लीस हा पुढारी होता. एखादा प्रसंग येऊन ठेपल्यावर विवक्षीत उद्देश सिद्धीस जाण्यास काय केलें पाहिजे हें तत्क्षणींच समजण्याची त्याच्यांत विलक्षण शक्ति असल्याबद्दल त्याचा फार लौकिक होता. लोकप्रीतींत त्याच्याशीं स्पर्धा करणारा गृहस्थ आरिस्टायडीस हा होता. त्याच्या आंगचा प्रामाणिकपणा व निर्लोभता यांच्या योगानें 'धीजस्ट' (सच्चा) असें त्याचें उपनांव पडलें होतें. दोघांत देशभक्ति अत्त्युत्कट असे; परंतु आरिस्टायडीसाची भक्ति शुद्ध व एकमार्गी होती. आपल्या देशास वैभवास चढवावें अशीं थेमीस्टाक्लीसाची इच्छा होती, पण ती त्यापासून आपली सत्ता वाढविण्याकरितां होती. अशा वृत्तीच्या दोन व्यक्तींची खडेजंगी व्हावयाचीच त्याप्रमाणें सन ४९३ (खि. पू.) या वर्षीं आस्ट्रेसिझम* ह्मणून हद्दपार करण्याचा एक प्रकार होता त्या प्रकारानें आरिस्टयडीस यास हद्दपार करावा अशी येमीस्टाक्लीसानें योजना केली. यामुळें लोकप्रीतीचा ओघ अव्याहत त्याजकडे वहात राहिला. आरमार वाढविणें अगदीं अवश्य आहे असें त्यास वाटल्यावरून लारियन येथील रुप्याच्या खाणींपासून होणाऱ्या फायद्याची आशा न ठेवितां त्याचा विनियोग आरमाराच्या बळकटीकडे

---

* ही रीत अशी होती कीं ज्याला हद्दपार करावें असें मनांत असेल त्याचें नांव एका शिंपीवर लिहीत. अशा नांव लिहीलेल्या शिंप्या एका मांड्यांत टांकीत. नंतर ज्याज्या नांवाच्या जास्त शिंप्या निघत त्यात हद्दपार करण्यांत येई.

करण्याविषयीं थेमिस्टाक्लीसानें आथेनियन लोकांस प्रवृत्त केलें. त्यांच्या लढाऊ जहाजांची संख्या आतां २०० वर येऊन ठेपली व असल्या हुशार नायकाच्या धोरणानें वागल्यामुळें जलमार्गावर आथेन्सार्चे वर्चस्व स्थापन झालें.

याप्रमाणें हीं दोन पुढारी शहरें शत्रूशीं सामना करण्याची हरप्रयत्नानें तयारी करीत असतां इतर ग्रीक संस्थानांतून माजलेली दुही अत्यंत शोचनीय होती. तंटे मिटाविण्याच्या व आपल्या देशबांधवांची सर्व शक्ति एकवटून दृढ करण्याच्या कामीं थेमिस्टाक्लीसानें श्रम करण्यांत कमी केलें नाहीं. स्वातंत्र्येच्छु लोक कोरिन्थ येथें एकत्र जमले व त्यानीं देशाचें रक्षण करण्याच्या आणि शत्रूस हारीं जाण्याचा प्रत्यक्ष प्रसंग आला नसतां जीं संस्थानें शत्रूस वश झालीं त्यांच्या उत्पन्नाचा एक दशांश भाग डेलफाय येथील देवस्थानाच्या शेवेस अर्पण करण्याच्या आणा शपथा वाहिल्या. हें कार्य थेमिस्टाक्लीसाच्या वजनामुळेंच झालें. शत्रूच्या पुढील गतीस थरमापिलीच्या घांट वाटेंत प्रतिबंध करण्याकरितां पेलापोनिशियन लोकांची एक लहानशी टोळी रवाना करण्यांत आली व युरिबायडीस याच्या ताब्यांतील आरमार युबियन आखाताच्या द्वाराच्या उत्तरेकडील जागीं आसरा धरून राहिलें.

इराणी आरमार दक्षिणेकडे चाललें असतां त्यास भयंकर वादळानें गांठिलें. तें वादळ तीन दिवस चाललें. त्यांत ४०० गलबतांचा व असंख्य जीवांचा नाश झाला. तथापि या अरिष्टामुळें त्या अफाट आरमाराचें तादृश नुकसान झालें नाहीं; व ग्रीक आरमारांतील गलबतांची फाटाफूट होऊं न देण्याकरितां

थेमिस्टाक्लीसास फार प्रयास पडले. परंतु अखेरीस शत्रूवर हल्ला करण्यासाठीं ग्रीक आरमार मोठा हिय्या करून बाहेर पडलें. तेव्हां मोठी लढाई जुंपली. तींत शत्रूच्या असंख्य अवजड गलबतांची धांदल उडाली व मोठें नुकसान झालें; तथापि ग्रीक लोकांचेंही बरेंच नुकसान झालें आणि थरमापिली येथें घडलेल्या प्रसंगाचें वर्तमान समजल्यावरून त्यांनीं पाऊल मागें घेण्याचा निश्चय केला.

इराणी लोकांच्या गतीस अवरोध करण्यासाठीं जी-लहानशी टोळी पाठविण्यांत आली होती, तिचें अधिपत्य स्पार्टाचा राजा **लिओनिडास** याजकडेस होतें. त्याची एकंदर फौज कायती ३०० स्पार्टन व दोन चार हजार ग्रीसच्या इतर भागांतील लोक इतकीच होती. ही खिंड टाळून पुढें जाण्यास डोंगरांतून दुसरी एक आडवाट होती. परंतु ही गोष्ट **लिओनीडास** यास प्रथम ठाऊक नव्हती. जेव्हां त्यास ती समजली, तेव्हां त्यानें डोंगराची वरची बाजू अडवून धरण्याकरितां **फोकियनांस** रवाना केले. इराणीलोकांचें अपार सैन्य पाहून **लिओनिडा**साच्या हाताखालील लोक अगदीं भेदरून गेले होते. यामुळें त्यांस एकत्र राखण्यास त्यास महत्प्रयास पडले. हे थोडकेसे ग्रीक शांतपणानें आपणाकडून हल्ला होण्याची वाट पहात राहिले आहेत, हें ऐकून झरक्सीसास थोडेंथोडकें आश्चर्य वाटलें नाहीं. परंतु हल्ला सुरू झाला तेव्हां त्याच्या लोकांस अनेकवेळां माघार घ्यावी लागली. पुष्कळ इराणी लोक मारले जाऊन झरक्सीस निराश होण्याच्या बेतांत आला; इतक्यांत **एफिआल्टिस** नामक एका ग्रीक भेद्यानें डोंगरांतली वाट त्यास दाखविली. हें वर्तमान **लिओनिडास** यास समजलें, तेव्हां आपल्या साथिदारांपैकीं ज्यांची

परत जाण्याची इच्छा दिसली त्यांस त्यानें तसें करूं दिलें. तरी तो आणि त्याचे स्पार्टनलोक यांनीं खिंडीचा मार्ग अडवून धरण्याचा निर्धार केला. स्पार्टनां खेरीज कांहीं **थेसपियन** व ४०० **थिवन** इतकेंच सैन्य त्याजजवळ राहिलें होतें. इराणी लोक आडवाटेनें डोंगर चढून वर आले, तेव्हां **फोकियन** लोकांनीं तेथून पळ काढिला. नंतर लवकरच इराणी सैन्य खिंडीच्या दक्षिणद्वाराजवळ येऊन पोंचलें. यामुळें ग्रीक चारीबाजूंनीं कोंडले गेले. शत्रूचा जितका नाश करवेल तितका करून आपले प्राण खर्ची घालावे असा **लिओनिडास** व त्याचे लोक यांचा निश्चय होऊन चुकला होता. पुष्कळदां इराणीलोकांस त्यांनीं माघारे घालविले. अखेरीस स्पार्टनलोक एका टेंकडीवर चोंहोंकडून वेढले जाऊन शत्रूच्या बाणांनीं सर्व पडले. ते पडल्या ठिकाणीं मागाहून त्यांस पुरून त्यांच्या शौर्यास अनुरूप असा शिळालेख तेथें ठेविण्यांत आला. ही थरमापिलीची लढाई ४८० (ख्रि. पू.) च्या उन्हाळ्यांत झाली. तींत २०००० इराणीलोक पडले असें म्हणतात.

आतां शत्रूच्या सैन्यानें दक्षिणेकडे चाल करून मार्गांत जें कांहीं मिळालें तें उध्वस्त करून टांकिलें. **डेलफाय**चें देवस्थान मात्र मोठ्या चमत्कारानें निभावलें. त्यांतील संपत्तीच्या लौकिकावरून इराणीलोक त्याजवर घसरले; पण इतक्यांत एकदम मेघगर्जनें प्रमाणें कडकडाट सुरू होऊन पारनेसस पर्वतावरील खडक त्यांच्या आगावर कोंसळले. यामुळें घाबरून जाऊन त्यांनीं माघार घेतली. नंतर हें सैन्य **बिओशिया**तून **आटिका** प्रांताकडे चाललें. तेव्हां **पेलापोनिसां**तून कुमक येण्याची वाट

पाहून दमल्यावर थेमिस्टाक्लीसाच्या सांगण्यावरून आथेनियन-लोकांनीं आतां पुढें काय करावें याबद्दल कौल घेण्यासाठीं डेल-फाय येथें लोक पाठविले. आपल्या लांकडी भिंतीआड राहून त्यांनीं आपला बचाव करावा असा कौल झाला. या गूढांत टांकणाऱ्या सह्यामुळें त्याच्या अर्था बद्दल अनेक तर्क निघाले, परंतु त्याचा अर्थ लावण्यास थेमिस्टाक्लीसास मुळींच अडचण पडली नाहीं. आरमाराच्या सहायानें तुह्मीं आपलें रक्षण केलें पाहिजे, असा कौलाचा अर्थ करून त्यानें कळविलें. हा अर्थ सर्वांस मान्य झाल्यावर आथेनियन लोक आपल्या साथीदारांसह आर्टेमिशयन येथून सालामिसकडे चालते झाले. तसेंच थेमिस्टाक्ली-साच्या सह्यानें शहराच्या रक्षणाचा भार ग्रामदैवत आथीना इजवर टांकून आपलीं मुलेंमाणसें व जंगम मालमत्ता सालामिस, इजिना व ट्रीझन येथें पाठविण्याचा आथेनियन लोकांनीं निश्चय केला.

सालामिस येथें एकत्र जमविलेल्या ग्रीस लोकांच्या आर-मारांत एकंदर ३०० गलबतें होतीं. संयोगीभूमि लगत राहिल्यानें पेलापोनीशन सैन्याच्या सहायानें एक मतानें वागतां येईल, ह्मणून या आरमारानें तेथें ठाणें धरून असावें असें बहु-तेक सर्वानुमतें ठरलें. शत्रूच्या आरमारास सालामिसच्या सामु-द्रधुनींत जाऊं देऊन तेथें त्यास गांठणें हाच निर्भय मार्ग होय, अशी थेमिस्टाक्लीसाची पक्की समजूत होती. ह्मणून आपल्या सांगण्याचा कांहीं उपयोग होत नांहीं असें पाहून सर्व आथेनियन लोकांसह आपण अन्यत्र कोठें तरी जाऊन वसाहत करूं अशी त्यानें भीति घातली. या धमकी पासून कांहींशी फलनिष्पति झाली. तरी पेलापोनीशियन लोक कदाचित् आंपला बेत फिर-

विण्याचा संभव असल्यामुळें निकराच्या लढाईचा प्रसंग जितक्या लवकर आणवेल तितका आणण्याचा त्यानें निश्चय केला. आपण भेद्या असल्याचें मिष करून एका विश्वासू गुलामास तिकडे पाठवून त्यानें इराणी सैन्यांतील नौकाधिपतिस असें जाणविलें कीं, ग्रीक लोक इतक्यांत चोहोंकडे पसरण्याच्या बेतांत आहेत, तेव्हां तत्क्षणीं त्यांजवर हल्ला केल्यास सहज पूर्ण जय मिळविता येण्यासारखा आहे; परंतु जर कां त्यांस तेथून निसटून पसरूं दिलें, तर मग एका मागून एका बरोबर अशा पृथक् पृथक् लढाया करावया लागतील. ही युक्ति खाशी लागू पडली. दुसऱ्या दिवशीं रात्रीच्या वेळीं आटिका व मिगारा आणि साला-मिस यांच्या मधल्या खाडींत शत्रूचीं गलबतें जाऊन भरलीं. दर-म्यान तिकडे झरक्सीसानें आटिका प्रांतांत अनर्थ करून सोडिला व सर्व मुलुख जाळून पोळून टाकीत चालला; आथेन्स शहरचा खालचा भाग घेऊन त्याचा नाश करून टांकिला; आणि आक्रापोलीसांत असलेल्या थोडक्या लोकांस जेरीस आणून त्यास आग लाऊन दिली. असले अनर्थापात पाहूनच सर्वांनीं सालामीस येथें एकत्र राहणें चांगलें नाहीं, असें ग्रीक सरदारांस वाटूं लागलें होतें. परंतु थेमिस्टाक्लीसाच्या युक्तिमुळें फुटून निघून जाण्यास सवड मिळण्यापूर्वीच त्यांस लढाई करणें भाग पडलें.

खाडींतून शत्रूचीं गलबतें भरून त्यांस इकडे तिकडे होण्या-सही जागा नांहीं अशीं खेंचून गेल्यावर ग्रीक लोकांनीं हल्ला सुरू केला. पाण्यांतील हा हल्ला पहात व ग्रीक लोकांचा पूर्ण नाश झाल्याचें दिसेल अशी अपेक्षा करीत झरक्सीस किनाऱ्यावर उंच तक्तावर बसला होता. पण आपली चूक त्यास लवकरच कळून

आली. इराणी गलबतांचा असा घोंटाळा झाला कीं त्यांस शत्रू मित्र कांहींच कळेना. ग्रीक लोकांची स्थिति याहून उलट होती. त्यांचीं जलद चालणारीं व हलकीं जहाजें आश्चर्य वाटण्याजोगें शौर्य व चपळता प्रगट करीत होतीं. लढाई सर्व दिवसभर चालली. शेवटीं सायंकाळच्या सुमारास बाकी राहिलेलें इराणचें आरमार फयालेरानच्या बंदराकडे गेलें. या दिवशीं इराणी लोकांचीं ९०० व ग्रीक लोकांचीं फक्त ४० गलबतें गमावलीं. अजून लढाई पुढें चालविण्यास झरक्सीसाकडेस भरपूर सैन्य होतें; तरी असला आणखी एकादा पराजय म्हणजे सर्वांशीं नाशच समजला पाहिजे, असें वाटून त्यानें मागें फिरण्याचा बेत केला. तथापि मारडोनियासास त्यानें मागें ठेविलें. आपल्या ३००००० सैनेच्या जोरावर सर्व ग्रीक लोकांस त्वरीत जिंकण्याचें त्यानें राजास अभिवचन दिलें. इतकें झाल्यावर हेलिस्पान्ट नदी उतरून स्वदेशीं परत जाण्याचा झरक्सीसानें बेत केला.

इराणचें आरमार जेव्हां सारानीक आखातांतून निघून उत्तरेकडे चाललें तेव्हां शत्रूचा पाठलाग करणें निर्भय नव्हे असें जाणून, त्यास ज्या बेटांनीं मदत केली होती, त्यांनां शासन करून आथेनियन लोक स्वस्थ बसले. इराणी राजानें परत जाण्याची त्वरा करावी म्हणून हेलिस्पान्ट वरील पूल मोडून काढण्याचा ग्रीक लोकांचा बेत आहे असें त्यास कळविण्याकरितां थेमिस्टाक्लीसानें मुद्दाम मनुष्य पाठविला. तो सेस्टास येथें पोंचण्यापूर्वीच वाद्दळांनीं पूल मोड़न गेला होता. परंतु आरमारांतून आपल्या सैन्यासह त्यास आशियाखंडांत सुखरूपपणें जातां आलें. हिवाळ्यांत थेसलींत तळ देऊन राहण्याचा मारडोनियसाचा विचार असल्यामुळें तेथपर्यंत तो आपल्या धन्याबरोबर-

गेला. सालामिस येथें जय मिळविणाऱ्या थेमिस्टाक्लीसाच्या लौकिकानें सर्व ग्रीस देश दुमदुमून गेला, तो इतका कीं स्पार्टन लोक सुद्धां त्यास आपल्या सरदारांप्रमाणें मान देऊं लागले.

सालामिसची लढाई ख्रि. पू. ४८० च्या उन्हाळ्याच्या अखेरीस झाली. त्यानंतर लवकरच आथेनियन लोक आपल्या शहरीं परत गेले, आणि आपल्या घरांदारांची व उध्वस्त होऊन गेलेल्या शेतांची दुरुस्ती करूं लागले; तरी शत्रूस ते विसरले नव्हते; कारण मारडोनियस थेसलींत असून मोठें आरमार ही इजियन समुद्रांत आहे हें त्यास ठाऊक होतें. इराणाकडून आथेन्साबरोबर निराळा तह करवितों, असें सांगून इतर ग्रीक संस्थानांतून आथेनियन लोकांस फोडण्याचा मारडोनियसानें प्रयत्न केला; परंतु जावत्कालपर्यंत सूर्यानें आपला मार्ग सोडिला नाहीं तावत्काल आथेन्साचें इराणाबरोबर सख्य होणें नाहीं असें मर्दुमकीचें उत्तर आथेनियन लोकांनीं दिलें. तेव्हां मार्डोनियसानें दक्षिणेकडे चाल केली असतां थेसलींतील व बिओशियांतील लोकांनीं त्यास मोठ्या हौसेनें मदत केली. तो जवळ येत चालला तेव्हां आथेनियन लोक शहर सोडून मुलांमाणसांसह पुनः सालमीस येथें गेलें. पुनः त्यांजबरोबर तोडजोडीचे बोलणें लाविण्याचा मारडोनियसानें यत्न केला; पण यावेळींही त्यास पहिल्यापेक्षां अधिक यश आलें नाहीं. आथेन्सास न मिळतां कोरिन्थच्या संयोगीभूमीवर तटबंदी करून आपला बचाव करावा असा प्रथम स्पार्टन लोकांचा विचार होता. परंतु शेवटीं अल्पवयस्क राजा प्लिस्टार्कस याचा पालनकर्ता पासेनियस यास ५००० लोकांनींशीं बिओशियांत जाण्याचा हुकूम झाला. आटिकांत जिकडे तिकडे लुटालुट करून झाल्यावर मारडोनिय-

सानेंही विओशियांत चाल केली; कारण तिकडे गेल्यावर थिबन व इतर लोक आपणांस सहाय करतील असा त्यास भरंवसा होता.

दरम्यानच्या वेळांत आथेनीयन लोकांचें सैन्य ११००० पर्यंत वाढलें असें झणतात. आथेनीयन सेनेचें अधिपत्य आरिस्टायडीस याजकडेस होते. त्यास हद्दपार केलें होतें, तरी त्याची मानमान्यता कमी झाली नव्हती. यास्तव या जोखमाच्या कामावर त्याची योजना करण्यासाठीं त्यास परदेशातून परत बोलावून आणिलें होतें. पुष्कळ दिवस पर्यंत हीं दोन्हीं सैन्यें समोरासमोर तळ देऊन राहिलीं. मात्र मधून मधून त्यांच्या लहानशा चकमकी झडत व डावपेंच चालत. शेवटीं निकराची लढाई करण्याचा मारडोनियसानें निश्चय केला. त्याच्या बेताची खबर गुप्त रीतीनें समजल्यामुळें ग्रीक लोकांनीं प्लाटेइया नजीक लढाई करण्याची तयारी केली. ही लढाई (ख्रि. पू.) वर्ष ४७९ यांत झाली. तींत इराणी लोक आरंभीं मोठ्या शौर्यानें लढले; परंतु मारडोनियस यास असाध्य जखम लागली. तो पडल्यानें लढाईचा निकालच झाला. इराणी लोकांनीं एकदम पाय मागें काढिला; व त्याच्या मदतीस येत असणाऱ्या टोळीनें हेलिस्पांन्ट गांठण्याच्या उद्देशानें उत्तरेकडील मार्ग धरिला. मदतीस असलेल्या ग्रीक सैण्याची दाणादाण झाली. तेव्हां आथेनियन लोकांबरोबर लढण्यास काय ते बिओशियन लोक राहिले. अखेरीस इराणी लोक आपल्या छावणींत जाऊन स्वस्थ बसले. निराशेनें ते इतके निर्वीय झाले कीं, कांहीं हालचाल न करितां त्यांनीं आपली कत्तल उडवून घेतली. यामुळें फक्त ३००० लोक जीवानिशीं निभावले. त्यांच्या तळावर अपार लूट सांपडली. त्या दिवशीं

दिवशीं जयश्रीनें माळ घातलेल्या पासेनियसानें ती सर्व जमा करण्याचा हुकूम केला. एकंदर लुटीचा दहावा भाग देवा करितां पाठवून मौल्यवान जिनसा वक्षीस दाखल पोसनियसाकरितां निवडून काढिल्या.

हेलिस्पान्टकडे पळून गेले इराणीलोक आशियाखंडांत सुखरूप पोंचले; आतां ग्रीसदेश परचक्रापासून अगदीं मुक्त झाला. शत्रूस मदत करणाऱ्या ग्रीकलोकांस शासन करण्याचें कार्य मात्र आतां शिल्लक होतें. ह्मणून ग्रीक सैन्यानें थीब्सच्या दरवाज्यापर्यंत चाल केली आणि गुन्हेगारांस आपल्या स्वाधीन करण्याची मागणी केली. अर्थात ती कबूल झाली नाहीं; तेव्हां थीब्स शहरास वेढा दिला. वीस दिवस वेढा पडल्यावर गुन्हेगारलोक आपण होऊन सैन्याच्या स्वाधीन झाले. त्यां पैकीं बहुतेकांस पासेनियसानें कांहीं चौकशी अगर इनसाफ न करितां ठार मारण्याचा हुकूम केला. हें त्याचें पहिलेंच स्वेच्छाचारी व जुलमी कृत्य होय. या नंतर त्याच्या हातून दुसरीं अनन्वीत कृत्यें घडलीं.

इकडे स्पार्टाचा राजा लिओटिकायडीस याच्या हातास्वालचें ग्रीक लोकांचें आरमार कायक्लेडिस द्वीपसमूहांत शत्रूची हालचाल टेहळीत राहिलें होते. स्यामासचा टायरन्ट इराणचा पुरा कैवारी असे. त्याचा पाडाव करण्याकरितां स्यामियनलोकांनीं या आरमाराची मदत मागितली. लिओटिकायडास तिकडे जाऊन पोंचला तेव्हां आपल्या स्नेह्यांच्या बचावाची कांहीं तजवीज न करितां इराणीलोक त्यांस सोडून आयोनियनलोकांस दावांत ठेवण्यासाठीं गायकेळ येथें असलेल्या खुप्की वरील सैन्यास

जाऊन मिळाले. ग्रीकलोकांनीं त्यांचा पाठलाग केला व इराणची तांबेदारी उडवून देण्याविषयीं आयोनियनांस सांगितलें. या दोन सैन्याची लढाई जुंपली तींत आशियांतील ह्मणजे इराणीलोकांची अगदीं दाणादाण उडून भयंकर तऱ्हेची प्राणहानी झाली. लूट जमा करून झाल्यावर ग्रीकलोक स्यामास येथें परत गेले. प्लुचाटेइयाची लढाई झाल्यादिवशींच ही मायकेलची लढाई झाली, तींत ग्रीकलोकांस जय प्राप्ती झाली.

ग्रीस देश व बेटें आतां अगदीं निर्भय झालीं होतीं. यामुळें मर्जीप्रमाणें इराणाबरोबर तह करण्याचें आयोनियन लोकांवर सोंपविणें हितावह दिसल्यामुळें पेलापोनीशियन लोकांसह लिओटिक्रायडीसाचें आरमार स्वदेशीं परत गेले. परंतु इयान्थिपास याच्या हाता खालचें आथेनियन लोकांचें आरमार उत्तर दिशेस वळलें व त्यानें सेस्टास शहरास वेढा दिला; कारण पुष्कळ श्रीमान व थोर थोर इराणी लोक तेथें रहात होते. सन ४७८ च्या वसंतऋतूंत (खि. पू.) दुष्काळामुळें पळून जाण्याचा यत्न करण्यास ते प्रवृत्त झाले. परंतु त्यांच्या पैकीं बऱ्याच असांमींस ग्रीकांनीं गांठून ठार मारिलें. नंतर नागरिकांनीं शहराचे दरवाजे उघडल्यावर इयान्थिपास हाही आपल्या आरमारासह स्वदेशीं निघून गेला.

आथेन्स शहराची राखरांगोळी होऊन गेली होती. यामुळें नगरांत परत आलेल्या लोकांस आपलें लक्ष्य प्रथम घरें दारें बांधण्याकडे द्यावें लागून देवालयांच्या दुरुस्तीचीं कामें पेस्तर सालापर्यंत तहकूब ठेवावीं लागलीं. त्यांच्यांतील पुढारी गृहस्थ थेमिस्टाक्लीस व आरिस्टायडीस यांनी शहरच्या रक्षणाची तज-

वीज त्वरीत करण्याचा व पुढें अशी दगदग पडण्याचा प्रसंग येऊं न देण्याचा निश्चय करून तटबंदी दुरुस्त करून वाढवावी असा हुकूम केला. या नूतन तटबंदीमुळें स्पार्टन लोकांत हेवा उत्पन्न होऊन ती तहकूब ठेवविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. ग्रीस देशावर पुनः स्वाऱ्या झाल्यास ग्रीक लोकांस पाहिजे तसें निर्भय स्थल पेलापोनीसास हें आहे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें. परंतु त्यांचा आपमतलबी उद्देश ओळखून थेमिस्टाक्लीसानें तो मोठ्या कुशाग्र बुद्धिनें हाणून पाडिला. त्यानें शहर व त्यांतील तीन बंदरें यांच्या तटबंदींचीं कामें पुरीं केलीं इतकेंच नाहीं तर पिरेइयस हें व्यापारी बंदर बनविलें. यामुळें आथेनियन कायद्याच्या छायेस अनेक व्यापारी व धंदा हुन्नर करणारे लोक--विशेषे करून परमुलखी लोक—तेथें जाऊन राहिले. याप्रमाणें या मोठ्या लढाई पासून आथेन्साच्या सामर्थ्याची वृद्धि झाली आणि आपली योग्यता व सामर्थ्य तें जाणूं लागलें.

सन ४७७ च्या वसंत ऋतूंत (ख्रि. पू.) अजून पर्यंत इराणी लोकांच्या हातीं असलेल्या कायप्रास बेटाकडे ग्रीक आरमार गेलें. पासेनियसाचे हातीं असून मदतीस आलेल्या आथेनियन सैन्यावर अधिकारी आरिस्टायडीस व मिल्टायडीसाचा पुत्र कायमन हे होते. इराणी लोकांस बेट सोडून जावें लागलें. नंतर आरमार बायझनशम येथें गेलें, तेव्हां इराणी लोकांस तें शहरही सोडून जाणें भाग आलें. या प्रमाणें जय होत गेल्यामुळें पासेनियसाचे डोळे फिरले. कारण तो आतां इराणी रीत रिवाजाप्रमाणें वागूं लागला व आपल्या ग्रीक साथीदारांबरोबर असह्य उद्दामपणानें वागूं लागला. दऱ्यानें ग्रीक देश इराणी लोकांच्या हातीं जावा व या नोकरीबद्दल अक्षिसादाखल झर-

क्सीसाची कन्या आपणास पाणीग्रहण करण्यास मिळावी अशी खटपट करण्यासही तो चुकला नाहीं. त्याच्या वर्तनानें ग्रीक-व विशेषे करून आयोनियन-लोकांचीं मनें विटून गेलीं. कारण आथेनियन सेनानींच्या ममतेच्या व चित्त आकर्षण करणाऱ्या वागणुकशीं तिचा अगदींच मेळ पडण्यासारखा नव्हता. अशा वृत्तिमुळें अजूनपर्यंत स्पार्टाकडेस असलेला अधिकार यापुढें आथेन्साकडे द्यावा असा ठराव करण्याकडे हळू हळू ग्रीक लोकांची प्रवृत्ति होत चालली आणि शेवटीं पेलापोनीशान व इजिटन हे लोक खेरीज करून बाकीच्या सर्वांनीं सर्व समाईक व्यवहारांत आथेन्साचें श्रेष्ठत्व मान्य केलें. मग इराणी लोकांपासून ग्रीस देशाचें रक्षण व्हावें या उद्देशानें आथेन्साच्या अध्यक्षते खालीं त्यांनीं एक कट उभारिला. या समाईक कार्यासाठीं सर्वांनीं वर्गणी द्यावी व आथेन्सानें सैन्य जमवून त्याची योग्य तशी योजना करावी असें ठरविण्यांत आलें. तथापि अंतस्थ व्यवस्थेच्या कामीं प्रत्येक संस्थान अगदी स्वतंत्र राहिलें. डेलास बेटांत समाईक द्रव्य ठेवण्यांत आलें आणि सर्व संस्थानांच्या प्रतिनिधीनीं दर वर्षीं अपालोच्या देवालयांत एकत्र जमावें असें ठरलें. याप्रमाणें पासेनियसाच्या मुर्खपणामुळें स्पार्टाची पूर्वीची प्रतिष्ठा गेली. शेवटीं त्यास परत बोलावून त्यांचे उद्योग चालू असल्या स्थळाकडून ते निघून गेले व आपल्या प्रतिस्पर्धी शहरास यथेच्छ विजयानुभव घेऊं दिला. तथापि संयुक्त पेलापोनीसाचे धूरिणत्व अजून त्याजकडेसच होतें. यामुळें ग्रीस देशांत आतां दोन मोठे तट झाले. आथेन्सानें आपली प्रतिष्ठा व मानमरातब यांचे रक्षण बाहात्तर वर्षं म्हणजे पेलापोनीशान युद्धाच्या अखेरीपर्यंत केलें.

आरिस्टायडीसाच्या कृत्यांपैकीं अत्यंत महत्वाचें व थोर कृत्य म्हटलें म्हणजे आथेनियन कटाची त्यानें रचना केली हें होय. तरी आरकनचा हुद्दा व एरिओपगस सभेच्या सभासदाची जागा जमीनजुमला नसलेल्या मनुष्यासही मिळण्यास हरकत नसावी अशी व इजसारख्याच दुसऱ्या महत्वाच्या राजकीय सुधारणा ही त्यानेंच केल्या असें म्हणतात. लोकांचा त्याजवरील विश्वास आमरणांत तसाच कायम राहिला होता.

पासेनियस व थेमिस्टाक्लीस यांचे शेवट याहून भिन्नरीतीनें झाले. पासेनियसास स्पार्टा येथें परत बोलावून नेल्यानंतर त्याजबद्दल सक्त तपास चालू झाला. परंतु तो दोषी असल्याबद्दल खात्री लायक पुरावा नसल्यामुळें हें चौकशीचें काम तसेंच टांकावें लागलें. पुढें तो बायझनशम येथें गेला असतां इराणाबरोबर इतक्या उघड रीतीनें त्याचा खटपट सुरू होती कीं, तिजमुळें दरबारी मंडळीस त्यास परत स्वदेशीं बोलावणें भाग पडलें. कांहीं पुरावा न मिळाल्यामुळें पुनः त्यास सोडून दिल्यावर त्यानें हिलाटांस (गुलामांस) बंडाव्यास प्रवृत्त करण्याचा उद्योग चालविला. तसाच इराणाबरोबर त्याचा दगलबाजीचा पत्रव्यवहार चाललाच होता. अखेरीस त्याच्या एका गुलामानेंच त्याच्या कृत्याची परिस्फुटता केली. कांहीं युक्ती लढवून फौजदारी न्यायाधीशांनीं खरा प्रकार काय आहे तो त्याच्याच तोंडून ऐकिला, तेव्हां त्यास कैद करण्याचा त्यांनीं बेत केला, परंतु तो आथेनाच्या देवळांत पळाला. तें पवित्र स्थळ रक्तपातानें भ्रष्ट होऊं नये म्हणून न्यायाधिशांनीं देवालयाचीं द्वारें बुजवून टांकण्याचा हुकूम केला. यामुळें उपासमारानें तो तेथेंच मरण पावला. तो अगदीं मरणोन्मुख

झाला तेव्हां त्यास देवळांतून काढिला व त्या पवित्र हद्दींतून बाहेर पडल्यावर तो मरण पावला. ही गोष्ट (खि. पू.) वर्ष ४६१ यांत घडली.

थेमिस्टाक्लीसाच्या दैवगतीचा संबंध पासेनियसच्या दैवगतींशीं होता. तो ही गर्विष्ट व तारतम्यशून्य बनला होता. परंतु तो जो लोकांस आवडेनासा झाला तो त्याच्या स्वहितैशी व धनलोभी स्वभावामुळें झाला. त्याच्या अशा स्वभावाचीं चिन्हें सालॅमिसच्या लढाई नंतर लागलींच दिसून आलीं. त्याजवर असंख्य शत्रू उठले व आस्त्रेसिझम ह्मणून जन स्वातंत्र्यास अपाय करणाऱ्या व्यक्तीस हद्दपार करण्याची जी रीत होती तिजप्रमाणें त्यास हद्दपार केला. तो आरगास येथें जाऊन राहिला व पासेनियसास अपराधी ठरविल्या वेळीं तो तेथेंच होता. आथेन्स येथील तटबंदीच्या दुरुस्तीच्या प्रसंगापासून त्याचा द्वेष करीत असलेल्या स्पार्टनांनीं पासेनियसा बद्दल आपण केलेल्या चौकशींतल्या कृष्णकारस्थानांत थेमिस्टाक्लीसाचें अंग असल्याचें निष्पन्न झालें आहे, याकरितां त्याचा तपास होऊन त्यास योग्य शासन झालें पाहिजे असा आग्रह धरिला. त्याच्या अपराधाबद्दल त्यावेळीं किंवा त्यानंतर कधींही पुरावा मिळाला नाहीं. तरी त्याच्या शत्रूनीं त्यास कैद करण्याचा ठराव करून सोडिला. थेमिस्टाक्लीस पळून इपायरस येथें गेला. तेथून पायलसास जाऊन आशियाखंडांत जाण्यासाठीं गलबतांत बसला. तो तिकडे पोचल्यानंतर लवकरच झरक्सीस राजा मरण पावला (खि. पू. वर्ष ४६५) आणि आरट्याझरक्सीस राजा झाला. थेमिस्टाक्लीस राजदरबारीं गेला आणि आपले त्याजवर उपकार झाले असून आपली सांप्रतची दैन्यावस्था इराणच्या हितासाठीं झट-

ल्यामुळेंच प्राप्त झाली आहे, यास्तव कृतज्ञ बुद्धिनें आपलें स्वागत होणें वाजवी आहे, असें त्यानें राजाच्या मनांत भरून दिलें. दरबारांत ती एक मोठ्या मेहेरबानींतली असामी झाली व सरतेशेवटीं तीन सधन नगरांची जमाबंदी त्याच्या खर्चाकरितां तोडून देऊन आशियामायनरांत त्यास पाठविला.याप्रमाणें आपल्या आयुष्याचे अखेरीचे दिवस त्यानें राजाच्या थाटामाटानें घालविले. तो कोणत्या रीतीनें मरण पावला याजविषयीं निश्चित कांहीं समजलेलें नाहीं.

भाग ७ वा.

पेलापोनिशियन युद्धाच्या आरंभापर्यंत आथेन्सचें वर्चस्व.

थेमिस्टाक्लीस कारभारांतून निघाल्यानंतर आथेन्सांत कायमनच काय तो फार वजनदार मनुष्य राहिला. कायमन बड्या लोकांच्या पक्षांतील होता, परंतु गांवगुंडा प्रमाणें युक्त्य लढविण्यास तो मागें पुढें पहात नसे. पुष्कळ संपत्ती असल्यामुळें उधळपट्टी करून गरीब लोकांत औदार्याचा भपका त्यास दाखवितां येई. तो उत्तम शिपाई असून पूर्वीच सालामिसच्या लढाईंत ख्यातीस आला होता. नंतर बऱ्याच कामांत जय मिळविल्यामुळें व मुखत्वेंकरून ख्रिस्ती शका पूर्वी ४६६ व्या वर्षी न्याक्सास सर केल्यामुळें त्याची ख्याती वाढली. कांहीं वेळ आथेन्साच्या कटाची भरभराटी होत गेली; परंतु इराणापासून आतां ग्रीसला धोका नाहीं असें पाहून न्याक्सासच्या लोकांनीं आथेन्सांचें वर्चस्व नाकबूल केलें. कायमनानें त्यांच्या शहराला वेढा देऊन तें जिंकिलें; तेथील लोकांस त्यानें अतिकडक रीतीनें वागविलें. आथेन्साचें साथीदार होण्या ऐवजीं आतां त्या शहरास आथेन्साच्या अंमलांत राहावें लागलें. ह्या उदाहरणावरून इतर संस्थानांस भीति पडली असती, परंतु तसें झालें नाहीं. ज्याणीं ज्याणीं बंड केलें ते ते आपलें स्वातंत्र गमावून बसले. कटांतील कांहीं संस्थानें कामगारी ऐवजी पैसा देण्यास कबूल झालीं, परंतु त्या योगें त्यांचें जास्त कल्याण झालें नाहीं; कारण त्यांच्यांतील शौर्य नाहींसें झालें व त्यामुळें आपल्या अंमला खालच्या लोकांप्रमाणेंच त्याच्यावर आथेन्सांची सत्ता बसली.

(ख्रि. पू.) ४६५ व्या वर्षीं प्याम्फिलियांतील युरीमिडान नदीच्या मुखाजवळ ठेविलेल्या इराणी आरमारावर कायमनानें मोठा जय. मिळवीला; नंतर तो नदींतून वर गेला आणि त्यानें शत्रुच्या खुष्की वरील सैन्याचाही मोड केला. पुनः समुद्रावर आल्यानंतर इराणी आरमाराच्या मदतीस ह्मणून जी गलबतांची तुकडी येत होती तिचा सबशेल नाश केला. हा तिहेरी जय मिळवून तो उत्तरेकडे गेला आणि थ्रेसियाच्या सुवर्ण भूमींतून इराणी लोकांचा नायनाट केला. कामन ईजियन समुद्राच्या उत्तर भागांत असतां थ्रेस मधील सोन्याच्या खाणीं वरून आथेन्साची थेसासबरोबर लढाई जूंपली. थ्रेसियन लोकांनीं स्पार्टाची कुमक मागितली. स्पार्टा आटिकावर स्वारी करण्याच्या तयारींत होतें, इतक्यांत एकाएकी ख्रि. पू. ४६४ व्या वर्षीं ल्याकोनियावर भयंकर संकट ओढवलें. एक धरणीकंप झाला; त्याच्या योगानें टेंजीटास पर्वतावरून खडकाचे खडक कोसळून जिकडे तिकडे हाहाःकार झाला. स्पार्टात अवघीं पांच घरें राहिलीं आणि वीस हजार लोक मेले असें सांगतात. हा भयंकर प्रळय चालला असतां आपल्या निष्ठुर धन्यांवर मूड उगविण्याची हेलट व मेसेनियन लोकांनीं संधी साधिली. यामुळें थ्रेसियन लोकांचें होईल तसें होवो असे ह्मणून स्पार्टास स्वस्थ बसावें लागलें, व ते लोक आथेन्सची प्रजा बनले. इथोम डोंगरावर तटबंदी करून मेसेनियन लोक त्यांत राहिले, त्यांच्या पुढें स्पार्टाचें कांहीं चालेना, तेव्हां ज्यांच्यावर थोड्यावेळापूर्वी स्वारी करण्याची तयारी ते करीत होते त्याच आथेनियन लोकांची बेशरमपणें त्यांनीं मदत मागितली. आथेन्सांतील बडे लोकांचा पक्ष नेहमीं स्पार्टास अनुकूल असे. यावेळीं तेथें तोच पक्ष प्रबल होता, यामुळें कायमना बरोबर मोठें सैन्य देऊन त्याला इथोमला वेढा

घालण्याकरितां पाठविलें. परंतु स्पार्टन लोकांप्रमाणें त्यालाही यश न आल्यामुळें त्याच्या इमाना विषयीं संशय येऊन त्याला सैन्यासह रजा मिळाली. आथेनियन लोकांस हा अपमान फार झोंबला, आणि स्पार्टाबरोबरील संबंध तोडून टाकून त्यांनीं अरगासशीं संधी केला. दरम्यान मेसेनियन लोकांशीं जवळ जवळ दहा वर्षं युद्ध चाललें होतें. शेवटीं खि. पू. ४९९ व्या वर्षीं कायमचे देश सोडून जाण्याच्या शर्तीवर त्यांस शत्रूच्या स्वाधीन व्हावें लागलें. ह्या दुर्दैवी हद्दपार झालेल्या लोकांची कींव करून आथेनियन लोकांनीं त्यांस नापाक्टास शहर राहण्यास दिलें. तेथें वसाहत करून बरे दिवस येण्याची ते वाट पहात वसले.

या वेळीं प्रजापक्षाचा मुख्य झांथीपसचा मुलगा पेरिक्लीस होता. वक्तृत्व, मुत्सद्दीपणा आणि सेनानीपणा यांत त्याची त्यावेळच्या सर्व लोकांवर सरशी होती. कायमन स्वाऱ्या करण्यांत गुंतला असतां सार्वजनिक सभेच्या वादविवादांत पेरिक्लीस पडला होता. तो प्रजापक्षाचा नायक झाला, आणि कायमन व इतर बड्या लोकांचा खंबीर प्रतिस्पर्धी बनला. कायमन इतकी संपत्ति पेरिक्लीसाकडे असती तरी केवळ लोक प्रियता मिळविण्याकरितां त्यानें ती खर्च केली नसती. श्रीमंत व बड्या लोकांवर अवलंबून राहविण्यापेक्षां स्वत:च्या कमाईवर सुख मिळविण्याचें साधन गरीब लोकांस करून देणें हेंच जास्त भूषणार्ह आहे असें तो मानीत असे. त्यानें व त्याच्या मित्रांनीं (या मित्रांत प्रामाणिक एफिआल्टिसाचें नांव विशेषेंकरून सांगणें योग्य आहे) असे पुष्कळ उपाय योजिले कीं, ज्यांच्या योगानें गरीब लोकांस सार्वजनिक कामांत व उत्सवांत मिसळतां आलें. लोकप्रियता मिळविण्याचा त्याचा यत्न होता खरा; तरी हलकट व गांवगुंडा प्रमाणें युक्त्या त्यानें केव्हाहीं केल्या नाहींत.

सरदारपक्ष व प्रजापक्ष यांची चुरस बराच काळ चालली होती; परंतु एरिओपेगास सभेची सत्ता कमी करून तिला केवळ नामशेष करण्याची पेरिक्लीस व एफिआल्टिस यांनीं खटपट चालविली तेव्हां तो तंटा जास्त माजला. अर्थात् सरदार मंडळी अतिशय चवताळली. याच सुमारास कायमनचा स्पार्टानें आपमान केला होता ह्मणून सर्व सरदार मंडळ अप्रिय झालें होतें; तेव्हां एरिओपेगासची सत्ता कमी करण्याचा ठराव सहज पास झाला. यानंतर लौकरच कायमनाला आस्ट्रेसिझमनें हद्दपार केलें.

ख्रिस्ती शकापूर्वी ४६० व्या वर्षाचे सुमारास आथेनियन आरमार कायप्रसकडे असतां, इनारस व इजिप्तचा बराच मोठा भाग यांनी इराणाविरुद्ध बंड केलें. इनारसनें आथेनिथन आरमाराची मदत मागितली, त्यामुळें तें आरमार एकदम दक्षिणेकडे ह्मांकारले व त्याच्या सहायानें इनारसनें इराणी लोकांचा पराभव केला. नंतर तें आरमार नदीतून वर मेम्फीसपर्यंत गेलें. आथेनियन लोक मेम्फीसला पांच वर्षें वेढा देऊन बसले होते. परंतु बरीच मोठी इराणी लोकांची कुमक येऊन पोंचल्यामुळें त्यांस वेढा उठवावा लागला; 'आणि नदींतील एका बेटांत कोंडले जाऊन त्या बहुतेक सर्वांचा नाश झाला.

आथेन्सांचें आरमार ईजिप्तमध्यें गुंतलें होतें, त्याचवेळीं स्पार्टाचा व आथेन्साचा बेबनाव झाल्यामुळें आथेन्स व कोरिंन्थ यांची लढाई जुंपली. कोरिन्थला ईजिना व पुष्कळ आर्गिव्ह शहरें मिळालीं. आपलें सैन्य ईजिप्तमध्यें गुंतलें असतांही आथेनियन लोकांनीं न डगमगतां शौर्यानें शत्रूंवर हल्ला केला, आणि त्यांचा

अगदीं पराभव केला. आथेनियन लोकांच्या सर्व लष्करी कामांचा चालक जो मिरोनाईडस यानें कोरिन्थियन लोकांवर असा पूर्ण जय मिळविला कीं त्यांच्या सर्व सैन्याचा चुराडा झाला. या कोरिन्थशीं झालेल्या युद्धावरून व स्पार्टाचा द्वेश असल्यामुळें आणि तसेंच आपले नष्ट झालेले हक्क पुनः मिळण्याचा संभव असल्यास शत्रूकडून नाचवून घेणारे लोक खुद्द आथेन्सांत असल्यामुळें, पिरेइयस बंदराला आथेन्स शहर जोडण्याकरितां ज्या लांब भिंती बांधण्याची पुर्वीच सुरुवात झाली होती त्या पुऱ्या करण्याचें पेरिक्लीसाच्या मनांत आलें आणि आथेन्स शहर मजबूद करणें किती अगत्याचें होतें हें लवकरच प्रत्ययास आलें. बिओशियनां बरोबर झालेल्या एका चकमकींत थेसलियन साथीदारांच्या विश्वासघातामुळें आथेनियन लोकांचा पराभव झाला; परंतु एक वर्षांत म्हणजे ख्रिती शकापूर्वी ४५६ व्या वर्षी त्यांचें उसनें उगवून आलें; कारण मिरोनाईडस यानें बिओशिअन लोकांवर मोठा जय मिळाविला आणि टानाग्राची तटबंदी जमीनदोस्त केली. या वेळेपासून बिओशियांत आथेन्सांचें वजन वसलें आणि ईजिना लवकरच त्याच्या अंमलाखालीं आलें.

ह्याच सुमारास ईजिप्तांतील अरिष्टाचें वर्तमान आथेन्सांत पोंचलें. परंतु त्याला न जुमानितां स्पार्टा व त्याच्या जुटांतील संस्थानांशीं पूर्वी प्रमाणेंच झपाट्यानें लढाई चालविलीं. ख्रि.पू.४५३ व्या वर्षीं स्वतः पेरिक्लीसानें कायमनाला परत आणण्याचा घाट बनवून आणिला. सर्व खऱ्या देशाभिमान्यांनीं एक होऊन अल्पजनसत्ताक पक्षाचे बेत फसाविणें जरूर आहे असें त्याला दिसून आलें; कारण ह्याच सुमारास कडकडीत प्रामाणिक असा

त्याचा मित्र एफिआल्टीस यास मारेकऱ्यांनीं ठार मारिलें होतें. ह्या दोन इसमांचा (पेरिक्लीस आणि कायमन) मिलाफ झाल्यानें पुढील तीन वर्षें ग्रीक देशाला स्वास्थ्य मिळालें. नंतर पांच वर्षांच्या मुदतीचा तह झाला. ह्या अवधींत इराणी लोकांवर कायमनानें आपली शेवटची स्वारी केली. ईजिप्तांत पुनः बंड झालें होतें व पुनः आथेनियन लोकांची कुमक मागितली होती. बरेंच मोठें आरमार बरोबर घेऊन कायमन सायप्रस येथें गेला, व तेथून ईजिप्त येथें त्यानें एक तुकडी पाठविली आणि स्वतः किटियनाला वेढा देऊन बसला. ह्या वेढ्यांतच (ख्रि. पू.) ४४९ व्या वर्षीं तो मरण पावला. सामुग्री संपल्यामुळें त्याच्या सैन्यास वेढ्याचें काम बंद ठेवावें लागलें. परत येतानां वाटेंत त्या सैन्यानें समुद्रावर व खुप्कीवर इराणी लोकांवर पुष्कळ जय मिळविलें; नंतर ईजिप्तांत पाठविलेली तुकडी आपलें कार्य आटोपून त्यांस मिळाली आणि ते एकत्र स्वदेशीं निघून गेले.

ख्रि० पू. ४४८ व्या वर्षीं ग्रीस देशांतील शांततेचा कांहींसा भंग झाला. डेलफाय येथील देवळाच्या व्यवस्थेच्या हक्का संबंधानें डेल्फीयन व फोकियन लोकांत तंटा उपस्थित झाला. पुरातन काळापासून तें देऊळ डेल्फीयन लोकांच्या ताब्यांत होतें परंतु त्यांच्या पासून फोकीयन लोकांनीं तें हिसकावून घेतलें होतें. स्पार्टाच्या मदतीनें डेल्फीयन लोकांनीं तें परत घेतलें; परंतु स्पार्टनसैन्य तेथून परत गेल्याबरोबर पेरिक्लीस सैन्य घेऊन फोकीस येथें गेला आणि देवळाची व्यवस्था पुनः फोकीयन लोकांकडे दिली. पुढल्या वर्षीं बिओशियांत क्रांति होऊन आथेन्साला प्रतिकूळ असलेल्या पक्षाची सरशी झाली; व त्यामुळें तेथें आथेन्साचें वजन कमी झालें.

ख्रि. पू. ४४९ ह्या वर्षी तहाची पांच वर्षांची मुदत संपली. यूबिया व मिगारा संस्थानें आथेन्सा विरुद्ध उठलीं. यूबियांतील बंडावा मोडण्यांत पेरिक्लीस गुंतला असतां त्याला अशी खबर समजली कीं पेलापोनीशियन सैन्य आटिकावर स्वारी करून देश उजाड करीत आहे. लांच देऊन त्यानें स्पार्टन लोकांस आटिकांतून परतविलें; यामुळें यूबियाची सारखी खोड मोडण्याला त्याला अवकाश मिळाला. आतां सर्वच पक्षांनां लढाईचा कंटाळा आला होता. त्यांस शांततेची इच्छा झाली. त्यांनीं तीस वर्षांच्या मुदतीचा तह केला (ख्रि. पू. ४४९). या तहानें आथेनियन लोकांनीं पेलापोनिसस मधील आपलीं टांणीं सोडून दिलीं; परंतु समुद्रावरील त्यांचें वर्चस्व कायम राहिलें. हा तह आथेन्सांतील उमराव मंडळीस आवडला नाहीं. त्या मंडळीचा मुख्य या· वेळीं थ्युकिडायडीस होता. परंतु पेरिक्लीसाचें सामर्थ्य यावेळीं शिखरास जाऊन पोंचलें होतें. यामुळें त्यानें सर्व अडथळे हाणून पाडिले. आतां आथेन्साचें राष्ट्र दृढ व मजबूद करण्याचा बेत तडीस नेण्यास, आणि त्यांस मिळालेल्या उच्च पदाला योग्य असा भरंवसा व स्वाभिमान आपल्या लोकांत उत्पन्न करण्यास पेरिक्लीसाला संधी मिळाली. आथेनियन कटाचें आरिस्टायडीसा च्या वेळचें स्वरूप आतां राहिलें नव्हतें. आरिस्टायडीसाच्या वेळींही सार्वजनिक खजिना डेलासांतून आथेन्सांत नेला होता. कटांतील ज्या संस्थानांनीं बंडें केलीं तीं आथेन्साची प्रजा होऊन बसलीं होतीं; बाकीचीं इतकीं निःसत्व झालीं होतीं कीं कटांतील पुढारी म्हणण्यापेक्षां एका राष्ट्राचें प्रभुत्व आथेन्सकडे आलें होतें, असें म्हटलें तरी शोभेल, व या राष्ट्रावर त्याची अनर्गल सत्ता होती. वार्षिक खंडणी ४५० होती त्या ठिकाणीं पेरिक्लीसनें ६०० ठ्यालेंट केली; व सर्व अंमलांतील संस्थानांस प्रजासत्ताक

राज्यपद्धति स्वीकारावी लागली. परंतु सर्वांहून विशेष गैरसोईची व चीड येण्याजोगी गोष्ट ही होती कीं, सर्व महत्वाच्या दाव्यांचा निवाडा स्थानिक न्यायकचेरींत न होतां आथेन्सांतील न्यायासनासमोर व्हावा असें ठरविलें होतें.

ख्रिस्तीशकापूर्वी ४४० व्या वर्षीं पेरिक्लीसाला आपल्या आंगचे सेनापतीचे उत्तम गूण दाखविण्याची संधि मिळाली. स्यामास बेटांत उमराव लोकांचा अंमल होता, तो आथेन्साच्या सहाय्यानें उडवून देण्याची बहुजनसमाजाची इच्छा होती. हा हेतु साधण्याकरितां पेरिक्लीसाबरोबर आरमार देऊन त्यास तिकडे पाठविलें. त्यानें तेथें एकदम बहुजनसत्तात्मक राज्यपद्धति स्थापन केली आणि १०० उमरावांस ओलीस घेऊन लेमनास येथें पाठविले. लहान शिबंदी मागें ठेऊन तो स्वदेशीं परत आला. त्याच्या पश्चात कांहीं उमरावांनीं भाडोत्री शिपायांची मदत घेऊन नवीन अंमल फेंकून देऊन जुन्याची पुनः स्थापना केली, ओलीस ठेविलेल्या उमरावांस सोडविलें आणि आथेन्साचा संबंध तोडून टांकिला. हें ऐकतांच पेरिक्लीस फिरून आरमार घेऊन तिकडे गेला. त्यानें सेमियन लोकांस शहरांत घालवून त्या शहरास पाण्याच्या बाजूनें वेढा दिला. सेमियनांच्या मदतीस इराणचें आरमार येण्याचा संभव आहे असें जाणून त्यास लढाई देण्याकरितां तो बाहेर पडला; परंतु इराणी आरमार आलेंच नाहीं. स्यामास येथें परत येऊन पाहतों तों शत्रूनें कांहींशी सरशी केल्याचें त्यास दिसलें. तो आल्याबरोबर स्थिती एकदम बदलली; नऊ महिनें युद्ध चालल्यानंतर सेमियन लोकांस शत्रूच्या स्वाधीन होऊन आथेन्साची प्रजा व्हावें लागलें. ह्या गोष्टीमुळें आथेन्साचें राष्ट्र दृढ झालें व त्या राष्ट्रावर या पुढें बिनहरकत व स्वेच्छ अंमल आथेन्स करूं लागलें.

आतां स्वत:ची मजबूदी करण्याचें आथेन्सांत सामर्थ्य आलें आणि आपल्यास उपयोगी पडतील अशा ठिकाणीं नवीन वसाहती करून गरीब प्रजेची सोय लाविण्याची संधि त्यास आली. आथेन्साच्या नागरिक लोकांस जी योग्यता प्राप्त झाली होती तिचा त्यांस अभिमान वाटूं लागला. आथेनियन नागरिकांच्या हक्काची किंमत वाढली. ज्यांस ते हक्क नसत त्यांस टिपून बाहेर टाकीत. पेरिक्लीन्सानें शहारास शोभा आणण्या करितां व त्याच्या रक्षणाकरितां जीं कारागिरीचीं कामें काढिली त्यांपासून गोरगरीबांस कायदेशीर धंदा लागला. तसेंच नावाड्याचें काम शिकूनही त्यांस चांगला रोजगार मिळाला. त्यानें करविलेल्या कारागिरीच्या कामांतील लांब तटा विषयीं पूर्वी सांगितलें आहेच. परंतु ज्या देवळांच्या योगानें किल्यास शोभा आली होती—ह्मणजे पार्थेनान आणि त्याच्या भव्य पायऱ्या, व प्रोपिलिया, ज्यावर फीडियासनें आपल्या नकशी कामाची कमाल केली होती व अशींच दुसरीं देवळें, कीं ज्यांनीं किल्यास शोभा आणिली होती व जीं आज मोडक्या स्थितींत पाहूनही जगास आश्चर्यभरित करितात—तीं त्यानेंच बांधविलीं होतीं. लोकांस योग्य असे खेळ व कर्मणूक असल्याविना त्यांस खरें सुख होणार नाहीं हें पेरिक्लीस जाणून होता; ह्मणून त्यानें गरीब लोकांस नाटकगृहांत जातां येईल व सार्वजनिक उत्साहांत मिसळतां येईल असें साधन सरकारी खर्चानें करून ठेविलें. जुरीच्या लोकांस न्यायकचेरींत हजर राहण्यासाठीं पगार देण्याची चाल त्यानेंच घातली. हें नियम आरंभीं चागलें व न्यायाचे होते; परंतु याकामीं खर्च होणाऱ्या रकमा लोकप्रियता मिळविणाऱ्या पुढारी लोकांनीं पुढें बऱ्याच वाढाविल्यामुळें त्या नियमांपासून राज्याचें नुकसान झालें.

आथेन्साचा कारभार ज्या मुदतींत पेरिक्लीसाच्या हातांत होता तो काळ आथेन्साच्या इतिहासांत फार भरभराटीचा होय. इराणच्या लढायांपर्यंत इतर ग्रीक शहरां पेक्षां आथेन्सानें कोणत्याही गोष्टींत जास्त नांव मिळविलें नव्हतें. परंतु त्या लढायांत जे जय मिळाले त्यांच्या योगानें आथेन्साच्या लोकांस हुरुप आली; यामुळें आजवर जगांत झालीं नाहींत अशीं कला-कौशल्याचीं व विद्येचीं कामें करण्याचें त्यांच्यांत सामर्थ्य आलें. गाण्याच्या कविता हळू हळू नाहींशा होत चालल्या होत्या अशा वेळीं आथेन्सानें नाटक काव्य काढिलें. नाटक म्हणजे सर्व काव्यांत उच्च पण बिकट होय. शोकरस व हास्यरस मोठे नाटककार पेरिक्लीसाच्या वेळींच होऊन गेले. नाट्यकाव्यास प्रथम चलन फ्रीनिकसानें दिलें, तरी शोकरस नाटकाचा खरा जनक ईश्चीलस होय. याचीं सात नाटकें हल्लीं उपलब्ध आहेत. त्याच्या वेळचा पण वयानें लहान कवि सोफोक्लीस, याचें भाषासौंदर्य व एकंदर रचनाचातुर्य आजपर्यंत कोणास ही साधलें नाहीं. त्याच्या मागून युरेपिडेस झाला. हा कवि सोफोक्लीस पेक्षां कमी योग्यतेचा, पण लोकांस जास्त प्रिय होता. या विख्यात कवींनीं शोकरस नाटकाचा मनरंजनापुरताच उपयोग केला नाहीं, तर धार्मिक, नैत्तिक व कधीं कधीं राजकीय कामांत शोकरस नाटक हें एक साधन असे. परंतु राजकीय कामांत हास्यरस नाटकाचा उपयोग जास्त होई; कारण, हास्यरसांत कवीला वाटेल तशीं मोकळीक असते. हास्यरसाची आरिस्टोफेनेसानें कमाल करून सोडिली. आरिस्टोफेनेस पेलापोनीसियन युद्धाचे वेळीं होऊन गेला. इतर देशांप्रमाणेंच ग्रीस मध्यें ही गद्याचा विकास कविते नंतर झाला.

मनुष्याला हेवा, मत्सर व दुष्टपणा होण्याचा संभव असतो. ह्याचा इतर थोर लोकांप्रमाणें पेरिक्लिसाला ही अनुभव आला. त्याच्या खानगी व सरकारी कामांतील वर्तनाविषयीं संशय घेऊन कंड्या उठूं लागल्या. त्याला दुखविण्या करितां प्रथम त्याच्या जिवलग मित्रांवर हात टांकिला. नंतर खुद्द त्याच्यावर हल्ला सुरू झाला. आथेनाचा भव्य पुतळा करण्याकरितां काढून ठेविलेल्या द्रव्याच्या कांहीं भागाचा त्यानें अपहार केला असा त्याचेवर आरोप आणिला. परंतु त्या पुतळ्याचें सोनें काढून तें वजन करून त्यांत कांहीं कमी नाहीं असें सिद्ध करून त्यानें आपल्या शत्रूंचीं तोंडें बंद केलीं. आथेनादेवीच्या ढालीवर जीं चित्रें काढिलीं होतीं त्यांत आपला चेहरा काढिला असा फीडियासवर आरोप आणून त्यास कैदेंत टांकिलें. या कामांत यश आल्यामुळें त्याच्या शत्रुंनीं दुसरे यत्न केले. परंतु त्यांचीं कारस्थानें फसून त्यांना निराशेनें स्वस्थ बसावें लागलें. या पुढें पेरिक्लीसाला त्रास झाला नाहीं व मरेपर्यंत लोकसत्तात्मक राज्याचा मुख्य ही उच्च पदवी त्यानें कायम राखिली.

भाग ८ वा.

पेलापोनीसांतील लढाया.

खिस्तीशकापूर्वी सन ४४५ यांत जरी तीस वर्षांच्या मुदतीचा तह ठरला होता, तरी आतां फार दिवस शांतता राहूं शकणार नाहीं असें उघड दिसूं लागलें होतें. दिवसेंदिवस वृद्धिंगत होत असलेलें आथेन्सार्चे सामर्थ्य व वजन पाहून इतर राष्ट्रें व विशेषें करून स्पार्टा, त्याचा हेवा व द्वेष करूं लागलीं. यामुळें स्पार्टा व त्याच्याशीं स्नेहभावानें असणारीं संस्थानें यांतील ऐक्य दृढ झालें; पण आथेन्सचा प्रकार तसा नव्हता. आपल्या ताब्यांतील व स्नेहानें वागणाऱ्या संस्थानांच्या प्रामाणिकपणाविषयीं त्याची खात्री नव्हती. शिवाय स्पार्टाचा पक्ष म्हणजे डोरियन व महाजन यांचा पक्ष होता. आथेन्साचा पक्ष आयोनियन व प्रजासत्ताक मतांच्या लोकांचा असल्यामुळें तेथें प्रजासत्ताक संस्थांस उत्तेजन मिळत असे. अशा स्थितींत सर्व देशभर युद्धाग्नि भडकून जाण्यास कोठेंतरी एक ठिणगी पडण्याचाच कायतो अवकाश होता. ही ठिणगी अकल्पित दिशेने आली; आणि सत्तावीस वर्षेपर्यंत चालणारें, सर्व ग्रीक जगाच्या शांततेचा भंग करणारें, आणि आथेन्साम धुळीस मिळविणारें असें युद्ध उत्पन्न व्हावें हा तिचा परिणाम झाला.

इलिरियांतील केरकायरा (कारसायरा) ची वसाहत एपिड्यामनस्, येथें लोकांनीं महाजन पक्षास हुसकून लाविल्यावर त्यांनीं शेजारच्या एका जातीच्या लोकांचा आश्रय संपादिला आणि शहरावर हल्ला करावयास निघाले. आपलें मूळ स्थान केरकायरा येथील लोकांची एपिड्यामून्स येथील लोकांनीं मदत

मागितली; परंतु ती न मिळाल्यामुळें केरकायराची वसाहात जेथून आली होती, अशा कोरिन्थ शहराचें सहाय ते मागूं लागले. आपल्या कर्तव्यास न जागणाऱ्या या वसाहातीची खोडकी जिरविण्याची संधि आलेली पाहून कोरिन्थाच्या लोकांस आनंद वाटला. याप्रमाणें कोरिन्थाचें आरमार एपिड्यामनसू वर रवाना झालें. केरकायराच्या लोकांनींहीं एक आरमार पाठवून हद्दपार केलेल्या महाजनांस परत बोलवावें व कोरिन्थियनांस शहरांतून घालवावें असें बोलणें लाविलें. ही मागणी नाकबूल झाल्यावरून हद्दपार केलेले लोक, केरकायरीयन, व इतर लोक मिळून सर्वांनीं शहरास वेढा दिला. तेव्हां कोरिन्थियन लोकांनीं केरकायराबरोबर लढाई करण्याचा विचार प्रसिद्ध केला. आम्ब्रोकियन आखाताच्या मुखाजवळ झालेल्या समुद्रांतील लढाईंत त्यांचा पूर्ण पराजय झाला. पण याच समयास एपिड्याम्नीयनांस वेढा देणाऱ्या लोकांच्या स्वाधीन व्हावें लागलें. त्यांनीं शहरांतील रहिवाशांस गुलाम करून विकले व कोरिन्थियनांस लढाईंत सांपडलेले कैदी म्हणून ठेविले. ही गोष्ट ख्रि. पू. वर्ष ४३४ यांत घडली.

या नंतर नवीन स्नेही संपादन करून आपल्या पक्षास बळकटी आणण्याचा कोरिन्थच्या लोकांनीं होता तेवढा प्रयत्न केला. केरकायरीयनांनीं ही आथेन्साकडेस मदत मागितली. आपल्या शत्रूचा हेतु तडीस जाऊं देऊं नये म्हणून कोरिन्थियनांनीं ही आपले वकील आथेन्सास पाठविले पुष्कळ विचार करून आथेनियनांनीं केरकायराबरोबर मदत देण्यापूर्वी सल्ला केला; पण कोरिन्थबरोबर लढाई सुरू केली नाहीं. त्यांनीं लहानसें आरमार केरकायरा येथें पाठविलें; तरी केरकायरावर हल्ला होईपर्यंत लढाईच्या भरीस पडूं नये अशी ताकीद दिलेली

होती. सिवोटा नामक स्थळाजवळ कोरिन्थच्या व केरकायराच्या आरमारांची गांठ पडली. आपले स्नेही मट्टच्यास आलेले पाहून आथेनीयन लोक लढाईंत शिरले, त्यावरून त्यांनीं तह मोडला असें कोरिन्थियनांनीं ठरविलें. आथेन्स व कोरिन्थ यांची पहिली चकमक ख्रिस्ती शकापूर्वी सन ४३२ यांत झाली.

इकडे असा प्रकार चालला असतां ईजियन समुद्राच्या उत्तरेकडील शहरांनीं आथेन्साचा स्नेह सोडण्यास उद्युक्त व्हावें ह्मणून म्यासिडोनचा राजा पर्डिकास यानें उद्योग चालविला. अशा शहरांपैकीं पाटेडिया हें होतें. तो मुळची कोरिन्थियन लोकांची वसाहात. त्यांनीं आपली तटबंदी पाडून टाकावी व लोक ओलीस द्यावे असा आथेनियनांनीं हुकूम केला. आपण पाटेडियांचें रक्षण करूं असें स्पार्टानें सांगितलें होतें. यामुळें आथेन्सांतून आलेला हुकूम पाटेडियनांनीं मान्य केला नाहीं. त्याचेंच अनुकरण दुसऱ्या कित्येक शहरांनीं ही केलें. त्यांजवर पाठविलेल्या आरमारानें बखेडखोर शहरांबरोबर लढाईकरण्यासारखें आपलें बळ नाहीं असें पाहून तें पर्डिकास याजवर घसरलें. तरी दरम्यानच्या मुदतींत बरेंच वाढलेलें आपलें सर्व सैन्य केरकायरीयन व त्यांचे साथीदार यांजवर पाठवितां यावें, या उद्देशानें आथेनियन नौकाधिकारी, राजाबरोबर सल्ला करण्यास प्रवृत झाला. कोरिन्थियन लोकांचा पराजय तर झालाच, पण त्यांस पाटेडिया शहराच्या आश्रयास जातां आलें. यामुळें त्या शहरास खुष्कीनें व जलमार्गानें वेढा देण्यांत आला.

अशा प्रकारें घोंटाळा चालला असतां स्पार्टाच्या व्युहांतील सर्व शहरांतील लोकांची सभा स्पार्टांत मरण्याचें ठरलें

आणि आपणांस अन्यायानें वागविण्यांत येतें असें वाटत अस-लेल्या सर्व शहरांस आपल्या तक्रारी कळविण्यास येण्याविषयीं बोलावणीं झालीं. वऱ्याच तक्रारी पुढें आल्या. परंतु तेथें हजर असलेल्या आथेन्साच्या वकिलांनीं आपल्या देशबांधवाचें वर्तन यथायोग्य आहे असें मर्दुमकीनें स्थापन केलें. तथापि अखे-रीस सन ४३२ त (खि. पू.) लढाई करण्याचा ठराव प्रसिद्ध झाला. तरी नित्याच्या धिमेपणा प्रमाणें स्पार्टानें पुढील वर्षापर्यंत कांहीं केलें नाहीं. तोडजोड करण्याच्या कामीं थोडी खटपट झाली; पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. युरोप खंडांतील संस्थानांचा ओढा स्पार्टाकडेस होता; कारण स्वातंत्र्याचे व ग्रीक-दास्यविमोचनाचे आपण कैवारी आहों असें त्यानें प्रसिद्ध केलें होतें. स्पार्टाशीं स्नेहभावानें वागणाऱ्या संस्थानांत आरगास शिवाय सर्व पेलापानीसाचा समावेश होता. या खेरीज मिग्गारा, फोकिया, लोक्रिस, बिओशिया व इतर डोरियन शहरांचें पाठ-बळ त्यास होतें. आथेन्साच्या सहायकारी सस्थानांत चियास, लेसबास, प्लुयाटेइया, न्यापाक्टस येथील मेसिनियन, आकारने-नियाचा बहुतेक भाग, झ्याकिन्थास आणि केरकायरा हीं होतीं. आशियांतील आयोनीयन लोकवस्तीचीं हेलिस्पान्ट वरील शहरें व थ्रेसांतील समुद्र कांठचीं शहरें व ईजियन समुद्रांतील बहुतेक सर्व बेटें यांचें आथेन्सास पाठबळ होतें हें निराळें सांगणें नलगे. याप्रमाणें ग्रीस देशांत परस्पर विरुद्ध अशा दोन लष्करी छावण्या झाल्या व आतां लवकरच घडून येण्याऱ्या चकमकी करितां दोनही पक्षांकडून कडेकोट तयारी चालली.

सन ४३१ त (खि. पू.) स्पार्टाचा राजा आर्किडेमास यानें आटिकावर सैन्य स्वारी केली व आथेनियनांस निकराची

लढाई करणें भाग पाडावें म्हणून तो प्रदेश उध्वस्थ करून टांकिला. परंतु आपलें रक्षण करून स्वस्थ रहावें असा पेरि-क्लिसाचा निश्चय होऊन चुकला होता; यामुळें उन्हाळ्याच्या अखेरीस आर्किडेमासानें स्वदेशीं परत जाऊन लष्करास रजा दिली. इकडे आथेनियन आरमार पेलापोनिसाच्या व लोक्रिसच्या किनाऱ्यावर उसनें उगवीत होतें; व पावसाळ्यांत खुद्द पेरि-क्लिसानें मिगारावर स्वारी करून लुटालुट चालविली. या युद्धाच्या पहिल्या पांच वर्षांत दोनही पक्षांच्या लोकांनीं एकमेकांच्या मुलखांत स्वाऱ्या करून नासधूस केली. तरी निकराचा संग्राम करून लढाईचा शेवट करण्याची एकाची ही इच्छा दिसली नाहीं. ग्रीसाच्या पुष्कळ भागांत लढाईची धामधूम चालली असून एकंदरींत शत्रूपेक्षां आथेनियन लोकांचीच सरसी होती.

दुसऱ्या वर्षाच्या आरंभीं आर्किडेमासानें आटिकावर स्वारी केली, तेव्हां तेथें भयंकर सांथ उद्भवली. या वेळीं आपल्या बचावाकरितां बाह्य प्रदेशांतून तटबंदीच्या आंत येऊन राहिलेल्या लोकांनीं शहर गच्च भरून गेलें होतें. बाहेर चाळीस दिवस ल्याकेडिमोनियन लोक मुलूख ओस पाडीत असतां या सांथीनें ४००० सिटिझन (शहरवासी) व १००० गुलाम नाहींसे केले. गत साल प्रमाणें या वर्षींही आथेनियन आरमारानें पेलापोनी-सांत लुटालूट करून तो प्रांत ओस पाडण्याचा सपाटा चालविला होता. यामुळें, अन्नपाण्याच्या तोट्यानें पाटेडियावर शरण जा-ण्याची पाळी आली. सन ४२९ त (खि. पू.) आथेन्सांतील प्रख्यात पुढारी पेरिक्लिस हा सांथिच्या रोगानें मरण पावला. तो गेल्यानें लोकांचें केवढें नुकसान झालें तें लवकरच कळून आलें. कारण पापपुण्याची क्षिति न बाळगणाऱ्या गांवगुंडांनीं लोकांच्या दुर्वा-

सनांस प्रोत्साहन देऊन त्यांस नीति भ्रष्ट केलें; यामुळें आथेन्साचा नौकाधिपती फोरमियन, यानें जरी पश्चिम समुद्रांत कांहीं जय मिळवून पेलापोनीशन आरमारास स्वरक्षणाकरितां कोरिन्थच्या आखातांत जाणें भाग पाडिलें, तरी बाह्य प्रांतीं कांहीं विशेष प्रयत्न करितां येण्यास मार्ग नाहींसा झाला.

लढाई सुरू होण्यापूर्वीच कांहीं थीवन लोकांनीं विओशियापैकीं प्लुचाटेइया शहरावर विश्वास घातानें स्वारी केली होती; परंतु प्लुचाटेइयनांच्या सावधगिरीमुळें ते सर्व असामी कैद झाले व पुष्कळ ठार मारले गेले. आपल्याकडून 'होईल तितका पाठपुरावा प्लाटेइयाचे पुरातनचे स्नेही जे आथेनियन त्यांनीं केला. परंतु लढाईच्या तिसऱ्या वर्षीं आर्किडेमासानें आटिकावर स्वारी न करितां आपलें सर्व सैन्य प्लुचाटेइयाकडे चालविलें. तेथील लोकांनीं ही, अमानुषीय पराक्रमानें आपलें रक्षण केलें. तरी सन ४२७ त (ख्रि. पू.) त्यांस शहर शत्रूंच्या स्वाधीन करावें लागलें. सर्व पुरूष मंडळी निव्वळ कापून काढिली व स्त्रीयांस गुलाम करण्यासाठीं विकिलें. हे निरर्थक क्रूर कृत्य थीवन लोकांनीं केलें.

लढाईच्या चौथ्या वर्षीं आर्किडेमासानें मागील वर्षाप्रमाणें पुनः आटिकावर स्वारी केली. आथेनियन लोक नुस्ते स्वरक्षणाचा बंदोबस्त करून स्वस्थ होते. या वर्षांत घडलेली महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे धनकनकसंपन्न लेसबास बेटाचा बंडावा ही होय. या बेटांतिल महाजन मंडळीचें अंग स्पार्टाकडे होतें. पण साधारण जनसमाजाचा ओढा आथेन्साच्या कटाकडे होता. बंडखोरांस मदत देण्याचें स्पार्टन लोकांनीं

कबूल केलें व त्यांस पेलापोनीसाच्या कटांत घेतलें आणि आथेन्सावर हल्ला करण्याचाही निश्चय केला. तथापि आथेनीयन लोकांच्या तत्परतेमुळें त्यांस तो बेत रहीत करावा लागला. इकडे आथेन्साचा नौकाधिकारी पाचीस यानें मिटल्नी शहरास वेढा दिला. तरी त्याच्या मदतीस सन ४२७ सालापर्यंत (ख्रि. पू.) पेलापोनीसांतून आरमार कांहीं आलें नाहीं. मात्र त्या वर्षीं आथेनीयन लोकांस आपलें सैन्य लेसवास बेटांतून माघारें नेण्याचें भाग पाडावें ह्मणून स्पार्टन लोकांनीं पुनः आटिकांत उच्छेदं. मांडिला; तथापि पेलापोनीसाचें आरमार येण्यापूर्वीच मिटल्नीस शरण जावें लागलें. बेटाचें स्वामित्व पाचीस याजकडेस गेलें, तेव्हां त्यानें बंडखोरांतील पुढाऱ्यांस आथेन्सास पाठविलें; कारण या बेटांतील लोकांस कोणतें शासन करावयाचें याचा तेथें निर्णय व्हावयाचा होता. या वेळीं आथेन्साचें धूरीणत्व क्लियान नामक चर्मकाकडेस होतें. बायका व मुलें गुलाम करून विकावीं व पुरुषांस जिवें मारावे असा घोर ठराव करण्यास त्यानें आपल्या लोकांस प्रवृत्त केले. हा ठराव पाचीस यास कळविण्याकरितां एकदम जासूद पाठविला, तथापि या भयंकर हुकुमा संबंधानें आथेनियन लोकांस त्यांचीं मनें लवकरच खाऊं लागलीं. यामुळें दुसऱ्याच दिवशीं तो ठराव रद्द करून महत् अपराध्यांस मात्र देहांत शिक्षा देण्याचें ठरलें. तेव्हां दुसरें गलबत रवाना झालें व तें योग्य वेळीं पोंचून लोकांचे प्राण बचावले गेले. तथापि लेसावासचें स्वातंत्र्य जाऊन तें आथेन्साचें ताबेदार बनलें.

महाजनसत्ताक व प्रजासत्ताक पक्षांत हळूहळू सर्वत्र अत्यंत द्वेषभाव वृद्धिंगत होत चालला होता; तरी केरकायरांत निर्दयपणा व क्रूरता प्रगट झालीं तशीं दुसऱ्या कोठें झालीं नाहीं.

यामुळें त्या शहराची भरभराट कायमची लयास गेली. डोरीयन शद्ब महाजन सत्तावाचक व आयोनियन प्रजासत्तावाचक बनून गेले. यामुळेंच सायऱ्याक्युझ शहरानें धूरीणत्व स्वीकारिलेल्या डोरीयन वसाहती आयोनियन वस्तीच्या शहरांविरुद्ध सज्ज झालेल्या आढळतात. लिओन्टाईनचा वक्ता गारजियस यानें सन ४२७ त (ख्रि. पू.) आयोनियन लोकांस सिसलीवर स्वारी करण्यास प्रवृत्त केले, त्याचेंही कारण हेंच. असें करण्याचा मुख्य उद्देश त्या बेटांतून पेलापोनीसाचे मदतीस लोक पाठविण्यास सवड होऊं नये इतकाच होता.

या वर्षी पुनः आटिकावर स्वारी करावी, असा स्पार्टन लोकांनीं बेत केला होता; परंतु धरणीकंपाच्या धक्क्यांनीं भिऊन त्यांनीं तो सोडिला. यामुळें उत्तर व पाश्चिम प्रांतांतील आपल्या कांहीं शत्रूशीं लढाई करण्यास आथेनियन लोकांस सवड मिळाली. सिसलींत ही कांहीं महत्वाची ठिकाणें त्यानीं मिळविलीं. पुढील वर्षी आटिकावर स्वारी करण्याचा आपला बेत पेलापोनीशनांनीं खरोखर सिद्धीस नेला. परंतु तिकडे पंधराच दिवस राहून ते स्वदेशीं परत गेले. याचें कारण डेमास्थिनीस नामक हुशार आथेनियन सरदारानें मेसिनियांत पायलास येथें ठाणेंदेऊन त्याची तटबंदीही केलें असें वर्तमान त्यांस लागलें हें होय यामुळें स्पार्टन सैन्यास आटिकांतून माघारें बोलवावें लागलें. पायलास परत घेण्याकरितां बरेच प्रयत्न झाले. पण ते सर्व व्यर्थ गेले. नंतर स्पार्टन लोकांच्या एका टोळीनें पायलासच्या बंदरा समोरील स्फ्याक्टयिा नामक बेट आपल्या ताब्यांत घेतलें. लयाकोडिमोनियन लोकांची सर्व हलयांत पिछेहाट झाली आणि इमॉना गुलामांनीं चोरूनछपून धान्य आणून पुरवठा केला

नसता तर या उजाड वेटांत अडकून पडलेले स्पार्टन उपासमारीनें मेले असते. त्यांच्या बचावार्थ सल्ला किंवा थोड्या मुदतीचा तह करण्यास स्पार्टा शहर तयार झालें. परंतु यावेळीं आथेन्सा-चा कारभार क्लियानाच्या विद्यमानें चालत होता; आणि या शहरानें सांगितलेल्या शर्तीं स्पार्टास कबूल करितांच येऊं नयेत अशा होत्या. पायलास येथील आथेनीयन लोकांत ही अन्नपाण्याचा तोटा पडला. तरी आपल्या हातीं सैन्य असते तर स्पाक्टीयांतील स्पार्टनांस बंदिवान करून आथेन्सांत आणिले असते. अशी वल्गना क्लियान करूं लागला. त्याचें ह्मणणें खरें मानून आथेनियनांनीं त्यास सेनापति नेमिला. तो पायलास येथें पोंचला, तेव्हां डेमास्थिनीसाच्या उत्तम व्यवस्थेमुळें स्पार्टन लोक मोठ्या फिकिरींत असल्याचें त्यांस कळून आलें. यामुळें व अन्य गोष्टींच्या अनुकूळतेनें त्यानें स्पार्टन लोकांस बेटाच्या एका टोंकावर हांकून लाविलें व नंतर त्यांस शरण जाणें भाग पाडिलें. जवळ जवळ निंमे लोक बेटांत मेले होते; जिवंत राहिले त्यांस बंदिवान करून त्यानें आथेन्सांत नेले. याप्रमाणें क्लियानाचें अविचारी अभिवचन प्रसंगवशात खरें झालें.

मेसिनियन व गुलाम पायलास येथील आथेनियनांस येऊन मिळाले. यामुळें त्यांनीं स्पार्टास बराच त्रास दिला. तोडजोड करून आपले बंदिवान परत मिळविण्याचा स्पार्टानें केलेला प्रयत्न व्यर्थ झाला; कारण आथेनियन लोकांची मागणी फाजीलपणाची असून पेलापोनिशन लोकांनीं पुनः आटिकावर स्वारी केल्यास या बंदिवानांस जिवें मारूं असेंही अखेरीस त्यांनीं प्रसिद्ध केलें. या सालीं आथेनियन लोकांचा इतर ठिकाणींही जयच झाला व किथेरा नामक बेट त्यांनीं आपल्या

अंमलांत आणिलें. या त्यांच्या विजयामुळें स्पार्टन लोकांची उमेद अगदीं खचून जाऊन ते आपल्या बचावापुर्ता विचार करूं लागले. पण जसजशी त्यांची उमेद नष्ट होत गेली तसतशी आथेनियन लोकांत ती वाढली. ते जास्त धीट झाले व त्यांनीं लुटालूट करण्याच्या स्वाऱ्या चालू ठेविल्या. सिसलींत सायराक्युझचा राहणारा शाहणा व देशाभिमानी हरमोक्रेटीस याच्या मसलतीनें आथेन्सार्शी सख्य करण्यांत आलें. आपसांत तंटाभांडणें करून परक्यांस सर्व मुलख घशांत उतरतां येण्याचा मार्ग ते चोखाळीत आहेत अशी त्यानें आपल्या देशबांधवांची खातरी केली. परंतु याहून जास्त फायदेशीर अटी कबूल करवितां आल्या असत्या अशा समजुतीखालीं सिसलींत हा सल्ला करण्यास कबूल झालेल्या सैनानींपैकीं कांहींकांस आथेनियन लोकांनीं शासन केल.

ममता व हसून खेळून रहाण्याचा स्वभाव यांबद्दल स्पार्टन लोकांची कधींही ख्याती नव्हती. पण ज्याच्यांत हे दोन गूण वसत असून शिवाय जो मोठा योद्धाही होता असा एक पुरूष त्यांच्यांत झाला. तो पुरूष ब्रासिडास हा होय. त्यानें प्रथम आथेनियन लोकांस मिगारांतून हांकून काढिले; तसेंच त्यांस पायलास व किथेरा सोडून जाणें भाग पडावें या इराद्यानें च्याक्केडिकेच्या द्वीपकल्पांत व थ्रेसच्या किनाऱ्यावर लढाया चालू केल्या. या तजविजी अंमलात येत असतां बिओशियांत डेलियन येथें आथेनियनांचा मोठा पराजय झाला. आथेन्सास अनुकूळ असलेल्या पक्षांतील लोकांच्या बोलावण्यावरून ते तिकडेस गेलेले होते. त्यांच्या उत्तम तरबेज शिपायांपैकीं एक हजारापेक्षां जास्त लोक या लढाईंत पडले.

ब्रासिडास म्यासिडोनीयांत जाऊन पोचला, तेव्हां तेथील चंचल वृत्तीचा राजा परडिकास हा त्यास मिळाला. नंतर च्या-ल्कडिकेंत जाऊन तिकडील शहरांस आथेनियन लोकांच्या जाचां-तून सोडविण्यासाठींच आपण आलों असें त्यानें प्रसिद्ध केलें. आपल्या मोहक वर्तनानें त्यानें सर्वांस भुलवून सोडिलें व स्पार्टा-च्या कटास मिळण्याची इच्छा त्यांच्या अंत:करणांत उत्पन्न केली. कांहीं शहरें तर एकदम त्याच्या पक्षास मिळालीं व त्यांनीं ल्याकेडिमोनीयन शिबंदी आंत घेतली. त्यास स्पार्टांतून फारसें सहाय. मिळालें नाहीं; तथापि इकडे त्याचा जयजयकार होत चालला. परंतु आंपले बंदिवान सोडवून घेण्यास स्पार्टन लोक फार उत्सुक झाले होते, यामुळें सन ४२३ त (ख्रि. पू.) तह करण्यांत आला. कायमची शांतता व्हावी अशी उभय पक्षांची आतां इच्छा होती. या साठीं तसें होण्यास सवड मिळावी ह्मणून हा तह एक वर्षाच्या मुदतीचा करण्यांत आला होता.

याप्रमाणें सल्ला होण्या बद्दलचीं बोलणीं चालू असतां अनेक प्रतिकूळ कृत्यें उत्तर प्रांतीं करून आथेनियन लोकांनीं या अल्प मुदतीच्या तहांतील शर्ती मोडिल्या व सन ४२२ त (ख्रि. पू.) ती मुदत पुरी होतांच क्लियानानें आथेनियन सैन्याचें आधिपत्य स्विकारिलें. थोड्याशा अनुकूळ गोष्टी घडून आल्यावर त्यानें ब्रासिडास यास आम्फीपोलीसजवळ गांठलें. इतक्या अवका-शांत ब्रासिडास यास ही कुमक येऊन पोचली होती. शत्रूजवळ आल्याचें पाहून क्लियानानें माघार घेतली. तें पाहून स्पार्टन लोक आथेनियन सैन्यावर एकदम तुटून पडले व त्यानीं त्याची दाणा-दाण करून सोडिली. क्लियान स्वत: पळून जात असतां एका य:कश्चित शिपायानें त्यास गांठून ठार मारिला. तरी आथेनि-

यनांनीं लढाई मोळ्या नेटानें चालविली होती; परंतु अखेरीस ते मठ्ठयास आले. लढाईच्या आरंभींच ब्रासिडास यास असाध्य जखम लागली होती, यामुळें त्यास लढाईंतून काढून आम्फी पोलीस येथें नेला असतां तेथें तो मरण पावला.

ब्रासिडासाच्या मृत्यु नंतर स्पार्टन लोकांनीं त्याची पद्धत सोडिली. आपले नांदिवान सोडवून घेण्याचा त्यांचा निर्णय होऊन चुकला होता. आलिकडील पराभवांनीं आथेनियन लोकांचा गर्व बराच हरण केला होता. शिवाय या वेळीं त्यांचे धूरीणत्व निकायस याजकडेल असून सल्ला होण्याच्या कामीं त्याची अनुकुलता होती. ह्मणून सल्लयाचीं बोलणीं चालू झालीं आणि खिति शकापूर्वी सन ४२१ च्या वसंत ऋतूंत तहाचीं कलमें ठरून मसुदा झाला. उभयपक्षीं असें ठरलें कीं लढाईंत जिंकिलेला मुलूख सोडून द्यावा; कांहीं खंडणी न मागतां लढाईंत सांपडलेले बंदिवान सोडून द्यावे व हा तह (निकायसाचा तह या नांवानें हा प्रसिद्ध आहे) पन्नास वर्षें चालावा. याच वर्षीं आपलें पुर्वीचें प्रतिस्पर्धी जें आरगास शहर त्याजकडून उपद्रव होऊं नये ह्मणून स्पार्टानें आथेन्सावरोबर, त्यानें आपणास मदत करावी व आपल्या शत्रूशीं लढाई करावी, अशा मतलबाचा तह केला. या व्यवस्थेनें लहान लहान संस्थानांतून भीती व संशय उत्पन्न होऊन हा तह फार दिवस टिकणार नाहीं असें उघड उघड दिसूं लागलें.

सात वर्षेपर्यंत स्पार्टन किंवा आथेनियन यांनीं एकमेकांच्या मुलुखांत स्वाऱ्या केल्या नाहींत. परंतु दोहोंतून एकानें तरी तहाच्या शर्ती अक्षरशः पाळिल्या असें झालें नाहीं. दोनही

संस्थांनांनीं इतर संस्थानें आपल्या पक्षास मिळविण्याचा यत्न केला. इकडे आरगास संस्थान एका नूतन कटाचें पुढारी बनलें व आपण आथेन्साच्या बाजूचे आहों असें प्रसिद्ध केलें. तसेंच स्पार्टानें ब्रिओशिया बरोबर स्वतंत्र संधान बांधिलें. याप्रमाणें चोंहीकडून अडचणींची गुंतागुंत चालली असतां आल्किबायडिस आपल्या लोकांची युद्धेच्छा क्षुब्ध करीत होता. अजून त्याचें पूर्व वयच होतें, असें ह्मटलें असतां चालेल. तो एका प्रसिद्ध घराण्यांत जन्मला असून, स्वतःच्या विक्षिप्तपणामुळेंच तो लोकांच्या प्रितीस व आदरास पात्र झाला होता. त्याच्या अंतःकरणाची प्रवृत्ति उमरावांच्या धर्तीवर असे. परंतु महत्वाकाक्षेमुळें त्यास जन समुहाचा पुढारीपणा स्विकारावा लागला. परचक्रापासून रक्षण व्हावें व दुसऱ्याशीं लढाई करण्याचें मनांत आणिलें असतां मदत व्हावी ह्मणून आरगास बरोबर आथेन्सानें जो शंभर वर्षाच्या मुदतीचा तह केला, तो मुख्यत्वेंकरून त्याच्या प्रयत्नामुळें झाला होता. आथेनियनांनीं या स्नेहसंबंधाचा स्पार्टास त्रास देण्याच्या कामीं उपयोग केला आणि आल्किबायडिसाच्या चिथावणींमुळें आरगासानें सन ४१८ त (ख्रि. पू.) राग येण्यासारखा असा कांहीं प्रकार केला, कीं तो स्पार्टास अगदीं सहन झाला नाहीं. यामुळें युद्ध चालू होऊन म्यान्टीनियाजवळ झालेल्या लढाईंत आरजीव्ह लोकांचा पूर्ण पराभव झाला; परंतु तेथिल उमराव मंडळीच्या प्रयत्नानें आरगासानें आपल्या पूर्वीच्या स्नेह्यांस सोडून देऊन स्पार्टाबरोबर तह केला. नंतर आरगास व स्पार्टा यांनीं आपल्या स्नेहानियुक्त संस्थानांची संख्या वाढववेल तितकी वाढविली आणि साघली तेथें त्यांनीं महाजनसत्ताक पक्षास बळकटी आणिली.

सन ४१७ त (खि. पू.) आरगास येथें प्रजासत्ताक पक्षाची पुनः सरसी झाली व त्यांनें आथेन्साबरोबरचा आपला पूर्व संबंध जोडिला. पुढील वर्षी आल्किबायडिस आरमारसह आरगास येथें गेला आणि ३०० उमरावांस त्यानें बांदिवान केले. यानंतर लवकरच डोरिक लोकवस्तीचें मेलासबेट आथेन्साच्या कटास मिळेना ह्मणून त्यास वेढा देण्यांत आला, तेव्हां त्यास कांहीं अटी ठरविल्यावांचून शत्रूस शरण जावें लागलें. आथेनियन लोकांनीं मोठ्या शौर्यानें सर्व बेट उजाड करून सोडिलें व नंतर तेथें दुसरे लोक नेऊन भरिले. तहांतील शर्तीस अनुसरूनं मेलासास मदत करण्याचें कोणतेंही कृत्य स्पार्टन लोकांनीं केलें नव्हतें. परंतु शांतता राखणें शक्य होऊं नये असे योगायोग दूरच्या प्रदेशांत घडून येत होते.

सिसलींत मुलूख संपादन केल्या वांचून परत आलेल्या सरदारांवर आथेनियन लोक क्रुद्ध झाले होते, असें मागें दिसून आलेंच आहे. स्वदेशीं प्राप्त झालेल्या विजयश्रीनें चढून गेलेल्या गांवगुंडांनीं पेरिक्लिसाच्या मृत्यू नंतर लोकांची अशी समजूत घातली कीं मनापासून झटल्यास काय पाहिजे तें आपणास साध्य होण्यासरिखें आहे. मुत्सद्यांत दोन पक्ष झाले होते. निकायस पुढारी असलेल्या पक्षाच्या मनांतून किती नुकसान झालें तरी तें सोसून स्वस्थता राखावी असें होतें. दुसऱ्याचा पुढारी आल्किबायडिस हा होता. यांतील लोक लढाया मारण्याच्या व नवीन नवीन मुलूख संपादन करण्याच्या कल्पनांत गर्क होऊन गेले होते. याप्रमाणें मतभेद सुरू असतां सन ४१६ त (खि. पू.) सेलिनस शहरावरोबर भांडण्यास मदत मागण्याकरितां आथेन्सांत इजिष्टाच्या तर्फे वकील आले व त्यांनीं पुष्कळ

लालूच दाखविली. कशी काय स्थिती आहे तें पाहून येण्यासाठीं लागलेच वकील सिसलीस पाठविले. ते परत आल्यावर इजिष्टाचें सामर्थ्य व संपत्ति यांजबद्दल त्यांनीं फार रसभरीत वर्णन केलें. त्यावरून आल्किबायाडिस, ल्यामाकास व निकायस यांच्या हाताखालीं एक बलाढ्य आरमार देऊन त्यांस तिकडे पाठविण्याचा आथेनियनांनीं एकदम ठराव केला. अजूनपर्यंत आथेन्सांतून गेलेल्या सर्व आरमारांपेक्षां हें आरमार भव्य असून ग्रीक संस्थानांत असलेल्या त्या राष्ट्राच्या महतीस व प्रतिष्टेस अनुरूप असेंच होतें.

हें आरमार निघण्यास अगदीं तयार झालें असतां एका प्रातःकाळीं शहरास सुशोभीत करणारे हरमिसाचे बहुतेक सर्व पुतळे उपटून टांकिले किंवा छिन्न भिन्न केले आहेत असें आढळलें. या स्वैर कृत्यानें नगरांतील लोकांचीं अंतःकरणें भीतीनें व्याप्त होऊन गेलीं; कारण हें बंडाव्यांतील कृत्य असावें अशी समजूत होऊन चुकली. त्या कृत्याचा आरोप पुष्कळांवर करण्यांत आला; त्यां पैकीं जे लोक पळून गेले त्यांस देहांत शिक्षा ठरवून त्यांची मालमत्ता सरकारांत दाखल केली. माहिती देणारांनीं आरमार प्रत्यक्ष निघून जाईपर्यंत आल्किबायाडिसाचें नांव काढिलें नाहीं. तें दक्षिण इटालींत ऱ्हिजियम येथें पोंचल्यावर बचावाचीं साधनें कशीं काय आहेत तें पाहून येण्याकरितां एक टोळी पुढें पाठविण्यांत आली. तिनें आणिलेल्या माहितीवरून इजिष्टाच्या संपत्तिचें वर्तमान उगीच फुगवून सांगितलेलें होतें असें दिसून आलें. तरी आल्किबायाडिस व ल्यामाकास यांच्या मनांतून त्या शहरास मदत करावी, मिळतील तितकीं स्नेहसंबंध ठेवणारीं नगरें जोडावीं व सिसलींतील डोरियन पक्षाचें मुख्य शहर सायराक्यूझ याजर हला करावा असें होतें.

दरम्यानच्या मुदतींत आल्किबायडिसाच्या शत्रूंनीं त्याजवर आणिलेल्या तोहमतीस जाब देण्यासाठीं त्यास परत बोलाविण्याकरितां आथेन्साहून पाठविलेले वकील या सुमारास येऊन दाखल झाले. कांहीं हरकत न घेतां तो वकिलांबरोबर परत जाण्यास गलबतांतून निघाला; परंतु थुराई येथें पोंचल्यावर किनाऱ्यास उतरून तो फरारी झाला. आल्किबायाडिसास परत नेल्यानें ज्याच्याहातून या स्वारीचा शेवट कदाचित् चांगला होण्याचा संभव होता असा मनुष्य नाहींसा झाला. तो पेलापोनीसांत गेला. त्याच्या शत्रूनीं त्यास देहांत शिक्षा देण्याचा हुकूम केला आणि त्याची सर्व मालमत्ता जप्त केली. हिंवाळ्याचा आरंभीं आथेनियन लोक सायऱ्याक्युझच्या जवळपास किनाऱ्यावर उतरले. तेथ पर्यंत सिसलींतील लढाईचें काम फारसें नेटानें चाललें नाहीं. नंतर झालेल्या चकमकींत सायऱ्याक्युझन लोकांचा पराभव होण्याचें थोडक्यांत चुकलें व आथेनियन, कटानें येथें निघून गेले.

हिंवाळ्यांत हरमोक्रेटीसाच्या शिक्षेंत सायऱ्याक्युझन लोकांनीं आपला पक्ष सबळ करण्याच्या कामीं हर प्रयत्न केला; परंतु सिसलींतील शहरें या कार्यास मनापासून झटत नाहींत असें त्यांस आढळून आलें. नवीन स्नेहसंबंध जोडून आपली बाजू बळकट करण्याचा आथेनियनांनीं ही प्रयत्न केला. सायऱ्याक्युझन लोकांनीं स्पार्टा व कोरिन्थ कडेस मदत मागितली. यावेळीं आल्किबायाडिस स्पार्टा येथें जाऊन राहिला होता. त्यानें सायऱ्याक्युझन लोकांस सहाय्य करण्यासाठीं मोठें सैन्य व हुशार सरदार पाठविण्याविषयीं व याच समयास आटिकाच्या मध्यभागीं असलेलें डिकेलिया नामक स्थळ मिळविण्याविषयीं सरकारची आग्रह पूर्वक विनवणी केली. त्याचें म्हणणें एकदम मान्य होऊन जिलिपास याचा सायऱ्याक्युझास रवानगी झाली.

सन ४१४ च्या (खि. पू.) वसंतांत आथेनियन लोकांनीं सायऱ्याक्युझास वेढा दिंला; व बऱ्याच चकमकी उडाल्या, त्यांपैकीं एकींत लयामाकास मरण पावला. मग सापऱ्याक्युझास सक्त वेढा बसला. त्यामुळें लोक इतके हताश होऊन गेले कीं त्यांनीं आपला पुढारी हेरमोक्रेटीस यास पदच्युत केला. आतां सिसलींतील पुष्कळ शहरें त्यांच्या बाजूस मिळाल्यामुळें आपला खास जय होईल असें आथेनियनांस वाटूं लागलें; पण याच संधीस जिलिपास आला व नुसत्या त्याच्या नांवानेंच डोरियम शहरांस उत्तेजन चढलें. पुष्कळ लोक त्याच्या ध्वजास मिळाले. तेव्हां सायऱ्याक्युझन लोकांनीं सल्ला करण्याचा विचार बाजूस टांकून आथेनियन लोकांच्या बहुतेक पुऱ्या झालेल्या तटवंदीवर हल्ला केला.

आतां सर्व मनू बदलला. सेलिनसांतील राहिवासी व ग्रीक शहरें सायऱ्याक्युझाच्या पक्षास मिळालीं. आथेन्साच्या बाजूस न्याक्सास व कटाने यां खेरीज कोणीं फारसीं राहिलीं नाहींत. आथेनियन लष्कराचा निकायस हाच काय तो एकटा सेनानी राहिला होता. त्याजकडून सायऱ्याक्युझ शहरास वेढा न बसतां तो स्वतःच वेढला गेला. त्यानें कुमक पाठविण्याविषयीं आथेन्सांत लिहून पाठविलें व प्रकृती नादुरुस्त असल्यामुळें काम सोडण्याची आपली इच्छाही दर्शविली. ही दुसरी विज्ञप्ति मान्य करण्यांत आली नाहीं. पण त्याच्या म्हणण्याप्रमाणें डेमास्थिनीस व युरिमिडान या दोन सरदारांस नवीन सैन्य देऊन सिसलींत पाठविले. ग्रीसांतील दोन प्रमुख संस्थानां मधला तह आतां उघडपणें मोडण्यांत आला होता. यामुळें सन ४१३ त (खि. पू.) आजीस यानें आटिकावर स्वारी

केली व मुलुखांत लुटालूट करून त्यानें डिकेलिया येथें तटबंदी करून छावणी केली. येथें राहून त्यास आथेनियनांस नाना प्रकारें त्रास देतां येण्यासारखा होता. आथेन्सावर अणिबाणीचा प्रसंग येऊन गुदरला होता; त्याला स्वमुलुखांत व सिसलींत अशी दोन जागीं लढाई चालविणें भाग आलें होतें; या कामीं लागणारी पैक्याची रक्कम मोठी असून उत्पन्न कमी झालें होतें. असा प्रकार असल्यामुळें अस्वस्थता न नाखुषी उत्पन्न होऊन त्यापासून शेवटीं राज्यक्रांति होण्यापर्यंत मजल येऊन पोंचली.

डेमास्थिनीस व युरिमिडान हे आपल्या सैन्यासह येऊन दाखल होण्यापूर्वी पाण्यांतली एक लढाई झाली. तींत आथेनियन लोकांचा जय झाला. परंतु किनाऱ्यावरील त्यांची छावणी जिलिपासाच्या हातीं लागली. शत्रूनें आथेनियनांस फार त्रास दिला व दुसऱ्या पाण्यांतील लढाईंत त्यांस मागें फिरण्याची पाळी आली. आथेनियन लोक आपल्या लौकिकास मुकण्याची सुरुवात होते न होते अशा अणिबाणीच्या वेळीं डेमास्थिनीस व युरिमिडान हे येऊन पोंचले. डेमास्थिनीसानें सापऱ्याकयुझ शहराबाहेरील वाड्यांपैकीं एकीवर एकदम रात्रीच्या वेळीं हल्ला केला. आरंभीं जरी त्याचा जय झाला, तरी शेवटीं पुष्कळ नुकसान होऊन त्याचा पराभव झाला. अशा संकटावस्थेंतच लष्करांत रोगाची सुरवात झाली; त्याच्या सैनिकांची उमेद खचली; व सिसलींतून अजिबात निघून गेलें असतां वेर अर्से डेमास्थिनीसास वाटूं लागलें. याप्रमाणें निघून जाणें किती धोक्याचें आहे तें निकायासास कळत होतें., तरी शेवटीं गुप्त रीतीनें निघन जाण्याच्या आपल्या साथीदारांच्या बेतास त्यानें कबुली दिली. या बेताची बातमी सायऱ्याक्युझनास समजली व त्यानीं आपल्या

शत्रूवर एकसमयावच्छेदें करून जमिनीवरून व पाण्यांतून हल्ले केले. त्यांत आथेनियन आरमाराचा पुरा मोड होऊन युरिमिडान मारला गेला. आथेनियन लोकांचा नाश फार झाल व आपल्या शत्रूचा समूळ नाश करून टांकण्याच्या प्रयत्नास सायराक्युझन लागले. ह्मणून पुनः एक वेळ पाण्यांतील लढाईंतच आपलें बळ खर्चून पाहण्याचा त्यांनीं निश्चय केला. आथेनियनांस आपले जीव कसे बचावतात याची पंचाईत येऊन पडली. निकायसाच्या हाताखालचें खुष्की वरील लष्कर किनाऱ्यावर काढिलें होतें. यानंतर झालेल्या लढाईंत आथेनियन आरमारास माघार घेऊन किनाऱ्याकडे जावें लागलें व खुष्कीवरील सैन्याची त्रेधा उडून गेली. नाश होऊन उरलींसुरलीं निम्मे गलबतें सुद्धां टांकून द्यावीं लागलीं व पळून जाऊन एकाद्या निर्भय स्थळाचा आश्रय संपादन करण्याच्या प्रयत्नांत त्यांस आपणां पैकीं जखमी झालेल्या व आजारी असलेल्या लोकांनां ही सोडून जावें लागलें. विनीस निकायस असून पिछाडीच्या लोकांचें नियमन करण्याचें काम डेमास्थिनीसाकडेस होतें. सायऱ्याक्युझन लोकांनीं त्यांचा पाठलाग करून त्यांस हरएक प्रकारें त्रास दिला व कांहीं दिवसांनीं लढाईची तयारी करण्याचें त्यांस भाग पाडिलें. डेमास्थिनीसाच्या लोकांस शस्त्रें खालीं ठेविण्याची पाळी आली; तरी त्यांच्या जीवितास इजा पोंचूं नये असें ठरलें. जेव्हां शत्रूंनीं निकायसास गांठिलें व आपल्या सोबत्याची काय वाट झाली तें त्यांस समजलें, तेव्हां त्यास तें खरें वाटेना. ह्मणून पराकाष्टेच्या अडचणी सोसून कूच करण्याचें काम त्यानें तसेंच चालविलें. शेवटीं त्याजवर ही शरण जाण्याची पाळी आली. सात हजार बंदि-

वानांस सायराक्युझ शहराजवळील दगडांच्या खाणींत पाठविले; तेथें फार दाटीनें व धड अन्न नाहीं अशा अवस्थेंत, रोगोत्पादक हवेंत त्यांस सत्तर दिवस काढावे लागले. मेलेल्यांचीं प्रेतें व मरणोन्मुख झालेले लोक यांसही तेथेंच टांकण्यांत आलें होतें. शेवटीं अशा विपत्तींत ही जे जिवंत राहिले त्यांस गुलाम म्हणून विकिलें आणि निकायस व डेमास्थिनीस यांस ठार मारिले. आथेन्सानें केलेल्या एकंदर स्वाऱ्यांत अति भव्य अशा या स्वारीचा याप्रमाणें शेवट झाला. सायराक्युझन लोकांची निष्ठुरता व क्रौर्य पाहून अंगावर शाहरे उठल्यावांचून व त्यांचा त्रास आल्यावांचून रहात नाहीं.

या भयंकर अरिष्टाचें वर्तमान आथेन्सांत समजलें, तेव्हां लोक हतवीर्य होत्साते त्यांनीं या स्वारीस उद्युक्त करणारांवर तोंड सोडिलें. तथापि पूर्वीची हुशारी त्यांच्यांत पुनः लवकरच आली, आणि अजून शाबीद असलेली सत्ता तरी राखण्याचा त्यांनीं निश्चय केला. स्पार्टन लोक डिकेलिया येथील आपलें मजबूत ठाणें संभाळून असतां ही एकंदर लढण्याचें काम समुद्रांत व आशियामायनरच्या किनाऱ्यावर मिळून नऊ वर्षेपर्यंत त्यांनीं चालविलें. सिसलीच्या स्वारींत स्पार्टा जलमार्गावर प्रबल राष्ट्र बनलें. आथेन्साच्या अशा अवनतावस्थेची संधी साधून युबिया, लेसवास सारख्या नाखुप असलेल्या स्नेही संस्थानांनीं स्पार्टाशीं तहाचें बोलणें लाविलें. तसेंच आशियामायनरांत त्यांच्या हातीं असलेल्या मुलखांतून त्यांस हांकवून देण्याकरितां स्पार्टाचें सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न इराण ही करूं लागलें. हा घाट स्पार्टन लोकांस तेव्हांच कबूल झाला, आणि ख्रिस्ती शकापूर्वी ४१२ त स्पार्टन लोकांनीं आल्किबायाडिसास चियास येथें ल-

हान आरमार देऊन पाठविला. कारण दुसऱ्याच्या शिकवणी वरून तेथील लोकांनीं आथेन्साचा स्नेहसंबंध ही तोडला होता. त्याचा कित्ता दुसऱ्या शहरानींही उचलिला. यामुळें बंडावा करण्या विषयींच्या प्रेरणेस आथेन्साच्यानें प्रतिबंध करवला नाहीं. सरते शेवटीं स्पार्टा व इराण यांच्या दरम्यान तह झाला, त्यांत आशिया खंडांतील ग्रीक लोक इराणच्या ताब्यांत रहावे असें ठरलें.

तथापि आथेनियनांनीं मोठें सैन्य जमवून चियास जिंकून उध्वस्त केलें आणि बंडखोर शहरांस पुनः आपलें स्वामित्व कबूल करण्यास लाविलें. फ्रिनिकास याच्या हाताखालील दुसऱ्या सेनेनें मिलिटस्वर हल्ला केला, तेव्हां तीस इराणचा क्षेत्रप टिसाफार्निस व आल्किबायाडिस या दोघां बरोबर लढावें लागलें. असें असून जेव्हां सायराक्युझाहून आणखी कुमक आली, तेव्हां फ्रिनिकास यास स्यामासकडे परत जावें लागलें. आथेनियन लोकांचें समुद्रांतील वर्चस्व अजून कायमच होतें खरें; तरी मिलिटस् व दुसरीं कांहीं शहरें त्यांच्या शत्रूंच्या हातांत राहिलीं. आल्किबायडिसाविषयीं त्याच्या स्पार्टांतील स्नेह्यांस संशय होताच; त्यानें स्पार्टनास मिळत असलेली मदत बंद करावी व, आथेन्स आणि स्पार्टा यांस आपापसांत भांडण्यास लावून एकमेकांस जर्जर करूं द्यावें, अशी टिसाफार्निसाची समजूत घातली. ही मसलत टिसाफार्निसास मानवली. त्यामुळें स्पार्टाचें बरेंच नुकसान झालें; पण असें करविण्यांत आथेन्सापेक्षां इराणाचें विशेष हित साधून द्यावें असा आल्किबायडिसाचा उद्देश मुळींच नव्हता. आपल्या देशबांधवांस स्वतःची गरज लागण्यापुरतें त्याचें बळ कमी करवून नंतर त्यांजकडून आपणा-

स स्वदेशीं येण्याची मोकळीक मिळवावी इतकाच या खट-पटींत त्याचा हेतु होता. याच उद्देशानें स्पामास येथें अस-लेल्या आथेनियन सैन्यांतील लोकांचीं मनें वळवून कांहीं बोलणें चालणें करण्याकरितां व टिसाफर्निस त्यांच्या पक्षास मिळण्यास तयार असल्याचें कळविण्या करितां पिसान्डर यानें जावें असें ठरविलें. ही मसलत कांहीं अंशी तडीस गेली; परंतु आल्कि-बायाडिसाच्या सांगण्यांत महाजन सत्ता स्थापन करण्याचा आ-ग्रह दिसल्यावरून सर्व बोलणें तितक्यावरच राहिलें. परंतु सन ४११ त (ख्रि. पू.) आथेन्सांतील महाजन पक्षानें आप-ल्या इच्छेनुरूप राज्यकारभार चालविण्याची पद्धत अंमलांत आ-णिली, व तशाच प्रकारचा फेरफार इतर स्नेही संस्थानांतूनही झाला. तो प्रकार असा;-अनेक नवे कायदे करण्याकरितां दहाज-णांची निवड करून त्यांस पूर्ण अखत्यार देण्यांत आला; ४०० अ-सामींची एक मंडळी नेमिली; व निवड करण्याचा अधिकार ५००० नागरिकांस दिला. या महाजनसत्ताक पद्धतीचे मुख्य उत्पादक पिसान्डर, थेरामिनीस व वक्ता आन्टिफान असे तिघेजण होते. या नंतर सरकारच्या मनांतून स्पार्टाबरोबर त्वरित सख्य करण्याचें होतें. परंतु हा फेरफार स्यामास येथील सैन्यास मुळींच पसंत नव्हता आणि जेव्हां उमरावांचीं जुलुमाचीं व क्रूरतेचीं कृत्यें स-मजलीं तेव्हां सैन्य व आरमार या उभयतांनीं लोकांच्या हक्काचें रक्षण करण्याच्या व प्रजासत्ताक राज्यपद्धति चालू करण्याच्या शपथा वाहिल्या.

अंतस्थ बखेड्याच्या या मुदतींत बाह्यप्रदेशीं आथेन्सास बरेंच तोशीस लागलें. कारण उत्तरेकडील पुष्कळ शहरांसुद्धां युबियानें हो बंड केलें व स्पार्टन लोक ही इराणच्या मदतीची वाट

पहात बसले होते. परंतु लौकरच अगदीं भिन्न प्रकार घडून आला.

स्यामास येथील एक सरदार थ्रासिबोलस यानें आल्किबायाडिसास परत बोलाविण्याविषयीं सेनेस उद्युक्त केलें. त्या प्रमाणें तो गेल्यावर त्याची सेनांनींत योजना झाली. आपण स्पार्टास प्रतिकूळ असल्याचें टिसाफानिसाकडून प्रसिद्ध करवितां येईल या आशेवर त्यानें आपल्या देशबांधवांत आपले फार वजन आहे, अशी त्याची समजूत व्हावी अशी तजवीज केली. इतक्यांत आथेन्सांत कारभार पहात असलेले उमराव निर्दोषी आहेत व त्यांनीं केलें तें काम यथायोग्य आहे, असें स्थापन करण्याकरितां स्यामासास आथेन्सांतून वकील गेले. परंतु लष्करानें त्यांचें बोलणें ऐकण्याचें नाकबूल केलें इतकेंच नाहीं, तर आल्किबायाडिसाच्या सौम्य उपदेशाचें वजन पडलें नसतें तर उमरावांस पदच्युत करण्यासाठीं तें एकदम आथेन्सास गेलें असतें. तरी उमराव लोकांच्या आपसांतील तंट्यांमुळें अखेरीस तोच परिणाम झाला. उमरावांचें स्पार्टाबरोबर कारस्थान चालू असल्याच्या अंदेशावरून जी विरुद्ध योजना झाली, तींतलें धूरीणत्व आपणाकडेस रहावें असें थेरामिनिसानें केलें. यामुळें पेलापोनीसांतील आरमार जेव्हां आटिकाच्या किनाऱ्याकडेस प्रत्यक्ष येऊं लागलें तेव्हां लोक एकदम आपल्या गलबतांवर चढले व त्यानीं त्याजवर हल्ला केला. परंतु पुष्कळ नुकसान होऊन त्यांचा पराभव झाला. त्यामुळें कांहीं कालपर्यंत पुढें काय करावें तें त्यांस सुचेनासें झालें. तथापि ते लवकरच सावध होऊन त्यांनीं सभा भरविली. तिनें उमरावांस पदच्युत करून आल्किबायाडिसास माघारा बोलाविला. नावडत्या पक्षाचे

पिसान्डर व इतर पुढारी यांनीं पळ काढून ते डिकेलिया येथील शत्रूच्या छावणीच्या आश्रयास जाऊन राहिले.

टिसाफर्निसाकडून कुमक येण्याची वाट पाहून पाहून दमल्यावर स्पार्टाचा नौकाधिपति मिन्डारस यानें इराणचा दुसरा क्षेत्रप फार्नाबेझस याजकडे जाऊन आपल्या नशिबाची पारख पहावी ह्मणून आपलीं गलबतें हेलिस्पान्टकडेस चालविलीं. आथेनियन लोकांचें आरमार त्याच्या पाठोपाठ गेलें व त्यानें त्याजवर मोठा जय मिळविला. पाण्यांतली दुसरी लढाई आबीडास जवळ झाली. तींत आल्किवायाडिसाच्या सुव्यवस्थेमुळें आथेनियन लोक पुनः विजयी झाले. या सुमारास टिसाफर्निस ही आशियाच्या त्या भागांत जाऊन पोचला व त्यास निश्चितपणें आथेन्साच्या पक्षास वळविण्याचा प्रयत्न आल्किबायडिस करित असतां त्यानें त्यास कैद करून सारडीस येथें पाठविला; याचें कारण राजाच्या मनांतून आथेन्साबरोबरची लढाई चालवावयाची होती, असें ह्मणतात. थोडावेळ गेल्यानंतर आल्किवायाडिस कैदेंतून पळून परत आथेन्साच्या आरमारास जाऊन मिळाला व किझिकासच्या जवळ त्यानें मोठी लढाई मारिली; इंत मिन्डारस मारला गेला; पेलापोनीसचें सैन्य पळालें; व सर्व आरमार आथेनियन लोकांच्या हातीं लागलें. ही गोष्ट (ख्रि. पू.) सन ४१० त घडली. आतां आथेनियन लोकांनीं विजयाचा धोशा चालू केला आणि हेलिस्पान्टांत त्यानीं जें जें कांहीं गमाविलें होतें तें सर्व परत मिळविलें. पेलापोनशिन लोकांची मात्र धडगत दिसेनाशी झाली; कारण आटिकांत डिकेलियांतून केलेले हल्ले ही फिरविले जाऊं लागले.

चाल्केडान व बायझानशम हीं सन ४०९ त (ख्रि. पू.) आथेन्सास शरण गेलीं. असले विख्यात जय मिळविल्यावर सन ४०८ त (ख्रि. पू.) आल्किबायाडिस आथेन्सास परत गेला. तेथें त्याच्या सर्व अपराधांचा विसर पडला होता व कांहीं वेळपर्यंत लोकांस तो जीव कीं प्राण होऊन गेला होता. थोड्यावेळानंतर त्यास मोठें आरमार देऊन बंडावा केलेल्या आन्ड्रास बेटावर पाठविला. तें त्यास घेतां आलें नाहीं ह्मणून त्याच्या मनांतून ती गोष्ट कर्तव्य नाहीं, यामुळेंच असें झालें, अशी त्याच्या शत्रूंनीं लोकांची समजूत घातली. मनांत आणील तर तो पाहिजे तें करील असा त्याजबद्दल लोकांचा ग्रह झाला होता, यामुळें तर याह्मणण्यावर त्यांचा विशेष भरंवसा बसला.

मिन्डारसाच्या मृत्यु[ु]नंतर पेलापोनिशन आरमाराचें अधिपत्य लिस्यान्डर यानें स्वीकारिलें. हा मनुष्य मोठा हुशार असून आल्किबायाडिसास यथायोग्य प्रतिपक्षी होता. तो एफिसस येथें राजाचा मुलगा कायरस याची वाट पहात बसला होता, कारण तो राजपुत्र स्पार्टाचा पूर्ण पाठीराखा होता. आल्किबायडिसाच्या एका सरदारानें हुकुमाविरुद्ध लिस्यान्डरावर हल्ला केला. त्यामुळें मोठी लढाई होऊन तिचा आथेन्सास विपरीत असा परिणाम झाला. हें नुकसान भरून काढितां न आल्यामुळें आल्किबायाडिसानें आपलीं गलबतें स्यामासकडे नेलीं. हें अरिष्ट त्याच्याच निष्काळजीपणानें ओढवलें असें तेथें ठरविण्यांत येऊन सन ४०७ त (ख्रि. पू.) लष्करी लोकांनीं त्यास अधिकारावरून काढून टांकिला. स्वदेशीं आपल्या शत्रूंचें वजन फार असल्याचें समजून तो आपण होऊन देशत्याग करून थ्रेसांतील चेरसोनीसस येथें जाऊन राहिला. स्वदेशाविषयींचें त्याचें

प्रेम कधीं कमी झालें नाहीं, तरी चेरसोनासिस येथें गेल्यावर तो पुनः तिकडे गेला नाहीं. त्याच्या सरदारांपैकीं सर्वांत हुशार जो कोनान यानें स्यामास येथील सैन्माचें अधिपत्य आतां स्विकारिलें.

लिस्यान्डराच्या मागून कालिक्रेटिडास हा सेनानी झाला. त्यानें पहिल्या सपाट्यासच कीनानाचा पराभव करून त्याचें फार नुकसान केलें. हें वर्तमान समजल्यावर आथेनियनांनीं त्वरीत दुसरें मोठें आरमार तयार केलें आणि आरज़िनारा नामक द्विपसमुहा जवळील लढाईंत पेलापोनिशन लोकांचा पराभव केला. या लढाईंत कालिक्रेटिडास हा पडला व सत्तर गलबतांचा नाश झाला. लढाई आटोपल्यावर भयंकर वादळ सुरू झालें. त्यामुळें गलबतें फुटून पाण्यांत पडलेल्या लोकांस व प्रेतांस काढणें अशक्य झालें. याबद्दल आथेन्स येथें सरदारांवर दोषारोप करण्यांत येऊन इनसाफ होण्यासाठीं त्यांस परत येण्याचा हुकूम झाला. ज्या सहा जणांनीं हुकूम मान्य केला त्यांनीं आपल्या हातीं आपला नाश करून घेतल्यासारखें झालें. कारण गांवगुंडांच्या चिथवणी वरून संतप्त झालेल्या लोकांनीं सर्वांस एकदम देहांत शिक्षा देण्यांचा हुकूम केला. थेऱ्यामिनीस नामक सरदारानें सर्व दोष आपल्या साथिदारांवर घालून आपला बचाव केला. या सरदारांविषयीं चाललेलें काम अन्यायाचें आहे, असें या वेळीं धैर्यानें प्रतिपादन करणाऱ्या थोड्या लोकांपैकीं साक्रेटीस हा एक होता.

कालिक्रेटिडास मेल्यानंतर पेलापोनिशन सैन्याचें अधिपत्य पुनः लिस्यान्डर यास मिळालें. सन ४०५ त (खि. पू.)

तो एफिसस येथें आरमार असल्या जागीं मोठें सैन्य मदतीस घेऊन दाखल झाला. नंतर थोड्याच अवकाशांत तो हेलिस्पा-
न्टकडे गेला व त्याच्या मागून आथेनियन लोकही तिकडे गेले. ल्यामसेकासच्या समोरील इगासपोटेमिया नामक स्थळाजवळ त्यांनीं तळ दिला असतां सामानसुमान मिळविण्याकरितां त्यांस आपलीं गलबतें सोडावीं लागलीं. आल्किबायाडिस तेथून जवळच रहात होता. त्याच्या नजरेस ही हयगय आल्यावरून त्यानें त्यांस सावध केलें. परंतु त्याच्या उपदेशाची उपेक्षाच झाली. एके दिवशीं आथेनियन लोक नित्याप्रमाणें सर्व मुलुखभर पसरले आहेत, अशी संधि साधून लिस्यान्डर यानें त्यांच्या आरमारावर हल्ला केला. आपल्या लोकांची जमवाजमव करितां न आल्यामुळें कोनानानें पळ काढिला. गलबतें धरलीं जाऊन त्यांजवरील लोक कैद केले गेले अथवा मारले गेले. नंतर आथेन्साशीं स्नेह असलेल्या संस्थानांतून एका मागून एकास जिंकण्याच्या उद्योगास लिस्यान्डर लागला व आथेन्सांत धान्याची महर्गता करण्याच्या इराद्यानें या शहरांतील शिबंदी लोकांस त्यानें आथेन्सांत पाठविले. उत्तरेस असा प्रकार चालला असतां पेलापोनिसांतील खुष्की वरील सैन्य एकत्र होऊन त्यानें आथेन्साच्या दरवाज्या पासून अगदीं जवळच्या जागीं छावणी केली. नंतर लवकरच लिस्यान्डर ही आपल्या आरमारासह पिरेइयसापुढें येऊन टेपला. याप्रमाणें चार ही बाजूंनीं आथेन्स कोंडलें गेलें. आंतील लोकांपाशीं स्वरक्षणाचें कांहीं साधन नसतां ही त्यानीं शरण जाण्याचें प्रथम नाकारिलें; तरी अखेरीस दुष्काळामुळें शत्रूशीं तोडजोडीचें बोलणें चालू करण्याची त्यांजवर पाळी आली. स्पार्टांतील अधिकाऱ्यांस काय तें कळवावें, असें त्यांस सांगण्यांत आलें व शेवटीं पुढील कठीण

शर्तीं त्यांस कबूल कराव्या लागल्या. त्या शर्तीं अशाः— (१) पिरेइयसचे लांब कोट व तटबंदी पाडून टांकावींत. (२) बारा गलबतें ठेऊन बाकीचीं सोडून द्यावीं. (३) सर्व परागंदा उमरावांस परत बोलवावे. (४) आथेन्साच्या सर्व स्नेही संस्थानांस स्वातंत्र्य देऊन स्वतः आथेन्सानें स्पार्टाचें वर्चस्व कबूल करावें. या तहाची खटपट थेरामिनीस यानें करून तो कबूल करावा असा हताश झालेल्या लोकांस त्यानें उपदेश केला. त्याप्रमाणें या शर्ती एकदम कबूल करण्यांत आल्या आणि लिस्याडरानें पिरेइयसांत पाऊल ठेवितांच कोट व तटबंदी पाडण्याच्या कामास आरंभ झाला. असा पेलापोनिशनच्या युद्धाचा शेवट सन (ख्रि. पू.) ४०२ यांत झाला. पूर्वीच्या सर्व युद्धांत झाला नव्हता इतका रक्तपात या युद्धांत होऊन ग्रीक देश इतका निःशक्त होऊन गेला कीं, पाहिजे त्या परकी राष्ट्रास तो सहज जिंकिता यावा अशी दशा त्यास प्राप्त झाली.

भाग ९ वा.

पेलोपोनीशियन लढाईच्या अखेरीपासून आन्टा-लिकडास याच्या तहापर्यंत

राष्ट्र विलयास नेण्याचें काम पुरें झाल्यावर लिस्यान्डर यानें आथेन्सांत मुळची राज्यपद्धति बदलून तेथें अल्पजन सत्तात्मक राज्यपद्धति चालू केली. स्पार्टांतील बड्या लोकांपैकीं ३० असामी निवडून त्यांजकडेस बहुतेक अप्रतिबंध सत्ता सोंपविण्यांत आली. हे इसम साधारणतः तीस टायरन्ट (जबरदस्त तिसकडी) या नांवानेंच लोकांत प्रसिद्ध होते. मत देण्याचा अधिकार फक्त ३००० रहिवाशांस (सिटिझन) दिला असून त्यांनाच शस्त्रें वापरण्याची मोकळीक असे. इतर सर्व लोक कायद्याकडून रक्षण होण्याच्या सीमे बाहेरचे ठरविण्यांत आले. या सर्व तजविजी करून व यथेच्छ लूट घेऊन लिस्यान्डर स्पार्टा-शहरीं परत गेला.

या तिसांत धनाढ्य क्रिसीयस हा प्रमुख होता. आरंभीं आरंभीं प्रतिकूळ असणाऱ्या लोकांच्या पुढाऱ्यांस मात्र हे शिक्षा करीत असत; परंतु हळूहळू श्रीमान रहिवाशांच्या संपत्तीचा अभिलाष त्यांस झाला, येवढ्यामुळें तशा गृहस्थांसही रक्षणबाह्य+ (औटलॉ) ठरविण्यास ते मागें पुढें पाहिनासे झाले. सारांश

+ ओटलॉं (रक्षणबाह्य गुन्हेगार)-ज्यास सांपडेल त्यानें त्यास मारावा असा सरकारांतून ज्याजबद्दल जाहीरनामा लावला असतो अशास ही संज्ञा आहे; ही बहुधा राजकीय गुन्हेगारांच्या संबंधाची शिक्षा आहे. इतर गुन्हेगारांस इजा दिली असतां ती देणारास कायद्यानें शिक्षा होतें; औटलास ठार मारिल्यानेंही ती होत नाहीं ह्मणजे कायदा त्याचे रक्षण करीत नाहीं; ह्मणून तो रक्षणबाह्य होय.

इतिहास प्रतिद्ध भयानक कारकार्दीस त्यानीं सुरुवात केली. या कारकिर्दीत त्यांची क्रुरता व धनलोभ यांनीं १४०० रहिवाशांच्या आहुती घेतल्या; सुमारें ९००० लोकांनीं देश त्याग केला; यामुळें पूर्वी आथेन्साविरुद्ध असणाऱ्या शहरांस ही या परागंदा झालेल्या लोकांची कींव येऊं लागली. या तीस अधिकाऱ्यांचें क्रौर्य इतक्या कळसास पोचलें कीं त्यांच्यांतीलच थेरामिनीस नामक गृहस्थानें या कृत्यांचा आपणास वीट आल्याचें बोलून दाखविलें व त्या मंडळींतून आपलें नांव काढवून टाकिलें. या मुळें तो ही रक्षणबाह्य ठरला गेला; त्यास कैदेंत टाकिलें व हेमलाक नामक जलालू विष त्यास प्यावें लागलें. हा दुर्धर प्रसगं त्यानें मोठ्या मर्दपणानें सहन केला व आपल्या अनुचित आयुःक्रमाचें अल्पस्वल्प प्रायश्चित भोगिलें.

परंतु पातकाचे घडे भरण्यास आतां फारसा अवधी नव्हता. परागंदा झालेल्या गृहस्थांपैकीं कुशल सेनानी जो थ्रासिब्युलस हा आरंभीं थीब्स येथें जरी जाऊन राहिला होता, तरी दुसरे तसलेच ७० असामी त्यास मिळतांच त्यानें आटिकाच्या उत्तर भागांतील पायली नांवाची लहानशी गढी बळकाविली. तीस अधिकाऱ्यांनीं सर्व प्रकारची सावधगिरी ठेविली होती, तरी या जागीं एकत्र जमणाऱ्या परागंदा गृहस्थांची संख्या लवकरच सातशें पर्यंत वाढली. त्यांचे सहाय्य मिळतांच थ्रासीब्युलस यानें टायरटांच्या लष्कराचा पराभव करून पिरेइयस बंदरावर चाल केली. शहरांत दगाबाजी होईल या भीतीनें या तिसांनीं संशयावरून ३०० रहिवाशांस ठार मारण्याचा हुकूम केला आणि आपण पिरेइयसकडे चालते झाले. तेथें झडलेल्या चकमकींत परागंदा झालेले लोक विजयी झाले व पुष्कळ अनुयायां-

सह क्रिटस हा मारिला गेला. पराभूत सैन्य शहरांत घुसलें. व तिस-
पैकीं जे जिवंत राहिले होते ते इल्युशीस येथें निघून गेले. शह-
रांतील त्यांच्या स्नेह्यांनीं तोडजोड करण्याची खटपट केली;
पण तींत यश न आल्यामुळें त्यांनीं स्पार्टन लोकांची मदत
मागितली. त्याप्रमाणें लिस्यान्डर याच्या हाताखालीं कांहीं
सैन्य देऊन एक आरमार आथेन्सास रवाना करण्यांत आलें.
परंतु स्पार्टाचा राजा पासेनियस याच्या मनांत लिस्यान्डराच्या
लष्करी वैभवा विषयीं असूया उत्पन्न होऊन तो व थ्रासिब्युलस
असे आपसांत समजले व थ्रासिब्युलसानें उदार अंत:करणानें
तीस अधिकारी व त्यांचे अत्यंत दोषी हस्तक यां खेरीज सर्वांस
क्षमा केल्याबद्दल जाहीरनामा प्रसिद्ध केला.

या नंतर थ्रासिब्युलस शहरांत गेला आणि शांतता
व व्यवस्था राखून आपली पूर्वींची राज्यपद्धति चालू करण्याबि-
षयीं त्यानें लोकांस उपदेश केला. लोकांनीं हा उपदेश संतोषानें
मान्य केला; परंतु इल्युसीस येथील महाजन आथेन्सावर हल्ला
करण्याचा बेत करीत आहेत असें जेव्हां समजलें, तेव्हां शहरां-
तील राहिवासी एकवटून त्यांनीं चाल केली व महाजनांस एकदम
चोपून काढिले. याप्रमाणें तिसांच्या अंमलाचा व आथेन्साच्या वृत्तांत
झोटींगबादशाई नामाभिधान पावलेल्या कारकीर्दीचा सन ४०३
त (खि. पू.) अंत झाला. नंतर प्रजासत्ताक राज्यपद्धति
पुन: चालू होऊन कायद्यांची दुरुस्ती करण्या करितां ५०० अ-
सामींची एक मंडळी नेमण्यांत आली.

आथेन्साचा अगदीं चुराडा होऊन त्यास दैन्य आलें होतें,
तरी दुसऱ्या कोणत्याही संस्थानाकडून प्रगट झाला नाहीं असा
दम व जीवनकला अशा विपत्तींत ही त्यांत दृग्गोचर झालीं.

त्यांतील लोकांचें बुद्धिवैभव व त्यांचे उद्योग हीं जसें कांहीं कम-जास्त घडलेंच नाहीं अशा प्रकारें चालू होतीं. कांहीं अंशीं अगदीं अमदानीच्या दिवसांत ही साध्य झाली नव्हती अशा उन्नतावस्थेस कला व ग्रंथलेखन हीं येऊन पोंचलीं. फक्त कवितेच्या कामांत त्याच्या उलट प्रकार घडला; कारण कल्पना व लहर यांच्या जागीं विद्या व ज्ञान हीं हळू हळू स्थानापन्न होत चाललीं. आथेन्सास आलेले तोटे लवकरच भरून काढण्यांत आले; परंतु लढाईंत स्पार्टाचा जय झाला असतांही त्या शहरांची स्थिति याच्या विपरीत झाली. त्यास मिळालेल्या जयानें त्यांतील लोकांच्या रीतीभातींस फार अपाय झाला. परकियांच्या रीतीभाती व त्यांची मिजास हीं शहरांत शिरलीं. यामुळें जुनी राज्यपद्धति जरी बाह्यता प्रचलित होती, तरी तिच्या अंतस्थ हेतूंत महदंतर पडलें. इतर राष्ट्रांशीं दलणवळण झाल्यानें स्पार्टन लोकांत पैक्याचा उपयोग चालू झाला आणि ते लोक स्वभावतः लोभी असल्यामुळें स्पार्टन शहरवाशी लवकरच इतर संस्थानांतील लोकांपेक्षां अधिक धनवान झाले. मात्र हा घनसंचय फक्त थोड्याशा कुटुंबांतच झाला गेला. इतरांपासून अलग रहाण्याच्या स्वभावामुळें मुळची ९००० असलेली शहर राहिवाशांची संख्या ७०० वर येऊन बसली व त्यांतही सर्व हक्क असलेले असे १०० च लोक राहिले व ते अभिमानानें इतरांपासून अगदीं अलिप्त राहूं लागले.

इकडे आथेन्सांत लढाया व सांथी यांनीं अनर्थ करून सोडिला असतां ही शहर राहिवाशांची संख्या सांगण्या सारखी कमी झाली नाहीं; कारण व्यापारधंदा व उद्योग ईहींकरून देशहित साधल्या बद्दल परकी लोक व गुलाम यांस ही ते हक्क

देण्यांत आले. कांहीं विचारशुन्य व पापाभिरू नव्हत अशा गांवगुंडां मुळें लोकाचरणांत कांहीं अपायकारक परिणाम घडले व देशहिताच्या कामांत ज्यांचा अधीक चांगला उपयोग झाला असता अशा रकमा खैर्नीत व नाचतमाशांत खर्च झाल्या. तरी एकंदर जनसमूहा कडून सर्व प्रसंगीं विलक्षण थोरपणा व भूतदया प्रगट करण्यांत आली. शहाण्या थ्यासिब्युलसाच्या शिक्षेंत राहून त्यांनीं आपली राज्यपद्धति इतकी सुधारली कीं एरिओपेगस सभेच्या सदा जाग्रत दीक्षेमुळें तीस नियंमित प्रजासत्ताक पद्धतीचें स्वरूप प्राप्त झालें. यापुढें कांहीं कालपर्यंत म्हणजे म्यासीडोनचा राजा फिलीप याच्या कारकिर्दीपर्यंत आथेन्सानें शांततेचें सुख अनुभविलें. पण या वेळा पासून आपसांतील तंट्याबखेड्या मुळें त्याच्या सुखास अंतराय येऊं लागला.

आटिका प्रांतांतील कलाकौशल्य व ग्रंथलेखन यांच्या सुवर्ण युगांत इराणी लढायांपासून थोरल्या शिकंदर बादशहाच्या मृत्युपर्यंत लोटलेल्या दोनशें वर्षांचा समावेश होतो. यांतील पूर्वार्धांत कविता पूर्ण प्रगल्भावस्थेस पावल्याचें आपणास पूर्वीच दिसून आलें आहे. उत्तरार्धांत वक्तृत्व, तत्वविद्या, इतिहास व चरित्रलेखन यांच्या अध्ययनांत पेरिक्लीस व डेमास्थिनीस, सात्क्रेटीस व प्लेटो, थ्युकीडिडीस व झेनोफन, यांनीं अनुपम यश संपादिलें. सात्क्रेटिसानें स्वतः कांहीं ग्रंथ रचिले नाहींत. त्याजविषयीं आपणास जी कांहीं माहिती आहे ती त्याचे छात्र झेनोफन व प्लेटो यांच्या ग्रंथांवरून मिळालेली आहे. त्यानें तत्त्वविद्या खरोखर स्वर्गीहून भूलोकीं आणून गोरगरिबांच्या झोपड्यांस पोंचविली असें म्हणतात तें यथार्थ होय. कारण त्याच्या कालापूर्वी तत्वविद्येत फक्त सृष्टीच्या बाह्य स्वरूपाविषयीं म्हणजे

जगताच्या उत्पत्तीविषयीं मात्र विचार झालेला होता. परंतु मनुष्यांच्या नैतिक स्वभावाकडे व त्यांच्या परस्पर संबंधाकडे व कर्तव्यांकडे तिचें लक्ष त्यानें लाविलें. त्याच्या शिक्षणाची नूतन तऱ्हा व महाजनसत्ताक पक्षाकडील त्याचा ओढा यांमुळें त्याच्या शत्रूनीं तो तरुणांचीं मनें बिघडितो व लोकांनीं मानिलेल्या देवांची अवहेळणा करितो असा त्याजवर आळ आणिला. इनसाफाच्या वेळीं त्यानें आपल्या पक्षाचें निर्भयपणें समर्थन केलें, व दोषमुक्त होण्याच्या कामीं गैरकायदा साधनांचा उपयोग करण्याचें धि:कारयुक्त रीतीनें नाकारिलें; आणि त्याच्या वयाच्या सत्तराव्या वर्षीं जेव्हां त्यास मृत्यूची शिक्षा झाली, तेव्हां विषाचा प्याला तो आनंदयुक्त वृत्तिनें प्याला, व सन ३९९ त (ख्रि. पूर्वी) मरण पावला.

आतां आह्मीं ज्या प्रसंगाचें विवेचन करणार आहों त्याचा ग्रीसाच्या इतिहासाशीं बिलकूल संबंध नाहीं; तरी त्यावरून लोकांच्या स्वभावा विषयीं चांगलें ज्ञान होणारें आहे. इराणचा राजा आरट्याझरक्सीस याच्या एका धाकट्या भावाचा मुलगा कायरस यानें आपल्या भावाचा पाडाव करून त्याची गादी बळकाविण्याचा बेत केला होता. व याच इराद्यानें आथेनियन लोकांबरोबरील लढायांत त्यानें स्पार्टावर उपकार केले होते. आणि आतां स्पार्टाच्या साह्यानें ग्रीस देशांतील एकंदर नाखुष असलेल्या लोकांचें लष्कर त्यानें जमाविलें. हें सैन्य घेऊन इसवीसनापूर्वीचें वर्ष ४०१ यांत तो सार्डीस येथून निघाला. त्याची व त्याच्या भावाची कुनाक्झा येथें गांठ पडून तेथें लढाई झाली तींत कायरस मारला गेला. तथापि ग्रीक लोक कांहीं हत्यारें ठेविनात. तेव्हां कपटानें त्यांस आशिया खंडाच्या मध्य

प्रदेशांत जाऊं दिल्यावर त्यांच्या पुढाऱ्याचे खून केले. या सैन्यांत आथेन्साचा इतिहासकार झेनोफन हा " आपखुषीनें लढणारा योद्धा " (व्हालेंटियर) ह्मणून मिळाला होता. त्यानें आतां आपल्या देश बांधवांचें . अधिपत्य स्विकारून त्यांस प्राप्त झालेला रंजीसपणा नाहींसा केला आणि त्यांस ग्रीस देशांत सुरक्षितपणें परत नेण्याचें आश्वासन दिलें. उत्तर दिशेनें कूच करीत जात असतां युक्झाईन नदीवरील ग्रीक शहर त्यापेझस गांठेपर्यंत त्यांस वाटेंत सर्व प्रकारची विपत्ती भोगावी लागली; ज्या प्रदेशांतून ते जात होते त्याची त्यांस माहिती नव्हती आणि पाठीवर शत्रूचें लष्कर असून या प्रदशांतील कडवे लोकही त्यांजवर हल्ले करीत असत. मुळच्या १३००० लोकांपैकीं या कुच्याच्या अखेरीस फक्त ८००० लोक शिल्लक राहिले. हें ग्रीक लोकांचें परांवर्तन लष्करी वृत्तांतात एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट होऊन गेलें आहे; आणि आपल्या " आनाबासीस " नामक ग्रथांत स्वत: झेनाफनानें त्याचें सूक्ष्म रीतीनें वर्णन केलें आहे.

कायरसाच्या मृत्यूनंतर आशियामायनराचें अधिपत्य टिसाफर्नीस यास मिळालें. तेव्हां त्यास न जुमानितां ग्रीक शहरांनीं स्पार्टाची मदत मागितली. त्यावरून थिब्रान यास मोठ्या सैन्यासह तिकडे पाठविला; परंतु त्याच्या हातून कांहीं झालें नाहीं. त्याच्या मागून डार्किलिडास हा गेला. त्यानें तोडजोडीच्या योगानें इटोलीयांतील बरींच शहरें अनुकूळ करून घेतलीं; आणि थेसासच्या किनाऱ्यावरील ग्रीक शहरांस आपल्या पक्षास वळविण्याकरितां तो उत्तरेकडे गेला. टिसाफर्नीस व दुसरा एक क्षेत्रप या दोघांनीं मिळून ग्रीक सैन्यास मियान्डर नदीच्या कांठीं गांठिलें; परंतु लाढई न होतां आशियांतील ग्रीक शहराचें.

स्वातंत्र्य कबूल व्हावें ह्मणून डार्कोलिडास यानें बोलणें लाविलें होतें, त्याचा विचार करण्यासाठीं ख्रिस्ती शकाच्या पूर्वी ३९७ वे वर्षीं अल्प मुदतीचा तह करण्यांत आला व ग्रीक लष्कर शहरांतून काढून नेण्याच्या शर्तीवर तें म्हणणें कबूल करण्यांत आलें.

याच्या आदल्या वर्षीं स्पार्टाचा राजा आजीस हा मरण पावला होता; व त्याच्या जागीं त्याचा भाऊ आजिसेलास हा राजा झाला होता. स्पार्टाच्या महा पराक्रमी सेनानींत त्यांची गणना होती. त्याच्या कारकिर्दीच्या आरंभींच स्पार्टातील सधन लोकांविरुद्ध तेथील गरीब लोकांनीं बंडावा केला असून किनाडान हा त्यांत मुख्य होता. हें बंड आजिसेलास यानें मोठ्या चातुर्यानें मोडून काढिलें. आशिया खंडांतील ग्रीक लोकांस आपल्या अंमलांत आणण्यासाठीं इराणचा राजा तयारी करीत आहे, असें कळल्यावर आजिसेलास व लिस्यान्डर असे मोठ्या सैन्यासह गलबतांतून एफिसास येथें गेले; परंतु टिसाफर्नीस याची हवी तशी तयारी नसल्यामुळें केवळ वेळ काढण्याच्या उद्देशानें त्यानें तह केला. जेव्हां त्याचें कपट आजिसेलास याच्या लक्षांत आलें, तेव्हां त्यानें एकदम टिसाफर्नीस याजवर चाल करून सार्डीस शहरा नजीक त्याचा पूर्ण पराभव केला. या नुकसानीस्तव टिसाफर्नीस यास कामावरून काढिला; त्याच्या जागीं नेमिलेला अधिकारी टिथ्रास्टेस यानें त्याचा खून करविला. व स्पार्टाच्या राजास लांच देऊन त्यानें आपलें सैन्य फार्नावेझस नामक दुसऱ्या क्षेत्रपावर घेऊन जावें अशी योजना केली. या कामांत आजिसेलास यास इतकें चांगलें यश मिळालें कीं, इराणच्या मध्य भागांत जाऊन तेथें लढाई चालविण्याचा घाट त्यानें घातला; परंतु या

स्वारीकरितां त्याची तयारी चालली असतांच त्यास स्पार्टा येथें परत बोलावून नेलें (ख्रिस्ती शकापूर्वी वर्ष ३९४).

आजिसेलास हा आपला विजयी मार्ग आक्रमित असतां टिसाफर्नीस यानें आशिया खंडांतील ग्रीक लोकांस लांच देऊन स्पार्टाविषयीं त्यांचीं मनें कलुषीत करण्याचें काम चालविलें होतें. त्यामुळें पुढारी संस्थानांनीं एकवटून स्पार्टाविरुद्ध कट केला. कारण आथेन्साच्या जुलूमांतून ज्या शहरांस सोडविल्याची तें शेखी मिरवित असे त्यांतून ठेविलेल्या अधिकाऱ्यांच्या (हार-मास्टी) क्रूर कृत्यांनीं स्पार्टाविषयीं त्यांच्या अंतःकरणांत द्वेष उत्पन्न झाला होता. लोक्रीयनांनीं हल्ला केल्यामुळें फोकियनांनीं स्पार्टाचें सहाय्य मागितलें; त्यावरून लिस्यांडार याच्या हाता खालील लष्कराची संग्राम भूमीकडे रवानगी करण्यांत आली. बिओशियांतून तिकडे जात असतां ख्रिस्ती शकापूर्वीस वर्ष ३९५ यांत त्यानें हालीआरटास शहरावर हल्ला केला. लोक्रीयन लोकांचा पक्ष घेऊन थिबन त्या शहरच्या मदतीस गेले. त्यावेळीं झालेल्या चकमकींत लिस्यान्डर मरण पावला. पुढें संयुक्त राष्ट्रांनॉ कोरिन्थ येथें सभा भरविली व इतर संस्थानें अनायासें त्यांस येऊन मिळालीं. याच वेळीं कोनान नामक सुप्रसिद्ध आथेनियन परागंदा गृहस्थास इराणच्या राजानें स्पार्टावर पाठवावयाचें आरमार सिद्ध करण्याच्या कामावर नेमिलें. पण या आणिबाणीच्या वेळींच आजिसेलास यास स्पार्टा येथें परत बोलाविलें. उत्तरेकडील मुलूखांतून तो आला. ग्रीसांत त्यानें पाऊल ठेविण्यापूर्वीच युद्ध सुरू झालें होतें. स्पार्टन लोकांस उत्तरेकडे जाऊं न देण्याची त्यांनीं खटपट केली; परंतु निमियाच्या शेजारी त्यांचा पराभव झाला. ख्रि. श. पूर्वीचें वर्ष ३९४ बरेंच लोटल्यावर आजिसेलास जेव्हां

बिओशियांत जाऊन पोचला, तेव्हां निडासच्या किनाऱ्याबाहेर सर्व स्पार्टन आरमाराचा पराभव झाल्याचें वर्तमान त्यास लागलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं आजिसेलास यानें कोरानिया लगत संयुक्त सस्थानां बरोबर लढाई केली. त्यावेळीं दोन्ही पक्ष जरी अत्यंत त्वेषानें लढले, तरी शेवटीं आजिसेलास याचाच जय झाला. नंतर स्वदेशीं जाऊन त्यानें आपल्या सैन्यास रजा दिली. तरी कोरिन्थच्या हद्दींत लढाई निकरानें चाललीच होती. यांत कोरिन्थचें ल्याचियन नांवाचें बंदर जरी, स्पार्टाच्या हातीं गेलें, तरी कोरिंन्थियनांनी इफिक्रेटीस नामक आथेनियनाच्या सहाय्यानें, शत्रूंचें अधिपत्य आजिसेलास याजकडेस असतांही, त्यांशीं चांगलीच टक्कर दिली. दरम्यानच्या मुदतींत आशियामायनरांतील ग्रीक शहरें कोनान व फार्नाबेझस यांच्या मदतीनें स्पार्टन अंमलदारांच्या ताब्यांतून मुक्त झालीं होतीं. इसवी सनाच्या पूर्वीचें वर्ष ३९३ यांत या दोघांनींही ल्याकोनियाचा किनारा लुटून फस्त केला व किथेरा नामक बंदर घेतलें. स्पार्टाबरोबर युद्ध प्रसंग चालविण्या करितां इराणानें त्या शहरांस लागेल त्याप्रमाणें द्रव्यद्वारा मदत केली, इतकेच नाहीं तर आथेन्स शहराची तटबंदी दुरुस्त करण्याची परवानगी फार्नाबेझस यानें कोनान यास दिली व तें काम ख्रि. श. पूर्वी वर्ष ३९२ यांत पुरें झालें. यावेळीं स्पार्टाची जलमार्गावरील सत्ता सर्वांशीं नाहींशी झाली असून आथेन्सास त्याचें पूर्वीचें गेलेलें वर्चस्व भराभर मिळत चाललें होतें. याचा मूड घेण्याकरितां स्पार्टनांनीं कोनानाचें सामर्थ्य व वजन नष्ट करण्याकरितां कपटव्यूह रचिला. तह करून आशिया खंडांतील ग्रीक लोकांस इराणी राजाच्या ताब्यांत देण्याचें बोलणें लाविण्याकरितां कपटपटु आन्टालकिडास यास इराणी क्षेत्रप टिरिबेझस याजकडेस पाठविला. या

गोष्टीस कोनानानें व इतरांनीं पुष्कळ हरकती घेतल्या; तरी तें कांहीं मनांस न आणितां क्षेत्रपानें तें ह्मणणें मान्य केलें एवढेंच नव्हे, तर नवीन आरमार सिद्ध करण्याचें साधन त्यानें स्पार्टन लोकांस दिलें व कोनानास कैद केला. पण लौकरच या क्षेत्रपांत भांडणें लागलीं, त्यांचा परिणाम असा झाला कीं अजून पर्यंत स्पार्टास करीत असलेली मदत ते आतां आथेन्सास करूं लागले.

इकडे युरोप खंडांत स्पार्टास अनुकूळ अशा कांहीं गोष्टी घडल्या. यामुळें कांहीं बाबतींत त्यानें आथेनियनांचें पाऊल पुढें पडूं दिलें नाहीं. अशा स्थितींत आथेनियनांनीं वृद्ध थासिव्युलस याज जवळ बरेच मोठें आरमार देऊन त्यास पाठविलें. आरंभी थ्रेसच्या किनाऱ्यावर व इजियन समुद्रांत त्यास वराच जय मिळाला; परंतु आसपेन्डास येथें झालेल्या लढाईंत तो पडला. या शूर व उदार सरदाराच्या जागीं अविचारी व स्त्रैणबुद्धि आगिऱ्हिअस याची नेमणूक झाली. यामुळें पूर्वी गमावलेलीं बरींच ठिकाणें स्पार्टनांनीं परत मिळविलीं आणि याप्रमाणें विळविलेल्या इजिना बेटानून त्यांनीं आटिका प्रांतास बराच त्रास दिला.

ग्रीस देशांत असा प्रकार चालला असतां आन्टाल्किडास हा पुनः आशियांत गेला. यावेळीं तरी इराणाबरोबर सख्य करण्याचा त्याचा पूर्ण निश्चय होता. लढाईस कंटाळल्यामुळें आथेनियन लोक ही सल्ला करण्याच्या विचारास लागले होते. यामुळें या बेतास बरेंच सहाय्य झालें. त्यास कोरिन्थियन व आरजीव्ह लोक मिळून त्यांनीं टिरीवेझस याजकडेस वकील पाठविले. त्यावरून इ. पू. वर्ष ३८७ यांत ज्यास आन्टाल्किडासाचा तह असें ह्मणतात, तो करण्यांत आला. त्यांतील शर्ती येणेप्रमाणें होत्या:—आशियांतील सर्व ग्रीक शहरें व क्लाझोमिनी

व कायप्रस हीं पूर्वीप्रमाणें इराणच्या राजाकडे असावीं; परंतु या शिवाय आथेन्साच्या ताब्यांतील लेमनास व इम्ब्रास हीं दोन बेटें खेरीजकरून बाकी सर्व शहरें स्वमुखत्यार व स्वतंत्र असावीं. या तहाप्रमाणं वास्तविकपणें पुढारी संस्थानांनीं आपआपल्या ताब्यांतील लहान लहान शहरें मोकळीं करणें योग्य होतें. परंतु या ठरावाप्रमाणें वागण्याची थीब्स व आरगास यांची इच्छा नसल्यामुळें जबरदस्तीनें त्यांजकडून तसें करवावें लागलें. या कामीं इतरांस कित्ता घालून देणें स्पार्टास उचित होतें; परंतु या उलट त्यानेंच लाकोनिया व मेसिनिया यांत पूर्ववत् आपला अंमल चालू ठेविला.

भाग १० वा

आन्टाल्किडासाच्या तहापासून चेरोनियाच्या लढाईपर्यंत.

ग्रीस देशांतील शहरांच्या संबंधानें पाहूं गेल्यास आन्टाल्किडासाच्या तहाचा पूर्ण अंमल कधीं ही झाला नाहीं. पूर्वी आपल्या ताब्यांत असलेल्या सर्व मुलुखावर अंमल सुरू ठेवूनच स्पार्टा राहिलें नाहीं. त्यानें पेलापोनीसावर ही आपला अंमल बसविला; तरी आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करून आरगास मात्र मोकळें राहिलें. शिवाय उत्तर ग्रीसांतील संस्थानांच्या कारभारांत ही स्पार्टानें ढवळाढवळ चालविली. तेव्हां कट करून आपलें रक्षण करण्याचा त्यानीं प्रयत्न चालविला. त्यांत आलिंथासकडे प्रमुखत्व होतें. आथेन्स व बिओशिया हीं सुद्धां या कटास मिळणार आहेत, अशी वदंता उठल्यावरून स्पार्टनांनीं युडामिडास ह्याच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यास पाठविला व त्यानें पाटेडिया शहर एकदम घेतलें. नंतर लवकरच फिबिडास ह्याच्या हाताखालीं दुसरें त्याहून मोठें सैन्य निघालें. तो बिओशियांतून जात असतां, थीब्सांतील महाजन पक्षानें कपटानें तें शहर त्याच्या हस्तगत केलें व लोक पक्षाचा पुढारी इस्मिनियस यास पकडून ठार मारिला. प्रजासत्ताक पक्षांतील सुमारें ३०० पुढाऱ्यांनीं आथेन्साची वाट धरिली. त्यांत पेलोपिडास हाही होता. त्याचा प्रख्यात मित्र एपिमिनान्डास हा थीब्सांत राहिला असतां ही त्यास विशेष त्रास झाला नाहीं; कारण महाजनांस भीति वाटण्याजोगें त्याच्या स्वभावांत कांहीं नव्हतें.

आलिंथासबरोबर इ. स. पू. ३८३ पासून ३७९ पर्यंत लढाई चालली. परंतु या वर्षीं अन्नपाण्याच्या तोट्या मुळें त्यांतील

लोकांस तह करावा लागून त्यांस आपणांस जिंकणारांचें वर्चस्व कबूल करावें लागलें. या वेळीं स्पार्टाची सत्ता व वजन अगदीं शिखरास जाऊन पोचलीं होतीं; कारण पुनः युद्ध सुरू करण्याचें त्राण इतर संस्थानांत मुळींच राहिलें नव्हतें. तरी त्याच्या मोठ्या भरभराटीचें सालच त्याच्या पडत्या काळाच्या आरंभाचें साल झालें

परागंदा झालेल्या इतर लोकांशीं संप करून पेलोपिडास यानें स्पार्टाच्या शिबंदीनें कबज्यांत ठेविलेली आपली जन्मभूमि मुक्त करण्याचा घाट घातला आणि वेष बदलून एका रात्रीं ते लोक थीब्सांत शिरले. तेथें त्यांस दुसरे लोक मिळाले; मग त्यांनीं महाजनांच्या घरोघर जाऊन त्यांस ठार मारिलें. आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याविषयीं शहरवाशांस सांगितल्यावरून सुर्योदयाचे सुमारास ते सशस्त्र एकत्र जमले. त्यांस सहाय्य करण्याकरितां अथेनियन सैन्यही मोठ्या त्वरेनें येत होतें. तेव्हां स्पार्टन अधिकाऱ्यास शरण जाणें भाग पडलें. तो व त्याचे लोक यांस कांहीं इजा न करितां जाऊं दिले; मात्र ज्यांनीं शहर शत्रूंच्या हातीं जाऊं देण्याच्या कामीं सहाय्य केलें होतें त्यांस देहांत शिक्षा केल्या. ही हकीगत स्पार्टांत समजली, तेव्हां शस्त्रांच्या माऱ्या खालीं थीब्सास जेरीस आणावयाचें ठरलें. या प्रमाणें थीबन युद्धाचा प्रारंभ झाला. तें इ. स. पू. ३७८ पासून ३६२ पर्यंत चाललें.

हें युद्ध या दोन शहरां पुरतेंच होतें असें नाहीं; थोड्या बहुत अंशानें सर्व शहरांनीं त्यास हातभार लाविला होता. एपिमिनान्डास याच्या दक्षता युक्त धोरणानें वागून थीबनांनीं

बिओशियांतील शहरांवरील आपलें वर्चस्व पुनः मिळविलें. त्याच प्रमाणें आथेन्सानेंही जलमार्गावरील आपलें वर्चस्व मिळविलें व स्पार्टाचा तोरा उतरिला. परंतु ग्रीक लोकांच्या आपसांतील लढायां मुळें मासिडोनियनांस त्यांस जिंकण्याचा मार्ग खुला झाला.

लढाईच्या पहिल्या दोन वर्षांत स्पार्टन लोकांनीं बिओशियावर हल्ले करून धुमाकुळ चालविला असतां, थीबन लोक आपल्या तटबंदीच्या आंत आपला बचाव करून होते. अशा वेळीं पेलापोनीसानें नवीन सैन्य उभारून त्यास शिक्षण दिलें. या वेळीं आथेन्साचें थीब्स बरोबर सख्य असल्यामुळें त्यानें स्पार्टास प्रतिकूळ असा कट चालविला व चियास, बायझान्शम ह्होड्स व मिटल्नी वगैरे प्रमुख दरयावर्दी संस्थांनांशीं सख्य केलें. या योगानें त्याचें आरमार फारच वाढलें आणि शहाणपण व नेमस्तपणा यांच्या योगानें त्यानें कटांतील संस्थांनांची प्रीति व भरवंसा संपादन केलीं. तिसऱ्या वर्षीं ल्यासिडिमोनियन लोक बिओशियावर चालकरून जात असतां आथेनियनांनीं त्यांस मागें हटवून लाविलें. नंतर आपलें सैन्य बिओशियांत नेतां यावें व आटिकाच्या किनाऱ्यावर हल्ले करितां यावे अशा इराद्यांनीं स्पार्टन लोकांनीं आपलें आरमार वाढविलें. परंतु च्याब्रियसाच्या हाता खालील आथेनियनांनीं न्याक्सासच्या किनाऱ्याबाहेर त्याचा नाश करून टांकिला. याच समयास टिमोथियस याच्या ताब्यांतील आरमारानें पेलापोनीसाचा किनारा उध्वस्त केला व केफलेमिया, आकारनेनीया व एपिरियांतील कांहीं जातीचे लोक यांस आथेन्साच्या कटास मिळण्यांस प्रवृत्त केलें. या प्रमाण थीब्सावर आणखी हल्ले झाले असते, ते झाले नाहींत व त्यामुळें

बिओशियांतील दुसरीं शहरें त्यास आपल्या कबाजांत आणितां आलीं.

थीब्साच्या विजयानें आथेन्साच्या अंतःकरणांत भीति उत्पन्न होऊन त्यानें आन्टाल्किडासाच्या तहाच्या धोरणावर स्पार्टाशीं तह केला. थीबन लोक त्या तहास राजी नसल्यामुळें ते यांत मिळाले नाहींत व बिओशियांतील ज्या शहरांनीं आपलें स्वातंत्र्य राखण्याचा प्रयत्न केला त्यांस जमीनदोस्त करून सोडिलीं, तथापि आथेन्सानें आपला क्रम तसाच ठेवून थीब्सबरोबर लढाई चालू ठेविण्याचें स्पार्टाच्या मर्जीवर ठेविलें. ज्या वृत्तिमुळें पेलापोनीसाच्या लढाईच्या वेळीं राष्ट्रांत बखेडा माजला होता तसलीच वृत्ति आतां लोकांची झाली होती. कारण प्रत्येक ठिकाणीं प्रजासत्ताक पक्षाचे लोक महाजन पक्षाविरुद्ध उठले असतां या दुसऱ्या पक्षास स्पार्टाकडून सहाय्य न मिळाल्यामुळें त्यांच्याच हातीं सत्ता राहिली. आथेन्साचा सरदार इफिक्रेटीस हा प्रजासत्ताक पक्षाकरितां ढलाया मारून विजयी होत चालला होता; इतक्यांत इ. स. पू. ३७३ वे वर्षीं तहाचें बोलणें पुनः चालविण्यांत आलें व मध्यस्ती करण्याकरितां यावेळीं इराणच्या राजास बोलाविलें. याप्रमाणें आन्टाल्किडासाच्या तहाची पुनरावृत्ती झाली व तो आथेन्स व स्पार्टा या दोघांनीं ही मान्य केला. परंतु बिओशियन शहरांवर आपले वर्चस्व असावें अशी थीब्साची तक्रार असल्यामुळें तें या तहांत मिळालें नाहीं.

या तहा नंतर लवकरच स्पार्टाचा राजा क्लिओम्ब्रोटास यानें बिओशियावर स्वारी केली. परंतु थीबन लोकांस पेलोपिडास व एपिमिनान्डास यांसारखे शूर व हुशार सेनानी अस-

ल्यामुळें दुसऱ्या कोणाचें सहाय्य नसतांही त्यांनीं ल्युक्ट्रा येथें त्याजवर पूर्ण जय मिळविला (ख्रि. पू. वर्ष ३७१). या लढाईत क्लिओम्ब्रोटास हा, ४०० स्पार्टन व ३००० ल्याकोनियन यां सह मारला गेला; स्पार्टाचा शौर्याबद्दलचा लौकिक नष्ट झाला; व पेलापोनीशन प्रजा त्याच्या सत्तेचें जूं झुगारून देऊं लागली. सर्व आर्केडियन जनसमूह एकत्र होऊन मिगालापालीस नामक नवीन नगर स्थापूं लागला. थीब्सकडून मदत मिळण्याची त्यांस खात्री होती. त्याप्रमाणें पुष्कळ नवे स्नेह संपादून आपला सुरक्षितपणा दृढ केल्यावर त्यानें सन ३६९ त (ख्रि. पू.) पेलापोनीसावर स्वारी केली. यावेळीं त्या सैन्याचें अधिपत्य पेलोपिडास व एपिमिनान्डास यांजकडे होतें. ते द्वीपकल्पांत येऊन पोंचले तेव्हां पुष्कळ पेलापोनीशन लोक त्यांस मिळून स्यांनीं स्पार्टावर स्वारी केली. त्यामुळें स्पार्टन लोक हतवीर्य झाले. तथापि पहिल्या हल्याचा कांहीं म्हणण्या सारखा परिणाम घडला नाहीं. म्हणून एपिमिनान्डास हा गिथियान कडे गेला व तें शहर जाळून तो मेसिनीकडे वळला. तेथें पुष्कळ हिलाट व स्पार्टाची प्रजा त्यास मिळाली व त्यानें मेसिनिया स्वतंत्र असल्याची द्वाही फिरविली. हा स्पार्टास जबरदस्त धक्का बसला. मेसेनियन लोक जेथें जेथें होते तेथून तेथून त्यांस स्वदेशीं परत बोलाविले व इथोम पर्वताच्या पायथ्याशीं " नवीन मेसिनीची " स्थापना करण्यास आरंभ झाला. तीन महिने बाहेर राहून एपिमिनान्डास परत स्वदेशीं गेला.

अशा संकटावस्थेंत स्पार्टानें आथेन्साची मदत मागितली. त्या प्रसंगीं आपल्या नित्याच्या औदार्यास अनुसरून आथेनियन लोकांनीं इफिक्रेटीस यास पेलापोनीसांत पाठविला; परंतु एपि-

मिनान्डास यास स्वदेशीं परत जाण्यास त्याच्यानें प्रतिबंध करवला नाहीं. नंतर स्पार्टा व आथेन्स यांच्या दरम्यान सख्य असण्या बद्दलचा तह झाला; त्यावरून संयुक्त सैन्याचें अधिपत्य त्या दोन संस्थानाकडे आळी पाळीनें रहावें असें ठरलें.

इ. स. पू. ३६८ ह्या वर्षीं पुनः एपिमिनान्डास यानें पेलापोनीसावर स्वारी केली आणि त्या द्वीपकल्पांत त्याचा प्रवेश होऊं देऊं नये म्हणून संयोगीभूमिवर एकत्र जमलेल्या सैन्याचा त्यानें पराभव केला. पेलापोनीसांतील पुष्कळ शहरें त्यास स्वसंतोषानें मिळालीं. बाकीच्या कांहींस त्यानें जबरीनें आपली सत्ता कबूल करण्याचें भाग पाडिलें. परंतु या वेळीं सिसलींतून कुमक झाल्यामुळें स्पार्टाची स्थिती कांहींशी सुधारलेली होती. आर्केडियन लोक मुद्दाम कुरापत काढून लढाया करीत असल्यामुळें त्यांचे कैवारी थीबन यांनीं त्यांचा पक्ष सोडिला होता. अशा अडचणीच्या प्रसंगीं इराणच्या राजानें वकील पाठवून भांडत असलेल्या संस्थानांनीं तह करून आपसांत समजावें अशी सल्ला दिली. पण आपल्या ताब्यांतील लोकांस आपण स्वातंत्र्य देणार नाहीं असें थीबन म्हणूं लागले. यामुळें थीब्साच्या सैन्याचा कांहीं भाग गुंतवून ठेवण्यासारखा नवीन शत्रु उत्तरेस उत्पन्न झाला असतां ही, लढाई चालूच राहिली. ग्रीस देशाची अशी दैन्यावस्था पाहून थेसलींतील शहरें ताब्यांत असणारा फ्रिडाचा टायरंट (सर्व सत्ताधीश) जेसन यानें तो आपल्या ताब्यांत आणण्याचा बेत केला. म्हणून थीब्स व स्पार्टा यांच्या तंट्यांत तो बुध्या ढवळा ढवळ करूं लागला होता. परंतु ल्युक्ट्राच्या लढाई नंतर तो लवकरच मारला गेला. त्याच्या मागून अधिकारापन्न झालेला आलेक्झान्डर यानें थीब्सावरोबर जुंपले. यामुळें सन ३६८ त (इ. स. पू.)

पेलोपिडास यानें आटिकावर हल्ला केला असतां त्यांत तो घरला गेला. त्याची सुटका करून घेण्यास एपिमिनान्डास यास महत् प्रयास पडले. पुढें कांहीं वर्षांनीं पेलोपिडास हा पुनः थेसलींत शिरला. या वेळीं त्या प्रदेशांतील शहरांची त्यांच्या अविचारी व क्रूर टायरंटापासून सुटका करण्याचा त्याचा इरादा होता. परंतु कायनासकेफेली येथील लढाईंत तो पडला. तथापि त्याचें सैन्य विजयी झालें होतें, यामुळें थेसलींतील शहराचें स्वातंत्र्य त्यांस परत देण्याचें व थीब्स बरोबर सल्ला करण्याचें त्या टायरंटास (सर्व सत्ताधीशास) भाग पडलें (इ. स. पू. ३६४).

परंतु इकडे सन ३६७ त (इ. स. पू.) स्पार्टानें एका लढाईंत आकारनेनीयनांचा चुराडा उडविला. तींत १०००० आकारनेनीयन मेले असून एकही स्पार्टन पडला नाहीं, असें म्हणतात. या लढाईच्या पुढील वर्षी एपिमिनान्डास यानें पेलापोनीसावर तिसऱ्यानदा हल्ला केला. परंतु त्यापासून सांगण्या सारखा कांहीं उपयोग झाला नाहीं. सल्ला व्हावा अशी पुष्कळ संस्थानांची इच्छा होती, तरी आर्केडिया व एलीस यांच्या दरम्यान सन ३६९ त (इ. स. पू.) चालू झालेल्या लढाईमुळें ती शेवटास गेली नाहीं. एलीसास स्पार्टाचें पाठबळ होतें; परंतु आर्केडियानें दोहोंचाही पाडाव केला, आणि आलिंपियाचें देवालय आपल्या स्वाधीन करून घेतलें. पुढें देवालयांतील संपत्तीचें काय करावें याजवद्दल त्यांच्यांत वाद लागला. या द्रव्याचा उपयोग लष्कराकडे करावा असें म्हणणारांपैकीं पुष्कळ जणांस थीबन सेनापतीनें कैद केले. या ढवळाढवळीनें आर्केडनियनांस राग आला. म्यान्टिनियानें त्यांचें प्रमुखत्व स्वीकारिलें आणि सर्व पेलापोनीशन लोकांनीं थीब्साच्या ताब्यांतून मोकळे होऊन आपलें स्वातंत्र्य स्थापन

करावें असें त्यांस कळविलें. परंतु युबोई व थेसली येथील स्नेही संस्थानांचीं सैन्यें बरोबर घेऊन एपिमिन्डास हा पूर्वीच यावयास निघाला होता. तो पेलापोनीसांत आल्यावर आरजीव व मोसिनियन लोक आणि कांहीं आर्केडियन शहरें ही त्यास मिळालीं. ल्याकोनियन लोक आपल्या दोस्तांच्या सैन्यासह म्यान्टिनिया येथें तळ देऊन राहिले होते. तेथें त्यांजबरोबर निर्वाणाची लढाई मारावी असा एपिमिनान्डास यानें निश्चय केला. त्याचा पाहिलाच हल्ला इतक्या जोराचा झाला कीं, त्यामुळें शत्रूचा नाइलाज होऊन त्यांनीं पळ काढिला. परंतु छातींत भाला लागून त्यास असाध्य जखम झाली. आपलें सैन्य पूर्ण वियजी झाल्याचें खात्रीलायक वर्तमान कळेपर्यंत त्यानें तें शस्त्र काढूं दिलें नाहीं, तें वर्तमान त्यास सांगितल्यावर हें लोहशस्त्र त्या जखमेंतून काढिलें. त्यावेळीं अति रक्तस्राव होऊन तो मरण पावला.

ही म्यान्टिनियाची लढाई सन ३६२ त (इ. स. पू.) झाली असून ग्रीक इतिहासांतील महत्वाच्या लढायांपैकीं मानिलेली आहे. थब्स मुळचें फारसें प्रसिद्ध नव्हतें, तरी अल्प काल पर्यंत त्याला बरेंच महत्व येऊन एकंदर ग्रीस देशाच्या कारभारांत त्याचें अंग असे ही उच्चावस्था फार दिवस टिकली नाहीं. त्याला सामर्थ्य आलें होतें, तें पेलोपिडास व एपिमिनान्डास या दोन श्रेष्ट नागरीकां मुळें आलें होतें. त्यांच्या पश्चात त्यांच्या स्थानापन्न होण्या सारखा दुसरा कोणी नव्हता. स्पार्टाची शक्ति पूर्वीच नष्ट झाली होती. यामुळें इ. स. पू. ३६१ त तह झाला, त्यांत मेसिनियाचें स्वातंत्र्य मान्य करण्यांत आलें. इराणाविरुद्ध मिसर देशांत झालेल्या बंडास मदत करण्यासाठीं श्रेष्ट आजिसिलास हा गेला होता, तो याच वर्षीं तिकडे निवर्तला.

पेलापोनीसाच्या लढायां पासून नागरिकांनीं घरीं राहून चैनींत व ख्याली खुशालींत दिवस घालविण्याचा व आपल्या एवजी पगारदार शिपायांकडून लढाया करविण्याचा प्रघात पडत चालला होता. यामुळें त्यांच्यांतील पराक्रम नष्ट होत चालला होता. आथेन्सांत ही पुष्कळ वाबतींत लोकांच्या वागणुकीवर या सर्व साधारण वृत्तींचा परिणाम झाला होता; तरी म्याराथान व सालामीसच्या लढाया मारणांऱ्या योध्यांच्या वंशजांस उचित असा देशाभिमान व परिश्रम करण्याची इच्छा हीं त्या लोकांत अजून कधीं कधीं दृष्टीस पडत असत. तथापी पापपुण्याचा विचार न करणारे पुढारी विश्वासघात करीत व जनसमूह विचार केल्यावांचून त्यांच्या म्हणण्या प्रमाणें वागून देशास अरिष्ट प्रवाहांत नेऊन टांकीत असे.

ग्रीस देशांतील बहुतेक सर्व संस्थानांत असा प्रकार चालला असतां उत्तर देशांत एक संस्थान उदयास येत चाललें होतें. त्याजकडून देशस्वातंत्र्यास बाध येईल अशी भीति उत्पन्न झाली व अखेरीस त्यानें तें रसातळास ही नेलें हें संस्थान म्यासिडोनियाचें होय. त्यांतील लोक कांहीं पेलासजि व कांहीं इलिरियन वंशाचे होते. ग्रीक लोक त्यांस बार्बेरियन किंवा परकी म्हणत असत. या राष्ट्राचा पुरातन इतिहास चांगलासा कळत नाहीं. राज्यांत ग्रीक लोकांची सुधारणा प्रथम चालू करणाऱ्या आर्चिलेयस राजानें सन ४१३ पासून सन ३९३ पर्यंत (ख्रिस्त शकापूर्वी) राज्य केलें. म्यासिडोनचे राजे केव्हां केव्हां ग्रीसांतल्या तंट्याभांडणांत पडत असत, असें पूर्वीच आपणास आढळून आलें आहे. ज्या वेळची हकीकत आम्हीं लिहीत आहों त्या वेळीं आमिंटासाचा मुलगा फिलिप हा तेथें राज्य

करीत होता. म्यासिडोनच्या राज्यावर हक्क सांगणारे दोन असामी निवाल्या वेळीं मध्यस्ती करण्याचें काम पेलोपिडास याजवर सोंपिलें होतें. तो फिलिपास ओलीस घेऊन थीब्सांत गेला होता. इ. स. पू. ३९३ वे वर्षीं तो थीब्सांत राहत असतांच म्यासिडोनचा राजा मरण पावला; तेव्हां त्या गादीवर आपला हक्क शाबीत करण्यासाठीं तो पळून म्यासिडोनांत गेला. दोघां तोतयांची वाट लाविल्यानंतर त्याचें व आथेनियनांचें युद्ध जुंपलें. थ्रेसच्या किनाऱ्यावर आपला अंमल वाढवावा असा त्यांचा इरादा असून त्यांस तेथून अजी काढून द्यावें असा फिलीप याचा उद्देश होता. थीब्स येथें असतांना त्यास ग्रीक लोकांचा स्वभाव व त्यांच्या चाली यांची चांगली माहिती झाली होती व त्यांच्या सुधारणेस तो फार चहात असे. फिलिपाच्या आंगीं कांहीं लोकोत्तर गुण होते; पूर्ण कारस्थानीपणाचें शहाणपण, धूर्तता, व हुशारी, सेनानीची अक्कल, शिपायाचा दम, सतत श्रम करण्याची संवय आणि राजाचें औदार्य, हे सर्व गुण त्याच्या आंगीं एकसमयावच्छेदेंकरून वास करीत होते. ग्रीकांच्या पगारी सैन्यापेक्षां त्याचें म्यासिडोनियन सैन्य पुष्कळ चांगलें होतें. कोणतें एकादें कार्य संपादावें असें त्याच्या मनांत आलें, म्हणजें ज्याप्रमाणें तो संग्रामांत विजयी होत असे, त्याच प्रमाणें कधीं कधीं ता भेदानें व लांच लुचपतीनेंही जय संपादित असे; नुसतें वचन किंवा शपथ मोडिल्यानें कार्य सिद्ध होतें असें दिसल्यास त्या दोहींची तो पर्वा करीत नसे.

पूर्वेकडे व पश्चिमेकडे फिलिप आपली सत्ता वाढवीत असतां जें युद्ध झालें त्यास दुसरें सोशल (आपसांतील) युद्ध म्हणतात. त्यांत इ. स. पू. ३९७ पासून ३९६ पर्यंत आथेन्स

गुंतलें असल्यामुळें त्याजकडून फिलिपास मुळींच प्रतिबंध होऊं शकला नाहीं. चियास प्रभृति ज्या स्नेही संस्थानांनीं बंडावा केला होता, त्यांच्याशीं आथेन्साचा हा संग्राम होता. आथेनियन सेनापति च्यारेस हा अल्पदृष्टी व नालायक होता. जे इराणचे क्षेत्रप राजास जुमानित नसत, त्यांशीं त्यानें तह करून स्नेह जोडिला. यामुळें आपलें आरमार संयुक्त संस्थानाच्या मदतीस पाठविण्याचो इराणी राजानें भीति घातली, तेव्हां आथेन्सास त्याच्याशीं तह करावा लागला; पण त्या योगें त्याचे सन्मान्य स्नेंही विरुद्ध झाले व जमाबंदीचा ही बराच भाग हातचा गेला. असा प्रकार चालला असतां दरम्यानच्या मुदतींत पूर्वीच्या राजाचा खून करणारा जो फेरिचा टायरंट लिकोफ्रान याजबरोबर लढण्याच्या कामांत आपणास मदत करावी असें थेसलींतील शहरांनीं फिलिपास सांगून पाठविलें. फिलिपानें तें कार्य तडीस नेलें व तेणें करून थेसलींतील नगरांस त्यानें आपल्या खटपटीच्या कामीं अनुकूळ करून घेतलीं. पुढील एकाद्या प्रसंगीं त्याचा कदाचित् उपयोग होऊं शकेल, या समजुतीनें त्यानें या टायरंटास (सर्व सत्ताधिशास) पदच्युत केलें नव्हतें. दुसऱ्या सोसल युद्धांत तसा प्रसंगही आला (इ. स. पू. ३५९ ते ३४६). तो प्रकार असा:—

पेलोपिडास व एपिमिनान्डास यांच्या वेळीं प्राप्त झालेली योग्यता कायम ठेवावी असा थीबन लोकांचा हेतु असल्यामुळें शापदग्ध समजत असलेलें एक क्षेत्र महामूर केल्याबद्दल फोकियनांवर त्यांनीं आम्फिक्टीयानकौन्सिल नामक संस्थेकडेस फिर्याद केली. आम्फिक्टीयनांनीं फोकीयनांस दोषी ठरवून जबर दंड मागितला आणि त्यांनीं केलेलें सर्व काम नासून टाकावें

असें फर्माविलें. फोकीयनांनीं तसें करण्याचें नाकारिल्यामुळें अपालो देवाची इभ्रत कायम राखण्याकरितां म्हणून त्यांजबरोबर आम्फिक्टीयनांनीं लढाई चालू केली. दरम्यान फोकियन लोकांनीं डेल्फाय येथील देवस्थान व त्यांतील संपत्ति बळकाविली आणि आपला धूरीण फिलोमेल न याच्या सांगण्यावरून तें सोनें व रुपें आटून या लढाईचा खर्च भागविण्या करितां त्याचें नाणें पाडिलें. कांहीं वेळ पावेतों फिलोमेलास याचा जयच होत गेला. परंतु इ. स पू. ३५२ त तो लढाईंत पडला व त्याच्या जागीं त्याचा भाऊ ओनोमारकास हा धुढारी झाला. त्यानें पापपुण्याचा कांहीं विचार मनांत न आणितां या द्रव्याचा उपयोग लांच देण्याकडे व लढाईच्या खर्चाकडे केला. थेसलींतील शहरांबरोबरील युद्धांत फेरीचा अधिकारी लिकोफ्रान यास सहाय्य करून ओनोमारकास यानें त्याचें सख्य संपादन केलें. म्यासिडोनचा राजा फिलिप यानें टायरंट लिकोफ्रान याचाच पक्ष उचलिला. त्यांत कित्येकदां त्याचा पराजय झाल्यावर त्यानें एक भयंकर युद्ध केलें, त्यांत म्यासिडोनीयन लोक अपालो देवाच्या तर्फेचे योद्धे म्हणून लढले व आपल्या शत्रूंवर त्यांनीं जय मिळविला. आथेन्स व स्पार्टा यांचा फोकियन लोकांशीं स्नेह संबंध असून आथेनियन लोकांचें एक आरमार थरमापिली येथें ठेविलें होतें, त्याशीं सामना करण्याचा प्रयत्न करीत असतां ओनोमारकास हा मरण पावला. त्याच्या जागीं त्याचा भाऊ फेलास हा झाला व लिकोफ्रान हा पगारदारी सैन्यानिशीं त्यास जाऊन मिळाला.

ग्रीसाच्या अगदीं मध्य प्रदेशांत जाऊन टेपावें असा फिलिपाचा हेतु होता. परंतु आथेनियन आरमाराकडून विघ्न आल्यानें तो म्यासिडोनियांत परत गेला. आम्फिक्टीयनांचा

पक्ष स्वीकारल्यामुळें ग्रीसाच्या कारभारांत हात घालण्याची त्यास आयतीच संधी मिळाली. त्या धूर्त म्यासिडोनियनाचा मतलब आथेनियनांचा वक्ता डिमास्थेनीस याचे लक्षांत त्याचवेळीं येऊन चुकला व आपल्या लोकांस त्यानें जागे केलें. अनेक वेळां पराजय झाला असतांही फेलास यानें लढाई नेटानें चालविली; परंतु कांहीं दुखणें होऊन सन ३३१ त (इ. स. पू.) तो मरण पावला. त्याच्या जागीं झालेला फ्यालाकास याचेहो पराजयच झाले.तरी त्यानें बिओशिया प्रांत लुटून उध्वस्त करून टांकिला. थीबन लोकांस इरीणच्या राजाकडून सहाय्य झालें असतांही अखेरीस फोकियन लोकांनीं इ. स. पू. ३४६ त कोरोनिया जवळ एक मोठी लढाई करून त्यांचा पराभव केला. त्यानंतर बिओशियांतील पुष्कळ शहरें शत्रूच्या हस्तगत झालीं.

या प्रमाणें जेरीस आल्यावर थीबन लोकांनीं फिलिपाकडेस सहाय्य मागितलें. फिलिपानें ओलिन्थास नगरावर हल्ला केला असतां, त्या शहरास कुमक पाठवावी म्हणून आथेन्सांत डिमास्थेनीस लोकांस उत्तेजन देत होता. पुढें ओढवणारें अरिष्ट त्यास स्पष्ट दिसत असल्यामुळें त्या सुप्रसिद्ध वक्त्यानें सर्वांच्या समाईक शत्रूशीं टक्कर देण्या करितां सर्व ग्रीसाचा एकोपा करावा म्हणून खटपट केली; तथापि तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. फिलिपानें ओलिन्थास व दुसरीं शहरें [illegible] कून जमीनदोस्त केलीं. या प्रमाणें एकिकड मुलूख जिंकण्याचा सपाटा चालविला असतां ही त्या राजानें आथेन्साबरोबर सला करण्याचें बोलणें लाविलें. यामुळें तेथील लोक आपल । निर्भयते विषयीं वृथा भ्रमांत राहिले. म्यासिडोनच्या राजावर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं असें खुद्द डिमास्थेनीस यासही कांहीं वेळ वाटलें.

अशा संधीस म्हणजे इ. स. पू. ३४६ त थीबन लोकांनीं फोकियन लोकां बरोबरच्या युद्धांत त्यानें मदत करावी असें फिलिपाकडे बोलणें लाविलें. यावेळीं आथेनियन लोकांचीं सल्ला करण्याची फार इच्छा होती; म्हणून तहाचें बोलणें करण्यासाठीं व अटी ठरविण्यासाठीं त्यानीं राजाकडेस वकील पाठविले. थीबन लोकांस खुष राखण्याकरितां फिलिपानें तहाच्या बोलण्यांत फोकियनांचा संबंध ठेविला नाहीं. त्याच्या शर्ती आथेन्सानें मान्य केल्या; परंतु तहाचें पत्रक फिलिपाकडे पाठविलें, तेव्हां त्यानें वकिलास अडकवून ठेविला व मुलूख जिंकण्याचा क्रम जारी ठेविला. शेवटीं तहावर त्यानें सही करून वकील आथेन्सास परत गेल्यावर थरमापिलीच्या वाटेनें त्यानें फोकियन लोकांवर स्वारी केली. त्यांचा पुढारी फ्यालाकास यानें निरुपायास्तव फिलिपाशीं सल्ला केला आणि त्या भानगडींतून आपलें अंग त्यानें काढून घेतलें. आतां फोकियनांस कोणी पुढारी नसल्यामुळें फिलिप आम्फिक्टियनांकडे आपली शिफारस करील अशा समजुतीवर ते त्यास शरण गेले. परंतु ते अगदीं फसले.कारण आतां आम्फिक्टियन कटांतून त्यांस काढून टाकिले; त्यांना आपलीं शस्त्रें खालीं ठेवावीं लागलीं; त्यांच्या नगरांचा नाश केला व दरसाल डेल्फायच्या देवस्थानास त्यांनीं मोठी रकम द्यावी असा हुकूम झाला. हा ठराव अमलांत आणण्यांत थीबन व म्यासिडोनियन शिपायांनीं यत्किंचित्ही दया दाखविली नाहीं. दुसऱ्या पुष्कळ बिओशियन नगरांस ही थीब्सार्चे वर्चस्व मान्य करावें लागलें व त्यांच्यातील पुष्कळ लोकांस गुलाम करून विकिले.

आतां फिलिप आम्फिक्टियन मंडळांत फोकियन लोकांच्या जागीं स्थानापन्न झाला व त्यास कांहीं महत्वाचे हक्क ही

मिळाले. फोकियन लोकांचा झालेला असा भयंकर प्रकार पाहून ग्रीकांत, व विशेषें करून आथेनियनांत, भीति उत्पन्न झाली. परंतु फिलिपानें वक्ता एश्विनीस ह्याची मूठ दाबिली होती, म्हणून त्यानें त्यांची कशी तरी समजूत घातली. आतां नवीन लढाई सुरूकरण्याची ताकद आथेनियनांत राहिली नव्हती, म्हणून लोकांनीं अंगदीं स्वस्थ बसावें, फोकियनां बद्दलच्या टरावा आड येऊं नये, असें खुद्द डिमास्थेनीसानें सुचविलें.

पवित्र युद्ध (देवाच्या सन्मानार्थ केलेलें) उत्तर व मध्य ग्रीसांत चालू असतां पेलापोनीसांतील आपलें वर्चस्व परत मिळविण्याचा प्रयत्न स्पार्टानें चालविला होता. याच समयास पेलापोनीसांतील पुष्कळ शहरांत म्यासिडोनीयाच्या तर्फेचा एक पक्ष बनला होता. कारण मागें पुढें हात घालण्यास आपणास सवड मिळेल, या आशेवर फिलिपानें जिकडे तिकडे बखेड्यास उत्तेजन दिलें होतें. ही गोष्ट लक्षांत येऊन पेलापोनीसांत सर्वत्र शांतता राखण्याचा आथेनियनांनीं प्रयत्न केला. फिलिपाची मसलत इतरांपेक्षां डिमास्थेनीसास चांगली समजली होती. यामुळें पुढें येऊन पडणाऱ्या अरिष्टा बद्दल आपल्या देशबांधवांची खात्री करण्याचा त्यानें प्रयत्न केला. तरी तहास न जुमानितां फिलिप चारी दिशांनीं मुलूख घेत चालला असतां ही आपला हेतु कायतो शांतता राखण्याचाच आहे, अशी त्या कपटपटूनें त्यांची समजूंन घातली.

राजाचें वजन कमी करण्यासारखीं कांहीं कृत्यें आथेनियनांनीं केलीं हें खरें; तरी इ. स. पू. ३४० वे वर्षीं त्यानें पेरिन्थास व बायझन्शम् या नगरांस वेढा दिला, तेव्हां त्यांचे डोळे

चांगलेच उघडले व त्यांचा एकदम निश्चय ठरला. म्यासिडोनचें पुढें पडणारें पाऊल पाहून इराणच्या राजास ही इतके भय पडलें कीं, ग्रीक लोकांच्या मदतीस त्यानें आरमार पाठविलें. परंतु ग्रीक संस्थानांत मिलाफ होणें शक्य नव्हतें. आथेनियन लष्कर स्वाधीन असणारा फोकियन यानें राजाचा पराभव केला; तेणेंकरून आथेनियनांस इतकी हुरूप आली कीं, त्यांनीं त्या-जबरोबर झालेला तह अमान्य केला. यानंतर लवकरच आम्फिक्टियनांनीं फिलिपास आपल्या सैन्याचा सेनानी नेमिला व आम्फिसांतील लोकांनीं आपाला देवास वाहिलेल्या क्षेत्रांत लागवड केली असा वहीम असल्यामुळें त्या शहराशीं लढाई करण्याविषयीं त्यांनीं त्यास फर्माविलें. कांहीं अंशीं आपल्याच खटपटीमुळें प्राप्त झालेली असली संधि त्यानें व्यर्थ जाऊं दिली नाहीं, तर आम्फिसांतील लोकांवर चाल करून जातानां थीब्स व आथेन्स यांच्यांतील पुरातन वैरभाव ही त्यानें जागृत केला. आम्फिसा सहज घेतां आलें, तरी आपल्या मोठ्या सैन्यांसह तो लोक्रीयांत तळ देऊन राहिला व पुढील वर्षीं इलेशिया व किटिनियन हीं शहरें त्यानें एकाएकीं घेतलीं.

या जुलमी कृत्यानें सर्व ग्रीस देशाचे एकदम डोळे उघडले आणि डिमास्थेनीसाच्या सांगण्यावरून आथेनियन लोकांनीं थीब्स बरोबर सल्ला केला. ग्रीसचें स्वातंत्र्य कायम राखण्याच्या-कामीं त्यांचा उल्हास मोठा होता व त्यांस देशाच्या सर्व भागांतून कुमकही येऊन मिळाली. प्रथमतः ग्रीक लोक विजयी झाले. परंतु इ. स. पूं. ३३८ त चेरोनियाच्या मैदानांत दीर्घकालिक भावी परिणाम घडण्या सारखी लढाई झाली. बराच वेळ पर्यंत विजयश्री कोणास माळ घालते याचा निश्चय होईना; पण

अखेरीस ग्रीकांचा पुरा मोड झाला. धारातीर्थीं एक हजार आथेनियन पडले व दोन हजारांस कैद केले. या लढाईनें ग्रीसाचा भाग्योदय लयास गेला व फिलिप कृतार्थ होऊन बसला. तथापि यावेळीं मोठ्या शहाणपणानें त्यानें फार नेमस्तपणा दाखविला. आणिबाणीची व गोंधळाची पहिली धडकी निघून गेल्यावर आथेनियन, सलग्याबद्दलचें कोणतेंही बोलणें कबूल करीनात. डिमास्थेनीस प्रभृति देशभक्तांनीं तसाच नेट धरून राहण्याविषयीं बोध करण्याची पराकाष्ठा केली. परंतु आपल्या उल्हासाप्रमाणें घडवून आणण्याचें साधन त्यांजकडेस नव्हतें. यामुळें शेवटीं फिलिपानें सांगितलेल्या अटी कबूल करून तहनाम्यावर सह्या करून येण्याकरितां वकील रवाना झाले. आथेनियन लोकांस स्पार्टाचा पक्ष सोडावा लागून इ. स. पू. ३३७ त भरणाऱ्या कोरिन्थ येथील सभेंत मुकुत्यार पाठविण्याचें कबूल करावें लागलें. म्यासिडोनीयाचा राजा हाच आतां वास्तविक ग्रीसाचा मालक झाला. तरी डिमास्थेनीस, फोकियन व लायकरगस यां सारख्या लोकांच्या हातीं राज्यव्यवस्था असल्यामुळें आथेन्स आपला दरजा राखून चांगल्या भरभराटीच्या स्थितींत राहिलें. फिलिपाचा पक्ष सोडिल्या बद्दल थीबन लोकांस बराच चट्टा बसला. त्यांच्या किल्ल्यांत म्यासिडोनीयाच्या शिबंदीचें ठाणें बसलें व त्यास बिओशीयांतील इतर शहरांवरील आपलें वर्चस्व सोडावें लागलें. पेलापोनीसाच्याही बऱ्याच भागास फिलिपाचें स्वामित्व कबूल करावें लागलें. इ. स. पू. ३३७ त कोरिन्थ येथें ज्या वेळीं ग्रीसांतील सर्व प्रांताचे मुकुत्यार आले, तेव्हां स्पार्टाच्या तर्फेनें कोणीं आलें नव्हतें. आपल्या सर्व उद्योगाचें पर्यवसान ग्रीक लोकांस दिलेल्या पीडेबद्दल इराणचा चांगला सूड उगवावा इतकेंच आहे, असें या सभेंत फिलिपानें बोलून दाख-

विलें. हें भाषण लोकांस फार पसंत पडलें व फिलिपास सर्व ग्रीक सैन्याचें अधिपत्य देण्यांत आलें. आतां अघाढव्य अशी तयारी चालली. प्रत्येक ग्रीक संस्थानांतून मदतीस लष्कर आणविलें आणि आठेलास व पोरामिनीयन यांच्या हाताखालीं कांहीं सैन्य देऊन त्यांस लागलेच आशियांत रवाना केले; मात्र कांहीं घरगुती कारणामुळें फिलिपास मागें राहणें भाग पडलें. पुढील सालीं म्हणजें इ. स. पू. ३३६ त त्याची राजधानी पेला येथें त्याची कन्या क्लिओप्याट्रा इचा आलेक्झान्डर याजबरोबर विवाह झाल्याबद्दल मेजवान्यावर मेजवान्या उडत असतां, नाटकगृहाच्या दरवाजांत एका इसमाकडून फिलिपाचा वध झाला. त्याजकडून या इसमाची पूर्वी कांहीं नुकसानी झाली होती, म्हणून त्यानें हा डाव साधिला. फिलिपाच्या मागून त्याचा पुत्र आलेक्झान्डर यानें गादीवर बसावें असें लोकांनीं व सैन्यानें ठरविलें. हा राजपुत्र १२ वर्षांचाच होता, तरी यापूर्वी कित्येक वेळां त्यानें शौर्य गाजविलें होतें. यावेळीं राज्य मोठ्या धोक्यांत होतें; कारण फिलिपाच्या मृत्यूनें लोकांच्या मनाची वृत्ति चमत्कारिक झाली होती आणि आपली स्वतंत्रता मिळविण्याची वेळ आली आहे या समजुतीनें उत्तरेकडून बार्बेरायनि व दक्षिणेकडून ग्रीक लोक खवळून गेले होते; परंतु तरूण आलेक्झान्डर याच्या बुद्धिवैभवामुळें सर्व अडचणी दूर झाल्या.

भाग ११ वा.

आलेक्झान्डर धि ग्रेट (श्रेष्ठ) उर्फ शिकंदर बादशाहाच्या कारकीर्दीतील ग्रीसचा वृत्तांत.

सर्व ग्रीक तत्ववेत्यांत अति श्रेष्ठ जो आरिस्टाटल् यानें आलेक्झान्डर उर्फ शिकंदर याला काळजीं पूर्वक शिक्षण दिलें होतें. ग्रीक कलाकौशल्य व ग्रीक विद्या यांचा त्याच्या मनावर असा कांहीं संस्कार झाला होता कीं, त्यास खराखुरा ग्रीकच समजण्यास चिंता नाहीं. त्याच्या बापाच्या मृत्यूचें वर्तमान आथेन्सांत समजलें, तेव्हां लोकांत स्वातंत्र्या विषयींच्या नित्याच्या उत्सुकतेस इतका ऊत आला कीं, फिलिपाचा खून करणारास सुवर्ण मुकुट बक्षीस देण्याचा त्यानीं ठराव केला; कारण ज्यास "पेलाचा पोर" असें व्यंजोक्तीनें म्हणण्याचा प्रघात पडला होता, तो शिकंदर आपल्या बापानें जिंकिलेले प्रदेश एकत्र राखूं शकेल असें कोणांस ही वाटलें नव्हतें. याचें वास्तवीक कारण, त्या तरूण राजाचा जोम व उत्साह यांची त्यांस माहिती नव्हती हें होय. सिंहासनारूढ झाल्यावर ग्रीक देशावरील आपलें वर्चस्व कायम ठेविण्याकरितां हातीं तलवार घेऊन त्यानें थेसलीवर स्वारी केली. तेथें त्यास फारसा अडथळा आला नाहीं. यामुळें लोकांच्या कल्पनेहूनही जास्त त्वरेनें त्यानें दक्षिण भागांत चाल केली. आम्फिक्टियानी नामक मंडळीनें एकदम त्याचा सन्मान केला. तरी थीब्स, आथेन्स, स्पार्टादि प्रमुख संस्थानांतील प्रतिनिधी त्यास सामोरे न आल्यामुळें त्यानें थेसलीवर चाल करून थीब्सच्या अगदीं दारांतच तळ दिला. त्याची योग्यता कळण्यांत आपली चूक झाली असें आथेनियनांस आतां वाटूं लागून त्यांनीं क्षमा मागितली. कोरिन्थ येथें भरणाऱ्या सभेस त्यांनीं

प्रतिनिधी पाठविण्याच्या शर्तींवर त्यांस क्षमा करण्यांत आली. शिकंदर जातीनें तेथें गेला, तेव्हां इराणा बरोबर लढणाऱ्या सर्व ग्रीक सैन्याचें अधिपत्य त्यास देण्यांत आलें. ग्रीस देशाच्या सर्व कारभाराची व्यवस्था या सभेवर सोंपवून राजा परत येई-पर्यंत ती कायम रहावी असें ठरलें. स्पार्टानें मात्र आपले मुख-त्यार न पाठविण्याचा हट्ट पुरा केला.

या प्रमाणें ग्रीस देशाचा ताबा संपादन झाल्यावर सन ३३९ त (इ. स. पू.) तो म्यासिडोनीयांत परत गेला आणि ज्यांपासून त्याच्या राज्यास अपाय होण्याची भीति वाटत होती, अशा उत्तर व पश्चिमेकडील बार-बेरीयन (परकी) लोकांवर तो एकदम चालून गेला. या स्वाऱ्यांत त्यास फार भयंकर अरिष्टें सोसावीं लागलीं. परंतु त्याचा दम व आंगचें शौर्य यांनीं तीं चट सारीं देशोधडीस ला-विलीं. तरी इलिरिकम प्रांतांत त्याची बरीच खोटी झाली व त्या-मुळें तो मरण पावल्याची वातमी ही पसरली. या वर्तमानानें म्यासिडोनीयास प्रतिकूळ असणाऱ्या सर्व ग्रीकांस चेव आला; व इराणच्या राज्यानें अशा लोकांत बराच पैसा वांटला. इतर कांहीं सस्थानांसह थीब्सानें एकदम हत्यार उचलिलें. त्याच प्रमाणें आथेनियन देशभक्तांत डिमास्थेनीस अग्रेसर असून त्या सर्वांनीं म्यासिडोनीयाबरोबर युद्ध करण्यास लोकांस उद्युक्त केलें. थीब्सांत म्यासिडोनीयन शिबंदी आक्रापोलिसांत कोंडली, परंतु मोठ्या फौजेनिशीं शिकंदर एकदम बिओशियांत आला. थीब्स थोडा वेळ, पण शौर्यानें लढलें; तरी शेवटीं जिंकिलें गेलें. लोकांत चांगली दहशत पडावी म्हणून शिकंदरानें या शहरास सख्त शासन केलें; देवालयें व पिन्डार कविचें घर खेरीज करून

सर्व शहर जमीनदोस्त केलें. वेढ्यांत ६०,००० लोक मेले गेले; राहिलेल्या २०,००० स गुलाम करून विकिले.

थीब्साची अशी दशा पाहून सर्व ग्रीसांतील लोकांच्या मनावर फार छाप बसली. दया करण्याविषयीं राजास विनंती करण्या करितां आथेन्सातील वकील प्रथम आले. डिमास्थेनीस व लायकरगस यांस हवालीं करण्याच्या शर्तीवर ती विनंती मान्य झाली. तथापि ती शर्त पुरी करण्या विषयीं आग्रह दाखविण्यांत आला नाहीं; कारण आथेनियन लोकांविषयीं शिकंदराच्य मनांत अत्यंत पूज्यबुद्धि वास करीत असल्यामुळें, त्यांचा स्नेह संपादन करण्याची त्याची इच्छा होती. पावसाळ्यांत तो म्यासिडोनीयांत परत गेला, व इराणावर स्वारी करण्याची तयारी करूं लागला. सन ३३४ च्या (इ. स. पू.) वसंत ऋतूंत बरोबर मोठी फौज घेऊन तो सेस्टास येथें गेला. त्याच्या सैन्यांस आशियांत नेण्याकरितां त्यांचें आरमार तेथें तयार होतेंच. आन्टीपेटर यास राज्यांत प्रतिनिधी नेमून मागें ठेविला. इराणच्या राजा जवळ असलेल्या अफाट सैन्याशीं लावून पाहिलें तर शिकंदराचें लष्कर अल्पच होतें; त्यांत म्यासिडोनीयन व परस्थ लोक असून ग्रीक कायते ७००० च होते; कारण त्याच्यांतील पुष्कळांस आपणांस जिंकणारा जवळ चाकरी करणें पसंत न वाटून ते आशियामायनरांत गेले, व तेथें राजा डरायस उर्फ खुशरू याच्या लष्करांत मिळाले होते. त्यांत मेमनन सारिखे कांहीं मोठे हुशार लोक होते. हा मेमनन ऱ्होड्सचा रहाणारा होता; त्यानें इराणच्या आरमाराचें अधिपत्य स्वीकारिलें, व तेणेंकरून इराण व युरोपांतील ग्रीक यांचा संबंध कायम राखिला.

शिकंदर आशियांत शिरला तेव्हां त्याजबरोबर कवि, इतिहासकार व तत्ववेत्ते होते. ज्या प्रदेशांत पूर्वी युरोपिय-

नांचा कधींही प्रवेश झाला नव्हता त्याजबद्दल व त्यांतील लोकांबद्दल माहिती मिळवावी, व शिकंदराच्या पराक्रमाचें वर्णन करून ते चिरस्थायी करावे, हें या लोकाचें काम असे. त्या वेळच्या अत्यंत विख्यात सरदारांत गणणा होण्यास योग्य असे त्याचे सरदार होते; त्यापैकीं टालेमी व आरिस्टाबोलस या दोघांनीं आपल्या धन्याच्या पराक्रमाचा वृत्तांत ही लिहिला होता; परंतु त्यांचे ग्रंथ नष्ट झाले. *आकिलीसाची तारीफ करण्यांत

---

* **टीप**—ग्रीक लोकांनीं ट्रॉय शहरावर स्वारी केली त्यांवेळीं गेलेल्या ग्रीक योध्यांत आकिलीस हा शौर्य, पराक्रम व धाडस यां विषयीं सुप्रसिद्ध होता. दाशरथी रामानें लंकेवर केलेल्या स्वारी सारखीच जवळ जवळ या स्वारीची हकीगत आहे. आशियामायनरांतिल ट्रॉव येथील राजा प्रायम याचा मुलगा पारीस यानें स्पार्टाचा राजा मेनिलेयस याची बायको हेलन् इला पळवून नेल्यामुळें सर्व ग्रीक राजे एकवटून व मेनिलेयसाचा भाऊ आगामेमनान यास मुख्य सेनानी करुन यांनीं ही स्वारी केली. या लढाईत दोन्ही पक्षास देवता सहाय्य होत्या असें वर्णन आहे. कधीं एकाची, कधीं दुसऱ्याची सरसी व्हावी असें चाललें असतां, लुटींत मिळालेल्या एका कुमारीकेवरुन आकिलीस व आगामेमनान यांचा तंटा झाला व आकिलीस यानें लढण्याचें सोडून दिलें. सर्व ट्रोजन लोकांत ज्याचा मोठा दरारा असा हा योद्धा लढाईतून निघाल्यामुळें सांस मोठे उत्तेजन आलें व यांनीं ग्रीकांस दे. माय धरणी ठाव असें करून सोडिलें. पुढें ट्रोजनांचा सेनानी हेकटर, यानें आकिलीसाचा जिवलग मित्र पेट्राक्लस यास लढाईत मारिल्यामुळें याचा सुड उगविण्या करिता पुर्वीचें वैर विसरून आकिलीस पुनः लढूं लागला व याने हेक्टरास मारिलें. या प्रमाणें बारा वर्षें लढाई चालून ट्रॉय जिंकिल्यावर तिचा शेवट झाला, असें पाश्चात्य आद्यकवी होमर यानें इलियड नामक सुरस वीररस काव्यांत वर्णन केलें आहे.

हें काव्य शिकंदरास इतकें प्रीय झालें होतें, कीं त्याची एक प्रत पेटींत घालून ती पेटी तो नित्य आपल्या उशाशीं ठेवीत असे अशी आख्यायिका आहे, तसेंच आकिलीसाच्या पराक्रमाचें वर्णन करण्यास व्यास होमर सारखा कवी मिळाला, पण आपणास तसा कोणी मिळालेला नाहीं म्हणून तो वारंवार खेद करीत असे, असेंही वर्णन आढळतें.

ज्यास परम उल्हास वाटत असे अशा या नवयौवनसंपन्न राजानें ट्रॉय येथें वीर पुरुषांच्या नांवानें बळी दिले. या कृत्यानें सैन्यांतील ग्रीक लोकांस फार समाधान वाटलें, हें उघड आहे. त्याची इराणी लोकांशीं पहिली चकमक ग्रानीकास नामक लहानशा नदीच्या किनाऱ्यावर झडली. तींत इराणी लोकांची संख्या फार मोठी होती, तरी त्यानें त्यांचा पूर्ण पराभव केला. या विजयाचा परिणाम असा झाला कीं, बहुतेक आशियामायनर व विशेषतः तेथील ग्रीक नगरें त्यास शरण गेलीं, व बारबेरियन (परस्थ) लोकांच्या जाचांतून सोडविणारा ग्रीक म्हणून त्यांनीं त्याचें स्वागत केलें. हालीकारनेस शहर मात्र त्याशीं शौर्यानें लढलें; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इराणच्या राजाच्या सुवर्ण मुद्रिका खर्चून युरोपांतील ग्रीक लोकांस उठविण्याच्या कामीं फार परिश्रम केलेला मेमनन एकाएकीं वारला. यामुळें शिकंदरास बरेंच सहाय्य झालें. तो किलिकिया प्रांतांतून पुढें गेला, तेव्हां तेथें किडनोस नामक नदीच्या बर्फासारिख्या गारपाण्याचें स्नान केल्यामुळें बराच आजारी पडला. परंतु त्याच्या वैद्याच्या कुशलतेनें तो बरा झाला.

किलीकियातून शिरिया प्रांतांत जाणाऱ्या घाटवाटांत या चाल करून येणाऱ्या सैन्यास गांठण्याकरितां इराणचा राजा निघाला; व इस्पस येथें दोन्ही सैन्यांची मोठी लढाई झाली, तींत इराणी लोकांचा पराभव झाला. शिकंदरास अपार लूट मिळाली, व बंदिवान केलेल्या लोकांत इराणच्या राजाची आई, राणी व दोन मुली ही सांपडल्या; त्यांस त्यानें मोठ्या अदबीनें व उदारपणानें वागविलें. नंतर तो फिनिशिया व प्यालेस्टाईन प्रांतांत शिरला; तिकडे कोणी त्याच्या वाटेस गेला नाहीं. तरी टायर

नामक नगर त्याच्या स्वाधिन न झाल्यामुळें सात महिने पर्यंत इतिहास प्रसिद्ध वेढा देऊन त्यास तें काबीज करावें लागलें. ज्या नागरिकांस पळून जातां आलें नाहीं, त्या सर्वांची कत्तल केली, किंवा त्यांस गुलाम करून विकिलें; व नगर जमीनदोस्त करून टांकिलें. ही गोष्ट सन ३३२ त (इ. स. पू.) घडली; हीच दशा गाझा नामक नगराची झाली.

नंतर शिकंदर मिसर देशांत शिरला. तेथें त्रासदायक इराणी सत्तेंतून मुक्त करणारा समजून लोकांनीं त्याचें चांगलें स्वागत केलें. मिसरी लोकांशीं तो फार सलोख्यानें वागला इतकेंच नाहीं, तर पश्चिम जंगलांतील आमान नामक देवस्थानाचें त्यानें दर्शनही घेतलें. तेव्हां तेथील पुरोहितांनीं तो त्या देवाचा पुत्र असल्याचें कबूल केलें; यामुळें त्याचा अधिकार वाढला, व देवभोळे मिसरी लोक तो आपल्या पैकींच आहे असें मानूं लागले. मिसर देशांत नैल नदीच्या मुखाजवळ त्यानें आलेक्झांन्ड्रिया नामक नगर वसाविलें. तिकडे या प्रमाणें तो गुंतला असतां, त्याशीं सामना करण्याच्या इराद्यानें डरायस राजानें दुसरें सैन्य उभें केलें. परंतु तसें करण्यापूर्वी कांहीं मागण्या कबूल करून व हक्क देऊन सलोखा होईल तर पाहण्याचीही त्यानें खटपट केली. परंतु शिकंदराच्या मनांत सलोखा करण्याचें बिलकूल नव्हतें. आशियांत प्रवेश करून तो युफ्रेटीस व टायग्रीस ह्या नद्या उतरला, आणि सन ३३१ त (इ. स. पू.) त्यानें इराणी सैन्यास गागा नामक शहरानजिक गांठिलें. शत्रूची फौज याच्या चौपटीनें ज्यास्त होती, तरी त्यानें पुनः त्याचा पराभव केला. बाबीलोन, सौसा, पर्सीपोलीस, इग्बटाना वगैरे इराणी नगरें त्यांतील

अपार संपत्तीसह त्याच्या हस्तगत झालीं. त्यांतील पर्सीपोलीस हें बुद्धचा आग लावून जाळून टांकिलें. दुर्दैवी डरायस पूर्वे कडेस पळून जात असतां त्याच्याच क्षेत्रपांपैकीं बेसस नामक क्षेत्रपानें त्यास ठार मारिलें

पुढील वर्षांत शिकंदरानें डोंगराळ प्रदेशांतून अचाट मजला मारून कास्पियन समुद्राच्या दक्षिणे कडील व पूर्व कडील धट्याकट्या व रणशूर लोकांचा मुलूख जिंकिला. या दूरच्या प्रदेशांत त्याच्यावरून आलेक्झान्ड्रिया असें नांव पडलेल्या अनेक वसाहती झाल्या; व त्यांतून ग्रीक लोकांची सुधारणा व व्यापार यांचा सर्वत्र प्रसार झाला. सन ३२८ त (इ. स. पू.) त्यानें ब्याक्ट्रिया येथें तेथील राजाची कन्या रोक्झाना इच्याशीं विवाह केला. त्याची पूर्वेकडील चाल सुरूच होती, यामुळें त्यांचे म्यासिडोनीयन शिपाई बेदिलीचीं चिन्हें दर्शवूं लागले. परंतु तिकडे अगदीं लक्ष न देतां आश्चर्यजनक भूमी जें आर्यावर्त तेथपर्यंत जाण्याचा निश्चय करून त्यानें आपला क्रम चालूच ठेविला. इराणांतल्यापेक्षां हिंदुस्थानवाशी लोकांनीं त्यास अधिक प्रतिबंध केला, व अनेक वेळां त्याचा स्वतःचा जीवही धोक्यांत पडला. परंतु हिंदू राजेरजवाड्यांतील परस्परांविषयींचा मत्सरच मुख्यत्वें करून त्याच्या जय प्राप्तीस कारण झाला. त्यांतून कित्येकांनीं आपल्या शेजारच्या संस्थानिकांस शासन करण्याच्या उद्देशानें त्याच्याशीं सख्य केलें. त्या सर्वांत अत्यंत बलाढ्य जो पौरव त्याज बरोबर यास तुंमूल युद्ध करावें लागलें. त्यांत २०,००० हिंदु मरण पावले व स्वतः पौरव शत्रूच्या हातीं सांपडला. पुष्कळ वसाहती केल्यावर शिकंदरानें हायफेस

(विपाशा) नदीकडे चाल केली व भागीरथी पर्यंत जावें असा त्याचा मानस होता. परंतु या वेळीं म्यासिडोनीयन लोक असे कांहीं अडून बसले, कीं शेवटीं राजास आपला बेत रद्द करावा लागला व त्यानें स्वदेशीं परत जाण्याचा विचार केला. आपलें सार्वभौमत्व कबूल करण्याच्या शर्तीवर त्यानें हिंदूराजांस आपआपले कारभार संभाळण्याची मोकळीक दिली; व सिंदुनदाच्या मुखाचा व हिंदुमहासागराचा शोध लावण्याकरितां तो हायडस्पेस नदींतून खालीं गेला.

शिकंदर बादशाहा व त्याचें सैन्य पायमार्गानें डोशियाच्या भयंकर ओसाड प्रदेशातून गेलें, व नौकाधिकारि नीआर्कसासह आरमार किनाऱ्या किनाऱ्यानें इराणी आखातांत गेलें. सैन्यास ज्या ओसाड प्रदेशांतून जावें लागलें, तो धूळ आणि रेतीमय असून निर्जल होता, आणि ऊन तर अंगास झोंबत असे. यामुळें त्या लोकांचे अवर्णनीय हाल झाले. हा प्रवास फक्त दोनच महिन्याचा होता, तरी एकंदर सैन्यापैकीं तीन चतुर्थांश लोक फार हाल होऊन मेले. यानंतर एका वर्षानें, ह्मणजें (इ. स. पू.)३२५ त तो इराणांत जाऊन पोंचला, तेव्हां जिवंत राहिलेल्या लोकांस त्यानें सढळ हातानें इनामें दिलीं, व जे पुढें नोकरी करण्यास नालायक ठरले त्यांस मोठमोठ्या देणग्या देऊन परत युरोपांत पाठविले. शिकंदरानें इराणी लोकांस केवळ पराजित लोकां प्रमाणें वागविलें नाहीं. त्यांच्या चाली, रीती व धर्म जशाचे तसे चालविले, व त्यांची मनें याहूनही विशेष रीतीनें आकर्षून घेण्यासाठीं (अथवा आपली महत्वाकांक्षा व डामडौलाची हौस पूर्ण करण्या करितां ह्मटल्यास फारसा प्रमाद होणार नाहीं) त्यानें पूर्वेकडील स्वेच्छाचारी राजांप्रमाणें इतमाम व मिजास स्वतः

चालवून प्राच्य लोक जसे राजांस मुजरे वगैरे करितात, त्याप्रमाणें आपल्या युरोपियन शिपायांनींही करावे असें फर्माविलें.

प्राच्य आणि पाश्चात्य राष्ट्रांचें ऐक्य याहूनही दृढ करण्याकरितां म्यासिडोनीयन लोकांचीं इराणी स्त्रियांशीं लग्नें लाविलीं. पहिली बायको जिवंत असतां डरायस राजाची मुलगी वारसाईन इच्याशीं त्यानें स्वतः दुसरें लग्न केलें, आणि १०,००० पेक्षां जास्त म्यासिडोनीयन लोकांस इराणी स्त्रिया करून देऊन मोटमोठे देकार दिले. हीं लग्नें नेहमींहून विशेष थाटामाटानें केल्यामुळें आशियांतील अशिक्षित लोकांस आपल्या बरोबरीच्या पायरीस चढविलेलें पुष्कळ म्यासिडोनीयन लोकांस सहन न होऊन त्यांस फार राग आला; व त्यामुळें सन ३२४ त (इ. स. पू.) लष्करांत फिसाद झाली. तिचा तेव्हांच बंदोबस्त झाला हें खरें; पण त्याच्या उत्तम सरदारांपैकीं फिलोटस नामक सरदारास फिसाद करणाऱ्या लोकांचा पुढारीपणा स्विकारिल्याबद्दल देहांत शासन करावें लागलें. त्याच्या या वर्तना बद्दल त्यास उघड रीतीनें दोष देणाऱ्या दुसऱ्याही लोकांस व त्यांज बरोबर तत्ववेत्ता क्यालिस्थिनीस यास चिळस येण्यासारख्या क्रूर रीतीनें वागविलें आणि प्राच्य लोकांनीं व त्यांजबरोबर हलक्या व हांजी हांजी करणाऱ्या पाश्चात्य लोकांनीं दिलेल्या सन्मानानें राजाच्या मेंदूस विकार होऊन त्याचें डोकें फिरलें असें दिसूं लागलें.

शिकंदरानें बाबिलोन नगर आपल्या राज्याची राजधानी केली, व तेथें आपल्या जवळ भपकेदार दरबार जमविला आणि पृथ्वीवरील लांबलांबच्या मुलखांतील लोकांचे नजरनजराणे तो तेथें घेऊं लागला. मेजवान्या, नाच, रंग यांचीं रेलचेल, झाली व

अनेक प्रकारचीं क्रूर कर्में होऊं लागलीं, त्यांचा राजास फार पस्तावा झाल्या वांचून राहिला नाहीं; कारण त्याचा शूर सरदार क्लीटास यानें एकदां राजाचे प्राण वांचविले असतां ही अस-ल्या रंगाच्या प्रसंगीं राजास त्याचा राग आल्यामुळें भर मेजवानींत त्यास ठार केलें. त्याच्या असल्या अनन्वित कृत्यांचा हा एक मासला होय.

बाबिलोन नगरांत असतांना शिकंदरानें पश्चिम गोलार्ध, आफ्रिका व यूरोपाचा सर्व दक्षिणभाग जिंकण्याचा घाट घातला होता; परंतु मन एकसारखें व्यग्र ठेविल्यामुळें त्याची शरीर प्रकृती क्षीण झाली होती; त्यांतच दिग्विजया सारख्या उपद्व्यापाची तयारी करीत असतां, त्यास नवज्वरानें गांठिलें, व ३२३ च्या (इ. स. पू.) मध्यंतरींच अकरा दिवसांच्या विकारानें त्याच्या आयुष्याचा अंत झाला. सुगंधी मसाल्यांनीं त्याचें शव सुरक्षित राखून, मिसर देशांत आलेक्झान्ड्रिया येथें नेलें. त्याच्या मागें गादीवर कोणी बसावें याजबद्दल योजना पूर्वी झालेली नव्हती; तथापि आसन्नमरण झाला असतां राजानें शिक्कामोर्तब पर्डिकास याच्या हवालीं केलें.

शिकंदराच्या विजयांनीं आशियांत चिरस्थायी परिणाम घडून आले. त्यानें पूर्वेकडील दूरच्या प्रदेशांत स्थापन केलेल्या वसाहती त्याच्या मागें फार वर्षें पर्यंत टिकल्या; हिंदुस्थानाच्या सरहद्दीवर वसविलेलीं राज्यें पुष्कळ शतकेंपर्यंत कायम राहिलीं; पश्चिम आशिया व विशेषें करून मिसर देश, ग्रीक लोकांची विद्या व सुधारणा यांचें पीठ होऊन बसला; पूर्व आशिया व त्यांतील लोक यांचा युरोपियनांस परिचय झाला; व्यापारास

अनेक स्थलें खुलीं होऊन उत्तेजन मिळालें; व विशेषें करून भूगोल व मानव-जाती-विवेचन या विद्यांस प्रोत्साहन मिळालें. सारांश भूमध्य समुद्राच्या किनाऱ्या पासून अटक नदीच्या कांठा पर्यंत ग्रीक सुधारणा पसरली. तथापि त्याच्या जोरदार बाहूचा टेंका नाहींसा होतांच त्यानें रचिलेली भव्य इमारत कोसळून तिचे तुकडे तुकडे झाले.

आतां शिकंदराच्या स्वारीच्या मुदतींत ग्रीस देशांत काय प्रकार झाला त्याचें सिंहावलोकन केलें पाहिजे. स्पार्टाचा राजा आजीस यानें सन ३३३ त (इ. स. पू.) म्यासिडोनी-याची सत्ता झुगारून देण्याच्या उद्देशानें पेलापोनीशन लोकांचा कट उभा केला; व या कामांत मेमन व कांहीं इराणी क्षत्रप यांनीं त्यास सहाय्य केलें. या चळवळींत वांटेकरी होण्यास आथेनियन लोकही उत्सुक झाले होते, परंतु साधनांच्या आभावा-मुळें त्यांस स्वस्थ बसावें लागलें. शिवाय वारंवार निरोप पाठ-वून व नजराणें देऊन त्यांस खूष राखण्याचा प्रयत्न शिकंदरही करीत होता. परंतु सर्व पेलापोनिसांतील संस्थानांस या कटांत ओढून घेण्याचा स्पार्टाचा कृत निश्चय झाला होता. हें वर्तमान ऐकून राजप्रतिनिधी आन्टिपेटर यानें मोठ्या फौजेनिशीं सदर द्विपकल्पावर स्वारी केली, व मेगालापालीसाच्या नजीक झा-लेल्या दारूण युद्धांत स्पार्टन लोकांनीं बराच पराक्रम केला असतां ही, त्यांचा पूर्ण पराभव झाला. याप्रमाणें दीन दशा प्राप्त झाल्यावर स्पार्टानें सलोख्याचें बोलणें लाविलें असतां, त्याची विनंति विचारांत घेण्याकरितां कोरिन्थ येथील सभेस सादर केली. तेव्हां ग्रीसच्या इतर प्रदेशां प्रमाणें स्पार्टानेंही म्यासिडो-नीयाचें वर्चस्व मान्य करावें आणि १२० त्यालंट खंडणी द्यावी, अशा अटीवर त्याच्याशीं सख्य झालें.

यापुढें सन ३२४ पर्यंत (इ. स. पू.) ग्रीस देशांत शांतता होती. या वर्षीं शिकंदरानें परागंदा केलेल्या लोकांस स्वदेशीं परत येण्याची मोकळीक दिल्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. असें केल्यानें ग्रीसांतील आपल्या पक्षास बळकटी येईल अशी त्याची अपेक्षा होती; परंतु या उपायामुळें स्वदेशीं परत येणाऱ्या लोकांच्या मालमिळकती संबंधानें अंतपार नाहीं असे बखेडे मात्र उपस्थित झाले. शिवाय राजाचा कोशाधीश हारपेलास पुष्कळ संपत्ती घेऊन गुप्तरुपानें आशियांतून निघाला, व तिचा उपयोग ग्रीक लोकांस म्यासिडोनीया विरुद्ध प्रवृत्त करण्याच्या कामीं त्यानें केला. ही संधी साधून घेण्यास आथेन्सांत पुष्कळ असामी तयार होते; परंतु हारपेलास यास स्वाधीन करण्याविषयीं आन्टिपेटरानें जेव्हा सांगून पाठविलें, तेव्हां तो क्रेट येथें पळून गेला असतां त्याच्या पैशावर हात मारून एका इसमानें त्याचा खून केला, व आपण कायरीन येथें पळून गेला. आन्टिपेटराच्या धमकावणीनें आथेनियन लोक भेदरून गेले; व ज्यांनीं ज्यांनीं हारपेलासकडून पैका घेतला होता त्या सर्वांवर त्यांनीं खटले चालू केले. डिमास्थेनीस हा अशां पैकीं एक होता. त्याजला केलेला दंड देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें तो ट्रीझन येथें पळून गेला. परंतु पुढें लवकरच त्यास स्वदेशीं परत बोलाविण्यांत आलें.

शेवटीं शिकंदर वारल्याची खबर आथेन्सांत गेऊन पोंचली; तेव्हां कांहीं हालचाल न करितां स्वस्थ बसावें असें शांत व अनुभवी लोकांचें म्हणणें होतें, तिकडे लक्ष न देतां आथेनियन लोकांनीं एकदम लढाईची तयारी केली; व इतर ग्रीक लोकांनीं ही आपलें स्वातंत्र्य मिळवावें असें ते त्यांस सांगूं लागले.

त्यांनीं एक मोठें सैन्य उभारिलें यांतील बराच मोठा भाग इटोलियन लोकांनीं पुरविलेला होता. या संयुक्त सैन्याचें आधिपत्य लिओस्थिनीस यांस देण्यांत आलें. त्यानें बिओशियांतून पार निघून जाऊन थरमापिलीची घांटवाट अडविली. याच वेळीं इलीरियन व थ्रासियन लोक ही म्यॅसिडोना विरुद्ध उठले. यामुळें आन्टिपेटरास इकडे आड व तिकडे विहीर असें झालें. तो जलदी करून प्रथम थेसलींत गेला. परंतु त्याचें थेसलीयन लोकांच्या घोडेस्वारांच पथक लिओस्थिनीस यास जाऊन मिळाल्यामुळें तो लेमिया नांवाच्या शहरांत शिरला; व त्यानें तहाचें बोलणें लाविलें.

विजयानें उल्हू झालेले आथेनियन लोक प्रतिनिधी आन्टिपेटर यानें कांहीं अट न सांगतां आपल्वा स्वाधीन व्हावें असा आग्रह धरून बसले. तें त्यांचें म्हणणें अर्थात् कबूल झालें नाहीं व लवकरच पारडें ही फिरलें; कारण त्यास झालेल्या एंका जखमेमुळें लिओस्थिनीस मरण पावला, व इटोलीयन लोक स्वदेशीं निघून गेले. याच संधीस म्यासिडोनियाचा लिओनेटास नामक दुसरा सेनानी आशियांतून थेसलीच्या मार्गानें बऱ्याच मोठ्या लष्करानिशीं यऊन दाखल झाला. लिओस्थिनीसाच्या जागीं आलेला सरदार आन्टीफायलास यास लेमियाचा वेढा उठवून लिओनेटसा बरोवर निकराची लढाई करावी लागली. याप्रमाणें मोकळा होतांच व क्रेटेसस याच्या हाता खालचे आशियांतील दुसरें लष्कर त्यास मिळतांच, आन्टिपेटरानें आथेनियन लोकांबरोबर सन ३२२ त (इ. स. पू.) तुमूल युद्ध केलें; त्यांत आथेनियनांचा दोन वेळां पराभव झाला; सर्व थेसला प्रांत एकदम शरण आला; कटांतील संस्थानांची

फाटाफूट झाली, व प्रत्येक संस्थानानें आल्या तर्फे स्वतंत्र रीतीनें तह केला. परंतु आथेनियन व इटालीयन लोकांनीं मात्र शस्त्र खाली ठेविलें नांहीं. नंतर आन्टिपेटरानें दक्षिणेकडे चाल करून म्यासिडोनियाचे मुख्य मुख्य अनिष्ट चिंतक आपल्या स्वाधीन करावे अशी आथेनियन लोकांकडे मागणी केली; तेव्हां डेमास्पेनीस, हायपरडीस व दुसरे कांहीं असामी पळून गेले. आथेनियनांनीं परोपरीनें केलेली विनवणी व्यर्थ जाऊन त्यांस लढाईचा खर्च देण्याचें व म्युन्नियाच्या बंदरांत म्यासिडोनची शिबंदी राहूं देण्याचें कबूल करणें भाग आलें. म्यासिडोनियास अनुकूल असणाऱ्या श्रीमान लोकांच्या हातीं सरकारी अधिकार गेला; मत देण्याचा हक्क फक्त २००० इसमाकडेस राहिला; आणि पळालेल्या देशभक्तांस देहांत शिक्षा करण्याचा हुकूम झाला. डेमास्थेनीस कालेरियांतील पासिडान देवाच्या मंदिरांत लपला होता. अलिकडे तो नेहमी विष जवळ बाळगीत असे. आन्टिपेटराचे हेर आपल्या पाठीवर असल्याचें दिसून आल्यावरून त्यानें त्याचा उपयोग करून देहावसान करून घेतलें.

याप्रमाणें म्यासिडोनच्या किंवा जीस साधारणतः लेमियाची लढाई असें म्हणतात, तिचा शेवट झाला. तिच्या योगानें आथेन्सचें स्वातंत्र्य व राज्यपद्धती हीं दोन्ही नष्ट झालीं. आतां आपलीं शस्त्रें इटालियनांवर चालविण्याच्या तयारींत म्यासिडोनियन लोक होते, परंतु आशिया खंडांत घडून येणाऱ्या विनांमुळें त्यांस तसें करितां आलें नाहीं.

भाग १२ वा.

शिकंदर बादशाहाच्या मागून झालेल्या राजांच्या कारकिर्दींतील एकियन तटापर्यंतचा ग्रीसचा इतिहास.

या पुढील ग्रीसच्या इतिहासाची म्यासिडोनियाच्या इतिहासांत इतकी गुंतागुंत झालेली आहे. कीं तो निराळा करितां येण्यासारखा नाहीं, कारण कित्येकदां तो देश सदर राज्याचा प्रांत बनून राहिला होता. शिकंदर बादशाहा मरण पावला, तेव्हां त्याच्या मागें तक्तनशीन होण्यास लायक वारस कोणी नव्हता. अर्धवेडा एक भाऊ व दोन लहान लहान मुलगे एवढे कायते त्या घराण्यांतील पुरुष मागें राहिले होते. कांहीं काळपर्यंत प्रतिनिधी या नात्यानें परडिकास हाच सर्व राज्यांत मुख्य अधिकारी होऊन बसला. परंतु सन ३२१ त (इ. स. पू.) त्याचा खून झाला. नंतर शिकंदराचे सरदार ज्या ज्या भागांवर त्यांस सुभेदार नेमिले होते त्या त्या भागांतील राजसत्तेवर आपला हक्क सांगू लागले इतकेंच नाहीं, तर आन्टिगोनास आपणास सर्व प्रदेशाचा भूपति म्हणवू लागला व आन्टिपेटर आणि त्याचा पुत्र कास्यान्डर यांनीं म्यासिडोनिया व ग्रीस हे देश आपल्या हातांत ठेविले. शिकंदराच्या बायका मुलांस व मावास पेला येथें इतमामानिशीं अटकेंत ठेविल्यावर थोड्या वर्षांच्या आंतच त्या सर्वांच खन झाले. शिकंदर बादशाहाच्या कुटुंबाच्या माणसांचें वृत सर्व प्राचीन इतिहासांत विशेष हृदय द्रावक आहे. सरदार मंडळांत बरीच लढा लढी झाल्यावर आन्टिगोनास याजबरोबर मोठी लढाई चालू झाली, व ती पुष्कळ काळपर्यंत

टिकली. शेवटीं सन ३११ त (इ. स. पू.) राज्यावर हक्क सांगणारांनीं तें वांटून घेतलें. अशा रीतीनें प्राप्त झालेली शांतता फार वेळ टिकली नाहीं. पुनः नूतन युद्ध चालू झालें, व सरदारांपैकीं पांच जणांनीं राजा हा किताब धारण केला. तरी आन्टिगोनास हा सर्व राष्ट्रावर हक्क सांगत असल्यामुळें तंट्याचें मूळ नाहींसें झालें नाहीं. परंतु सन ३०१ त (इ. स. पू.) झालेल्या मोठ्या युद्धांत तो पडल्यावर जिकडे तिकडे शांतता होऊन तह झाला; त्यांत म्यासिडोनीया, थ्रेस, सिरिया व मिसरदेश हीं स्वतंत्र राज्यें गणलीं गेलीं.

शिकंदराच्या सरदारांच्या आपसांतल्या भांडणांच्या वेळीं ग्रीस देशास ही झीज सोसावी लागली, यांत संशय नाहीं. आन्टिपेटराचा पुत्र क्यासान्डर यास अनुकूळ असा एक बलाढ्य पक्ष आथेन्सांत होता. फोकियन हा त्याचा पुढारी असून त्याच्या मनांतून म्यासिडोनियाचें लष्कर म्युन्चिया येथें असावें असें होतें. प्रजा सत्ताक पक्षाचे लोक पालिसपरचन याच्या बाजूस होते, व त्यासच आन्टिपेटरानें आपला वारस ठरविलें होतें. आथेन्सांत पुनः प्रजासत्ताक राज्य पध्दती चालू करण्याचें व परागंदा झालेल्या लोकांस परत येऊ देण्याच अभिवचन आथेनियनांस त्यानें दिलें होतें. प्रजा सत्ताक पक्ष सबळ झाला व फोकियन याजवर राजद्रोहाचा आरोप येऊन त्यास देहांत शिक्षा झाली. (इ. स. पू. ३१७). नंतर क्यास्यान्डर व पालिसपरचन यांच्यांत लढाई सुरू झाली, तींत पालिसपरचन यानें बहुते पेलापोनीसप्रांत काबीज केला. तरी आथेनियनांनीं क्यासान्डराशींच तह केला; या व्यवस्थेंत त्यांचें राजकीय स्वातंत्र्य कबूल होऊन मत देणाऱ्या लोकांची संख्या वाढविण्यांत आली; परंतु याच वेळीं क्यासा-

न्डर यानें फ्यालेरान येथें राहणारा लोकप्रिय वक्ता डेमिट्रीयस यास आथेन्साचा सुभेदार नेमिलें. त्याची कारकीर्द ख्रिस्ती शका पूर्वीचें वर्ष ३१८ पासून ३०७ पर्यंत चालली. आरंभीं लोक त्यास फार चहात होते व आथेन्सास त्याच्या पहिल्या भरभराटीचा बराच अंश पुनः मिळाला. त्याच्या सन्मानार्थ नागरिकांनीं त्याचे ३०० पुतळे उभारिले असें सांगतात; परंतु पुढें आपल्या फाजीलपणानें तो सर्वांच्या द्वेषास पात्र झाला. या वेळीं सत्ता बळकाविणें इच्छिणाऱ्या म्यासिडोनियन उमेदवारांस ग्रीस देश एक भांडणाची बाब होऊन राहिला. होता व त्यांतील बहुतेक इसम ग्रीक लोकांस त्यांचें पाहिलें स्वातंत्र्य मिळवून देण्याचीं वचनें देऊन त्यांस खूष राखण्यांत फार तत्पर असत. परंतु असल्या वचनांत कांहीं अर्थ नव्हता; कारण तीं पूर्ण करण्याचें कोणा एकाच्याही हातीं नव्हतें शेवटीं त्यावेळचा मिसरदेशाचा सुभेदार टालेमी यानें कास्यान्डर यास ग्रीस देश सोडून परत म्यासिडोनियांत जाणें भाग पाडिलें. सन ३११ च्या (इ. स. पू.) तहांत ग्रीस स्वतंत्र असल्याचें कबूल करण्यांत आलें होतें; तरी कांहीं वर्षांनीं क्यासान्डर व टालेमी यांनीं प्रत्येकानें आपण जिंकलेला ग्रीसाचा भाग घेऊन स्वस्थ बसावें असें आपसांत ठरविलें.

फ्यालेरानचा डेमिट्रीयस याच्या कारकीर्दीतल्या शेवटल्या वर्षीं—म्हणजे लोकांची त्याजबद्दलची नाखुषी अगदीं कळसास पोंचल्या वेळीं—पालिआरकेटीस उपनांवाचा आन्टीगोनासाचा पुत्र डेमिट्रीयस हा मोठ्या आरमारानिशीं पिरेइयस बंदरांत आला व आपणास स्वातंत्र्याचा कैवारी म्हणवूं लागला. लोकांनीं त्याचें स्वागत मोठ्या उत्साहानें केलें; व फ्यालेरानचा डेमिट्रीयस यास कांहीं उपद्रव न देतां जाऊं दिलें. या नवीन

मेटलेल्या डेमिट्रीयसानें आपलें वचन पाळिलें. त्यानें गरीब लोकांस पुष्कळ धान्य फुकट वांटिलें; यामुळें लाकांनीं कृतज्ञ बुद्धीनें त्यास व त्याच्या बापास जवळ जवळ देवासारखा मान दिला. परंतु तो चंचल वृत्तिचा मनुष्य असल्यामुळें तो लवकरच आथेन्सांतून निघून गेला, व एकामागून एक अशा उलाढालीमागें लागला.

याप्रमाणें आथेन्सावरील दुसऱ्या लोकांचा दाव नाहींसा झाल्याबरोबर प्रजासत्ताक व म्यासिडोनीयन पक्षांच्या लोकांचीं जुनीं मांडणें चालू झालीं. प्रख्यात डेमास्थेनीसाचा पुतण्या डेमाचारीस हा प्रजासत्ताक पक्षाचा पुढारी होता. तो देशहितार्थ खऱ्या भावानें झटणारा असून लोकांचें स्वातंत्र्य राखण्याकरितां आपल्या हातून होण्यासारखें सर्व प्रयत्न त्यानें चालविले होते. परंतु म्यासिडोन पक्षाचें प्राबल्य जास्त झाल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. पालिसपरचन हा पेलापोनीसस जिंकण्यांत गुंतला असतां क्यासान्डर यानें आटिकावर स्वारी करून आथेन्सास बेढा दिला. डेमाचारीस यानें मोठ्या शौर्यानें शहराचें संरक्षण केलें; व इतक्यांत डेमिट्रियस पालिआरकेटीस याच्या हाताखालचें आरमार अकस्मात येऊन पोंचलें; यामुळें क्यासान्डर यास ग्रीस देशांतून निघून जावें लागलें. म्यासिडोनच्या तावेदारींतून या प्रमाणें मुक्त झालेल्या शहरांनीं आपली सुटका करणाऱ्या गृहस्थाचा सर्व प्रकारें सन्मान केला, व आपल्या लष्कराचा त्यास मुख्य अधिपति नेमिला. तो आथेन्सांत अगदीं थोडा वेळच राहिला; तरी आपल्या जुलमी व दुराचारी वर्तनानें त्यानें लोकांस नाखुष करून सोडिलें; आणि थोर मनाचा डेमाचारीस यास हद्दपार केलें. त्याच्या बापानें

त्यास आशियांत निघून येण्याविषयीं निरोप पाठविल्यावरून तो तिकडे गेला; परंतु इपसासच्या लढाईंत बाप पडल्या नंतर तो परत ग्रीस देशांत आला. तेथें स्वतंत्र राज्याची स्थापना करावी असा त्याचा मानस होता; परंतु आपल्याविषयींची लोकांची पूज्य बुद्धि नष्ट झाली आहे असें पाहून तो सिरियांत निघून गेला.

दरम्यान इकडे आथेन्सांत क्यासान्डराच्या सहाय्यानें लिओचारीस हा सर्व सत्ताधीश होऊन बसला; व त्यानें लोकांवर अश्रुतपूर्व जुलूम चालविला. हें वर्तमान ऐकून डेमिट्रीयस मोठ्या त्वरेनें आथेन्सांत गेला; आणि एकाएकीं हल्ला करून त्यानें तें शहर घेतलें (इ. स. पू. २९९ त). त्यानें मागील सर्व अपराधांची क्षमा करून उपासमार होत असलेल्या लोकांत पुष्कळ धान्य वांटून दिलें; परंतु या पुढें आक्रमणास कांहीं धोका येऊं नये म्हणून त्यानें म्युन्चिया व पिरेइयस येथें बळकट शिबंदी ठेविली, व शहरांतील म्युझियम नामक टेंकडीवर तटबंदी केली. नंतर पेलापोनीसांत स्वारी करून तो स्पार्टाच्या अगदीं दारापर्यंत जाऊन पोंचला असतां, म्यासिडोनीयांतून बोलावणें आल्यावरून तो तिकडे गेला व सन २९४ त (इ. स. पू.) तेथें सिंहासनारूढ झाला. त्यानें सात वर्षें राज्य केलें. या मुदतींत सर्व ग्रीस देश त्यास खंडणी देत होता. परंतु पिऱ्हसा बरोबरच्या लढाईंत त्याचें सैन्य त्यास सोडून गेल्यामुळें तो पळून सिरिया प्रांतांत गेला, व आपल्या अस्वस्थ आयुःक्रमाची परिसमाप्ती बंदीखान्यांत करिता झाला. पिऱ्हस हा म्यासिडोनियाचा राजा झाला, तेव्हां आथेनयन लोकांनीं पुनः बंडाचा झेंडा उभारिला; आणि म्यासिडोनच्या लष्करी तुकड्यांस त्यांच्या टा-

ण्यांतून हांकून लाविलें. असें असतां त्यांस कांहीं शासन न करितां पिन्हसानें उदार अंतःकरणानें त्यांस स्वातंत्र्य सुखाचा अनुभव घेऊं दिला. डेमाचारीस यास परत बोलावून आणिला, व त्यानें कारभार इतक्या हुशारीनें व दक्षतेनें चालविला कीं आपले पूर्वीचे सुखाचे दिवस परत येत आहेत असें आथेनियन लोकांस कांहीं काळपर्यंत वाटूं लागलें. पिन्हसाच्या मागून गादीवर बसलेला लिसिम्याकस यानें ही आथेन्सावरोबर सख्य केलें व त्या शहरास आपल्या प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा पूर्ण उपभोग घेऊं दिलें.

सन २८० च्या (इ.स.पू.) सुमारास उत्तरेकडून केल्ट किंवा गाल लोकांच्या झुंडीच्या झुंडी ग्रीस देशावर येऊन पडल्या. त्यांच्या प्रगतीस म्यासिडोनियांत अवरोध झाला. त्यांजबरोबरील युद्धांत राजा टालेमि केरौनास हा लढाईंत पडला. नंतर ते दक्षिण बाजूस डेल्फायकडेस वळले. येथील देवालयाच्या संपत्ती विषयींच्या लौकिकामुळें त्यांनीं तसें केलें यांत संशय नाहीं; परंतु सन २७९ त (इ. स. पू.) ते डेल्फाय जवळ जवळ आले तेव्हां दोनशें वर्षांपूर्वी इराणी लोक त्या पवित्र नगराजवळ आल्या वेळीं जसें त्या देवानें विजेच्या कडाडण्यानें व गडगडाटानें त्यांस घाबरवून सोडिलें होतें, त्याप्रमाणेंच आतां ही ह्या हल्ला करणारांची अवस्था झाली. इतकें झाल्यावर गाल लोकांची फाटाफूट झाली, व त्यांची एक मोठी टोळी आशियामायनरांत गेली, व तेथें बराच काळ इकडे तिकडे भटकण्यांत घालविल्यावर त्यांनीं एका प्रांतांत कायमची वस्ती केली; त्यामुळें त्या लोकांवरून त्या प्रांताचें ग्यालिशिया असें नांव पडलें.

टालेमीकेरौनास याच्या मागून आन्टिगोनास गोन्याटास हा गादीवर बसला (इ. स. पू. वर्ष २८० पासून २३९ पर्यंत). हा ही ग्रीस देशावर आपला हक्क सांगूं लागला; पण त्यास तो शस्त्राच्या जोरावर स्थापन करावा लागला. इतकें करून ही त्या कामांत तो पूर्ण विजयी झाला असें नाहीं. म्यासिडोनीयाची शिबंदी शहरांत राहूं देण्यास आथेनियन कबूल होईनात, म्हणून त्यांजबरोबर युद्ध करावें लागलें. पुष्कळ वर्षें पर्यंत शहारास वेढा पडून राहिला. त्यांतील लोकांस स्पार्टाची व मिसरदेशच्या राजाची अजून मदत होती, तरी तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं आणि सन २६२ त शरण जाऊन म्युन्चिया, पिरेइयस व म्युझियम येथें म्यासिडोनची शिबंदी ठेवण्याचें कबूल करावें लागलें. (इ. स. पू. वर्ष २१२). इतकें झालें तरी तो आथेनियनांशीं फार सलोख्यानें वागला. त्यानें त्यांच्या प्रजासत्ताक राज्यपद्धतींत बदल केला नाहीं; इतकेंच नव्हे, तर म्युझियम येथील शिबंदी ही त्यानें लवकरच उठविली. आपल्या बंदरांतून म्यासिडोनची शिबंदी राहिल्याचें दुःख जरी त्यांस सहन करावें लागलें, तरी बराच वेळ पर्यंत आथेन्सांत शांतता होती. आक्रियन नांवाच्या एका कटाबद्दल आम्हांस यापुढें माहिती द्यावी लागणार आहे. येथें इतकेंच सांगावयाचें आहे कीं, त्या कटाचा याबेळचा पुढारी म्यारेटास यानें म्यासिडोनच्या सेनापतीस लांच देऊन सन २२९ त (इ. स. पू) त्याजकडून बंदरांतील लष्कर उठविलें आणि तीं मोकळीं करविलीं. असें केल्यानें आथेनियन आपल्या कटास खास मिळतील अशी त्याची अपेक्षा होती. परंतु त्या कटाच्या लढायांच्या उद्योगांत मिळण्याचें आतां त्यांच्यांत सामर्थ्य नव्हतें; आणि या पुढें ग्रीसदेशाच्या कारभारांत शटून उद्योग करण्याचेंही त्यांनीं सोडून दिलें.

एकंदर म्यासिडोनियन कारकीर्दींत तेथील राजाच्या मागण्या नाकबूल करण्याच्या कामीं स्पार्टानें बराच निग्रह प्रगट केला. तरी ग्रीस देशाच्या इतर भागांचें स्वातंत्र्य राखण्यांस त्यानीं कांहीं उद्योग केला नाहीं असें म्हटलें असतां चालेल. सन २०४ (इ. स. पू.) तें शहर डेमिट्रीयसाकडून जिंकिलें जाण्याचें थोडक्यांत चुकलें असें आपणांस पुर्वीच दिसून आलें आहे; त्यावेळीं शहरास तट ही होता. तेव्हां यावरून सहज असें दिसून येईल कीं तेथील लोकांचा पूर्वीचा बाणा अगदीं बदलून गेला होता; सारांश, यावेळीं तें संस्थान अगदीं निकृष्टावस्थेंस पोचलें होतें. सर्व संपत्ति थोड्याशा कुटूंबांत जाऊन एकंदर जनसमूह कंगाल झालेला होता; सर्व सत्ता युफोरांच्या हातीं असून जुन्या घराण्यांचे वारस यापलीकडे राजांकडे कांहीं अधिकार राहिला नव्हता.

अशा स्थितींत आजीस राजानें (इ. स. पू. २४१ त). राज्यपद्धती सुधारून तिला चालू काळास अनुरूप असें स्वरूप देण्याचें जोखमाचें काम हातीं घेतलें. तरुण स्पार्टन अनुकूळ असल्यामुळें गरीब लोकांस विपत्तींतून सोडविण्यास अवश्य असे बरेचसे कायदे त्यानें पसार करून घेतलें; जमिनीची नवीन वांटणी केली; त्यांतील ४,९०० धडे स्पार्टन लोकांकरितां ठेवून १५,००० ल्याकोनीयनांकडे दिले; स्पार्टन लोकांची संख्या थोडी होती म्हणून ल्याकोनीयन लोकांस मतें देण्याचा अधिकार देऊन तीं संख्या वाढवावी असें ठरविलें. ह्या व अशा उपयांनीं स्पार्टन लोकांतील पूर्वीचा दम पुनः त्यांच्यांत येईल असें राजास वाटलें. सुधारणांस हरकत करणारा दुसरा राजा लिओनिडास यास हद्दपार केला. आतां कारभार सुयंत्र चालेल

असा रंग दिसूं लागला; परंतु आकियन लोकांवरील स्वारीच्या कामांत आजीस गुंतला आहे, अशी संधी साधून सुधारणा-प्रतिकूळ पक्षानें लिअेनिडास यास परत स्वदेशीं बोलाविलें; व आजीस स्वारीवरून परत आला तेव्हां त्यास धरून ठार मारिलें; त्याची विधवा आजियाटिस ही सुधारणेच्या कामांत आपल्या नवऱ्या प्रमाणेंच मनापासून झटणारी असें. तिनें पुढें क्लिओमिनीस राजाशीं लग्न लाविलें (इ. स. पू. २३६ ते २१०). आजीसानें हातीं धरिलेलें काम सक्तीनें पुरें करण्याचा राजा क्लिओमिनीस यानें यत्न केला. त्यानें युफोरांचे खून करविलें; लोकांची देणीं रद्द केली; आणि आतां जमिनीची वाटणी करण्यास तो लागणार होता, इतक्यांत आकियन कटाबरोबरील लढाई उद्भवली. या लढाईपासून अखेरीस क्लिओमिनीस व स्पार्टा या उभयतांचाही नाश झाला असें आपणास पुढें दिसून येईल.

भाग १३.वा.

आकियन कटाच्या आरंभापासून रोमनलोक ग्रीस देश जिंकीपर्यंतचा इतिहास.

राजकीय कारणांसाठीं सर्व ग्रीकलोक मिळून एक राष्ट्र कधीं बनले नाहीं. ट्रॉयच्या लढाईच्यावेळीं मात्र ते सर्व एका सेनानीच्या हुकमतींत वागत होते, असें वर्णन आहे. म्यासिडोन येथील राजांच्या कारकीर्दीत त्यांच्या जुलमापासून बचाव करून घेण्यास एकी हेंच साधन आहे, असें अनेक देशाभिमानी पुरुषांनीं प्रतिपादन केलें; तरी आकीयन लोकांत त्या कल्पनेस व्यावहारिक स्वरूप प्राप्त होईपर्यंत त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हा वेळपर्यंत ग्रीस देशाच्या इतिहासांत त्या लोकांस (आकियनांस) स्वतंत्र योग्यता कांहींच नव्हती. फार प्राचीन काळापासून त्यांच्या बारा शहरांत धरसोडी सारखा एकीचा कांहींसा प्रकार चालत आला होता. परंतु म्यासिडोनियन लोकांस पेलापोनिसांतून घालविण्याच्या इराद्यानें तीं इ. पू. २८० त जास्त निकट संबंध ठेवूं लागलीं. लवकरच दुसरीं शहरें या कटास मिळालीं व दिवसें दिवस त्याचा प्रसार सर्व ग्रीस देशभर होऊन सन २९१ त (इ. स. पू.) जेव्हां आरेटास नामक सिकियनानें आपल्या नगरास त्या कटास मिळण्यास प्रवृत्त केलें व आपण त्याचा मुख्य बनला, तेव्हां त्याचें सामर्थ्य फार वाढलें. सर्व संस्थानें मिळून एक राज्य समजावें; सर्व सत्ता स्ट्राटिज्यास नांवाच्या हुद्देदाराच्या हातीं द्यावी; या अधिकाऱ्याची निवड दरसाल व्हावी; व त्यास कामकाजांत मदत करण्यास हिपार्कस व सेक्रटरी या हुद्याचे दुसरे दोन अधिकारी

असावे; अशी या कटाची रचना होती. सरकारचें ठाणें इजियान एथें होतें व कटांतील संस्थानांचे प्रतिनिधी दरसाल तेथें जमत असत. नुसत्या ग्रीस देशांतच नव्हे, तर आजूबाजूच्या परकी सरकारांतही या कटाची प्रतिष्ठा व बूज फार मुदतपर्यंत राहिली.

परंतु दैवदुर्विलासामुळें या कटापासून सर्व ग्रीसाचा एकोपा झाला नाहीं एवढेंच नाहीं, तर इटोलियन लोकांनीं त्या विरुद्ध दुसरा कट उभारिला. ग्रीसास स्वतंत्रता मिळो वा न मिळो त्याची त्यांस पर्वा नव्हती. त्यांचें सर्व लक्ष स्वतःच्या फायद्याकडे होतें. ते लोक शूर व लढवय्ये होते. तथापि सुधारणेच्या कामांत ग्रीसाच्या इतर भागांप्रमाणें त्यांचे पाऊल पुढें पडलें नव्हतें. ते अव्वल पासून अखेर पर्यंत आडदांड, कजाग, बेविश्वासु व लुटालुटीचें भोक्ते होते. त्यांच्या कटाची रचना आकियन कटाच्या धर्तीवरच असून त्यांचें सामर्थ्यही फार जलदीनें वाढलें. थेरमान ही त्यांची राजकारभार चालविण्याची जागा होती.

आरेटास याची स्ट्राटिज्यासच्या जागीं बारा वेळां नेमणूक झाली. अधिकारावर नसल्या वेळीं ही आकीयन कटाचा तो जणूं प्राणच होता. त्या कटाच्या प्रजासत्ताक कारकीर्दीत सर्व पेलापोनिसाचें ऐक्य करण्याचे व म्यासिडोनच्या पाठबळानें सर्वत्र अस्तित्वांत असलेल्या सर्वसत्ताधिशांस हांकून देण्याचे विचार त्याच्या मनांत एकसारखे घोळत होते. वक्तृत्व व मुत्सद्दीपणा यांच्या जोरावर पुष्कळ कामांत त्यास यशच आलें; परंतु दृढनिश्चय व आंगचें धैर्य हे दोन गुण त्याच्या अंगीं कांहींसे कमी वसत होते. इ. स. पू. ३४३ त त्यानें म्यासिडोनच्या लष्करास कोरिन्थातून हांकून लाविलें आणि तेथील व मिगारांतील लोकांस या कटास मिळण्यास प्रवृत्त केलें. इ. स. पू. २२१ च्या सुमारास

स्ट्राटिज्यासचा अधिकार त्यास ११ व्यानें मिळाला. त्यावेळीं पेलापोनिसांतील पुष्कळ वजनदार शहरें त्याच्या पक्षास मिळालीं. म्यासिडोनच्या शिबंदीपासून आथेन्सास त्यानें सोडाविल्याचें दिसून आलेंच आहे. असें असतां आथेन्सास या कटास मिळतां आलें नाहीं.

या भरभराटीच्या काळांत इटोलियन लोकांनीं आकीयन लोकांवर कटाक्ष धरिला आणि आकाया वांटून घेण्याविषयीं म्यासिडोनचा आन्टिगोनास गान्याटास याजबरोबर तह ही केला. याच सुमारास स्पार्टाचाराजा क्लिओमिनीस यानें आपल्या सुधारणांच्या योगानें त्या संस्थांची अंतस्थ स्थिति सुधारली इतकेंच नाहीं, तर आरगास व म्यान्टिनिया प्रांत जिंकून त्यानें त्याचें सामर्थ्य वाढविलें. सारांश सर्व पेलापोनीसावरील पुरातनचें वर्चस्व परत मिळविण्यास तो झटत होता; म्हणून आरेटास आणि आकियन कट यांच्यांत व त्या संस्थानांत (स्पार्टांत) झटापट लागण्या शिवाय दुसरी गती नव्हती. आरेटासानें स्पार्टाबरोबर युद्ध चालू केलें. त्यांत तो इतका दंग झाला कीं, त्यानें कटाचे मूळ उद्देश विसरून जाऊन म्यासिडोनियाचें ही सहाय्य मागितलें. त्या वेळीं म्यासिडोनियांत आन्टिगोनास डासन हा प्रतिनिधी होता; त्यानें मदत देण्याचें तत्काळ कबूल केलें. युद्धाच्या आरंभीं क्लिओमिनीस यास जय मिळत गेला व त्यानें आकियन लोकांचा तीन लढायांत पराजय केला. पुष्कळ शहरें त्याच्या हस्तगत झालीं आणि कोरिन्थचा मजबूत किल्ला आक्रोकोरिन्थ याला वेढा घालण्यास त्यानें आरंभ केला. तथापि आरेटासबरोबर तोडजोड करण्याची त्याची इच्छा होती, परंतु आरेटास यानें मुर्खपणानें तें मजबूदस्थळ आन्टिगोनास डासन याच्या हवालीं केलें. क्लिओमिनीस

ह्यानें ही मोठ्या निकरानें टक्कर दिली. पण त्याचें कुटूंब निवर्तल्या मुळें त्यास स्पार्टा शहरीं परत जाणें भाग पडलें. इ. स. पूं. २२३ व्या वर्षी आन्टिगोनास हा आर्केडियावर चाल करून गेला आणि क्लिओमिनीस याचें कांहीं चालूं न देतां त्यानें पुष्कळ शहरें काबीज केलीं. स्पार्टाच्या उत्तरेस सिलिशिया येथें क्लिओमिनीस यानें आपला तळ दिला होता. तेथें इ. स. पू. २२१ त निकराची लढाई होऊन तींत फिलोपिमेन याच्या सहाय्यानें आकियन लोक विजयी झाले. क्लिओमिनीस थोड्याशा घोडेस्वारांनिशीं स्पार्टास पळून गेला. नंतर मिसरदेशांत आलेक्झान्ड्रिया येथें आश्रय मिळण्याची त्यास अपेक्षा असल्यामुळें तो तिकडे गेला; पण तसें कांहीं न घडतां तो उलटा बंदींत पडला व इ. स. पू. २२० त त्यानें आत्महत्या केली. त्याची आई व मुलें हीं त्याजबरोबर गेलीं होतीं, त्यांस मारून टाकण्यांत आलें. डोरियन लोकांच्या विजयापासून हा कालपावेतों स्पार्टांत राजे वंशपरंपरेनें राज्य करीत आले होते. आतां तें संस्थान बिनहरकत आन्टिगोनासाच्या हातीं गेलें; तरी त्यानें त्याच्या प्राचीन वैभवास्तव त्याबरोबर सौम्यपणाचेंच वर्तन ठेविलें. क्लिओमिनीसाबरोबरच स्पार्टाच्या जुन्या राजघराण्याचा अंत झाला आणि म्यासिडोनियांत इलीरियन लोक स्वाऱ्या करूं लागल्यामुळें स्पार्टांत सुयंत्र व्यवस्था लावण्यास पाहिजे होता तितका काळपर्यंत आन्टिगोनास यास तेथें राहतां आलें नाहीं.

सिलिशिया येथील लढाईंत आकियन लोक विजयी झाले खरे; तरी तिजमुळें त्यांचें स्पार्टापेक्षां कमी नुकसान झालें असें नाहीं. कारण कोरिन्थाचा बळकट किल्ला म्यासिडोनियन लोकांच्या हातीं राहिला व त्यांचीं राजसुत्रें युद्धकैलत अत्यंत

पठाईत अशा ५ व्या फिलिपाच्या हातीं होतीं (इ. स पू. २२० तागायत १७९). त्याच्या कारकीर्दीस प्रारंभ झाला तेव्हांच सामाजिक युद्धांमुळें ग्रीस देश द्विधा झालेला होता. तो प्रकार असा. स्पार्टास इतकी निकृष्टावस्था प्राप्त झाली होती कीं, युफोर लोकांचा राज्याधिकार लायकरगस नांवाच्या मनुष्यानें लांचलुचपतीनें मिळविला. त्यानें अवशिष्ट असलेली राज घराण्यांतील मंडळी लागलीच नाहींशी करून टांकिली; व आपण एकटाच राजा असल्या बद्दलची द्वाही फिरविली. नंतर आकियन व म्यासिडोनियन यांज विरूद्ध इटोलियन लोकांशीं सख्य केलें. यामुळें सुरू झालेलें युद्ध तीन वर्षें चाललें. त्यांत दोन्ही पक्षांत ग्रीक लोकच असून म्यासिडोनियन लोक एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत देश उध्वस्त करित चालले होते. तथापि आपल्या तंट्याभांडणाची वाटेल तशी सोय लावण्याचें काम आकियन लोकांवरच सोंपवून जाणें म्यासिडोनच्या राजास भाग पडलें. कारण आद्रिआटिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील कांहीं गांवांत रोमन लोकांनीं या पूर्वीच आपला पगडा बसविला होता. यास्तव त्यास तिकडे लक्ष्य द्यावें लागलें. ओरटास यास फिलिपाचें करणें आवडलें नाहीं; म्हणून त्यानें तद्विरुद्ध प्रतिपादन केलें. त्याचा इतकाच परिणाम झाला कीं, पुढें थोड्याच वर्षांच्या आंत राजाज्ञेनें त्यास विष प्रयोग करण्यांत आला. इ- स. पू २१६ मध्यें हानिबाल यानें रोमन लोकांचा चार वेळ परामव केला. त्यावेळीं फिलिपानें त्याजबरोबर तह केला. त्यांत त्यानें हानिबाल यास मदत देण्याचें कबूल केलें असून असेंही ठरलें होतें कीं, रोमन लोकांचा पुरा पाडाव झाल्यास आद्रिआटिक समुद्राच्या पूर्वेकडील प्रदेश म्यासिडोनियाकडे राहावा. ती बातमी लागल्यावरून म्यासिडोनियन लोकांस इटालींत उतरण्यास

सवड मिळूं नये म्हणून रोमन लोकांनीं हर प्रयत्न चालविला. तसेंच हानिबाल इटाली देशांत असेंपर्यंत आपणास फिलिपाबरोबर युद्ध चालवितां येणार नाहीं हें जाणून त्यांनीं इटोलियन लोकांशीं सख्य केलें. ही गोष्ट इ. स. पू. २११ त घडली. दुसऱ्या कित्येक ग्रीक शहरांनीं ही याप्रमाणें तह केले. फिलिपानें ही इतर ग्रीक लोकांशीं व विथीयन लोकांचा राजा प्रुशियस याजबरोबर सख्य करून आपल्या पक्षास बळकटी आणिली. दुर्दैवेंकरून येथेंही ग्रीक लोक रोमन व म्यासिडोनियन लोकांकरितां आपआपसांत लढले. फिलिपाबरोबरचा युद्ध संग्राम चालविण्याविषयीं इटोलियनांस रोमन लोक टोंचीत होतेच; पण इ. स. पू. २०६ त त्यांनीं या लोकांस सहाय्य करण्याचें बंद केल्यामुळें फिलिपाबरोबर तो सांगेल त्या शर्तीं कबूल करून त्यांस तह करावा लागला. नंतर पुढील सालीं फिलिपानें रोमन लोकांशीं सख्य केलें; तरी रोमन लोकांनीं इलीरिकम प्रांताचा कांहीं भाग आपल्या हातीं ठेविला तो ठेविलाच. ग्रीस देशाच्या अंतर्व्यवस्थेंत रोमन लोकांनीं प्रत्यक्ष हात घातल्याचा परिणाम याप्रमाणें झाला.

सिलिशीयाच्या लढाईपासून आकियन लोक युद्धास दिवसेंदिवस अधिकाधिक कंटाळत चालले होतें. व आतां तर तें अगदीं उदास होऊन गेलें. परंतु त्यांचा मुख्य सेनानी स्ट्राटिजास फिलोपिमेन हा मोठा लढवय्या व तसाच मोठा मुत्सद्दीही होता. त्यानें त्यांच्यांत नवीन दम उत्पन्न केला. त्यानें आपलें लक्ष्य प्रथम स्पार्टाकडे दिलें. लायकरगसाच्या मृत्यूनंतर तेथें म्याकाहनिडास हा आपणास टायरन्ट म्हणवूं लागला. (इ. स. पू. २११.) आणि त्यानें आकियन लोकांबरोबर कलह मांडिला.

त्याची व फिलोपिमेन यांची मान्टीनियाजवळ मोठी लढाई झाली, तींत त्याचा पराभव झाला. म्याकाहनीडासा मागून टायरंटचा अधिकार नाविस यानें बळकाविला. तो क्रूरपणाचा मूर्तिमंत पुतळाच होता असें म्हटलें असतां चालेल. या वेळच्या ग्रीसच्या इतिहासांत ज्या ज्या अनर्थांबद्दल टायरन्टांची ख्याति आहे तसले सर्व अनर्थ त्यानें त्या शहरास भोगावयास लाविलें. रोमन लोक व फिलिप यांच्या दरम्यान झालेल्या तहांत एकानें दुसऱ्याच्या स्नेह्यांच्या वाटेस जाऊं नये असें ठरलें होतें. तरी फिलिपानें अनेक रीतींनीं तो ठराव मोडिला. यावेळीं असें घडलें कीं, आकारनेनियापैकीं दोन तरूण गृहस्थ आथेन्सांत रहात होते. त्यांनीं कांहीं धर्माविरुद्ध आचरण केल्याचा संशय आल्यावरून चवताळलेल्या लोकांनीं त्यांस जिवें मारिलें. त्यामुळें फिलिपाच्या मदतीनें आकारनेनियनांनीं आटिका प्रांतावर चाल करून लुटालूट चालविली. त्यावरून आथेनियन लोकांनीं परगमासचा राजा आटेलास याजबरोबर व ऱ्होडीयन लोकांबरोबर सख्य करून फिलिपाबरोबर युद्ध चालू केलें. फिलिपानें लागलाच आथेन्स शहरास वेढा दिला. रोमन आरमाराच्या सहाय्यानें आथेनियनांनीं त्यास हटवून लाविलें. तेव्हां मुंड उगवून घेण्यासाठीं म्हणून साधेल तिकडे तो मुलूख उध्वस्त करीत चालिला. इ. स. पू. २०० मध्यें रोमन लोकांनीं आटिका प्रांताचें संरक्षण करण्याचा बोजा उघडपणें आपल्या माथीं घेतला आणि कान्सल सल्पिशस गाल्बा यास सैन्य देऊन म्यासिडोनियावर पाठविलें. याप्रमाणें दुसऱ्या म्यासिडोनियन युद्धास आरंभ झाला. या उभय दळांस त्यांच्या त्यांच्या पूर्वीच्या स्नेह्यांचें पाठबळ होतें, तथापि लढाईच्या पहिल्या वर्षीं सांगण्यासारखें

कांहीं घडलें नाहीं. क्विन्क्टोनियस फ्लेमिन्टिनस यानें इ. स. पू. १९८ त आकियन लोकांस आपल्या पक्षास अनुकूळ करून घेतलें आणि त्यांच्या व इटोलियन लोकांच्या सहाय्यानें तो थेसलीवर चालून गेला. दोन्ही पक्षांच्या दरम्यान तोडजोडीचें बोलणें चाललें; परंतु त्यापासून कांहीं फलनिष्पत्ति न जहाल्यामुळें कायनासेफाली नामक स्थळाजवळ त्यांचें मोठें युद्ध होऊन विशेषेंकरून इटोलियन लोकांच्या मर्दुमकीनें फिलिपाचा पुरा मोड झाला. नंतर फिलिपानें ग्रीक शहरांतून असलेली आपली शिबंदी काढून न्यावी आणि डेमिट्रियस, आक्रोकोरिन्थास व चालसीस या तीन मोक्या किल्यांत रोमन लोकांचें लष्कर रहावें अशा शर्तीवर तह झाला. प्यारासइंब्रोस, डेलास व स्कामरास हीं बेटें आथेनियनांस परत मिळालीं. परंतु चमत्कार हा कीं, इजिना बेट त्यांना न मिळतां तें आटेलास राजास मिळालें. कायनासेफालीचा जय मुख्यत्वें करून इटोलियनांनीं मिळविलेला होता; त्यांस ही व्यवस्था पसंत पडली नाहीं. ग्रीस देशांतील तीन मोठ्या मोक्या किल्यांत रोमन लोकांचें लष्कर असेपर्यंत म्हणजे ग्रीस देशाचे पायांत या तीन बिड्या आहेत तोंपर्यंत त्याच्या मुक्ततेबद्दल फ्लुचामिनियस यानें दिलेलीं वचनें केवळ शुष्क शब्द समजलीं पाहिजेत, असे ते उघड बोलूं लागले.

या लढाईच्या पुढील वर्षीं म्हणजे इ. स. पू. १९६ त इस्तामियन नामक उत्सवाच्या वेळीं सर्व ग्रीक लोक एकत्र जमले असतां ग्रीस देश स्वतंत्र व मुखत्यार असल्याची द्वाही फ्लयामिनियस यानें फिरविली. यांत आपले धनी बदलले याबाहेर कांहीं झालें नाहीं, हें लक्षांत न घेतां लोकांनीं आनंदोत्सव केला. सिरियाचा राजा आन्टिओकस यास रोम विरुद्ध वागण्यास

हानिबाल चिथावित होता, आणि टायरन्ट नाबीस हाही आरगासांतून जाईना; म्हणून पुढें कांहीं काळ पर्यंत ल्फ्यामिनियस ग्रीस देशांत राहिला. अखेरीस ल्फ्यामिनियस यानें नाबीसास आरगासांतून जाण्यास भाग पाडिलें इतकेंच नाहीं, तर फार कडक शर्ती कबूल करून त्यास तह करावा लागला. मात्र स्पार्टा येथील टायरन्टाचा अधिकार त्याचा त्याजकडेस तसाच ठेविला. या गोष्टीबद्दल आकियन व इटोलियन या दोघांची ही कुरकुर राहिली. ग्रीक लोकांच्या संतोषार्थ रोमन लोकांनीं तीन ही किल्ले इ. स. पू. १९४ त सोडिले; परंतु आकियन लोकांस दिलेलीं समुद्रकांठचीं कांहीं शहरें परत घेण्याच्या उद्देशानें नाबीस यानें त्यांजबरोबर लढाई चालू केली. फिलोपिमेन हा आकियन लोकांचा सेनानी होता. त्यानें स्पार्टा शहरास वेढा दिला व नाबीसास सहाय्य करण्याचा बहाणा करून इटोलियनांनीं त्याचा खून केला, व किल्ला बळकाविला; परंतु या आपल्या विश्वास घातकी साथ्यांवर स्पार्टन लोक उठले, व त्यांनीं त्या बहुतेक सर्वांस मारून टांकिले. या धांदलींत फिलोपिमेन यानें शहराचाच नव्हे, तर सर्व ल्याकोनियाचा धनीपणा बळकाविला व तीं दोन्ही आकियन कटांत सामील केलीं. यामुळें आतां सर्व पेलपोनीसस प्रांत त्या कटांत आला.

कायनासकेफलीच्या लढाईपासून इटोलियन लोक रोमन लोकांवर फार संतापले होते. आतां ग्रीस देश जिंकणें फारसें कठीण नाहीं, असें सिरियाचा राजा आन्टिओकस यास समजावून त्यांनीं त्यास बोलाविलें. इ. स. पू. १९२ त तो राजा येऊन दाखल झाला; तेव्हां त्यास पुष्कळ ग्रीक शहरें मिळालीं; परंतु पाहिजे तितकें सैन्य त्यानें बरोबर नेलें नव्हतें; व लढाईचें

कामही फारसें नेटानें चालविलें नाहीं. इ. स. पू. १९१ त आसिलियस ग्लाब्रिओ नामक कान्सलानें थरमापिलीजवळ त्याचा पराभव केला. त्यावरून तो परत आशियांत गेला. त्या कान्सलास इटोलियन लोकांवर लवकचर दुसराही जय मिळाला. नंतर त्यांजबरोबर सहा महिन्याचे मुदतीचा तह करण्यांत आला. तो संपतांच त्यांनीं पुनः युद्धास सुरवात केली; परंतु इ. स. पू. १८९ त त्यांस रोमचें वर्चस्व कबूल करून तहकरणें भाग पढलें. त्याचप्रमाणें लढाईचा खर्च देण्याचें, इटोलीयाबाहेरचीं सर्व शहरें आपल्या कटांतून वगळण्याचें, आणि रोमचे शत्रू ते आपले शत्रू व त्याचे मित्र ते आपले मित्र मानण्याचें कबूल करावें लागलें. या प्रमाणें त्यांचा कट फुटून आतां त्यांत फक्त इटोलियांतील शहरें मात्र राहिलीं.

फिलोपिमेन यानें स्पार्टा शहर बळकाविल्यावर थोडीं वर्षेपर्यंत तें स्वस्थ राहिलें; परंतु इ. स. पू. १८८ त त्याच्यांत व स्पार्टन लोकांत वाद लागला. आपला निवाडा करण्यासाठीं रोमच्या सिनेट सभेस उभयपक्षांनीं विनंती केली; परंतु तिकडून संदिग्ध उत्तर आल्यामुळें इनसाफाचें काम फिलोपिमेनानें आपल्याच हातीं घेतलें. नाबिसानें हद्दपार केलेल्या लोकांस त्यानें स्वदेशीं बोलाविलें, आणि आकियनांविरुद्ध असणाऱ्या पुढारी लोकांस देहांत शिक्षा दिल्या. इतकेंच करून तो थांबला नाहीं; त्यानें स्पार्टन लोकांकडून प्रजासत्ताक राज्यपद्धति चालू करविली. ह्या उलटापालटी झाल्यानें स्पार्टन लोकांस फार संताप आला; परंतु त्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें तो गिळून जाऊन आलेला प्रसंग त्यांस सहन करावा लागला. इ. स. पू. १८३ त मेसिनियन लोक आकियनापासून फुटले. यामुळें फिलो-

पिमेन यास त्यांजवर चालून जावें लागलें. तिकडे जात असतां वाटेंत कांहीं मेसिनियन स्त्रीयांनीं त्याजवर हल्ला करून त्यास जिंकिलें व मरणोन्मुख अवस्थेंत त्यास मोठ्या समारंभानें मेसिनी येथें नेला. तेथें लोकांनीं त्यास देहांत शिक्षा दिली. ती त्यानें आपल्या एकंदर आयुष्य क्रमास उचित अशा शांत वृत्तीनें सोशिली. त्याच्या मागून त्याच्या जागीं इतिहासकार पालिबियस याचा बाप लिकोर्टस हा झाला. त्यानें मेसिनिया प्रांत परत घेतला; व फिलोमेन यास दोषी ठरविण्यांत पुढारी असलेल्या लोकांस ठार मारिविलें.

परंतु असल्या जुलमी व दांडग्या उपायांनीं शांतता प्राप्त झाली नाहीं. तरी रोमच्या बलाढ्य बाहूंनीं ग्रीक संस्थानांची कर्तृत्वशक्ति नष्ट होऊन हे आपसांतील छोटेखानी तंटे मिटले जाण्याची वेळ येत चालली होती. म्यासिडोनच्या फिलिप राजा कडून रोमन लोकांनीं सक्तीनें कबूल करविलेला हा तह त्यानें कांहीं कळपर्यंत पाळिला; पण त्यामुळें आपली मानहानी होते असें दिसल्यावरून त्यानें शेवटीं दुसऱ्या लढाईची तयारी केली. तथापि कुटुंबांतील कलहामुळें त्यास कल्पोंचवितां आली नाहीं. परसियस नामक मुलानें दुसरा मुलगा डेमिट्रियस यास ठार मारण्याविषयीं त्याचें मन कपटानें कळविलें होतें. पुढें या कामांत आपण कसे फसलों तें त्यास समजलें तेव्हां त्यास पश्चात्ताप झाला व त्या योगें सन १७९ तं तो मरण पावला. त्याच्या मागून परसियस गादीवर बसला. तो रोमन लोकांचा बापापेक्षांही जास्त द्वेष करित असे. बाप करित असलेली लढाईची तयारी त्यानें जारीनें चालविली; व पुष्कळ राष्ट्रांचा स्नेह संपादन अरून आपलें सामर्थ्य वाढविलें. या

उद्योगांत त्याच्या कारकिर्दीचीं पहिलीं सात वर्षें निघून गेलीं; कारण इ. स. पू. १७१ पर्यंत लढाई प्रत्यक्ष सुरू झाली नाहीं. परिल्या तीन वर्षांत तर सांगण्यासारिखें कांहींच झालें नाहीं. तरी आपण रोम शहरास सहाय्य करण्यापेक्षां म्यासिडोनास करणें चांगलें, असें ग्रीक लोकांस सर्वत्र वाटूं लागलें होते. तथापि आपला खजिना खुला करण्याचा पराशियसाचा निश्चय होईना. या मुळें त्याचे परमुलखी स्नेही एकामागून एक त्यास सोडून गेले. शेवटीं इ. स. पू. १६८ त पायडनाजवळ मोठी निकराची लढाई झाली, तींत रोमन सरदार इमिलिसस पौलस यानें त्याचा पराभव केला. पराशियस आपला खजिना घेऊन पळाला; परंतु शत्रूनें त्यास गांठिलें आणि बंदीवान करून रोम शहरास पाठविलें.

या लढाईंत आकियन लोक नाखुषीनें खरे, तरी पण रोमच्या तर्फेनें लढत होते. परंतु लढाई संपल्यावर त्यांतून पुष्कळांवर उघड अगर गुप्त रीतीनें म्यासिडोनचा पक्ष स्वीकारिल्याचा आरोप आला. त्यामुळें १००० हून जास्त लोकांस (व त्यांतच इतिहासकार पालिबियस यास) कैद करून रोम शहरीं पाठविलें. तेथें गेल्यावर निरनिराळ्या शहरांत त्यांची वांटणी करून त्यांस ओलिस ठेविले. अशा स्थितींत ते १७ वर्षें राहिल्यावर शेवटीं त्यांस स्वदेशीं जाण्याची मोकळीक झाली. तेव्हां मृत्यूनें त्यांची संख्या २०० पर्यंत आणून ठेविलीं होती, आशाच प्रकारचा संशय असलेल्या इटोलियन लोकांस या पेक्षां फार कडक रीतीनें वागविलें; कारण त्यांच्यांतील ९०० नामकित इसमांस जिवें मारिलें, व पुष्कळांस गुलाम करून ठेविले.

हीं अरिष्टें मोठींच होतीं; तरी त्यांहून खडतर तीं अजून यावयाचींच होतीं. या वेळीं आथेनियन लोकांची इतकी कंगाल-स्थिती झाली होती कीं, आपल्याच मुलखांतील ओरेपास नामक शहरांत लूट करण्याचा त्यांस प्रसंग आला. त्यावद्दल रोमन सिनेटकडे कागाळी गेल्यावरून चौंकशी करण्यासाठीं पंच नेम-ण्यांत आले. आथेनियन लोक पंचापुढें आले नाहींत; म्हणून त्यांनीं ५०० त्यालेंट दंडाबद्दल द्यावे असा ठराव झाला. ही रक्कम उभी करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें सवलतीचा हुकूम होण्या-विषयीं त्यांनीं सिनेट सभेस अर्ज केला. तेव्हां दंडाची रक्कम कमी करून १०० त्यालेंटच कायम ठेविले. नंतर कांहीं काळ गेल्यावर ओरेपासवर पाहिल्याप्रमाणेंच जुलूम झाला. या वेळीं दाद मिळण्यासाठीं ओरेपासच्या लोकांनीं आकियन लोकांस विनंती केली व त्यांच्या सक्तीच्या हुकूमानें अशा घोरपडीपासून पुढें त्या शहराचें रक्षण झालें.

दरम्यानच्या मुदतींत म्यासिडोनियांत एक तोतया उत्पन्न झाला. आपलें नांव फिलिफ असून आपण परशियसाचा पुत्र आहें असें म्हणून तो राज्यावर हक्क दाखवूं लागला. म्यासि-डोनियन लोकांस रोमन ताबदारोचा वीट आला होता. यामुळें त्याच्या बोलण्यावर त्यांचा एकदम विश्वास बसला व ते त्यास जाऊन मिळाले. पुढें लढाया सुरू झाल्या, त्यांत आरंभीं तोत-याचा कांहीं फायदा झाला, पण इ. स. पू. १४८ त सिसिलियस मेटेलस यानें त्याचा पराभव केला. नंतर विजयोत्कर्ष दर्शवि-ण्याकरितां तो त्यासह रोम शहरीं गेला. या लढायांत ग्रीक लोकांनीं रोमन लोकांशीं लहानसहान शुल्क चुरशीचीं वरींच कृत्यें केलीं. इतर थोर रोमन गृहस्थांप्रमाणें मेटेलस याचाही ग्रीक

लोकांवर लोभ असून त्यांच्या हितास तो झटत असे; म्हणून "तुम्ही स्वस्थ राहिल्यास तुमचीं दुःखें काय आहेत त्याचा रोमन पंचा मार्फत तपास करतीन" असें त्यानें वचन दिलें. हे पंच कोरिंन्थ येथें गेले, तेव्हां एकत्र जमलेल्या आकियन लोकांनीं त्यांचें योग्य आदरातिथ्य न करितां फार अपमान केला. खुद्द मेटेलस यानें पाठविलेल्या वकिलास याहून कांहीं जास्त यश मिळालें नाहीं. साहसी व बेफिकीर पुढाऱ्यांच्या भरीस पडून आकियन लोकांनीं रोम बरोबर युद्ध करावें असा मूर्खपणाचा ठराव केला. म्यासिडोनीयांतील व्यवस्था लावून थेसली जिंकिल्यावर मेटेलस आपल्या सैन्यासह बिओशियांत गेला (इ. स पू. १४७). आकियनांच्या सेनानी क्रिटोलेअस याच्या मनांतून रोमन लोकांस थरमापिली येथें अडवावें असें होतें; परंतु त्यास तिकडे जाण्यास वेळ लागला व दोन वेळां पराभव झाल्यामूळें तो जो पळाला तो पुनः नजरेस पडला नाहीं.

आकियन लोकांस आतां आपला मूर्खपणा कळून आला, कारण मेटेलस बिओशियांत शिरला असतां एका रोमन आरमारांतील सैन्य पेलापोनीसांत उतरलें व देश उध्वस्त करित चाललें. यावेळीं डाइओस हा आकियन लोकांचा सेनानायक होता. तो रोमन लोकांचा कट्टा वैरी हे ता. त्यानें आकियन लोकांचें अवशिष्ट सैन्य व हत्यारे दिलेले गुलाम कोरिन्थच्या जवळ पास एकत्र जमविले. मेटेलसानें थीब्स शहराचा फडशा उडविला व नंतर मिगारावर चाल केली आणि ग्रीक लोकांनीं शस्त्रें खालीं ठेवून शरण यावें ह्मणून आणखी एकवार प्रयत्न करून पाहिला. परंतु मदांध झालेल्या डाइओसानें त्याचें बोलणें कांहींएक ऐकिलें नाहीं. हीं बोलणी चालूअसतांच मेटेलस

याच्या अधिकाराची मुदत संपली व त्याच्या जागीं एक ममियस हा आला. तो निव्वळ आडदांड शिपाई असल्यामुळें त्याला ग्रीक लोकांचा ओढा मुळींच नव्हता. त्यानें मोठ्या सैन्यानिशीं संयोगी भूमि आपल्या स्वाधिन करून घेतली आणि कोरिन्थ नजिक ल्युकोपेट्रा येथें इ. स. पू. १४३ त लढाई दिली. तींत ग्रीक लोकांच्या नशिबाचा कायमचा निकाल लागला. कांहीं आशा राहिलेली नाहीं असें दिसून आल्यावर डाइओस थोड्याशा लोकांनिशी आपला गांव मेगालापोलीस येथें पळून गेला. तेथें गेल्यावर आपल्या पत्नीस मारून आपली कोणतीहीं वस्तु रोमन लोकांच्या हातीं लागूं नये म्हणून त्यानें घरास आग लावून दिली, व स्वतः विष प्रयोग केला. त्या लढाई नंतर तीन दिवसांनीं ममिअस कोरिन्थ शहरांत शिरला आणि आग लावून तें जाळून पोळून टांकण्याचा हुकूम केला. रहिवाशांपैकीं वयांत आलेल्या पुरुषांस मारून टांकिलें व बाकीच्यांस गुलाम करून विकिलें. ग्रीसांतील आकियन व इतर सर्व कट मोडून टांकिले. कोरिन्थचा प्रदेश रोमन मुलखांत सामिल झाला. रोमन शिपायांनीं सर्व पेलापोनीसास असें उध्वंस्त करून टाकिलें कीं, त्यास आतां निर्जन वनाची उपमा आली. प्रथम चालूकेलेल्या जुलमी उपायांचा कडकपणा पुढें कमी करण्यांत आला व रोमन लोकांच्या अमलांतही पुष्कळ ग्रीक शहरांस स्थानिक स्वराज्याचे हक्क प्राप्त झाले. आकाया या नांवानें सर्व ग्रीसदेश रोमन राज्याचा एकदम प्रांत बनला किंवा कसें हें निश्चयानें सांगवत नाहीं. परंतु एवढें खरें कीं, त्याचें राजकीय अस्तित्व मावळलें. आतां त्यास ज्या कांहीं सवलती मिळाल्या त्या

कलाकौशल्य व लेखन विद्या यांतींल त्यांच्या अनुपम श्रेष्ठत्वा-
मुळेंच मिळाल्या; कारण अन्यत्र कोठेंही लाभ होण्याचा,
संभव नाहीं असलें मानसिक शिक्षण मिळविण्याची अपेक्षा
कारणाच्या पृथ्वी वरील सर्व प्रदेशांतील तरूणांस यापुढें आथेन्स
हेंच विशेषेंकरून चित्ताकर्षण करणारें स्थळ झालें.

पुरवणी,

इ. स. पूर्वी वर्ष १४६ पासून इ. स. १८६२ त जार्ज राजा सिंहासनारूढ झाला तेथपर्यंतच्या ग्रीस देशाच्या इतिहासाचा सारांश.

ग्रीस देश सर्वांशीं परकी लोकांच्या अंमला खालीं प्रथम गेला तो कोरिन्थ जिंकिलें गेलें तेव्हां. त्या पुढच्या दोन. हजार वर्षांचा त्या देशाचा इतिहास झटला म्हणजे पर. अमलांत भोगिलेल्या यातनांचा वृत्तांत होय.

इ. स. पूर्वीचें वर्ष १४६ पासून इ. स. ३२४ पर्यंत म्हणजे चारशें पन्नास वर्षांहून जास्त मुदतपर्यंत ग्रीस देशांत रोमन लोकांनीं सत्ता गाजविली. त्यांच्या मागून म्हणजे इ. स. ३२४ पासून इ. स. १४३२ पर्यंत तेथलें राज्य बादशहनशाम येथील बादशाहांकडेस होतें. वास्तविक पहातां त्यांस परकी म्हणतां येण्यासारखें नाहीं; कारण पूर्वेकडील पातशाहात जरी प्राचीन खऱ्या हेलनिक राजपद्धतीहून काहींशीं निराळी होती तरी एकंदरीनें ती ग्रीक धर्तीवरच होती. तिचा अंमल ग्रीसांत असतांच उत्तर, पूर्व व दक्षिण या दिशांकडून बारबेरियन (परके) लोकांनीं त्या देशावर स्वाऱ्या केल्या व त्यांतील कांहीं भाग आपल्या ताब्यांत घेतले. अखेरीचीं ४०० वर्षें तर (इ. स. १४५३ पासून इ. स. १८२१ पर्यंत) ग्रीक लोक निर्दय व पशुवत क्रूर तुर्कांच्या अंमलाखालीं होते व त्या देशाच्या बऱ्याचशा मोठ्या भागावर अजून ही त्यांची सत्ता आहेच.

या दोन हजार वर्षांत परक्यांचा अंमल ग्रीक लोकांनीं अगदी मुकाट्यानें सोसला असें नाहीं; आपणावर जुलूम करणारां विरुद्ध त्यांची बंडाळी बहूदा हमेश चालूच होती. त्यांचे राष्ट्रीय स्वातंत्र्य गेलें होतें, तरी आपली स्थानिक स्वराज्य पद्धति कसब्यांतून व शहरांतूब त्यानीं जारी ठेविली होती. शिवाय परकी लोकांच्या अगाध शक्ति खालीं ते चुरडून गेले होते, तरी त्यांची उपजत बुद्धि आणि त्यांची भाषा व ग्रंथ रचना यांचा त्याच्या जुलमी सत्ताधिशांवर मानसिक व नैतीक वचक असे; आणि शेवटीं आपलें स्वातंत्र्य व अधिकार हीं त्यानीं संपादन केलीं, तीं तरी त्यांच्या या राष्ट्रीय सामर्थ्याच्या व बुद्धिवैभवाच्या जोरावरच केलीं.

भाग १.

ग्रीसांतील रोमन लोकांची कारकीर्द (ख्रि. पु. वर्ष १४६ ते इसवी सन ३२४ पर्यंत.)

आरंभीं तरी ग्रीक लोक स्थानिक स्वातंत्र्याचा उपभोग घेत होतें, हें मागील भागांत दर्शविलेंच आहे. प्रत्येक महत्वाच्या शहरांत त्यांतीलच एक रहिवाशी अंमल करीत असे; आणि मोठमोठे रोमन लोकही आपल्या पराजित प्रजेच्या बुद्धिवैभवास मान देण्यास सिद्ध असत, इतकेंच नव्हे तर त्यांची भाषा व ग्रंथ अवगत असणें हें भूषण समजत. शिक्षणानें ते हेलनिकच बनले होते; ते ग्रीक भाषा बोलत व लिहित असत, व ग्रीस देशास आपल्या ज्ञान भांडराची मातृभूमि मानीत. आथेन्साचा 'नगर-वासी' म्हणवून घेण्यांत बादशाहांसही भूषण वाटे. परंतु दुर्दैवानें रोमन लोकांवर जो हा ग्रीकांचा पगडा बसला तोच साधारण सर्व रोमन लोकांत त्यांच्या विषयीं मत्सरबुद्धि उत्पन्न होण्यास कारण झाला. कारण त्यामुळेंच 'ग्र्याक्युलस' हें स्नेह बुद्धिचें व मानाचें दर्शक उपपद तिरस्कारास्पद झालें.

ग्रीस देशाची नैसर्गिक स्थिती व रचना व जागाच अशी आहे कीं रोमन लोकांच्या आपसांतील किंवा परराष्ट्रां बरो-बरील लढायांची तीच रणभूमी व्हावी. यामुळें आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची प्रत्येक संधी साधण्यास ते सदा तत्पर असत; आणि त्यामुळेंच ग्रीस देशावर अधिकाधिक संकटें ओढवत गेलीं. या प्रमाणें ख्रिस्ती शकाच्या पूर्वीलं शेवटच्या शतकाच्या आरंभीं पान्टस येथील राजा मिथ्रिडेटस यानें रोमन लोकांस आशिया मायनरांतून हांकून लाविल्यानंतर, त्यानें त्यांजबरोबर युरो-

पांतही लढाई चालविली. तेव्हां त्या कामीं त्यानें ग्रीक लोकांचें सहाय्य मागितलें व त्यांनीं तें दिलें. त्यानें ग्रीस देशांत अफाट सैन्य पाठविलें; तेव्हां ल्याकेडेमोनियन, आकिनियन, थीबन व व विशेषेंकरून देशाभिमानी आथेनियन त्यास येऊन मिळाले. प्रथम प्रथम मिथ्रिडेटस यास जयच मिळत गेला; व कांहीं काळपर्यंत ग्रीक लोकांनीं आपलें पूर्वील स्वातंत्र्य अनुभविलें. येऊन भिडलेल्या या अरिष्टानें ख्रि. पु. वर्ष ८७ यांत रोमन लोक शुद्धीवर आले, व त्यांनीं एल. कार्नेलियस सल्ला यास ग्रीस देशावर पाठविलें. त्यानें बंडावा करणारीं बहुतेक शहरें परत जिंकिलीं व पिरेइयस बंदरास सक्त वेढा दिला. फक्त आथेनियन लोक टेंक धरून राहिले होते; पण पुढील सालीं अन्न पाण्याच्या आपदेमुळें त्यांसही शरण जाणें भाग आलें. त्या विजयी सरदाराचा क्रोध फार भयंकर होता. पिरेइयस बंदर अगदीं नाहींसें करण्यांत आलें, व आथेन्स शहरांत सरसकट सर्वांची एक सारखी कत्तल उडविली. सहस्रावधि लोकांस बोकडासारखे चिरले, व त्याच प्रमाणें सहस्रावधी लोकांस गुलाम करून विकिले. हीच दशा थीब्स व इतर शहरांची झाली. डेल्फाप, आलिम्पस, व एपिडारस येथील सुंदर व धनाढ्य देवालयें लुटिलीं, त्यांतील सोन्या रुप्याचे मौल्यवान जिन्नस आटवून त्यांचें नाणें पाडिलें; व कलाकौशल्याच्या अति सुबक व मौल्यवान चिजा रोम शहरीं पाठविल्या. यांतील बऱ्याच वाटेंत समुद्रांत बुडून नाहींशा झाल्या.

या नाशकारक लढाईस फार दिवस होऊन गेले नाहींत तोंच त्या कालचे परम विख्यात रोमन सरदार पाम्पी व जुलियस सीझर यांच्यांत राज्याधिकाराबद्दल कलह उत्पन्न झाला.

ह्या कलहानें राष्ट्रभर परस्पराविरूद्ध असे दोन पक्ष बनले. आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची सदा आशा करीत बसलेले ग्रीक लोक त्यांस मिळाले. या झटपटी ग्रीस देशांत चालल्या व त्यांचा अंतही तेथेंच झाला. आथेनियन, बिओशियव, पेलापोनीशियन हे पाम्पीच्या पक्षास मिळाले; व आकारनेनियन इटोलियन व इपिरोटसमधील कांहीं भागाच्या लोकांनीं सीझरचा पक्ष उचलिला. इसवी सनापूर्वी ४८ व्या वर्षी थेसलींत फारसालास येथें झालेल्या मोठ्या लढाईंत सीझरानें आपल्या प्रतिपक्षाचा मोड केला. सर्व ग्रीसास आतां त्यास शरण जाण्याची पाळी आली; परंतु त्यानें लोकांशीं सलूचापेक्षां अधिक ममतेचें वर्तन केलें. मिगेरियन लोकांवरही बरीच कडक शिस्त ठेविली. आथेनियन लोकांच्या प्राचीन वैभवाबद्दल त्याच्या अंत:करणांत पूज्य बुद्धि वसत असून तो त्यांची फार तारीफ करीत असें; म्हणून त्यानें त्यांस देणग्याही दिल्या; आणि ममीयसानें नाश अरून टांकिल्यापासून मोडकळीच्या स्थितींत असलेलें कोरिन्थ शहर पुनः बांधण्यांत आलें (इसवी सना पूर्वी वर्ष ४८).

पुढें दोन वर्षांनीं सीझर मारला गेल्यानंतर ग्रीस देशांत पुनः आपसांतिल झगडा सुरू झाला, त्यात एका पक्षांत आन्टोनी व आक्टेव्हियस हे असून दुसऱ्या पक्षास ब्रुटस व क्याशियस हे होते. आथेनियन लोकांनीं पुनः शस्त्र उचलिलें, आणि ते ब्रुटस व क्याशियस यांस मिळाले. ल्याकेडेमोनियनांनीं आन्टोनी व आक्टेव्हियस यांचा पक्ष स्वीकारिला. इसवी सनापूर्वी वर्ष ४२ यांत आन्टोनी व आक्टेव्हियस यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पूर्णपणें मोड केला व रोमन राष्ट्र आपसांत वांटून

घेतलें. या वांटणींत ग्रीस आन्टोनीकडे गेलें. त्याचें स्वत:चें अध्ययन ग्रीस देशांतच झालें असल्यामुळें तो आथेनियन लोकांशीं फार सौजन्यानें व औदार्यानें वागे; वारंवार त्या प्रसिद्ध शहरीं राहून त्याच्या रीतीभातींचा स्वीकार करी; व 'फिलहेलनी' व 'फिलआथेनियस' म्हणजे ग्रीसचा व आथेन्सचा हितचिंतक म्हणवून घेण्यांत त्यास अभिमान वाटे.

परंतु ही शांतता फार मुदत चालली नाहीं. आन्टोनी व आक्टेव्हियस यांत लवकरच लढाई सुरू झाली. ती ग्रीस देशांतच होऊन बहुतेक ग्रीक लोकांनीं आन्टोनीचा पक्ष स्वीकारिकाला. आक्टीयन येथील लढाईंत इ. स. पूर्वी ३१ व्या वर्षी आन्टोनीचा पूर्ण पराभव झाला. आक्टोव्हियस (यास या पुढें आगस्टस असें म्हणूं लागले) ग्रीक लोकांशीं ममतेनें वागला. पाट्री शहराचें पुनरुज्जीवन करण्याचा त्यानें हुकूम केला, व जेथें त्याचा विजय झाला तेथें त्यागोष्टीच्या स्मरणार्थ निकापोलीस (विजयाचें) नामक शहर वसविलें. लवकरच पाट्री व आथेन्स हीं मोठ्या वस्तीचीं व ग्रीसांतील अत्यंत सधन नगरें बनलीं. आगस्टसाच्या व त्याच्या मागून गादीवर बसलेल्या बादशाहांच्या कारकीर्दीत रोमन राष्ट्रास प्राप्त झालेल्या स्वस्थतेचा सुपरिणाम ग्रीस देशावर ही घडला आणि पुष्कळ शहरांस व विशेषें करून आथेन्सास पूर्वीच्या स्थानिक स्वराज्याचा लाभ मिळाला. तथापि कालिग्युला, निरो वैगेरे प्रथम प्रथमच्या बादशाहांनीं ग्रीस देशांतील कलाकौशल्याचे पदार्थ तेथून नेले; ट्रेजन व विशेषें करून हेड्रियन वैगेरे दुसऱ्या बादशाहांनीं ताबेदार ग्रीकांवर लोभ व पूज्यबुद्धि दाखविण्याची कोणतीही संधी व्यर्थ जाऊं दिली नाहीं. हेड्रीयन वारंवार आपल्या आवडत्या

आथेन्स नगरींत राहत असे. त्यानें सार्वजनीक इमारती बांधून शहरास शोभा आणिली, व आथेन्सचा 'आरकन युपोनिमस' या हुद्याचें त्यास मोठें भूषण वाटत असें.

हें सर्व खरें असतांही ग्रीस देशाची स्थिती वर्षानुवर्ष निकृष्ट होत चालली. रक्तपाताच्या लढाया वारंवार झाल्यामुळें लोक संख्या कमी झाली; मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या आभावानें व्यापार व उद्योग धंदे बसले व रोमन लोकांच्या द्रव्य तृष्णेनें सधन शहरें निर्धन झालीं. रोमन लोकांच्या असभ्य चाली रीति व मल्लांचे खेळ यांच्या योगानें लोकांचीं मनें भ्रष्ट झालीं आणि कलाकौशल्य व विद्या यांजबद्दलची त्यांची अभिरुची बिघडून त्यांत विपर्यास पडत चालला.

देशाची अशी दैनावस्था असतां उत्तरेकडून एक अरिष्ट त्यांजवर येऊन पडण्याची भीति उत्पन्न झाली. या संधीस प्राचीन रशिया व उत्तर जर्मनी यांत असलेले गाथ लोक रोमन राष्ट्रावर स्वाऱ्या करूं लागले. जेथें जातील तेथें ते लोक जें सांपडेल त्याचा नाश करीत. इ. स. २४५ त ते ग्रीस देशावर स्वारी करण्यास निघाले. झरक्सीसाच्या वेळीं केल्याप्रमाणें आतांही ग्रीक लोक थरमापिली येथें दबा धरून बसले. आथेनियन लोकांनीं आपली तटबंदी पुनः बांधिली आणि पेलापोनीशन लोकांनीं कोरिन्थच्या सामुद्रधुनीची डागडुजी केली. या योगानें आणि थ्रेसमध्यें रोमन लोकांनीं गाथ लोकांचा पराभव केल्यामुळें त्या वेळीं ग्रीसचा बचाव झाला. परंतु २६७ वर्षीं गाथ लोकांनीं जलमार्गानें ग्रीसवर स्वारी केली, आणि कोरिन्थ, आरगास आणि दुसरीं द्वीपकल्पावरील पुष्कळ शहरें व बेटांतील

शहरें यांचा त्यांनीं नाश केला. आथेनियन लोक मोठ्या शौर्यानें लढले; पण शेवटीं त्यांस हारीं जावें लागलें. त्यांच्या सुंदर शहरांत लुटालुट व नाशधूळ केली, रक्ताचे पूर वाहविले. त्या आडाणी लोकांनीं शहरांतील स्मारकांचा नाश केल्यावर पुस्तकालयांतील हस्तलिखीत ग्रंथंही जाळून टाकण्याचा त्यांचा विचार होता. पण इतक्यांत "ग्रीक लोकांस त्यांचे ग्रंथ शिलक ठेवा; कारण ते वाचण्यांत ते गुंतले आहेत तोंपर्यंत त्यांस आपल्या शस्त्राचें स्मरणही होणार नाहीं व तसें झाल्यानें त्यांस पाहिजे तेव्हां जिंकण्यास अडचण पडणार नाहीं" असें त्यांच्यांतीलच एक गृहस्थ तिरस्कारयुक्त वाणीनें बोलल्यामुळें त्या हस्त लिखीत ग्रथांचा बचाव झाला. जयप्राप्तीनंतर गाथ लोक आपल्या रानटी आनंदोत्सवांत गर्क झाले आहेत आशा संधीस आथेनीयन लोकांचा शूर सरदार जो इतिहासकार डक्सीपास ह्यानें आपलें राहिलेलें सैन्य एकत्र करून शत्रूवर छापा घालून त्याचा अगदीं मोड करून टांकिला. जे कांणी पळून इलिरिकम येथें गेले त्यांचा ग्यालीनस बादशाहानें बहुतेक सर्वांशीं नाश केला. नंतर दोन वर्षांनीं पूर्वी पेक्षां मोठ्या भरण्यानें व २०० गलबतांनिशी गाथ लोकांनीं थ्रेस, म्यासिडोनिया, थेसली व ग्रीस देशाचे इतर भाग यांजवर हल्ले केले. परंतु प्रत्येक ठिकाणीं ग्रीक लोक व बादशाहा क्लाडियस यांनीं मिळून त्यांचा पराभव केला. पुढें दोन शतकें पर्यंत या आडदांड लोकांच्या हल्ल्या पासून ग्रीस देश सुटला होता; परंतु दिवसें दिवस दुर्बळ होत चालेलेल्या रोमन राष्ट्रांतिल वरचेवर होणाऱ्या गडबडीमुळें त्यांचें बरेंच नुकसान झालें.

ग्रीस देशांत व तेथून जगाच्या सर्व सुधारलेल्या भागावर जिचा परिणाम घडून आला अशी अत्यंत महत्वाची गोष्ट झटली

म्हणजे ख्रिस्ती धर्माचा प्रसार ही होय. ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकाचीं पन्नास वर्षें झालीं, त्या सुमारास ख्रिस्ती धर्मोपदेशक पाल यानें म्यासिडोनीयांत व विशेषें करून थेसालो नाव्हीके येथें त्या धर्माचा उपदेश केला. तेथें लोकांकडून छळ झाल्यामुळें तो पुढें अंथेन्सांत गेला; परंतु त्याच्या उपदेशा पासून तेथें फारसा उपयोग झाल्याचें दिसत नाहीं. तेथून तो कोरिन्थांत गेला व तेथें त्यास चांगलें यश आलें; आणि येथून ग्रीसच्या पुष्कळ प्रांतांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला. या वेळीं भूमध्य समुद्राच्या बहुतेक मुलखांत लोक ग्रीक भाषा समजत अमून तीच बोलत असत. पहिल्या शिकंदर बादशाहाच्या विजयानें मिसर देश व आशियाखंडाचा बराच भाग ग्रीक बनला होता. हा ग्रीक भाषेचा सार्वत्रिक प्रसारच प्राचीन काळीं ज्ञात असलेल्या जगावर ख्रिस्तीधर्म पसरण्याच्या कामीं मोठें बाह्य साधन झाला.

रोमन राष्ट्र अधिकाधिक पोकळ होत चाललें असून त्याचा विनाश होण्याचा समय नजिक आला होता. परंतु उलट पक्षीं चालू असलेल्या स्थिती पेक्षां चांगल्या स्थितीचें बीज ग्रीक लोकांच्या जोमदार व मर्दानी बुद्धिप्रावल्य व ख्रिस्ती धर्माचें अप्रतिहत सामर्थ्य यांतच होतें. ही गोष्ट बादशाह कान्स्टन्टाईन, ज्यास ग्रीग्रेट (थोरला) असें ह्मणत, त्याच्या लक्षांत आली (३०६-३३७). त्यानें बायझनटाइन राष्ट्राची स्थापना करून आपण ख्रिस्ती धर्म कबूल केला व तो आपल्या राज्यांत चालू केला.

भाग २

वायझनटाइन् कारकीर्द इ. सन १३० पासून १४५३ पर्यंत.

कान्स्टनटाईन याच्या अंत:करणांत खिस्ती धर्माचें बीजा रोपण त्याची आई हेलन इनें केलें असावें असें दिसतें. कारण तो जन्मत: मूर्तिपूजक असून त्याचें शिक्षण तशांतलेंच होतें. सन ३०६ त तो बादशाह झाला. म्याक्सेन्टीयस याजबरोबर युद्ध करण्याचा प्रसंग आला तेव्हां त्यास आकाशांत 'हा घेऊन विजयी हो' अशीं अक्षरें लिहिलेला एक चकचकीत क्रुस दिसला, असें म्हणतात. हें आपल्या पुढील वैभवाचें चिन्ह होय असें त्यानें मानिलें, व त्यावेळापासून तो खिस्ती धर्मानुय्रायांवर कृपादृष्टी ठेवूं लागला. या नंतर त्यानें आपल्या सैन्या करितां लाबारम नांवाचें नवें निशाण तयार केलें व त्याजकर खिस्ताचें नांव काढविलें. त्या वेळापासून लाबारम हेंच ग्रीक राष्ट्राचें सूचक होऊन राहिलें आहे. त्यांच्या कारकीर्दीत सर्व राष्ट्रांत खिस्ती दिक्षा चालू झाली. खिस्ती मंदिरांस मोठमोठ्या देणग्या मिळून त्यांचें संरक्षण होऊं लागलें; व रविवार हा ईश्वर भजनाचा स्वतंत्र दिवस ठरविण्यांत आला. फार दिवस चाललेल्या लढायांनीं व क्रांतींनीं कनिष्ट प्रतीच्या लोकांची फार दैना उडाली होती. ह्या बादशाहाच्या शहाणपणानें व दृढनिश्चयानें आतां या लोकांची स्थिती सुधारत चालली. त्यानें राज्यांत व्यवस्था व न्यायमनसुबी मोठ्या खंबीरपणानें चालू केली,

आपल्या राज्याच्या पूर्वेकडील राजधानीची जागा निवडण्याच्या कामीं त्यानें दीर्घदर्शीत्व दाखविलें तितकें दुसऱ्या

कोणत्याही गोष्टींत स्पष्ट दिसून येत नाहीं. आपल्या राज्याचा पश्चिमेकडील भाग आतां फार दिवस टिकणार नाहीं अशी त्याची खात्री झाल्यावर त्यानें पूर्व भागांत म्हणजे ग्रीस देशांत आपली गादी स्थापिली. प्राचीन बायझनशम शहराच्या जागीं त्यानें पूर्व राष्ट्राची राजधानी इ. स. ३३० वसविली व ती आपल्या म्हणजे कान्स्टंटियानेंपोलीस या नांवानें चालू केली. तें स्थळ सर्व प्रथ्वीवरील अति रमणीय स्थळांपैकीं असून व्यापाराच्या व लढाईच्या कामीं फार सोईचें आहे. प्राचीन रोम शहरांतील कलाकौशल्याच्या जिनसा व धर्मसंबंधीं स्मारकें तेथून काढून या नूतन रोमांत नेलीं. आणि नवीन राजवाडे व इतर सार्वजनीक इमारती बांधून शहरास शोभा आणिली; आणि बंदोबस्ता करितां विस्तृत तटबंदी केली; व मनोरे बांधिले. राज्यांतील सर्व भागांतून प्रसिद्ध पुरुषांस मुद्दाम बोलावून आणिलें, तसेंच विशेष हक्क दिल्यामुळें व इतर फायद्यामुळें पुष्कळ लोक आपण होऊन तेथें राहण्यास आले. त्याचा जन्म जरी रोमांत झाला होता, तरी त्याच्या अंतःकरणाचा ओढा ग्रीसाकडे असे. यामुळें पुष्कळ ग्रीक शहरांस त्यानें मानास चढविलें, व त्यांचें लालन केलें. त्या प्रमाणेंच आथेनियन लोकांचा सेनानी म्हणवून घेण्यांत तो फार भूषण मानीत असे.

या प्रमाणें ग्रीक राष्ट्र व ख्रिस्ती धर्म यांची स्थापना एका कालींच झाली, आणि सन ३६४ त पूर्व व प्राच्य राष्ट्रें कायमचीं वेगळीं झालीं.

कान्स्टनटाईन याच्या मागून (सन ३६१ ते ३६४) झालेल्या बादशाहां पैकीं जुलियन यानें प्राचीन ग्रीक ग्रंथ व तत्वविद्या यांचें फार अध्ययन केलें होतें. हा राजा मोठा

बुद्धिवान पुरुष, शूर योद्धा व उतम मुत्सदी असा होता, ग्रीक ग्रंथ व तत्वविद्या यांजबद्दल प्रेम असल्यामुळें आलिम्पसच्या जुन्या धर्माचें पुनरुज्जीवन करून ख्रिस्ती धर्म राज्यांतून नाहींसा करण्याचा विलक्षण विचार त्याच्या मनांत आला. तथापि ख्रिस्ती धर्मानुयायांचा त्यानें कोंहीं छळ केला नाहीं. ही विलक्षण कल्पना जरी विपरीत व असाध्य होती, तरी तिचा ग्रीक लोकांस फार चांगला उपयोग झाला. त्यांच्या शहरांचें आणि तत्वज्ञान विद्येचें व विशेष करून आथेन्स येथील विद्येचें कांहीं काळ पर्यंत पुनरुज्जिवन झालें. परंतु त्याच्या पाठी मागून झालेल्या बादशाहांनीं पुनःख्रिस्ती दिक्षा स्वीकारिल्यामुळें त्याचे प्रयत्न निष्फळ झाले.

चौथ्या शतकाच्या सुमारास आपला राजा आल्रिक् याच्या वेळीं गाथ लोकांनीं थ्रेस, म्यासिडोनियां व थेसली यांजवर स्वाऱ्या करण्याचा क्रम पुनः चालू केला. सर्व अडथळे दूर करून ते धरमापिलीच्या घाट वाटेनें पुढें गेले आणि समग्र वर्ष भर बिओशिया, आटिका, कोरिन्थ व पेलापोनीस, हे प्रांत उध्वस्थ करित राहिले. बरीच रकम खंडणी दिल्यामुळें आथेन्स मात्र त्या त्रासांतून सुटलें. शेवटीं त्यांस पेलापोनिसांतून हांकून दिलें तेव्हां ग्रीसाच्या पश्चीम भागांतून व इपायरसांतून ते युरोपाच्या पश्चीम भागांत शिरले, आणि ल्याटिन राष्ट्राचा नाश करण्यांत उपयोगी पडले (स. ४७६). दिवसेंदिवस ग्रीक घर्तीकडे वळत असलेल्या वायझनशम राष्ट्रानें आपले स्वातंत्र्य थापुढें जवळ जवळ १००० वर्षें राखिलें, तथापि रानटी लोकांचे हल्ले चुकले नाहींत. विशेष करून व्हांडल लोक उत्तर आफ्रिकेचा बहुतेक भाग आपल्या ताब्यांत घेतल्या नंतर ग्रीसाच्या किनाऱ्या

वर चांचेपणा करूं लागले. परंतु प्रत्येक वेळीं बादशाही सैन्यानें त्यांस हटवून लाविलें.

महाविख्यात बादशाह जस्टीनियन यानें आपले सरदार वेलिसारीअसे व नारसीस यांच्या सहायानें, इटालीदेश व उत्तर आफ्रिका बळाकावलेल्या व्हांडाल व गाथ या लोकांस जिंकिलें; आणि ते दोन ही प्रदेश आपल्या विस्तृत राज्यास जोडिले (५२७ ते ५५९). त्यानें महान विख्यात् कायदे पंडितांस कायद्यांचा एक संग्रह तयार करण्यास सांगितलें. (कारपस् जुरिस् सिव्हिलीस) हें पुस्तक थोडें ग्रीक भाषेत व थोडें ल्याटीन भाषेत लिहिलें अमून सर्व युरोपियन राष्ट्रांतील कायद्यांचा पाया तेंच आहे. त्याच्याच कारकीर्दीत चिनांतून रेशमी किडे युरोपांत आणिले असें सांगतात. या मुदतींत व्यापार उदीम भरभराटींत होते. तो राज्य करीत असतांच कान्स्टंटीनोपल येथील भव्य सेंटसोफाया हें प्रार्थना मंदीर बांधलें गेलें. या कामांत ६ वर्षेपर्यंत १०००० लोक खपत होते असें म्हणतात.

ज्या प्रमाणें जस्टिनियनानें व्हांडाल व गाथ लोकांस जिंकिलें, त्या प्रमाणेंच हेराक्लियस यानें (सन ७१७ ते ७४१) लढायांत जय मिळवून इराणी लोकांस मागें हटविलें. या लोकांनीं इसवी सनच्या तिसऱ्या शतका नंतर नव्या इराणी राज्याची स्थापना करून आशियामायनरांतील ग्रीक शहरें लुटण्याचा सपाटा चालविला होता; व ते कान्स्टन्टीनोपलवर ही येऊन पडतील अशी भीती उत्पन्न झाली होती.

आठव्या शतकाच्या आरंभीं या देशावर आशिया खंडांतून नवीन अरिष्ट येण्याची भीति उत्पन्न झाली. महमदाच्या धर्मानें नवीन स्फुरण पावलेल्या आरब लोकांनीं पृथ्वीवर सर्वत्र त्या धर्माचा प्रसार तलवारीच्या जोरावर करण्याचा प्रयत्न चालविला. आशियामायनरांतील ग्रीक प्रांतावर त्यानीं स्वाऱ्या केल्या; इतकेंच नाहीं तर खुद्द कानस्टन्टीनोपलास वेढा घातला. परंतु इसारियन बादशाह लिओ यानें आपल्या शौर्यानें व कुशलतेनें त्यांस जिंकिलें (सन ७१७ ते ७४१) आणि त्यांचें आरमार जाळून टांकिलें. या लिओनेंच देवालयांतून मुर्तीपूजा बंद केली, व त्याच्या मागून झालेल्या पुष्कळ बादशाहांनीं तोच क्रम चालविला (या मुळें त्यांस मूर्तीं उच्छदेक असें टोपण नांव पडलें); व त्या मुळें सबंध एक शतक राज्यांत सर्वत्र भयंकर दंगे माजून राहिले. आशियाच्या बाजूस जरी राष्ट्र सुरक्षित होतें, तरी बलगेरीयन व स्ल्याव्होनियन लोकांचे हल्ले होण्याचा संभव होता. बलगेरीयन लोक मूळचे तुर्की रक्ताचे असून शूर होते. त्यांनीं राष्ट्राच्या उत्तरेकडील भागांत लुटालूट केली, व थ्रेसांतिल उत्तर भाग जिंकून तेथें ते कायमचे राहिले, आणि त्या प्रांतास त्यांनीं बळगेरीया असें नांव दिलें.

स्ल्याव्होनियन व वालरचियन लोक त्यांच्याहून सौम्य वृत्तिचे होते. त्यांनीं म्यासिडोनिया, थेसली, व इपिरस आणि ग्रीसच्या इतर प्रांतांतून वस्ती केली; ख्रिस्ती धर्माची दिक्षा घेतली; व हळुहळु ग्रीक भाषेचाही अंगिकार केला. यामुळें ते लोक तंटे भांडणा शिवाय ग्रीक लोकांत मिसळून गेले. परंतु त्यां पैकीं कांहींजण मेंढपाळाच्या वृत्तिनें राहिलें असून इतरांपासून

अलिप्त असल्यामुळें मेंढपालक असें त्यांचें उपनांव ठरल्या सारखें झालें आहे.

पांच शतकांहून ज्यास्त मुदत पर्यंतचे वायझनशानचे बादशाहा रोमन वंशांतले होते. वायझनशान हे नवें रोम समजून राष्ट्रास रोमन राष्ट्र ह्मणत असत. आरंभि तर सरकारी दप्तर वैगेरे बहुशः ल्याटिन भाषेंत असे. परंतु ग्रीक भाषा व धर्म यांचें वजन इतकें जबर होतें कीं कालांतरानें सरकार व रोमन वंशी बादशाहा देखील लक्षांत न येतां ग्रीक बनले.

खरोखर ग्रीक उत्पत्तीचे जे एकामागून एक असे अनेक बादशाहा होऊन राष्ट्राच्या लयापर्यंत गादीवर बसले त्यांतील सिडोनीयाचा ब्यासिलास हा पहिला होय. त्याच्या कारकिर्दीत जें अवशिष्ट रोमन स्वरूप राष्ट्रांत होतें, तें ही नष्ट झालें. ब्यासिलास आणि त्याच्या मागून झालेले बादशाहा निकेफारसफोकस (सन ९६३ ते ९६९) जोनेस झिमिनीस (९६९ तें ९७६) आणि दुसरा ब्यासिलास (९७६ ते १०२५) हे सगळे योद्धे व मुत्सदी होते. त्यांनीं पूर्वेस व दक्षिणेस आरबांचा पाडाव केला व क्रेट बेट त्यांजकडून घेतलें. त्याच प्रमाणें उत्तरेस व पश्चीमेस त्यांनीं बलगेरीयन लोकांचा पराजय करून त्यांस जेरीस आणिलें. याच सुमारास त्यांच्या प्रमाणें रानटी जे रशियन लोक त्यांनीं आपला राजा इगोर याच्या हाताखालीं कान्स्टन्टिनोपलावर चाल केली. परंतु फोकस यानें त्यांचा पराजय केला व ग्रीक अग्नीनें त्यांचीं गलबतें जाळिलीं. रशियाची राणी ओलगा ही सन इसवी ९५५ स कान्स्टन्टिनोपल येथें गेली, व तेथें तिनें हेलिना या नावानें ख्रिस्ती धर्माची दिक्षा घेतली. प्राचीन रशियन राजांपैकीं अत्यंत विख्यात जो व्ह्लाडीचिर यानें ग्रीक

धर्माधिकाऱ्यांकडून आपणास ख्रिस्ती धर्माची दिक्षा मिळावी ह्मणून विनंती केली. त्यास ब्यासिलास हें नामाभिधान देण्यांत आलें व त्यावेळचा बादशाहा. ब्यासिलास याची बहिण आना हिज बरोबर त्यानें विवाह केला. आना रशियांत गेली तेव्हां तिनें बरोबर अनेक ग्रीक पंडीत व कारागीर तिकडे नेले, व त्यांनीं ख्रिस्ती धर्म व सुधारणा यांचीं मूळतत्वें रशियांत नेलीं.

तीन शतकेंपर्यंत राष्ट्र बलाढ्य, शांत व भरभराटींत राहिलें; व त्याकाळांत व्यापार व नाविक विद्या उदयास आलीं. ग्रंथलेखन व शास्त्रीयज्ञान यांचें अध्ययन ग्रीक लोकांत इतकें जारी होतें कीं त्यामुळें पाश्चिमात्य राष्ट्रांस त्यांनीं रानटी ही संज्ञा देण्यांत फारसा प्रमाद केला असें म्हणतां येणार नाहीं. जोआनेस क्रीसास-टोमस, ब्यासिलीओस आणि जार्जियस यांज सारख्या पुरूषांच्या नजरेखालीं पूर्व शतकांत धर्मशास्त्र व व्यासपीठवक्तृत्व यांची उन्नती जशी झाली तशी पुढें कधीं ही झाली नाहीं. तरी या विषयांचें अध्ययन यावेळीं मोठ्या आस्थेनें होत असे. जुलमी राजाच्या अंमलांत सार्वजनीक नीति नेहमीं फार निकृष्ट स्थितींत व गर्हणीय असते. त्याप्रमाणेंच येथें ही स्थिती होती, तरी रोमन बादशाहांच्या वेळीं तिचें जें स्वरूप होतें त्याहून या वेळचें फार चांगलें होतें. ग्रीक व रोमन मठ हे याच वेळीं वेगळे झाले. ही गोष्ट इतकी महत्वाची आहे कीं तिजपासून पुढें मोठ मोठे परिणाम घडून आले. पोप निकलस यास आपल्या अधिकाराबद्दल असलेल्या आढ्यतेस त्यावेळचा अति विद्वान् बादशाहा फोशियस यानें नजुमानतां त्यानें पोपाचे सिद्धांत व आचार हे ख्रिस्ती शास्त्रास अनुसरून नाहींत हें लोकांस दाखवून दिलें (सन ८९८ ते ८९१). या वेळापासून ग्रीक म्हणून जें जें कांहीं दिसलें

त्याचा पोप धर्मानुयायी अत्यंत द्वेष करूं लागले; आणि पश्चिमेकडील सर्व राष्ट्रांस वायझनटाइन राष्ट्राबरोबर युद्ध करण्यास त्यांनीं प्रवृत्त केलें. त्या राष्ट्राची संपत्ति ही त्याची तशी प्रवृत्ति होण्यास अधिक कारण झाली.

इसवी सन १०३० यावर्षीं इटालीच्या खालील प्रदेशाचा राजा राबर्ट गिझकार्ड यानें इपायरस व थेसली या प्रांतांवर स्वारी केली; परंतु आलेक्सीस काम्युनियस यानें त्यास मागें हटविलें. सन इसवी १०४६ त सिसलीचा राजा दुसरा राबर्ट यानें कारकायरा बेट जिंकिलें; परंतु ग्रीक लोकांनीं तें लवकर परत घेतलें. त्याचप्रमाणें त्यानें कोरिन्थ व दुसऱ्या ग्रीक शहरांवर हल्ले करून तीं लुटलीं. सरशेवटीं सन इसवी १२०४ यावर्षीं व्हेनिशीयन लोकांनीं फ्रान्सांतील कांहीं रजवाडे व मोठें सैन्य यासह कान्स्टन्टिनोपलवर हल्ला करून तें घेतलें; शहरांत लूट केली; व धर्म वेडानें अंध होऊन विजयी झालेल्या या लोकांनीं सहस्रावधी लोकांचे जीव घेतले. त्यानीं आपसांतीलच एकास बादशाह करून त्याच्या नांवाची दंवडी पिटली, व जिंकलेल्या मुलखाची वांटणी करून ते भाग पुष्कळ स्वतंत्र संस्थानांत भिडावून दिले. फक्त तीन मोठे ग्रीकप्रांत जिंकले गेले नाहींत; व तेवढे मात्र ग्रीक लोकांच्या अंमलांत राहिले. आशियामायनरांत निकाया आणि टापेझस व युरोपांत एपिरस हे ते प्रांत होत. यांत निकायाचें संस्थान तेथील अधिकारी थिआडोरसलासकारीस व जोआनेस-ड्युकस यांच्या शहाणपणामुळें व शौर्यामुळें फार महत्वास चढलें. तथापि विजयी झालेल्या परकी लोकांची सत्ता फार दिवस टिकली नाहीं. यास दोन गोष्टी कारणीभूत झाल्या; एक फ्रेंच रजवाड्यांतील आपसांतील तंटेभांडणें व दुसरें ग्रीक आणि

फ्रांचक लोकांतील मोठें वैमनस्य शेवटीं सन इसवी १२६१ या-
वर्षीं निकायाचा राजा मिचेल प्यालिओलोगस याचा सेनापति
आलेमसीस स्ट्राटिगोप्युलस .यास कान्स्टान्टिनोपलांत जाण्याची
एक भुयारांतील वाट उमगून तो रात्रीच्या वेळीं ८०० लोकां-
निशीं शहरांत शिरला व तेथें त्यानें आपला अंमल बसविला.
नंतर थोड्याच अवकाशांत मोठ्या इतमामानें मिचेलस यानें शह-
रांत प्रवेश केला. या प्रमाणें ५० वर्षें पर्यंत अस्तित्वांत असलेलें
व्हेनिशियन लोकांचें कान्स्टन्टिनोपल येथील राज्य लयास गेलें
तथापि पेलापोनीसाचा, युरोपांतील ग्रीक प्रदेशाचा, व बेटांचा
बराच भाग कित्येक शतकें पर्यंत व्हेनिशन लोकांच्या हातीं
राहिला होता.

पश्चिमेकडील विजयी लोकांच्या हातून राष्ट्र मोकळें होतें
न होतें तों त्याहून विशेष भयप्रद असें अरिष्ट पूर्वेकडून येऊन
पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तुर्की लोकांनीं आशियांतील
बरेच ग्रीक प्रांत जिंकून आपला पुढारी औरखान याच्या दिम
तीनें ते हेलिस्पान्टवर आले आणि त्यांनीं कालीपोलीस
जिंकिलें. त्याचा-पुत्र मुराद यानें (सन १३५९ ते १३८९)
फिलिपोपोलीस, आड्रियानोपोलीस, आणि थ्रेसाचा बराच भाग
जिंकिला व आड्रियानोपोलीस ही तुर्की सुलतानांच्या राजधा-
नीची जागा झाली. त्याच्या मागून झालेल्या राजांनीं आपला
देश काबीज करण्याचा क्रम अव्याहत चालविला. इकडे असा
प्रकार होत असतां (सन १४४०) दुसरीकडे वायझनशनच्या
बादशाहाचा भाऊ व त्या राष्ट्रांत अद्याप सामील असलेल्या पेला-
पोनीससच्या भागाचा राजा कान्स्टंटाईन प्यालिआलोगस यानें
व्हेनिशियन लोकांस त्या द्वीपकल्पांतूनच नव्हे तर आटिकाप्रांत व

उत्तर ग्रीसांतील सर्व प्रदेश यांतूनही हांकून लाविलें. परंतु व्हेनिशियन लोकांनीं आतां तुर्की लोकांकडे सहाय मागितलें. त्याप्रमाणें ते कोरिन्थच्या लगत फ्रयांक लोकांस येऊन मिळाले (सन १४४६) व कान्स्टंटाइन यास जिंकिलें; यामुळें तो आपल्या पेलापोनीसांतील मुलुखांत निघून गेला. तूर्क लोक मुळचेच अनिवार शूर व त्यांत आतां धर्म पिशानें उल्लू झालेले, यामुळें ते कोणासच आटोपेनासे झाले. त्यांस पुरूनउरण्याजोगा एकच पुरूष होता, व तो ज्यास शीडरबेग असें बहुधा म्हणतात तो होय. हा उत्तर इपायरसांतील आलवानियाचा राजा असून इतिहासांत फार सुप्रसिद्ध वीरांपैकींच ती असामी होती. पंचवीस वर्षेपर्यंत तुर्क लोकांच्या अमर्याद सेनासागराबरोबर त्यानें नेट धरिला; त्याचें नांव तुर्की लोकांचा थरकांप करून सोडी. आतां तेंच ग्रीक लोकांस भावी आशेचें स्थान होऊन राहिलें होतें. त्याच्या मरणानंतर मात्र तुर्कांनीं आलवानीया देश घेतला व त्यांतील बहुतेक राहिवाशांस मुसलमानी धर्म स्विकारणें भाग पाडिलें.

याप्रमाणें कान्स्टन्टीनोपलच्या चारी बाजूस तुर्की लोकांनीं जिंकिलेल्या प्रदेशाचा वेढा पडत चालला. एक वेळीं मोठें असलेल्या या राष्ट्राचे जिंकले गेले नाहींत असे पेलापोनिसिस व मुख्य खंडांतील ग्रीसचा कांहीं भाग एवढेच प्रांत राहिलें होतें. असें असतां इसवी सन १४५३ च्या एप्रील महिन्यांत दुसरा मंहमद या नांवाचा सुलतान २,००,००० व ४०० गलबतांचें आरमार यांसह कान्स्टंन्टिनोपल जवळ आला. हा भोठा क्रात्य पण शूर योद्धा होता. थोर व उदार अंत:करणाचा बादशाहा कान्स्टटाईन प्यालीओलोगस यानें उरलेंसुरलें लष्कर जमा केलें, व मरेपर्यंत शत्रूस दाद द्यावयाची नाहीं असा निश्चय केला.

त्यानें पोपाकडेस व पश्चिमेकडील राजेरजवाड्यांकडेस मदत मागितली; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ग्रीक लोक आपलें वर्चस्व कबूल करितील व पुनः रोमनक्याथोलीक पंथांत मिळतील तर आपण मदत करीन असें पोपानें सांगितलें. तें ऐकून बादशाह व कान्स्टंन्टिनोपलचे राहिवाशी एक स्वरानेंच ओरडलें कीं, " तुर्की पगडी पत्करेल पण पोपाचा मुकुट नको " मुसलमानी सत्ता चालेल पण पोपाचा जुलूम असह्य होय, हें त्यांतील तात्पर्य. आतां दुसरी कांहीं आशा न राहिल्यामुळें नांव मिळवून मरावें असा त्यांनीं निश्चय केला. सात आठवडेपर्यंत तुर्कांनीं शहरावर एंकसारखे नेटानें हल्ले केले परंतु ग्रीक लोकांनीं प्रत्येक वेळीं त्यांस हटाविलें. त्या रानटी लोकांचा दम खचत चालला. मग रागानें आणि लज्जेनें अगदीं बेफाम होऊन महमदानें स्वतः सैन्याचें अधिपत्य घेतलें व असें जाहीर केलें कीं जमीन व दगड हीं मात्र आपल्याकडे ठेवून जिंकिलेले लोक व धनदौलत सर्व शिपायांच्या हवालीं केली जाईल. या योगानें त्यानें लोकांत पुनः उत्साह आणिला, व त्यांजवरील अंमलदार त्यांस मागून फटक्यांनीं व सोट्यांनीं बडवूं लागले. शेवटीं ता. २९ मे रोजीं कान्स्टन्टिनोपल शहराच्या तटबंदीस शिड्या लावून ते वर चढले, तेव्हां कान्स्टन्टाईन शिल्लक असलेल्या शिपायांस म्हणाला " आमच्या रक्तस्त्रावानें आम्हीं आपल्या देशाचें रक्षण करावें अशीं ईश्वरी इच्छा दिसत नाहीं; तरी आपल्या वंशजांनीं आपला धर्म व जात यांचें रक्षण करण्यास उद्युक्त रहावें एतदर्थ सद्गुण व शौर्य यांचा कित्ता त्यांस घालून देऊं या. " तीन दिवस पर्यंत तुर्कांनीं लोकांची कापाकापी चालविली, व घरें दारें उध्वस्त केलीं, रस्ते प्रेतांनीं भरून गेले व त्यांतून रक्ताचे पूर वाहूं लागले आणि पीडिलेल्या लोकांचे वि-

लाप व रडणें अथवा विजयी झालेल्या रानटी लोकांचें हंसणें, खिदळणें यांशिवाय दुसरा शब्द कांनीं पडेनासा झाला. शौर्याचा किल्ला स्वतः सुलतानानें घालून दिला होता; त्याप्रमाणें क्रौर्याचा ही आतां त्यानेंच घातला. तो असा; आपल्या विश्वासू अनुयायांसह कान्टन्टाईन लढाईंत पडला होता. त्याचें शव शोधून काढण्यास मंहमदानें फर्माविलें. तें सांपडलें तेव्हां डोकें त्यानें पायांनीं तुडविलें, व मग तें कांपून विजयध्वजा म्हणून आशियांत पाठविलें. बादशाही घराण्यांतील जिवंत सांपडलेले लोक व राज्यांतील दुसरे सरदार लोक यांस त्यानें आपल्या डोळ्यां देखत, आपण मेजवानी खात बसल्या ठिकाणीं ठार मारविलें. तसेंच आयरिनी नांवाची सुंदर कुमारिका होती, तिचा वध त्यानें स्वतः आपल्या हातांनीं शिपायांसमक्ष केला. तिसऱ्या दिवशीं कत्तल बंद करून सांपडलेली मौल्यवान लूट गलबतांवर नेऊन लादण्याचा त्यानें हुकूम केला. सर्व प्रकारच्या संपत्तीनें जहाजें भरून गेलीं. गुलाम करून विकण्यासाठीं सहस्त्रावधी पुरूष व स्त्रिया यांस आशियांत नेलें. प्राचीन ग्रीक ग्रंथकारांच्या हजारों हस्तलिखीत ग्रंथांचा नाश करून टांकिला; किंवा अगदीं अल्प किमतीस ते देऊन टांकिले. ज्या ग्रीक लोकांस जीव घेऊन पळून जाण्याची सवड मिळाली ते कांहीं ग्रीक बेटांत व इटालींत निघून गेले. या पळून गेलेल्या मंडळींत पुष्कळ प्रसिद्ध विद्वान होते. त्यांनीं ग्रीक भाषा व ग्रीक ग्रंथ यांचें ज्ञान इटालींतील लोकांस करून दिलें, व तेणेंकरून पाश्चात्य देशांत विद्येचें पुनरुज्जीवन व तज्जन्य प्राटेस्टंट धर्मपंथाचा उद्भव यांस ते विद्वान लोक कारणभूत झाले. अशा ग्रीक लोकांत विशेष विख्यात गृहस्थ तिकडे गेले ते कान्स्टान्टाईन, जोनलासकाटीस, थिआडोरगाझीस, बासारियन, चाल्कोकान्डीलास व मसुरास हे होत.

भाग ३

तुर्कांच्या अंमलांतलि ग्रीसाचा वृत्तांत,
इसवी सन २४३ ते १८२१.

आपल्या शिपायांची द्रव्यतृष्णा तृप्त होऊं दिल्यावर, महंमद जिंकिलेल्या मुलखांची व्यवस्था करण्याच्या कामास लागला. सर्व ग्रीक लोकांस गुलाम ठरविले; म्हणजे त्यांची चीजवस्त व जीवित हीं विजयी लोकांच्या मर्जीवर अवलंबून राहिलीं; म्हणून प्रत्येक ग्रीक मनुष्यास आपल्या वयाच्य दहाव्या वर्षापासून दर वर्षीं कर द्यावा लागे. याचा हेतु इतकाच होता कीं त्यावरून त्यानें एक वर्षा पुरतें आपलें जीवित सुलताना पासून खरेदी केलें असें वाटावें. सर्व जमीनजुमला सरकाराचा ठरवून तो तूर्क अंमलदारांस वांटून दिला; किंवा तुर्की लोकांच्या धर्म कृत्यांकरितां राखून ठेविला. लहान सहान वस्तु ही ग्रीक लोकांकडस राहूं दिल्यास ती मोठी मेहेरबानी समजली जाऊन, पाहिजे तेव्हां ती काढून घेतां येत असे. जुलमी कर मनमानेल तसा पाहिजे तेव्हां वाढविला जात असल्यामुळें सर्व प्रकारचे उद्योगधंदे किंवा व्यापार करणें अगदीं अशक्य होऊन गेलें होतें. एकाद्यानें वित्तसंचय केलाच, तर त्याला जिवंत राहण्याचीही फारशी आशा नसे; कारण गुलामाच्या अवस्थेंतून निघण्याचा प्रयत्न केल्याचा त्याजवर सशंय येत असत. तरी ख्रिस्ती लोकांस अत्यंत भयंकर खंडणी द्यावी लागे तीही;—एकंदर ख्रिस्ती मुलांच्या संख्येच्या एक पंचमांश इतकीं मुलें जबरीनें त्यांच्या कुटुंबांतून काढून त्यांस महंमदी धर्माचें शिक्षण देण्यांत येत असे. जानिसरीस म्हणून

जें विशेष प्रकारचें सैन्य तयार केलें होतें व ज्यानें 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या म्हणी प्रमाणें आपल्या राक्षसी शौर्यानें ख्रिस्ती लोकांस त्राही त्राही करून सोडिलें होतें त्याची भरती यांच्या तून होत असे. पुष्कळ ग्रीक माता आपल्या मुलांवर असला प्रसंग येऊं नये म्हणून आपल्या हातानें त्यांचें प्राण घेत, व नंतर आपला जीव देत असत. अशा अंमलांत मानसिक शिक्षण व्यापार, व उद्योगधंदे शक्यच नव्हतें. कोरिन्थ जिंकिलें गेल्या दिवसापासून ग्रीक लोकांस जी संकटें भोगावीं लागलीं, त्या सर्वांत हें अत्यंत भयंकर होतें. त्याजमुळें ग्रीक लोक हें नांवही शिल्लक राहूं नये असा अनर्थ गुदरला होता; परंतु त्या लोकांच्या धर्मोपदेशकांचा स्तुत्य देशाभिमान व या क्रूर राक्षसांचें मौर्ख्य यामुळें तो प्रसंग टळला. तुर्की लोक स्वभावतःमूर्ख, अज्ञानी, व आळशी असल्यामुळें आपल्या ख्रिस्ती गुलामांवर कसा अंमल करावा तें त्यांस समजलें नाहीं, किंवा त्यांस तो करण्याची इच्छाच झाली नाहीं. सर्व ग्रीक लोकांतून कोणा तरी एका मनुष्यास जबाबदार ठरवून त्याच्या मार्फत सर्व व्यवहार करणें त्यांस विशेष सोईचें वाटलें; कारण जरा कांहीं संशय आल्यास अशा माणसास सहज मारून टांकितां येण्या सारखें होते. अशा मनुष्यास पेट्रार्क ही संज्ञा होती. ग्रीक राष्ट्र लयास गेल्यावर ग्रीक लोकांत मोठा अधिकारी काय तो पेट्रार्क हाच राहिला. त्यांच्या सुदैवानें या वेळीं जार्जियस जेनाडिअस नामक एक धर्माधिकारी होता. त्या काल्च्या सर्व लोकांत तो मोठा विद्वान असून तो उत्साही व दूरदर्शी कार-स्थानी पुरुष होता. सर्व ग्रीक लोकांचे डोळे आतां या पुरुषा कडेस लागले व त्यास पेट्रार्कचा हुद्दा देण्यांत आला. महमदानें ग्रीक लोकांचा पुढारी म्हणून त्यास मान्य केलें. त्याची बुद्धी

वक्तृत्व यांजमुळें मंहमद त्याला मान देत असे; सर्व ग्रीक लोकांच्या वतिनें त्यानें (मंहमदानें) त्यास जबाबदार ठरविलें. जेनाडिअस यानें पेट्रार्क हाच राजकीय व धार्मिक बाबतींत लोकांचा नियंता सजमला जावा अशी योजना केली. पेट्रार्काच्या हाताखालीं असणारा "बिशप" सर्व प्रांतांतून धर्मसंबंधीं व राजकीय बाबतींत लोकांचा मार्गदर्शक व शिक्षक ठरला. मठा संबंधी काम काजाची व्यवस्था पाहणें इतकेंच त्याचें काम नसून राजकीय संबंधानें ग्रीक लोकांवर हुकमत चालविण्याचें ही काम त्याचें होतें. सर्व खासगी व्यवहारांत इनसाफ करण्याच्या कामीं लोकांनीं आंपण होऊन त्याची निवड केली. देशभाषा कायम राखण्याचीं साधनें ज्या शाळा व धर्मरक्षण करणारे मठ यांची तपासणी करण्याचें काम त्याचें होतें. या दोन प्रकारच्या संस्थांमुळें लोकांचा स्वाभिमान व राष्ट्रत्व कायम राहिलें. त्या कारणांनींच ग्रीक लोकांस आपसांतील तंट्यासंबंधानें तुर्की लोकांच्या न्यायासना पुढें जाण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं. ज्याप्रमाणें प्रांतांतील बिशप हा पेट्रार्कचा ताबेदार असे, त्या प्रमाणें गावांत खालच्या प्रतीचे धर्माधिकारी होते ते बिशपाचे ताबेदार होते. या मुळें त्याच्या प्रमाणें तेही देश हिताचें काम करूं लागले. नित्याच्या उपासनेंत या रानटी लोकांवर जय मिळण्याविषयीं ते परमेश्वराची करूणा भाकीत असत. धर्माधिकाऱ्यांशीं संबंध असून त्यांच्या हुकमांत वागावें लागत असे, असे दुसरे देशाभिमानी अधिकारी असत. त्यांस प्रिमेट असे म्हणत. या अधिकाऱ्यांची निवड दिवाणी कामाचा निकाल लाविण्यासाठीं लोकांकडूनच त्यांच्या इच्छेनुरूप होत असे. निरनिराळे कर वसूल करून तुर्की अमंलदारांकडेस तेच देत असत. कधीं

पाच्छांची मनधरणी करून व कधीं लांचलुचपत देऊन हेच तुर्की मुलकी व लष्करी अंमलदारांच्या त्रासापासून लोकांचा बचाव करीत. प्रत्येक गांवाची जमाबंदी ठरविणें व मनास वाटेल तशी तिची विल्हेवाट करण्याचें काम त्यांजकडे-सच असे. धर्माधिकाऱ्यांप्रमाणेंच हेही लोकांचे मुखत्यार आहेत असें तुर्की लोकांनीं कबूल केलें होतें, आणि लोकांबद्दल त्यांच्या प्रमाणें हेही जबाबदार गणले जात. या प्रमाणें तुर्कांच्या जुलमी अंमलांतही ग्रीक लोकांचा राष्ट्रीयपणा व स्थानिक स्वराज्यपद्धत यांचें रक्षण धर्माधिकारी व प्रिमेट यांजकडून होत गेलें, आणि तुर्कांपासून लोक अगदी अलग राहिले गेले. यामुळें तुर्क व ग्रीक यांच्यांत शरीरसंबंध झाला नाहीं; कोणी ग्रीकानें महमदी धर्म स्वीकारिला नाहीं; किंवा या दोन जातींच्या लोकांत कोणताही अन्योन्य व्यवहार घडला नाहीं. कट्टा द्वेष हीच त्यांची परस्परांविषयीं भावना होती; परंतु हें देशाभिमानाचें कार्य उरकण्यांत धर्माधिकारी व प्रिमेट यांस कधीं कधीं स्वतःचें प्राण खर्ची घालावें लागत; कारण ग्रीक लोकांचें एखादें बंड झालें किंवा बंड न होतां कोठें संशयाचा प्रकार दिसला कीं प्रथम हे लोक (धर्माधिकारी व प्रिमेट) बळी पडत, मग ते कान्स्टंन्टीनोपलचे पेट्रार्क असोत, बिशप असोत अथवा यःकश्चित खेड्यापाड्यांतील धर्माधिकारी किंवा प्रिमेट असोत.

तुर्कलोकांच्या अमलांत धर्माधिकारी व प्रिमेट यांशिवाय ग्रीक लोकांचा अति महत्वाचा भाग म्हटला म्हणजे ज्यांना क्लेफ्टस् ही संज्ञा होती ते होत. इपायस, थेसली, आकारनेनिया, इटोलिया, आरकेडिया आणि माईना (लयाकोनिया) या प्रांतां-

तील शुर व आजिंक्य लोकांस तो संज्ञा असे. त्या डोंगराळ प्रातांत नेहमी शूर लोकांचीच वस्ती असे; परंतु तुर्कांच्या विजयापासून तर ज्यांस स्वातंत्र्य प्रिय असे व जे तुर्कीलोकांचा अंमल मान्य करण्यास राजी नसत असे सर्वजण तेथें जाऊन भरले. त्यांनीं आपल्या डोंगराळ मुलखांतून तुर्कांबरोबर एकसारखें युद्ध चालविलें. ते स्वेच्छाचारानें व स्वतंत्रपणें वागत व स्वदेश व स्वधर्म यांच्या शत्रू विरुद्ध नेहमीं बंडावा करीत. डोंगराच्या आश्रयामुळें ते शत्रूच्या हल्ल्यास जुमानित नसत, इतकेंच नाहीं तर कधीं कधीं विजेप्रमाणें अकस्मांत आपल्या शत्रूवर तुटून पडत. त्यांची एकसारखी चळवळ चालू असे. ते ज्याप्रमाणें शूर होते, त्याचप्रमाणें मोठे सावधही असत. यामुळें त्यांचा तुर्कीलोकांस दरारा असे. लढाई करणें हेंच सौख्य व जीविताचें सार्थक असें ते समजत. बिछान्यावर पडून मरणें म्हणजे मोठ्या दुर्दैवाची व शरमेची गोष्ट असें त्यांस वाटे. लढाईप्रमाणें ते गायन विद्येचे व कवितेचेही शोकी असत. यामुळें प्रत्येक विजयाबद्दल तात्काल पद्य रचून तें गात असत. साधारण प्रचारांत जीं म्हणून कवनें आहेत त्यांत त्यांचीं गाणीं फार मनोरम आहेत. तुर्कीलोकांच्या जुलमास प्रतिबंध करण्याचें काम त्यांनीं अव्याहत कसें चालविलें याचा तीं कवनें कवितावद्ध वृत्तांतच होत असें म्हटल्यास चालेल. आपला देश स्वतंत्र होण्याची वेळ पुढें मागें कधीं तरी येईल आसा भावार्थ त्या सर्वांत दिसतो. देश तुर्कांनीं जिंकिल्यावर ही या तीन संस्थांच्या पाखरेखालीं ग्रीक राष्ट्राचें अस्तित्व कायम राहिलें.

आतां विजयी झालेल्या तुर्कांकडे आपण वळूं. उत्तर ग्रीस जिंकून महमदाचें समाधान झालें नाहीं. त्यानें युबीया बेट व

आथेन्स हीं जिंकून पेलापोनिसांत व आथेन्सांत प्रवेश केला व आथेन्सांतील ुपारथेनान नांवाच्या इमारतींत फेरबदल करून तीला मशीद बनविली . पेलापोनिसांतील बहुतेक शहरें व किले,तशींच बहुतेक बेटें यावेळीं व्हेनिशियन लोकांच्या अंमलाखालीं होतीं. यामुळें यापुढें २०० वर्षेपर्यंत त्यांच्यांत व तुर्कीलोकांत तुमुल रण माजलें. या लढायांमुळें ग्रीक लोकांचें फार नुकसान झालें. कारण दीर्घकाल पर्यंत चाललेला हा कलह व युद्धें सदां त्यांच्या मुलखांत घडलीं. यामुळें ग्रीस देश पादाक्रांत करावा व त्यांतील लोकांचा नाश करावा असा हेतु असणाऱ्या दोन शत्रूंच्या मध्यें सांपडल्यासारखें त्यांस झालें.

यास्तव या वेळीं ग्रीक लोकांची स्थिति फार शोचनीय होती. कारण व्हेनिशिय लोकांच्या पक्षानें राहिल्यास तुर्कीलोक त्यांचा भयंकर रीतीनें मूड उगवीत (एकवेळ अशा अपराधाकरितां पेलापोनिसांतील एका गांवचे सर्व लोक कर्वतीनें कंबर चिरून मारिले); बरें कधीं ते तुर्कांस मिळाले (असें बहुधा क्वचित्च घडत असे,) तर व्हेनीशियन लोकही तशाच निर्दयपणानें त्यांशीं वागत (एक वेळ त्यांनीं एका गांवांतील २००० लोकांस नेऊन गुलाम करून विकिलें); तटस्त वृत्तीनें राहिल्यास दोन्ही पक्षाचे लोक त्यांचे हालहाल करीत. असा प्रकार होता, तरी ग्रीक लोकांच्यानें कधीं स्वस्त बसवलें नाहीं; कारण आपल्या तरवारीच्या जोरावर स्वातंत्र्य मिळविण्याची आशा त्यांच्या अतःकरणांत सदां जागृत होती. या दोन प्रकारच्या विपत्तींत त्यांस व्हेनिशीयन लोक कमी त्रासाचे वाटत. यांचें कारण एक तर तेही ख्रिस्तो धर्मानुयायी होतें. दुसरें कारण असें होते कीं एकदां तुर्कीलोक नाहींसे झाले म्हणजे त्यांस स्वतंत्र करण्याची ते लबाड

इटालियन नेहमीं आशा दाखवीत; तरी वास्तविकपणें पहातां त्यांचा विचार ग्रीस देशावरील आपला पगडा दृढ करून त्यांचा व्यापार व आरमार यांचा नायनाट करून टांकण्याचाच होता व त्यांचे हे दोन्ही उद्देश तडीस गेले. जस्टीनियनाच्या वेळापासून युरोपांत पहिल्या प्रतिचे म्हणून गणलेले आथेन्स व कोरिन्थ येथील रेशमी कारखानें त्यानीं बुडवून ते व्हेनिस व जिनोव्हा येथें स्थापन केले

विख्यात पहिला सुलेमान यानें व्होडस् बेट इसवी सन १५२२ त घेतलें. तरी तें मिळविण्यास फार प्रयास पडले. कारण व्हेनीशियन लोक व नाईट टेम्पलर्स यांशीं मिळून ग्रीक लोक मोठ्या शौर्यानें लढलें. नाईट लोकांपैकीं जे वांचले ते माल्टा बेटांत पळून गेले. नंतर तुर्कलोकांनीं लवकरच दुसरीं पुष्कळ बेटें जिंकिलीं आणि कारकायरा बेटास वेढा दिला; परंतु तेथील रहिवशांनीं व व्हेनीशियन लोकांनीं त्यांस मागें हटवून लाविल्यावर इथाकिन्थास, केफालेनिया व दुसरीं बेटें त्यांनीं उध्वस्त करून टांकिलीं. पुढें थोडक्याच दिवसांनीं बाकी राहिलेले पेलापोनिसांतील किल्ले त्यांच्या हातीं लागले. यामुळें व्हेनीशियन लोक तुर्कांशीं स्नेह करण्यास प्रवृत्त झाले.

त्याच्या (सुलेमानाच्या) मागून सिंहासनारूढ झालेला सेलीम यानें सायप्रस हें सुंदर बेट व्हेनिशियन लोकांपासून घेतलें. तरी एक वर्षपर्यंत म्हणजे इसवी सन १५७० पासून १५७१ पर्यंत नेटानें भांडल्याशिवाय तें प्राप्त झालें नाहीं. या लढाईंत त्या बेटांतील रहिवाशांनीं प्रतिकाराच्या कामीं दाखविलेलें शौर्य व रानटी तुर्कांचें अविचारी क्रौर्य यांजमुळें तिजकडे पश्चिमे-

कडील राष्ट्रांच्या दृष्टी लागल्या. ल्युकोशिया नामक नगरींत २०००० लोकांची कत्तल उडविली, व त्याशिवाय ४०००० गुलाम करून विकिले. फ्यामागस्टा शहर दहा महिनेंपर्यंत मोठ्या नेटानें लढलें; परंतु शेवटीं आंतील रहिवाशांचे प्राण वांचविले जातील व त्यांस कांहीं त्रास दिल्यावांचून दुसरीकडे जाऊं दिलें जाईल असें शपथ पूर्वक अभिवचन देण्यांत आल्यावर तें शत्रूच्या स्वाधीन झालें. परंतु नेहमींप्रमाणें हें वचन मोडण्यांत आलें म्हणजे शहराचे दरवाजे खुले होतांच पुरुषांची कत्तल उडविली व इतरांस गुलाम म्हणून विकिले. पुढें लवकरच या परकी लोकांचा पराभव झाला, व त्यांत त्यांचें पुष्कळ नुकसान झालें. कारण २०० गलबतांच्या तुर्की आरमाराचा आस्त्रियाचा डानजुअन याच्या हाताखालीं असलेल्या, व्हेनिशियन, पोप व बादशाहा यांच्या संयुक्त आरमारानें नापाक्ठसच्या किनाऱ्यासमोर विध्वंस केला. या प्रसंगीं व्हेनिशियन लोकांच्या बहुतेक सर्व गलबतांवर ग्रीक लोक होते; व ते नेहमीप्रमाणें ख्रिस्ती धर्म व आपलें स्वातंत्र्य यांकरितां मोठ्या उत्सुकतेनें लढले.

ग्रीक समुद्रांतील सर्वांत मोठें व महत्वाचें क्रिटा बेट अजून व्हेनिशियन लोकांकडेच होतें. तें ताब्यांत ठेविण्याकरितां व्हेनिशियन लोक तीस वर्षें लढत होते. पण त्याचा शेवट असा झाला कीं, व्हेनिशियन लोकांकडेस थोडेसे डोंगरी किल्ले मात्र राहिले, व सर्वच हातांतून जाण्याच्या भीतिस्तव सर्व ख्रिस्ती राष्ट्रांकडेस त्यांनीं मदत मागितली. फ्रान्साकडून मात्र कुमक मिळाली. फ्रान्स देशानें उमरावांपैकीं शेलकी मंडळी व ६००, शिपाई वोफर्ट व नाव्हेरी येथील ड्युकांच्या हाताखालीं देऊन पाठविले. तुर्कांचा सरदार आकमेदकाय-

मिसली याची शौर्य व मुत्सदीपणा यांजबद्दल सारखी ख्याती होती. शेवटीं सन १६७० त त्याच्या हाताखालीं लढून त्यांनीं सर्व बेट व्हेनिशियन लोकांकडून घेतलें. यापुढें कांहीं काल-पर्यंत ग्रीसांत व्हेनीशियन लोकांचा अंमल मुळींच नव्हता. तथापि पुढें थोड्यवर्षांनीं (सन १६८५) विख्यात मारोसिनी याच्या हाताखालीं व्हेनिशियन लोकांनीं ग्रीक लोकांच्या सहाय्यानें पेलापोनीसाचें सर्व द्वीपकल्प पुनः मिळविलें, व त्याच्या पुढील वर्षींच त्यांनीं आथेन्स ही घेतलें. या प्रसंगींच व्हेनिशियन लोकांचा एक तोफेचा गोळा वर पडून पारथिनानचा नाश झाला. तुर्की लोकांनीं तेथें आपल्या दारू गोळ्याचें दास्तान करून ठेविलें होतें. मोरोसिनी मरण पावल्यानंतर व्हेनिशियन लोकांनीं मिळ-विलेला मुलुख एकामागून एक त्यांच्या हातून गेला व शेवटीं सन १६९९ त त्यांनीं तुर्कांशीं सल्ला केला. त्या तहांत पेलापो-नीसस मात्र त्यांजकडे राहिलें. तथापि सन १७१९ त तिसरा आक्रमेद याच्या कारकीर्दींत तुर्कांनीं तें द्वीपकल्प जिंकून घेतलें. त्या दिवसापासून आयओनियन बेटें खेरीजकरून ग्रीक लोकांची वस्ती असलेला सर्व मुलुख तुर्कांच्या ताब्यांत गेला. आयओ-निअन बेटें सन १७९७ त फ्रेंच्यांकडे व पुढें रशियाकडे गेलीं. आणि सन १८१५ पासून तीं इंग्लडच्या हिमतीस देण्यांत आलीं.

परंतु त्या वेळापासून तुर्की लोकांची सत्ता दिवसें दिवस क्षीण होत चालली. तरी लुटालुट, क्रौर्य व इतर दुर्गुणांचा अंमल निरंकुश चालू राहिला. या पूर्वीच त्यांनीं ख्रिस्ती मुलांस जुलमानें मुसलमान करण्याची वहिवाट टांकून दिली होती, यामुळें त्यांस चांगले शिपाई मिळण्याचें बंद झालें. असें असतांही

ग्रीक लोकांस अपमान व अप्रतिष्टा हीं सहन करावीं लागत होतीं; तरी हळुहळु ते गतवैभव मिळवित चालले होते. त्यांच्या स्वराज्याचा दिवसें दिवस अधिकाधिक विकास होत चालला असून तुर्कीं लोकांच्या मूर्खपणामुळें सतराव्या शतकाच्या अखेरीस त्यांनीं तुर्कांचीं मनें सुप्रसन्न करून घेऊन ते राज्याचे बडे दुभाषी बनून राष्ट्रांतील परराज्यसंबंधी खात्याचें सर्व काम पाहूं लागले; व तेणेंकरून राज्याच्या सर्व कारभारांत बरेंच वजन राहून आपल्या देशबांधवांस गुप्त रीतीनें सहाय्य करण्याची, किंवा त्यांचा बचाव करण्याची संधी त्यांस मिळूं लागली. त्यांच्या आश्रयाच्या योगानें सर्व देशभर शाळा स्थापन झाल्या. अशा देशाभिमानी गृहस्थांत आलेक्झांडर मौरोकार्डेटास हा अतिशय नांवाजलेला असून विद्या व राजकार्यधुरंधरपणा यांबद्दल त्याची ख्याती होती. पुढें लवकरच कान्स्टान्टिनोपल येथील या ग्रीक लोकांस मोल्डेव्हिया व वालाचिया या संस्थानांची हुकमत तुर्क लोकांकडून मिळाली. यांत आलेक्झांडरचा मुलगा निकोलस मौरोकार्डेटास हा पहिला असून तो बापाप्रमाणें विद्वान व राजकारणपटु होता. सन १८२१ पर्यंत ज्या ग्रीक राजांनीं या प्रांतावर राज्य केलें त्यांनींच अर्धवट रानटी प्रदेशांत सुधारणेचा पहिल्यानें पाया घातला. आपल्या शहाणपणाच्या योजनांनीं त्यांनीं ग्रीक लोकांत विद्यावृद्धि व व्यापाराची भरभराट केली, व धर्मसंस्था प्रिमेट, व कान्स्टन्टिनोपल येथील व इतरत्र श्रीमान गृहस्थांचें गुप्तसहाय्य यांच्या योगानें ग्रीक लोकांची सांपत्तिक स्थितींत भरभराट होत चालली.

परंतु सन १७६९ त ग्रीक लोकांच्या पुनरुज्जिवनास जबरदस्त धक्का बसला. रशियाची चक्रवर्तिनी राणी क्याथेराईन

इचें या वेळीं तुर्कांबरोबर युद्ध चाललें होतें. आपलें गत स्वातंत्र्य परत मिळविण्यास टपत बसलेल्या ग्रीक लोकांनीं ही संधी साधून मैनाप्रांत व सर्व पेलापोनीसस यांत शस्त्रें उचललीं. त्यांच्या सहाय्यार्थ फौज व आरमार पाठविण्याचें चक्रवर्तिनीनें वचन दिलें होतें. पण शेवटीं आरलाफ याच्या हाताखालीं असलेलीं थोडिशीं गलबतें मात्र मदतीस आलीं. तुर्कीं लोकांनीं असंख्य रानटी आलबनी लोकांस मदतीस बोलाविलें. या लोकांनीं खड्ग व अग्नी यांच्या योगानें सर्वत्र प्रळय करून सोडिला. एकंदर ग्रीक लोकांनीं व विशेषें करून मैनाप्रांतांतील लोकांनीं (ज्यांस पूर्वी लंयासिडिमोनियन असें म्हणत) व क्लेपटसाचा प्रसिद्ध सरदार आंड्रुटसास यांनें शौर्याची पराकाष्ठा केली, तरी तुर्कांनीं हें बंड मोडून टांकिलें; आणि लुटालुटं नें पेलापोनीसस उध्वस्त करून सोडिलें. रशियन लोकांनीं आपत्त या ग्रीक स्नेह्यांस सोडून दिलें; व आपण आशिया मायनरकडे [illegible]घून गेले. तेथें सन १७७० त स्काटलंडचा एलफिन्स्टन ना[illegible]क शूर दर्यावर्दी याचा हाताखालीं त्यांनीं झेस्मी नजीकचें तुर्कीं आरमार जाळून टांकिलें. यायें उर्ट तुर्कांनीं ग्रीस देशाच्या सर्व भागावर काढिलें; यामुळें जिकेंड तिकडे खून माजले. पेट्रार्क मेलिटस व कान्स्टन्टिनोपल येथील पुष्कळ धर्माधिकारी व प्रिमेट यांस हालहाल करून मारिलें. फिलोफापोलीस, लारिसा, क्रिकाला, स्मर्ना व दुसऱ्या कित्येक शहरांतून रक्ताचे पूर वाहले.

सन १७८७ त जेव्हां रशियन व तुर्कीं लोक यांत पुनः लढाई सुरू झाली, तेव्हां हो ग्रीक लोकांनीं विशेषेंकरून डोंगराळ प्रदेशांत बंडावा केला. ग्रीक लोकांनीं या वेळीं पहिल्यानेंच लहान आरमार तयार केलें व तें लिव्हिडीस येथील रहिवाशी

ल्याव्रोस क्याटसोनीस याच्या हातांखालीं दिलें. त्यानें पुष्कळदां तुर्की गलबतांवर हल्ले करून तीं पकडलीं. या वेळीं इपायरसच्या उत्तरेकडील सुलीओटस लोकांनीं संग्राम भूमिवर पहिल्यानेंच प्रवेश केला. त्यांनीं इपायरसचा अल्लिपांच्छा याजबरोवर लढण्यांत दाखविलेल्या शौर्यानें सर्वांस थक्क करून सोडिलें. ते आपल्या डोंगराळ प्रदेशांत अडकून पडले होते. तेथें त्यांजपाशीं अन्नपाण्याचा किंवा युद्धोपयोगी सामुग्रीचा पुरवठा नसतां,व मृत्यु व रुग्णावस्था यांहीं करून अगदीं दुर्बल झाले असतां ही अखेरपर्यंत त्यांनीं इतक्या शौर्यानें नेट धरिला कीं त्यास उपमा देण्यांस इतिहासांत दुसरें उदाहरणच नाहीं. आपल्या स्वातंत्र्या करितां पुरुषच नव्हे तर वायकापोरें सुद्धां लढलीं. ' डोंगर स्वाधीन करा नाहींतर तुमच्या मुलास ठार करीन ' असा वेइमान अल्लीनें सुलिओटसचा राजा साव्हेलास यास जेव्हां निरोप पाठविला तेव्हां " वेइमान अल्ली, माझ्या मुलाचा जीव तूं खुशाल घें; परमेश्वराची कृपा असल्यास माझी पत्नी दुसरे पुत्र प्रसवेल; परंतु दुसरा देश मात्र मला पुनः मिळणार नाहीं " असा त्यानें उलट जवाब पाठविला. सुलिओटस लोकांचा निरुपाय होऊन चुकला असतां त्यांस दुसरीं घरें व संपत्ती देण्याची अल्लीनें आशा दाखविली. त्यास त्यांनीं एकच जवाव दिला कीं " तुला व तुझ्या वचनाला धिःकार असो. डोंगरांतील आमच्या झोंपड्यांतील धूळ तुझ्या सर्व ऐश्वर्यापेक्षांही ही आम्हांस अधिक प्रिय आहे." शेवटीं सन १८९३ त आपत्तिनें लोक पटापट मरत आंहत, जवळ युद्धसामुग्री नाहीं, किंवा पिण्यास पाणीही नाहीं अशी स्थिती येऊन पोचलीं; तेव्हां डोंगरी प्रदेश सोडून जाण्याचा त्यांनीं निर्धार केला. अल्लीनें त्यांस मार्गांत गांठिलें. त्या वेळीं वहुतेक मारिले

गेले. उरल्यासुरल्यांनीं आपणांस मारून घेतलें; बायकांनीं मुलें कडेवर घेऊन डोंगरावरून खालीं उड्या टांकिल्या. सारांश फारच थोडे लोक त्या वेळीं इंग्रजांच्या आश्रयाखालीं असलेल्या पारगा बंदरापर्यंत जिवंत जाऊन पोंचले. तेथें त्यांस मिळालेला आश्राही अलिस पाहवला नाहीं; म्हणून त्यानें पारगाचें बंदर इंग्रजांकडून विकत घेतलें. तेव्हां सुलिओटस लोकांनीं आपल्या वाडवडिलांचीं हाडें एकत्र करून ते आयोनीयन बेटांत निघून गेले, व तेथें कायमची वस्ती करून राहिले.

फ्रान्सांतील राजक्रांतीनें ग्रीक लोकांस नूतन हुरूप आली. विद्यालयें सर्वत्र स्थापन झालेलीं होतीं. फार विद्वान गृहस्थांनीं त्यांस ज्ञान, नीति व स्वातंत्र्य यांची अभिरूचि लाविण्याचे प्रयत्न केले. आडामान्टीयासकोरेस हा या सर्वांत फार विख्यात होता. त्यानेंच प्रथम ग्रीक भाषा शुद्ध करून तिचे नियम बांधून टांकिले; ग्रीक लोकांस आपल्या प्राचीन ग्रंथ भांडाराचा परिचय करून देऊन आपल्या थोर पूर्वजांच्या सद्गुणाचें अनुकरण करण्याची ईर्षा त्यांच्यांत उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला; पारीस शहरांत राहून ज्यांच्याबद्दल नाना तऱ्हेच्या कंड्या पिकविण्यांत आल्या होत्या व ज्यांचा लोक तिरस्कार करीत असत अशा ग्रीक लोकांची बाजू त्यानें स्वीकारिली. त्यानें लोकांस ग्रीस राष्ट्राची चांगली माहिती करून दिली व तें लवकरच स्वतंत्र होईल असें भविष्य केलें. व्यापार व उद्योगधंदे यांची वृद्धि होतहोती. यामुळें विद्यालयें स्थापन करण्यास व ग्रंथ छापण्यास, आणि आपल्या देशाच्या गरजा भागविण्यास श्रीमान व्यापाऱ्यांनीं उदार हस्तानें द्रव्यद्वारा सहाय्य केलें. याच समयास हायड्रा, सास्रा व पेटसा या लहानशा तीन बेटांनीं नवीन आरमार

तयार करण्याचा क्रम चालविला होता. हेंच आरमार पुढें स्वातंत्र्याच्या लटाईंत ग्रीक लोकांचा आधारस्तंभ होऊन त्यानें तुर्कांस "दे माय धरणीं ठाव" असें करून सोडिलें. आरंभीं काळा समुद्र व भूमध्य समुद्र यांच्या मधील प्रदेशांत त्यांनीं व्यापार सुरू केला. परंतु नंतर त्युनीस व बारबरी येथील चांचे लोकां-पासून आपलें रक्षण करण्याकरितां उदमी गलबतांस लढाऊ जहाजांची योग्यता त्यांस आणावी लागली. या योगानें समुद्रांतील युद्धकलेचें त्यांस ज्ञान प्राप्त झालें; व त्यांस अपार संपत्ति मिळाली, ती विशेषेंकरून पहिल्या बोनापार्टाची युरोप खंडांतील व्यापार पद्धत चालू असतां मिळाली.

धर्माधिकारीमठ, विद्वान लोक, क्लेपटस, प्रिमेट, दर्यावर्दी लोक आणि व्यापारी ह्या सर्व राष्ट्रीय शक्ति आपल्या देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्याच्या कामीं विचारपूर्वक दृढ निश्चयानें झटत होत्या सर्व ग्रीक राष्ट्रास तुर्कांच्या तावेदारींतून सोडविण्याचा व एतदर्थ अजून पर्यंत ज्यांचे प्रयत्न निर्फळ झाले असे ते देशाचे निरनिराळे भाग एकवटविण्याचा विचार प्रथम थेसलींतील रिगास फेरीओस याच्या मनांत आला. स्फुरण उत्पन्न करणाऱ्या आपल्या रणकवनांनीं त्यानें ग्रीक लोकांच्या अंतःकरणांत आपल्या देशाबद्दल व स्वातंत्र्याबद्दल अनावर प्रीति उत्पन्न केली. तसेंच आपल्या वाडवडीलांच्या हातीं किती विस्तीर्ण प्रदेश होता हें चटकन त्यांच्या मनांत भरावें म्हणून त्यानें सर्व ग्रीक प्रदेशाच्या नकाशाचें पुस्तक छापून काढिलें. आपल्या पूर्वजांचे गुण व पराक्रम हीं त्यांच्या मनांत भरावीं म्हणून त्यानें फ्रेंच भाषेंतून "तरुण आनाकारासिस याचा प्रवास" नामक पुस्तकाचें भाषांतर केलें. तसेंच ग्रीक लोक स्वतंत्र झाल्यावर त्यांनीं व पूर्वीकडील ख्रिस्ती धर्मानु-

यायांनीं कसें वागावें याजवद्दलच्या कायद्याचें पुस्तकही त्यानें तयार करविलें. पुढें सोसायटी आफ फ्रेंडस (मित्रमंडळ) या नावानें जी मंडळी स्थापन झाली तिची मूळ कल्पना यानेंच काढिली. ज्यांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्य प्रीति उत्पन्न झाली होती व योग्यता, बुद्धि व ऐश्वर्य यांच्या योगानें समाईक उद्देश तडीस नेण्याची ज्यांच्यांत लायकी व इच्छा होती असे सर्व लोक या संस्थेच्या नांवाखालीं एकत्र झाले. या सभेचा प्रसार सर्व देशभर झाला, व बहूतकरून सर्व ग्रीक लोक तिचे सभासद बनले. आपला मोठा उद्देश तडीस जाण्याच्या कामीं बोनापार्टास अनुकूळ करून घेण्याच्या उद्देशानें सन १७९७ त तो इटालींत गेला असतां ट्रिस्टी येथें आस्ट्रीयन लोकांनीं त्यास पकडून तुर्कांच्या हवालीं केलें; व त्यांनीं बेलग्रेड येथें त्याचा शिरच्छेद करण्याचा हुकूम केला. मरण्याच्यापूर्वी " ग्रीक लोक माझ्या मृत्यू-बद्दल लवकर उसनें फेडतील " असें तो म्हणाला.

भाग ४.

ग्रीक राष्ट्राचें पुनरुज्जिवन. सन १८२१ पासून १८६२ पर्यंत.

रिगास याचे उदार प्रयत्न व आत्मत्याग; विद्यापीठें व धर्माधिकारीमठ यांजकडून मिळालेल्या प्रोत्साहनानें ग्रीस देशाच्या स्वातंत्र्याविषयीं लोकांच्या मनांत नित्य वृद्धिंगत होत असणारें प्रेम; क्लेप्टस् व सुलिओटस यांचीं शौर्याचीं कृत्यें; तुर्कीलोकांच्या भ्याडपणामुळें त्यांजविषयींची तुच्छता व त्यांचें क्रौर्य, रानटी वर्तन व धर्मवेड यांबद्दल द्वेष; या सर्व कारणांनीं अखेरीस सन १८२१ सालचें राजक्रांतीचें बंड उत्पन्न झालें. रणकाव्यांत म्हटल्याप्रमाणें ' देशाचें स्वातंत्र्य व ख्रिस्तावरची पवित्र श्रद्धा राखण्या करितां ' सर्व ग्रीक लोक--पुरुष व बायका; अल्पवयी व वृद्ध-- एकदम युद्धास सिद्ध झाले. अगदीं उत्तर टोंकास डयान्युब नदीच्या कांठच्या प्रांतांत आणि आरकेडिया व लेकोनियाच्या डोंगराळ मुलखांत एकाच वेळीं बंडाळी माजली. बेलाचिया प्रांतांत ग्रीक रजवाड्यांच्या आश्रयाखालीं ' मित्रमेळा ' नांवाची संस्था बराच काळ पावेतों परिश्रम करून राहिली होती व तिच्या परिश्रमांस यश येऊन तेथील रहिवाशी पुष्कळ ग्रीक लोक एकत्र झाले होते. त्या प्रांतांत राज, घराण्यांतील पुरुष आलेक्झांडर सिलांटीस यानें ग्रीक लोकांच्या वतीनें स्वातंत्र्याचा ध्वज उभारिला. याच प्रांतांत राजपुत्रांच्या आश्रयाखालीं हिप्याट्रया या संस्थेचे प्रयत्न फार दिवसपर्यंत बिन हरकत चालू होते. ग्रीस देशांतील सर्व प्रांतांतील तरूण मंडळी ब्युच्यारेस्ट नामक विद्यालयांत एकत्र जमली; आणि जिओजियस गेन्ना-

डियस याच्या वर्तनानें व भाषणांनीं त्यांस चेव येऊन पूर्वी थीबन लोकांनीं पेलोपिडास व एपिमिनान्डास यांच्या हाताखालीं ज्याप्रमाणें " पवित्र सेना " नामक सेना उभारिली होती त्याप्रमाणें त्यांनीं शस्त्रें उचलून ' पवित्र टोळी ' नामक सैन्य जमविलें. आलिम्पियन ज्यार्जियस उर्फ ज्यार्गाकास यानें थेसली व एपिरास या प्रांतांत कित्येक शूर व अनुभवी लढवय्ये जमविले. तथापि वालाकियन लोकांच्या भ्याडपणामुळें व विश्वासघातामुळें आणि इपिरलान्टीस यास युद्धाचा अनुभव नसल्यामुळें तुर्की लोकांनीं तें बंड लष्करच मोडून टाकिलें. या पवित्र टोळींतील थोर मनाचीं व विद्वान तरूण मंडळी ज्यागाट्झानी येथें धारातिर्थीं पतन पावली. पुष्कळ निकराचे प्रयत्न निर्फळ झाल्यावर शूर ज्यार्गाकास हा आपल्या लोकांसह सेकान येथील मठाच्या आश्रयास गेला, आणि त्या इमारतीखालून तयार केलेल्या सुरूंगास बत्ती देऊन त्यानें आपणासह चढाई करून आलेल्या तुर्कांच्या चिंधड्या उडवून दिल्या. याचा तुर्की लोकांनीं भयंकर रीतीनें सूड उगविला. ग्रीक लोकांची वस्ती असलेल्या मोल्डव्हिया व वालाचिया प्रांतांतील शहरांत त्यांनीं रक्ताचे पूर वाहविले. कान्स्टटिनोपल येथें त्यानीं उडवून दिलेला अनर्थ केवळ अनिर्वाच्य होता. कान्स्टटिनोपल बंदर जाळून बादशाहास ठार मारून शहर काबीज करून घेण्याच्या इराद्यानें ग्रीक लोकांनीं घातलेला घाट उघडकीस आला; तेव्हां सर्व ग्रीक लोकांचा निःपात करण्याचा दुसरा महंमद बादशाहा यानें निश्चय केला वयोवृद्ध कुलाधिपति ग्रेग्रीअस यास इस्टर सनंड म्हणजे इस्टर नामक सणांत येणाऱ्या रविवारीं त्याच्या राहत्या वाड्याच्या दरवाज्यासींच फांशीं दिलें, आणि त्याचें शव गल्लोगल्लीं सर्व शहरभर फरफटत फरफटत

फिरवून समुद्रांत फेंकून दिलें. एथून कत्तलेस आरंभ झाला. सर्व कुलाधिपति, बिशप, इतर मुख्य मुख्य धर्माधिकारी व हजारों इतर शहरवाशी यांचे खून पडले, व त्यांच्या जिंदग्या जप्त करण्यांत आल्या. हजारों लोकांस गुलाम करून आशियांत पाठविलें. सारांश कान्स्टंटिनोपल शहर घेतांना जो भयंकर देखावा नजरेस पडला त्याचें प्रतिबिंबच यावेळीं उभें राहिलें म्हटल्यास चालेल. आड्रियानोपल, थेसालोनैक, स्मर्ना, कायप्रस या सर्व ठिकाणीं असाच प्रकार घडून आला.

परंतु खुद्द ग्रीसांत तर बंडखोरांस जास्त यश आलें होतें. आरकंडियांतील म्यान्क्टालारा नामक मठांत मोठमोठे वजनदार पेलापोनिशन तारीख ६ अप्रील १८२१ रोजीं एकत्र जमले, आणि स्वदेशाप्रीत्यर्थ देह अर्पण करण्याची त्यांनीं आणभाक घेतली. या मंडळींत माइना प्रांतांचा वृद्ध अधिपति पेट्रस मौरा मिचलास हा आपले बंधू, पुत्र, पौत्र यांसह मिळाला होता; व ते सर्वजण शौर्य आणि देशाभिमान यांजबद्दल सारखेच प्रसिद्ध होते. त्याच प्रमाणें पेलापोनिसांतील जगविख्यात योद्धा थिओडोरस कोलोकोत्रोनीस हाही त्यांत होता. यास ग्रीस देशांतील अर्वाचीन ओडेशियस म्हटल्यास शोभेल. त्याजपाशीं अंतपार लागूं नये असा युक्तिप्रयुक्तींचा भरणा असून संकटांत न डगमगणारें धैर्य वसत होतें. आपल्या नावाजण्या सारख्या शौर्यानें व तसेंच श्रोतृजनास थक्क करून सोडणारें लोकप्रिय व विनोदी अशा वृक्तृत्वानें त्यानें सर्व पेलापोनिशन लोकांस, स्फुरण आणिलें. त्याचप्रमाणें शहाणे धर्माधिकारी, झैमिस स्यान्टास आणि डिलिजैनीस व निळ्या निशाणास विजय प्राप्तीचें अभिवचन देऊन तें शुद्ध करणारा आर्चबिशप जरमा-

नास हेही त्यांत मिळाले होते. ज्यांत बहुतेक भरणा आलबनी लोकांचा होता अशीं दोन मोठीं तुर्की सैन्यें या बंडवाल्यांच्या बंदोबस्ताकरितां पेलापोनीसांत शिरलीं. यांपैकीं एकांत ६००० शिपाई असून त्यानें किरयाकोलीस व जोनानस मारिओमिकालीस याच्या हाताखालील १००० ग्रीक लोकांवर हल्ला केला. अहोरात्र दोन दिवसपर्यंत ग्रीकलोक मोठ्या शौर्यानें व नेटानें लढले. तिसऱ्या दिवशीं कोलाकोत्रोनीस आपल्या आर्केडियन लोकांसह येऊन पोंचला आणि व्हालटेट्सी येथें त्यानें तुर्क लोकांचा पुरा मोड करून टाकिला. या लढाईंत बचावून पळून गेलेल्या लोकांस ट्रिपालीस येथें आश्रय मिळाला. याचवेळीं ग्रीसाच्या पूर्व प्रदेशांत उद्भवलेल्या बंडाचा मोड करण्यासाठीं ४५०० घोडे स्वारांचें एक तुर्की पथक तिकडेस शिरलें. त्याच्या पुढील गतीस प्रतिबंध करण्याच्या हेतूनें ७०० ग्रीक थरमापिलीची खिंड धरून बसले. त्यांचें अधिपत्य आन्फीसाचा बिशप व तरूण डायस्कास यांजकडेस होतें डायस्कास हा पूर्वी धर्माधिकारी असून सांप्रत सौंदर्य, शौर्य व सहृदयता यांच्या योगानें सर्व सरदारांत अत्यंत लोकप्रिय झाला होता. मोठ्या निकरानें व शौर्यानें लढत असतां बिशप मरण पावला. व डायसकास हा पुष्कळ जखमांनीं घायाळ होऊन शत्रूंच्या हातीं सांपडला. त्यांनीं त्याचा अत्यंत निष्ठूरपणें खून केला (ता. ५ मे). त्या दिवशीं आकाश अगदीं निरभ्र असून ऊन लख्ख पडलें होतें. त्यास वधस्थानीं नेलें तेव्हां 'फुलें फुलत असून जणू पृथ्वी देवीनें हिरवा शालु परिधान केला आह आसा भास होणारा किती मजेचा दिवस **च्यारान** यानें मला नेण्यास पसंत केला आहे पहा!' असें त्यानें म्हटलें (यावरून मरणाची तिळभरही भीती त्याच्या ठायीं नव्हती हें उघड आहे).

तुर्कांनीं फोकीस, बिओशिया व अटिका हे प्रांत उध्वस्त करून टांकिले, तरी इतःस्ततः पसरलेले ग्रीक सैन्य त्यांच्या पिछाडीस ओडेसियस यानें पुनः जमविलें. हा ओडेशिअस उद्योग व शौर्य यांजबद्दल सुप्रसिद्ध होता. पांच हजार तुर्की लोक त्याजवर चाल करून गेले. गुरास हा त्यास जाऊन मिळाला व त्यासह ओडेसियस हा १००० लोकांनिशीं थरमापिलींत जाऊन राहिला; व तुमुल युद्ध करून त्यानें तुर्की लोकांचा पूर्ण पराभव करून टांकिला.

शेवटीं तारीख ५ व ६ सप्टेंबर या दिवशीं यूरोप खंडांतील ग्रीसच्या सर्व मुलखांतील लोकांनीं जेव्हां हत्यारें उचालेलीं, तेव्हां त्या देशाच्या ताब्यांत असलेल्या बेटांच्या बंदोबस्ताकरितां कान्स्टान्टिनोपल येथून आरमार रवाना झालें. ग्रीस देशांतील आरमारांत मुख्यत्वें करून हायड्रा, चेटसा आणि सारा या प्रांतांतून आलेलीं गलबतें होतीं; त्यांनीं शत्रूंवर चाल केली. हायड्रा येथें सर्व सत्ता देशाभिमानी उमरावांच्या हातांत असे; तेथील लोकांची चालचलणूक स्पार्टन लोकांप्रमाणें असून, अभिमान, साधेपणा व अपराजित शौर्य या गुणांत ही ते स्पार्टन लोकांची बरोबरी करण्यासारखे होते. व्यापारउद्योग, सचोटी व कलाकौशल्य या सद्गुणांच्या जोरावर त्यांनीं अपार संपत्ति मिळविली असून आतां ती सर्व संपत्ति, सर्व जहाजें व अखेरीस प्राणही स्वदेश सेवेंत अर्पण करण्याचा त्यांनीं निर्धार केला होता. स्वातंत्र्या प्रीत्यर्थ चालविलेल्या या युद्धांत हायड्रियट लोकांचें अधिपत्य अव्वल पासून अखेरपर्यंत लयाझारोझ् कुंटुरीओटीस् याजकडेस होतें. यावेळीं त्यानें तारतम्य, सद्गुण व दृढनिश्चय हे गुण प्रगट करून आपली सर्व दौलत देश सेवेंत खर्ची घातली. ग्रीक लोकांचें

आरमार लहान असून तुर्कीं आरमार त्याच्यापेक्षां फारच मोठें होतें, तरी त्यांनीं तुर्कांस लेसवास बेटाच्या शेजारी गांठलें, व तारीख ८ रोजीं वर ६०० लोक असलेल्या एका गलबतास आग लावून दिली. यामुळें तुर्कीं आरमाराची त्रेधा उडून त्यानें परत कान्स्टन्टिनोपलकडे धूम ठोकिली.

हे जय मिळविल्यानंतर पुढील राज्यव्यवस्थेच्या तजवीजीस ग्रीक लोक लागले. सर्व ग्रीक लोकांची एक सभा एपिडाउस येथें भरली व राज्यपद्धतीचे नियम तयार केले. त्यांत असें नमूद केलें होतें कीं " फार वर्षेपर्यंत देशकालीं यातना व त्रास सोसून आतां ईश्वराच्या व मानवाच्या साक्षीनिशीं आम्हीं अशी प्रतिज्ञा करितों कीं गतस्वातंत्र्य मिळविण्याकरितां व जगांतील ख्रिस्ती व सुधारलेलीं राष्ट्रें--कीं जीं तो धर्म व सुधारणा हीं दोन्हीं आमच्या पूर्वजांकडून शिकली--यांत आपली गणनाकरून घेण्याकरितां सर्वस्व अर्पण करण्याचा आम्हीं निश्चय केला आहे".

हा वंडावा मोडून टांकण्याच्या कामीं पुढील सालीं तुर्कस्थानानें आपली शिकस्त करून पाहिली. द्रामअली याच्या हाताखालीं सर्व राज्यांतील निवडक ४०००० लोक देऊन ग्रीक लोकांनीं नाफ्लीया शहरास दिलेला वेढा उठाविण्याकरितां पेलापोनीसांत त्यांस पाठविलें. यावेळीं ग्रीक लोक मोठ्या कचाटींत आले. आपले पेलोपोनीशन लोक जमविण्याचीं कोलोकोत्रोनीस यास सवड मिळावी म्हणून मोसेतिचालीस व डेमिट्रियस प्सीलयान्टीस (आलेक्झांडर याचा उत्तम व शूर माऊ) हे आरगास येथील आक्रोपोलीस व मायली (मिल) धरून बसले. कोलोकोत्रोनीस ही १०००० लोकांनिशीं लौकरच येऊन

दाखल झाला. तुर्की लोकांची पेलोपोनीसांत पुढें जाण्याची छाती होईना; व अशा स्थीतींतच त्यांस आढळून आलें कीं धान्य व पाणी यांच्या आस्तिमुळें आरगासच्या मैदानांत ही आतां तळ देऊन रहाण्याची सोय नाहीं. म्हणून कोरीन्थकडे परत जाण्याचा त्यांनीं निश्चय केला; परंतु निकेटस व सील्यांन्टीस यांनीं घाटवांटा अडवून टांकिल्या होत्या; व आतां ते तुर्कांवर तुटून पडले, व बहुतेक सर्व सैन्याचा त्यानीं सप्पा उडवून टांकिला. जे थोडेसे लोक निभावले ते पळून कोरिन्थ येथें गेले. झुचोटइयाच्या विजयाचें स्मरण देणारा हा मोठा जय कोलोकोत्रोनीस याच्या युद्धकलां कौशल्यानें व निकेट याच्या शौर्यानें मिळाला. या वेळापासून निकेटस हा "तुर्कहंता" हें नामाभिधान पावला; तरी वस्तुतः तो एकाद्या लहान मुलाप्रमाणें गरीब स्वभावाचाच होता.

कान्स्टान्टिनोपलांतून सैन्य रवाना झालें त्याचवेळीं तुर्की बारबरी, व इजिप्सियन असें संयुक्त आरमारही ग्रीसाच्या ताब्यांतील बेटांचा समाचार घेण्यासाठीं म्हणून रवाना झालें तें एप्रील महिन्यांत सुंदर व सधन परंतु निर्वीर्य अशा चियास बेटावर येऊन पोंचलें. मेंढ्यांच्या कळपावर लांडगे तुटून पडतात त्याप्रमाणें त्या लोकांवर तुर्क तुटून पडले. कित्येक दिवसपर्यंत त्या बेटांत रक्तपात--जुलूम व जाळपोळ याशिवाय कांहीं दिसत नव्हतें. मिसरदेश व आशियाखंड येथें गुलाम करून विकण्याकरितां सहस्रावधि पुरूष व बायका पाठविण्यांत आल्या. या भयंकर कृत्यांची बातमी समजली तेव्हां हायड्रियट पेटसीपट्स् आणि सारियटस् यांनीं अती त्वरेनें आपलीं आरमारें तयार केलीं. या सर्व गलबतांचे अधिपत्य हायड्रियट आन्ड्रीस मियालीस याजकडेस देण्यांत आलें. ग्रीस देशांत जे चांगले आड-

मिरल निपजले त्या सर्वांत हा उत्तम असून निश्चयाचा खंबीर असे; तो कधीं हंसला नाहीं; किंवा रडला नाहीं. त्याचें श्रेष्टत्व सर्वांस सारखेंच मान्य होतें. जय मिळविल्यानंतर दुसरी कसली अपेक्षा न ठेवितां पुनः तो आपल्या कुटुंबांत जाऊन राहिला. आपला अनुभव व धैर्य यांच्या योगानें तुर्की लोकांचें आरमार अफाट असतांही त्यास त्यानें अडवून धरिले. ता. ६ जून रोजीं कान्स्टन्टीनास कानारीस नामक एक तरूण व शूर सारियट ३२ लोकांनिशीं एक लहानसें गलबत घेऊन निघाला व त्यानें एका मोठ्या लढाऊ तुर्की जहाजास आगलावून दिली, व तें सर्व जाळून टांकिलें. याप्रमाणें निरपराधी पुरूष व स्त्रिया यांच्या रक्तानें दूषित झालेल्या चियास बेटासभोंवतालच्या पाण्यांत आपल्या आडमिरलासह (अधिपति) २००० तुर्क लोक मृत्युमुखीं पडले. यापासून तुर्की लोकांत अशी धडकी भरली कीं ग्रीक आरमार लहान असतांही ते लोक लढाईस उभें न राहता त्यांनीं पळ काढिला. नाप्लीयाचा वेढा उठविण्याकरितां आलेलीं इजिप्त्सीयन गलबतेंही ही त्यांस येऊन मिळालीं, तरी ग्रीक आरमाराच्या भीतीनें तिकडे न जातां त्या किल्ल्याच्या समोरून ते पळाले. याप्रमाणें मदत न मिळाल्यामुळें नाप्लीया ग्रीक लोकांच्या हस्तगत झालें (१२ डिसेंबर). तुर्क आरमार टेनिएस बेटाकडे गेल्यावर त्यास तुफानानें गांठिलें व ग्रीक लोकांच्या युक्तीनें १००० लोक वर असलेलें गलबत नाहींसें झाल्यामुळें एकंदर सर्व आरमार होईल तितक्या त्वरेनें कान्स्टन्टिनोपलास परत गेलें.

सुलियट लोकांचा देश जिंकिला गेल्यावर ते आयओनियन बेटांत जाऊन राहिले होते, ते दरम्यानच्या मुदतींत

म्हणजे सन १८२० सांत आपल्या डोंगराळ मुलखांत पुनः जाऊन राहिले. त्या लोकांनीं आतां तुर्कीं लोकांबरोबरचें युद्ध परत चालू केलें. तुर्कांनीं त्यांच्या पहाडी मुलखावर केलेल्या स्वाऱ्या त्यांनीं हटवून मागें लाविल्या. यूरोप खंडांत (बेटें खेरीज करून) ग्रीसाच्या ताब्यांत असलेल्या दक्षिणे कडील प्रांतावर सन १८२२ सांत आलेक्झांडर मारोकारडेटास हा मुख्य अधिकारी होता. राजकारस्थानांतील निपुणते विषयीं जशी त्याची ख्याति होती तशीच शहाणपणाच्या सुशिक्षीत देशाभिमाना विषयींही होती. मिसोलांधी हें ठिकाण किती महत्वाचें आहे हें मनांत आणून तो तेथें जाऊन राहिला आणि त्यानें आकारेनिया व इटोलिया येथें हीं लष्करी शिक्षणाची योजना केली. मारोकारडेटास हा स्वतः बरोबर २५०० लोक घेऊन उत्तरेकडे सुलीअट लोकांस मदत करण्याकरितां गेला. परंतु एपायरस प्रांतांत ते शिरले नाहींत तोंच त्यांच्याहून चौपटिनें जास्त अशा तुर्कीं सैन्यानें त्यांस गांठिलें. तेव्हां ते मोठ्या निकरानें लढले, तरी त्यांचा फार नाश होऊन त्यांस मागें हटावें लागलें. त्यांत पुष्कळ फिलहेलनीस (हेलनिक लोकांचें दोस्त) पडले, बरमन सरदार नारमन याची ही तीच अवस्था झाली. त्याचें प्रमाणें माईना व आरकेडिया प्रांतांतून लष्कर घेऊन पायरसांत येत असलेला कायरियाक्युलिस मौरोमिचालीस हाही तिकडेस रमण पावला. तो मोठ्या निकरानें लढला हें खरें, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. याप्रमाणें सर्व तुर्कीं सैन्याचा रोंख सुलियट लोकांवर होता. त्यांनीं शौर्यानें शत्रूशीं सामना केला; परंतु जवळचा दारूगोळा व धान्य संग्रह संपल्यामुळें त्यांस आपले पहाड पुनः सोडून केफालोनिया येथें जाऊन

रहाणें भाग आलें व तेथून लवकरच ते मेसालोंघीस जाऊन पोंचले. आतां सर्व तुर्की सैन्याचा रोंख त्या ठिकाणावर राहिला. परंतु मारोकारडेटास याचा व तेथील रहिवाशांचा "मारुं किंवा मरूं" असा निश्चय होऊन चुकला होता; कारण तें शहर सर्व पेलापोनीसांत अत्यंत बळकट असल्याचें त्यांस ठाऊक होतें. शहरांत पुरते ३९० लोकही नव्हते; तटबंदी जुनी व मोडकळीस आलेली असून बचावाचें साधन कायतें चवदा जुन्या तोफा. तुर्की आरमार तर त्यास वेढा देतच होतें. हायड्रियट लोकांचीं गलबतें येऊन तुर्की लोकांस वेढा उठविणें भाग पडे पर्यंत कसा तरी वेळ काढून घेण्यासाठीं मारोकारडेटास यास बळेंच तहाचें बोलणें लावावें लागलें. तीं गलबतें पोंचतांच तुर्कांस वेढा उठवावा लागला. इकेंड आकारनेंनिया, इटोलिया व अन्य स्थळें येथून कुमक एकदम येऊन पोंचली. तारीख ६ जानेवारी १८९३ या दिवशीं एकदम हल्ला करून ठिकाण सर करण्याचा तुर्कांनीं यत्न केला, तेव्हां त्यांस हाकून लाविलें, इतकेंच नाहीं तर ग्रीकलोक पाठीस लागल्यामुळें त्यांस फार नुकसान सोसावें लागलें.

पेलापोनीसाचें केवळ नाकच असें जें मेसालोंघी शहर तें हस्तगत करून घेण्याकरितां सुलतानानें सन १८२३ त आलबनीस लोकांचें बलाढ्य सैन्य तिकडे रवाना केलें. या छोटेखानी शहरांतील लोक शूर होते हें खरें; तरी त्यावेळीं ग्रीक राजक्रांतींतील विजयशाली योद्धा व पुरातन सुलीयट घराण्यांतील पुरूष मार्कस बोझारिस हा तेथें हजर नसता तर त्यांस क्वचितच आपला बचाव करितां आला असता. केफालोनियांतून आलेल्या १२०० लोकांचें धुरीणत्व पत्करून चाल करून येत असलेल्या

तुर्कां लाकांवर हल्ला करण्याचा धाडसाचा निश्चय त्यानें केला आपल्या सैन्यांतील निवडक ३५० असामीनिशीं त्यानें तुर्कीं छावणीवर रात्रीच्या वेळीं हल्ला केला; आणि भितीनें भेदरून गेलेल्या आपल्या शत्रूस तटबंदी असलेल्या सुरक्षीत स्थळांतून हांकून लाविलें. जरी जबर जखमा लागल्या होत्या तरी बोझारिस हा मस्तकांत गोळी लागून पडेपर्यंत एकसारखा लढतच होता. तो पडला तरी युद्ध चालूच होतें. अरुणोदय झाल्या नंतर आपल्या प्रिय सरदाराच्या मृत्यूमुळें विव्हळ झालेले सुलिअट लोक रणभूमी पासून निघून गेलें, व जातानां त्या पराक्रमी पुरुषाचें प्रेतही त्यांनीं बरोबर नेलें. त्यांस जय मिळाला खरा; पण तो मोठ्या नुकसानावांचून मिळाला नाहीं. बोझारिस याच्या मृत्यूनें सर्व ग्रीस देश शोक व भीति यांनीं व्यापून गेला. पुढें सहा महिन्यांनीं म्हणजे ता. १९ एप्रिल रोजीं दुसरा एक अनर्थकारक प्रकार घडून आला, व त्यानें सर्व ग्रीस देश शोकाकूलं करून सोडिला. कारण प्रसिद्ध कवि लार्ड बायरन हा त्या दिवशीं मरण पावला. ग्रीस देशाच्या स्वातंत्र्याविषयीं आतूर असलेल्या इतर गृहस्थांप्रमाणें या झटपटींत त्यांस मदत करण्याकरितां तो गेला होता. त्यानें स्वतःच्या खर्चानें सुलीअट लोकांचें एक पलटण तयार केलें होते. तें घेऊन ग्रीस देशास स्वतंत्र करण्याकरितां लढाईस जाण्याचा त्यानें निश्चय केला होता, पण इतक्यांत मृत्यूनें त्यास गांठिलें. यापूर्वी त्या देशावर आलेल्या अनेक संकटांपेक्षां या अरिष्टानें ग्रीक लोकांस अतिशयीत दुःख झालें.

परंतु दरम्यान इकडे १९००० तुर्की लोकांचें सैन्य मेसालोंघीपुढें येऊन दाखल झालें; व त्यानें अनाटोलिकम शहरास

वेढा दिला; तरी वेढ्यांत सांपडलेल्या लोकांचें शौर्य, त्यांनीं वेळोवेळीं बाहेर पडून घातलेले छापे, हिंवाळ्याचें सानिध्य व बोझारीसाच्या कीर्तीमुळें त्यांच्या अंत:करणांत उत्पन्न झालेली भीति यांच्या योगानें तुर्की लोकांस तो उठवून निघून जावें लागलें.

ग्रीक लोकांचें बंड मोडून टाकण्याकरितां पुष्कळ निरर्थक यत्न केल्या नंतर ईजिप्तचा अधिकारी मंहमद पाच्छा याची मदत सुलतानास मागणें जरूर पडलें. य:कश्चित् शिपायाच्या दर्जापासून ईजिप्तच्या सुभेदारीच्या पदास चढलेला हा गृहस्थ मोठा कर्ता पुरूष असून त्याचें खुष्कीवर व समुद्रावर मोठीं सैन्यें सिद्ध करून त्यांजवर बहुधा युरोपियन अंमलदारांची योजना केली होती. मोठ्या पगाराच्या आशेनें त्याच्या नोकरीस राहून त्यांनीं तीं तरबेज केलेलीं होतीं. ग्रीस देश जिंकण्यांत त्याचें सहाय्य हटकून मिळावें म्हणून सुलतानानें क्रीट बेट त्यास दिलें. राजक्रांतीच्या आरंभापासून तीं सन १८२३ त मंहमदानें तें हस्तगत करून घेईपर्यंत हें बेट स्वातंत्र्याच्या पक्षास होतें. सदरील मंहमदाचा पुत्र इब्राईम यास आतां पेलापोनीसचा मुख्य सुभेदार नेमून तो प्रांत पुनः जिंकून तुर्कस्थानाच्या ताब्यांत आणण्याचा त्यास हुकूम झाला. नंतर कासास नामक लहान बेटावर इजिप्तचें मोठें आरमार चाल करून गेलें. (जुलै १८२४). या बेटांतील शूर राहिवाशांनीं क्रिटन लोकांस नेटानें व मोठ्या धैर्यानें सहाय्य केलें होतें. कासियन लोक थोडाच वेळ पण मोठ्या निकरानें लढले. पण शेवटीं कांहींची कत्तल झाली वा कांहींस गुलाम म्हणून विकण्याकरितां इजिप्त म्हणजे मिसर देशांत पाठविलें. असा प्रकार चालू असतां २०० गलबतांचें एक आरमार सारा बेटापुढें येऊन टेपलें. यांतील लोकांवर त्यांच्या

धिट्टाईमुळें विशेष रोष झालेला होता. त्यांनीं आपल्या बेटाची तटबंदी केली होती व मासिडोनियांतून त्यांच्या मदतीस १००० लोक आले. या साधनांच्या भरंवशावर स्वस्थ राहून त्यांनीं तुर्की लोकांचे पाय किनाऱ्यास लागूं न देण्याचा कांहीं प्रयत्न न करितां जमिनीवर शत्रूबरोबर लढण्याचा संकल्प केला. या लढाईंत त्यांनीं जरी आपलें नेहमीचें शौर्य प्रगट केलें, तरी शत्रुच्या संख्येपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. त्यांच्यापैकीं कांहीं असामी व ६०० म्यासिडोनियन मिळून सेन्ट निकलस नामक मठाची बंदोबस्ती करून त्याच्या आश्रयास राहिले. दोन दिवस निकरानें लढल्यावर त्यांपैकीं $\frac{1}{3}$ लोकही शिल्लक राहिले नाहींत. व राहिले तेही बहुतेक जखमी झालेले. अशा स्थितींत त्यांनीं एक धिट्टाईचा संकल्प केला (असें बेत या लढाईंत पुष्कळ नजरेस पडतात). त्यांनीं गोळ्या सोडण्याचें बंद केलें. आणि तुर्कांस मठांत स्वस्थपणें शिरूं दिलें. तो शत्रूनीं भरून गेल्यावर " स्वदेश आणि स्वातंत्र्य " अशा शब्दांनीं जयघोष करीत त्यांनीं सर्व इमारतीस वन्ही ठोकून दिली. सर्व ग्रीक तर या कृत्यांत मेलेच; परंतु त्यांजबरोबर ४००० तुर्कीहि बळी पडले. यामुळें शत्रूस अपार त्वेष आला. त्यांनीं सहस्रावधि पुरूष धरून विक्रीकरितां गुलामाच्या बाजारांत पाठविले. पुष्कळ स्त्रियांनीं तुर्काच्या हातीं न लागावें म्हणून समुद्रांत उड्या टाकिल्या. राहतांपैकीं सहस्रावधि माणसांनीं गुहांचा व पर्वतांचा आश्रय केला. ग्रीक आरमारास ह्या अनिष्ट प्रकाराचा प्रतिकार करितां आलें नाहीं; कारण उदार बुद्धीनें आपल्या स्वतःच्या खर्चानें हीं गलबतें सिद्ध करणाऱ्या हायड्रा व स्पेझा या शहरांच्या रहिवाशांचीच पुंजी संपत आली होती. परंतु स्पार्ट्राच्या लोकांची

संकटें पाहून त्यांस पुनः चेव आला व त्यांनीं पुनः प्रयत्न चालविले. मिआलीसच्या खालोखालचा प्रसिद्ध नौकाधिपती जो ज्यार्जीयस स्याक्चुरीस याच्या देखरेखीखालीं त्यांनीं दुसरें एक आरमार तयार केलें. यावेळीं तुर्की आरमार स्यामास बेटावर हल्ला करण्याच्या तयारींत होतें. याच उद्देशानें दुसरें एक आरमार आशिया खंडाच्या किनाऱ्यावर ठेवून दिलें होतें. बच्यावून आलेल्या ग्रीक आरमारास स्पाराट व कानारा लोकांची कुमक मिळाल्यावर ग्रीक आरमार या आरमारांवर चालून गेलें, आणि मायकेलच्या डोंगरा लगत ग्रीक लोकांनीं समुद्रांत तीन लढाया मारिल्या. त्यांत त्यांची संख्या कमी असतांही त्यांनीं प्रत्येक वेळीं तुर्कांचा परभव केला व शत्रूचीं पुष्कळ गलबतें वरिल खलाशांसह जाळून टाकिलीं. एकामागून एक या प्रमाणें झालेल्या अनेक पराभवांमुळें आशिया खंडांतील मोठें तुर्की लष्कर कच खावून इजिप्तांतल्या मोठ्या आरमास जाऊन मिळण्याच्या इराद्यानें हालिकारनीस येथें निघून गेलें. मिआलीस व स्याकतुरीस असे एकत्र होऊन त्यांनीं त्याजवर चाल केली. मिआलीस यांचें आरमार लहान होतें तरी शत्रूच्या मोठ्या सैन्यास अडवून धरण्याचा त्यानें निश्चय केला होता. त्यानें तीनदां त्यांचा पराजय केला, त्याचीं बरींचशीं गलबतें जाळलीं व त्यांस मोर्चा फिरवून मिटलनीस पळ काढावा लागला; इतकें करूनच तो राहिला नाहीं, तर जवळ जवळ वर्षाच्या अखेरीपर्यंत त्यानें त्यांस त्रास देण्याचा क्रम ठेविला. शेवटीं तुर्की आरमारास हेलिस्पान्ट व आशिया मायनरकडे वळून जाणें भाग पडलें. वयोवृद्ध योद्धा मिआलीस हा कीर्ती संपादून निमूटपणीं घरीं निघून गेला. युरोपखंडांतील ग्रीसाच्या मुलखांत तुर्कांनीं चालविलेल्या लढायांत ही त्यांस असेंच अपेश आलें.

तथापि पुढल्यावर्षीं (१८२५) युरोपियन अलमदारांच्या हाताखालीं तयार झालेलें मोठें व उत्तम तरवेज असें लष्कर बरोबर घेऊन इब्राईमपाच्छा पेलापोनीसांत शिरला. त्यानें पायलासास वेढा दिला, व तिकडील आपल्या उद्योगास सहाय्य व्हावें ह्मणून स्फाक्टीया नामक लहान बेटावर ही हल्ला केला. बावन मिसरी गलबतें बंदरांत शिरलीं त्यावेळीं हायड्राचा शूर रहिवाशी स्यामोडास हा फक्त आठ ग्रीक गलबतांनिशीं तेथें होता तारीख ८ मे रोजीं मिसरी लोकांनीं आपल्या लष्कराचा बराच भाग बेटावर उतरून दिला, व मिआलिस यानें हल्ला केला तर बचावकरितां यावा ह्मणून आरमार तयारीनें राहिलें; परंतु वारा प्रतिकूळ असल्यामुळें मिआलिसा यास त्या लोकांवर हल्ला करितां आलें नाहीं. बेटांत शिपायगिरीच्या कामगारीवर असलेले बहुतेक ग्रीक मारले गेले; साक्तुरीस व मारा कारडोटास हे पळून गेले, व वारा अनुकूळ झाल्यामुळें आठां पैकीं सात गलबतेंही शत्रूच्या आरमाराची फळी फोडून पार निघून गेलीं. त्यांचा सरदार श्यामोडास याच्या रक्षणास आतां मागें राहिलेलें एकटें जहाज " आथिना " एवढेंच शिल्लक राहिलें. परंतु तो मरण पावल्याचें वर्तमान जेव्हां लोकांस समजलें व स्याक्तूरीस याजकडेस त्यांचा पुढारीपणा आला तेव्हां बंदराच्या तोंडीं असलेल्या सगळ्या आरमाराच्या हातावर तुरी देऊन निघून जाण्याचा त्यांनीं निश्चय केला. बचावून निघून तरी जाऊं किंवा गलबतें जाळून तरी टाकूं असा त्या शूर खलाशांनीं निश्चय केला सहा तास लढल्यानंतर त्वरेनें व कुशलतेनें वैरीमारून "आथिना' समोरील गलबतांमधून निघून गेलें. तुर्की लोकांनीं स्क्याक्टीया हा हस्तगत करून घेतल्याचें उसनें थोड्याच दिवसांत मिआलीस यानें मिथोनेच्या बंदरांत वीस मिसरी गलबतें जाळून घेतलें.

इतक्या अवधींत तुर्की आरमार मेसोलांधविर हल्ला करण्याकरितां हेलिस्पान्टाहून निघालें. स्याक्तूरीस यानें आपल्या गलबतांनिशीं पुढें हाऊन त्यास युवोईया व आन्ड्रास या बेटांच्या मध्यें गांठलें, आणि त्याचा पूर्ण पराभव करून त्याची सामान नेण्या आणण्याची जहाजेंही हिरावून घेतलीं. परंतु तिकडे पेलापोनेसांत इब्राईम याचें अफाट सैन्य विजयी झालें. त्यानें पायलास हस्तगत करून घेतलें; मेसिना शस्त्रांनीं व अग्नीनें उध्वस्थ करून टाकिलें. असा प्रकार चालू असतां मेसिनियांतील राहणारा डिकाइयस यानें पेलापोनिशन लोकांत पुनः धैर्य जागृत करण्याचा निश्चय केला. जिवावर उदार झालेले असे ६०० असामी त्यानें निवडून काढिले, आणि आपला निश्चय नापाली सर्व्हो सरकारास कळविला. स्वदेशाकरितां पाहिजे तेव्हां देह सोडण्यास लोक तयार असले तरच त्यांच्या हातून देशसेवा घडण्याची शक्यता आहे, असेंही त्यानें आपल्या देशबांधवांस कळविलें. आर्केडियांत म्यानिक्रिया येथें आपल्या ठाण्याचा बंदोबस्त करून तो सर्व मिसरी सैन्य येण्याची वाट पाहत राहिला. एक सबंध दिवस पर्यंत उभय सैन्यांचें तुमुल युद्ध होऊन लिआनिडास व ३०० स्पार्टन यांनीं थरमापिली येथें जसे देह ठेविले होते त्या प्रमाणें यांनींही केलें. तिकडे इब्राईम खान मुलुख जाळीत लुटीत व लोकांस ठार मारीत देश जिंकीत व लढाईंत धरलेल्या बंदिवानांस मिसर देशांत पाठवीत होता. ग्रीक लोकांची सर्व प्रकारची सामुग्री असलेल्या लर्ना येथील बखारी आपल्या ताब्यांत घेण्याच्या हेतूनें पुढें तो आरगासच्या मैदान मुलुखांत गेला. परंतु या वेळीं २२७ शूर अनुयायांसह इप्सीलियान्टीस हा तटबंदीचा बंदोबस्त करून तेथें राहिला होता; व कांहीं झालें तरी

हें महत्वाचें ठिकाण हातांतून जाऊं द्यावयाचें नाहीं असा त्याचा कृत संकल्प होता. त्याच्या अचाट धैर्यास यश आलें. मिसरी लोकांस त्यांचें फार नुकसान करून त्यानें मागें हटाविलें व इब्राईम त्रिपोलीस येथें परत गेला. वयोवृद्ध कोलुकोत्रूस यानें १०००० लोक जमा केले. इब्राईम याजबरोबर झुजण्या करितां तो त्रिपोनीसकडे चालला. शत्रूपासून पेलापोनीसाचें रक्षण करण्याचें सामर्थ्य काय तें त्याच्यांत होतें, व त्यानें जमविलेलें लष्कर हा वेळ पर्यंत त्यानीं मिळविलेल्या सैन्यांत सर्वांहून अधिक होतें. जुलै महिन्यांत दोनही सैन्याची गांठ त्रिकोफा जवळ पडली. एका ग्रीक पलटणीच्या अविचारी आवेशामुळें ग्रीक सैन्यांत शिस्त राहिली नाहीं, व लवकरच ती अव्यवस्था सर्व सैन्यांत पसरून त्यामुळें त्याचा पूर्ण पराभव झाला. या पलटणीनें सेनापतीचा हुकूम न जुमानतां मिसरी लोकांचा फार लांब पर्यंत पाठलाग केला, त्याचा हा असा परिणाम झाला. ४०० लोक लढाईंत पडले. ८०० बंदिवान होऊन मारले गेले अथवा गुलाम म्हणून विकले गेले. इब्राईमानें आतां पुनः मेसिना, लिकिना व आकॅंडिया हे प्रांत उध्वस्थ केले आणि आपल्या सर्व बंदिवानांस गुलाम करून मिसर देशांत पाठविले. कोलुकोत्रूस यानें आपल्या सैन्यापैकीं उरलेसुरले लोक पुनः एकत्र जमविले, परंतु सोक्षमोक्ष होण्यासारखी लढाई करण्याची त्यास छाती होईना. त्यानें इब्राईमाच्या पाटीवर राहून त्यास बराच जेरीस आणिला आणि अखेरीस डोंगराच्या आश्रयास जाऊन राहिला.

इब्राईमास पेलापोनीसांत जय मिळाल्यामुळें मेसोलांधी किल्यावर शेवटचा हल्ला करण्याची सुलतानास उमेद आली. हें काम त्यानें तुर्कांचा मोठा सरदार रशीद मकमेट पाच्छा याजवर

सोंपविलें व तो पाच्छा ३०००० लोकांनिशीं त्या किल्लचास वेढा देण्यास सिद्ध झाला. मागील वेढ्या नंतर या लहानशा किल्लचाच्या तटबंदीची दुरुस्ती करण्यांत आली होती. परंतु तेथील तोफखाना काय तो ४० पोलादि तोफांचा असून त्या ही बहुतेक निरुपयोगी झाल्या सारख्या होत्या. तेथील रक्षणाचें मुख्य साधन ह्मटलें ह्मणजे त्यांतील शिबंदी होती. तींत ५००० शिपाई असून एपिरास, थेसली व आकारनेनिया या प्रांतांतील अत्यंत शूर सरदार त्यांत होते. या सर्वांवर मुख्य अधिपति मारकास याचा चुलता नोतीस बोझारीस हा असून या वेळीं त्याचें वय ७० वर्षांचें होतें. वेढा देणाऱ्या लष्करास लवकरच आणखी ज्यास्त तुर्की आरमाराची मदत येऊन पोंचली. तुर्कांनीं केलेलें पहिले दोन हल्ले मोठ्या मर्दुमकीनें हटविले गेले व तुर्की आरमारास मायालीस व साक्तुरीस यानीं हांकून लाविलें. शहरांत धान्याचा तोटा पडूं लागला होता, तरी आतां धान्याचा पुरवठा करण्यास मवड झाली होती. अशा संधीस एका रात्रीं १००० शिपाई हातीं तरवारी घेऊन किल्लचांतून बाहेर पडले आणि तुर्कांवर हल्ला करून व त्यांची कत्तल उडवून पुष्कळशी लूट, निशाणें व बंदीवान यांसह परत किल्ल्यांत गेले

छापा घालून मेसालांधीं किल्ला सर करावा म्हणून तुर्कांनीं पांच महिनें पराकाष्टा केली. त्यांस तसें करूं देऊं नये म्हणून ग्रीक लोकांनीं ही तितक्याच नेटानें यत्न केले. अन्नपाण्याची टंचाई व रोग यांणीं ते जरी जेरीस आले होते, तरी छापे घालण्याच्या हातोटिनें त्यांनीं त्या गर्वीष्ठ रोसिदास बरेच रंजीस केलें. पुढील वर्षाच्या आरंभी १०००० तरबेज स्वार व बराच तोफखाना यांसह इब्राहीम त्यास येऊन मिळाला. आपल्या मोठ्या

सैन्याच्या जोरावर त्यानें आंतील लोकांस शरण येण्याचा निरोप पाठविला (जानेवारी १८२६). मेसालांधींतील लोकांची अवस्था यावेळीं फार कठीण होती. तरी त्यांनीं या म्हणण्यास मुळींच डाळ घातली नाहीं. आसमंतांतील सर्व प्रदेश तुर्की व मिसरी लष्करानें भरून गेला होता व सर्व समुद्रभर त्यांचीं गलबतें पसरलीं होतीं. शहरांत दुष्काळ व रोग यांणीं रक्षण करणारांपैकीं १५०० लोकांचें बळी घेतले होते व निम्मेंं किल्लाही मोडकळीस येऊन विघडला होता. अशा आणिबाणीच्या प्रसंगीं मायालोस आपल्या आरमारानिशीं येऊन पोंचला व त्यानें लागोपाठ दोन दिवस तुर्कांचा पराभव केला. याप्रमाणें मेसालांधी शहरास वसलेल्या सख्त वेढ्याची फळी फुटली गेली व दोन महिनें पुरण्या सारखी सामुग्रीही शहरांत पाठवितां आली. इतकें झाल्यावर मायालीस हा पुढील तजविजीकरितां हायड्रा येथें परत गेला. पुष्कळ दिवस तयारी चालवून रेसीद व इब्राहीम यांनीं आतां एकदम चढाई करून किल्ला सर करण्याचा यत्न केला. दोन दिवस एकसारखा मडिमार सुरू ठेविल्यावर तिसऱ्या दिवशीं एक किल्ला त्यांच्या हातीं लागला; परंतु चौथ्या दिवशीं ग्रीक लोकांनीं तो परत घेतला. दोघांही पाच्छांनीं भडीमार चालू ठेवण्याचा उद्योग चालविला. परंतु त्यांच्या लष्करांत अंदाधुंदी चालू झाली होती. यामुळें लढाई चालू ठेवण्याकरितां सुद्धां त्यांजवर सक्ति करावी लागली. हल्ला करून शहर कावीज करण्याची तुर्कांस आतां आशा राहिली नव्हतीच. म्हणून तोफखाना एकसारखा चालू ठेवण्याचा त्यांनीं निश्चय केला. मेसालांधीच्या अगदीं पुढ्यांत असलेलीं तीन बेटें त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतली. क्रीसोव्हा नामक चौथ्या बेटावर ही रेसीद यानें हल्ला केला. त्यांतील शिबंदीचे लोक एका मठास बंदोबस्त करून

राहिले अमून त्यांत किस्तास टिसावेलास व १३० प्रमुख सुलियट होते. मोठ्या निकराचें युद्ध चालून रेरीद जखमी झाला व त्यास मागें फिरावें लागलें. ग्रीक लोकांनीं प्रगट केलेल्या शौर्याची कल्पना इब्राहीम यास नव्हती. पराजयाबद्दल रेशीद यास दुषण लावण्यांत आलें तेंव्हां तो इब्राहीमास म्हणाला " हे लोक मनुष्यें नाहींत, सैतानें आहेत. तुम्हीं स्वतः जाऊन कसें काय आहे तें पहा." इब्राहीम यासही मागें हटण्याची लवकरच पाळी आली. नंतर टीसावेला हा मिसरी सैन्यावर तुटून पडला आणि त्यानें असा कहर करून सोडिला कीं, कांहीं दिवसपर्यंत १००० रांवर तुर्की व मिसरी शवें उथळ पाण्यांत तरंगत राहिलीं व त्यांनीं हवा दुषीत करून टांकिली.

दरम्यान इकडे दुष्काळ व व्याधी मेसालांधी शहराची नाशधूळ उडवीत होतीं. लष्करास दाणागोठा मिळण्यास मार्ग राहिला नसून शहरांतील इमारतींचा सप्पा उडत चालला होता. आतां बचावाची आशा कायती मायालीस व त्याचें आरमार यांजवर अवलंबून होती. हायड्राच्या देशाभिमानी लोकांनीं जिला उपमा देता येणार नाहीं अशा उदारबुद्धिनें पांच वर्षेंपर्यंत आरमाराचा खर्च चालविला होता; पण आतां तेच कफल्लक बनले होते तरी पुराण्या नौकाधिपतीच्या हाताखालीं नवीन आरमार तयार करण्यांत आलें; मात्र गलबतांवर असावे तितके लोक नव्हते. कित्येकांवर तर धड वीस असामीही नव्हते. तरी मायालीस यानें शत्रूच्या संयुक्त आरमारास आक्ट्याक्सस नामक भूशिरा नजीक गांठिलें; आणि त्याची संख्या ज्यास्त होती तरी त्यानें निश्चयानें व धैर्यानें त्याशीं सामना केला. तथापि या लढाईपासून सांगण्यासारखा कांहीं उपयोग झाला नाहीं; तरी लहान-

सहान चकमकी झाडून या शूर नाविक अधिकाऱ्यानें शत्रूस नेहमीं त्रास देण्यांत कमी केलें नाहीं. परंतु मेसालांधी शहरास हरतऱ्हेनें धान्याचा पुरवठा करण्याचे त्याचे प्रयत्न फुकट गेले. शेवटीं मेसालांधींतील लोकांची इतकीं दैन्यावस्था झाली कीं, काय होईल तें होवो, पण शहरास वेढा देऊन बसलेल्या लोकांतून पार निघून जाण्याचा त्या वज्रदेही योध्यांनें निश्चय केला. परंतु इतक्यांत शहर शत्रूच्या हवालीं झाल्याचें वर्तमान येऊन त्याचें अंतःकरण विदीर्ण झालें.

शहरांत सर्व प्रकारच्या विपत्तिची परमावधी होऊन चुकली होती. वीस दिवसपर्यंत तर लोक निर्वाहास समुद्रांत उगवणाऱ्या वनस्पती व पायांतील जोड्यास तेल लावून नरम झालेलें चामेडं मिळाल्यास मोठे भाग्य मानीत होते. रोग तर मीं म्हणत असून औषधोपचारांची कांहीं तजवीज नव्हती. मोडक्या पडक्या घरांनीं भयाण दिसणाऱ्या रस्त्यांच्या बाजूस रोगग्रस्त व उपास मारानें मरणोन्मुख झालेले वृद्ध व तरूण पुरुष व स्त्रिया पडून राहिलेल्या किंवा मरून पडलेल्या आढळत. अशा स्थितींत ही शत्रूचा हल्ला फिरवितां यावा म्हणून लोकांस रात्रंदिवस जपावें लागे. त्यांची स्थिती इभ्राहेमास चांगली माहित असल्यानें शरण येण्याविषयीं तो निरोपावर निरोप पाठवित असे. परंतु आंतील शूर रक्षकांनीं अशा निरोपाचा प्रत्येक वेळीं धिःकारच केला. तीन चार दिवसांत अन्नावांचून लोक मरून जातील व शेवटीं वचावाचें काम आपोआप नाहींसें होईल हे पुढाऱ्यांच्या लक्षांत येऊन चुकलें. म्हणून एकदम शत्रूवर तुटून पडून वांचवतील तितके लोक वांचवावे असा निर्णय ठरला. एकंदर २००० इसमांतून शूर शूर असे लोक निवडून ता. २२

एप्रीलच्या रात्रीं त्यांनीं हातीं तलवारी घेऊन शत्रूच्या सैन्यांतून रस्ता करीत निघून जावें असें ठरलें. ही अचाट युक्ति शेवटास गेली असती; परंतु एका बलगेरीयनानें इब्राहिमास बातमी दिल्या मुळें ती फुकट गेली. पुर्वी वर्तमान समजल्यामुळें या धीट टोळीच्या निसटून जाण्याच्या प्रतिबंधास अवश्य त्या तजविजी करण्याची त्यास सवड मिळाली. संकेताची वेळ जवळ आली तेव्हां लढण्यास समर्थ असलेले ग्रीक पुढें सरसावले व बाकीचे तरूण लोक त्यांच्या मागून जाण्यास सशस्त्र सिद्ध झाले. सर्व स्त्रियांनीं ही पुरुषांचे पोशाख करून शस्त्रें धारण केलीं, त्यांनीं उजव्या हातीं तलवारी घेतल्या व डाव्या कडेवर लहान मुलें घेतली किंवा त्यांस पाठिशीं बांधिली. त्यांच्या मागून ह्यातारेकोतारे पुरुष आणि बायका मुलें चाललीं व त्यांच्या रक्षणार्थ शिपायांची एक तुकडी अगदीं सर्वांच्या मागून चालली. तथापि वृद्धापकाळ व व्याधी यांमुळें ज्यांस त्यांजबरोबर जातां आलें नाहीं, किंवा आपला प्रिय हुंवरटा सोडून जाण्याची अथवा आपल्या पुर्वज्यांचीं थडगीं सोडण्याची ज्यांस इच्छा नव्हती असे दुसरे बरेच लोक मागें राहिले. ही सर्व मंडळी दारूच्या कोठी भोंवती जमली व पुढें काय होतें ते पहात तेथें राहिली. किल्ल्यांतून बाहेर पडणारी मंडळी आपल्या मदतीस येणाऱ्या इतर ग्रीक लोकांकडून मिळावयाच्या सूचनेची वाट पहात राहिली. इब्राहिमास इत्थंभूत बातमी समजलेलीच होती; त्यानें या लोकांवर भडिमार करण्याचा आपल्या लोकांस हुकूम दिला. कित्येक तासपर्यंत ग्रीक लोकांची ही शूर तुकडी काढीभर सुद्धां चळली नाहीं. तरी त्यांस दोहोंकडून वेदना होऊं लागल्या होत्या; म्हणजे आतां, अमळशानें तरी मदत खचीत येऊन पोंचण्याची अपेक्षा व शत्रूच्या गोळ्यांचीआग हीं त्यांचें काम काढीत होतीं; तरी बाहेरून कोणत्याही प्रकारची सूचना आली

नाहीं. शेवटीं चंद्रोदय होऊन त्यांचा समाचार घेण्यास तयार असलेल्या तुर्की व मिसरी लोकांचें थवेचे थवे दृष्टीस पडूं लागले. इतक्यांत ' हुं चला, पुढें व्हा, आणि अशिक्षित (बारबेरीयन) लोकांचा समचार घ्या ' असा मेघगर्जनेंसारखा ध्वनी फुटला. मानव प्राण्यांत आढळणें शक्य नव्हे अशा धैर्यानें ग्रीक लोकांनीं शत्रूच्या मोर्च्यावर हल्ला केला. त्यांच्या गतीस कशाच्यानेंही प्रतिबंध करवला नाहीं. भीतिनें भेदरून गेलेल्या तुर्की व मिसरी सैन्यामधून त्यांनीं मला रूंद मार्ग काढिला, इतक्यांत " शहरांत परतः " असा कोणाचासा भयंकर आवाज कानीं पडला आणि बरेच लोक भीतिनें माघारे हटले. त्वेषास चढलेल्या तुर्कांनीं व आरबांनीं त्यांच्या मागें लागून जो त्यांच्या तावडीस सांपडला त्यास तोडून काढला. यापुढें अंगावर रोमांच उभें राहण्यासारखे प्रकार सर्व रात्रभर चालले. निराशेनें एका प्रकारचें धैर्य उत्पन्न होत असतें. हल्ला करण्यास न जातां मागें राहिलेले लोक आतां प्रत्येक रस्त्यांत व घरांत अशा प्रकारें आलेल्या धैर्यानें लढले आणि पुष्कळांनीं तर शत्रूसह आपणांस बंदूकिच्या दारूस आग लावून उडवून घेतलें. म्हातारे कोतारे व जखमी झालेले लोक दारूखान्याजवळ जमले होते, तेथें जेव्हां शत्रूचे बरेचसे लोक आले, तेव्हां म्हातारा कापसालीस यानें कोठीस आग लावून दिली. तेव्हां सर्वांचा एकदम फडशा उडाला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मेसालांधी शहर म्हणजे ज्यांत ३००० ग्रीक व त्यांचें असंख्य शत्रू गडप झाले होते असा रक्षापुंजांचा संचय होऊन राहिलें.

किल्यांतून बाहेर पडणाऱ्या लोकांच्या आघाडीच्या टोळीवर चाऱ्हीकडून मारा चालल्यामुळें शत्रूची फळी फोडून

निघून जाण्यास तीस महत्प्रयास पडले, हे खरे; परंतु तिजवर हल्ला करणाऱ्यांस चांगला हात दाखवून याचा वचपा तिनें क़ाढिला. शेवटीं झायगांस डोंगराजवळ ते लोक येऊन पोंचले, तेव्हां आपण निर्भय झालों असें त्यांनीं मानिलें. पण आतां त्यांजर आलवानी लोकांनीं हल्ला केल्यामुळें भयंकर रणकंदन माजलें. बायकांत आतां त्राण राहिलें नव्हतें;त्यांपैकीं पुष्कळांनीं तुर्कांच्या हातीं पडण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून आपणांस मारून टांकण्याविषयीं नवऱ्यांच्या विनवण्या चालविल्या. अखेरीस त्यांच्या मदतीस तेथें असलेल्या ३०० ग्रीक लोकांचा व त्यांची गांठ पडली, तेव्हां यांच्या सहाय्यानें त्यांनीं आलवनी लोकांस पळ काढण्यास लाविलें आणि त्यांस थोडासा विसावा मिळाल्यासारखें झालें. ज्या प्रदेशांतून त्यांस जाणें जरूर होतें तो अगदीं उध्वस्थ झाला होता. यामुळें चाऱ्ही बाजूनें अडचणी उभ्या असतां अन्नपाणी मिळण्याची पंचाईत. क्षुधा, श्रम व जखमा यानीं पुष्कळांस मृत्यूमुखीं लोटिलें. ते आम्फायसीस येथें आल्यावर मात्र त्यांस थोडा विसावा मिळून स्वदेशबांधवांकडील ममतेच्या वागणुकीचाही आस्वाद घेण्यांस सांपडला. परंतु याप्रमाणें निभावून आलेलें असामी फक्त १८०० च होतें. तेव्हां मेसालांघी शहरांतील प्रत्येक रहिवाशी शूर व स्वदेशार्थ देहार्पण करणारा होता असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

मेसालांघी शहर शत्रूच्या हातीं गेल्याच्या वर्तमानानें सर्व ग्रीस देशभर निराशा व दुःख उत्पन्न केलें. नाम्फिया येथील सरकारचा कांहीं उपाय चालला नाहीं. ग्रीस देशांतील सर्व प्रांतांतले व विशेष करून मेसालांघींतील शूर लोक तेथें एकत्र जमले; पण त्यांजजवळ पैका किंवा लष्कर यांतून कांहींच नव्हतें.

शिवाय उध्वस्थ झालेल्या मुलखांत साथीच्या रोगानें कहर करून सोडिला होता, लोकाचा दम अगदीं नाहींसा झाला होता व जिकडे तिकडे विपत्तिनें पाउ घेतली होती. शिवाय मेसालांघीहून फिरलेला इब्राहीमखान पेलापोनीस उध्वस्थ करीत चालला असून तो नाफ्लिया येथे येण्याची वदंता दररोज उठे. इकडे युरोपांतील ग्रीस प्रदेशांतलें एकच महत्वाचें शहर जें आथेन्स त्याजवर रेसीद-पाच्छा चाल करीत होता. या सर्वांहून बाधक गोष्ट ही होती कीं ज्या हुहिमुळें अजूनपर्यंत फार अनर्थ झाला तिची नाफ्लिया येथें, यावेळीं परमावधी होऊन चुकली होती. अशा प्रसंगीं जार्जीयस जेनाडियास यानें नाफ्लियाच्या प्रसिद्ध भागांत रहाणाऱ्या लोकांची सभा भरविली, आपल्या देशाच्या स्थितीचें हृदयद्रावक शब्दांनीं वर्णन केलें आणि पुनः एकवार प्रयत्न न केल्यास त्यांच्या पुर्वजांचे, स्त्रियांचे व लेंकरांचें अभिस्त्राप त्यांच्या मस्तकीं पडतील इतकेंच नाहीं, तर ते सर्व जगाच्या उपहासास पात्र होतील असें त्यानें सांगितलें. त्याच्या बोलावण्यावरून या सभेत त्या लोकांच्या बायका व मुलेंही हजर होतीं.

यांनीं हातीं क्रुस घेऊन व गुडघे टेंकून आपल्या पतींची विनवणी केली कीं अशिक्षीत शत्रूच्या हातीं जाऊ देण्यापेक्षां स्वहस्तांनीं तुम्हीं आमची वाट लावावी. यामुळें लोकांत नुतन उत्साह उत्पन्न झाला व शत्रूस जिंकण्याच्या किंवा स्वदेशार्थ मरून जाण्याच्या त्यांनीं गहन प्रतिज्ञा केल्या. स्वदेश बांधवारितां आपलें असलें नसलें सर्व अर्पण करण्यास प्रत्येक असामी तयार झाला. लढाईच्या कामीं लागणारे सर्व घोडे लोकांनीं स्वसंतोषानें पुरविले व याप्रमाणें मिसरी लोकांपासून नाफ्लियाचें संरक्षण करण्यास स्वारांचे लष्कर सिद्ध झालें. वयोवृद्ध कोलोकोत्रुनिस कुशलतेनें व दक्षतेनें सर्वत्र योजना ठेवून समरांगणा-

समोरासमोर उभे न रहातां घरपळीच्या लटपटी करून मिसरी लोकांवर वरचेवर हल्ले करावे व त्यांस त्रास द्यावा असा क्रम चालविला. मैदानांतील लोकांनीं, शस्त्र व अग्नी यांच्या योगानें देशाची धूळधाण करणाऱ्या शत्रूस मनसोक्त वागूं देऊन आपण स्वतः डोंगरांचा, गुहांचा, बळकट दुर्गांचा अथवा गड्यांचा आश्रय केला. इब्राहीमखानानें केलेला नेटाचा हल्ला मैना शहरच्या रहिवाशांनीं (पुरुष व बायका मिळून) हटविला व त्याची बरीच नासाडी केली.

या राजक्रांतींत पुढें आलेल्या सरदारांत अल्प अवकाशांत अग्रगणत्व पावलेला जार्जियस कारेस्काकीस यास ग्रीस संस्थानाच्या युरोपखंडांतील प्रदेशांतून रवाना होणाऱ्या सैन्याचें अधिपत्य देऊन रेसिद पाच्छावर चालून जाण्याच्या कामावर त्याची योजना करण्यांत आली. तुर्की लोकांस युरोपांतून अजि हुसकून लावण्याचा मोठा व अचाट घाट त्यानें घातला होता. रेसिदानें अथेन्सास वेढा देऊन तें शहर सर केलें होतें आणि तेथील रहिवाशांनीं मोठा नेट धरिला असतां ही शूर गुरास ५७० लोकांनिशीं रक्षण करीत असलेल्या पवित्र आक्रापोलिस नामक भागास वेढा दिला होता. कारेस्काकीस हा नाफ्लिया येथून ६०० लोकांनिशीं निघाला असून इक्झिस येथें त्यानें आपलें लष्कर वाढवून २९०० इसमाची भरती केली. मेसालांघींहून निभावून आलेल्या लोकांनीं या कामीं शर्थ करून सोडली. रेसिदाच्या लष्कराच्या तुकड्यांचा त्यानें दोन वेळ पराजय केला आणि त्यांची ओझीं वाहणारीं व इतर प्रकारची बहूतेक सर्व जनावरें धरिलीं. आक्रापोलिसच्या वेढ्यास प्रतिबंध करण्याची झाला त्यानें योजना केली आणि ज्याच्या योगानें अथे-

न्साच्या मैदानांत रोसिदाच्या सैन्यास वेढून टांकतां येईल असें त्यास वाटत होतें अशा प्रकारचा घाट घातला. आक्रा-पोलिस सर करण्याकरितां रोसिदानें ता. १८ आक्टोबरच्या रात्रीं एक सारखी तोफ चालविली. त्यामुळें या झटपटींत इरिक्थीयन नामक इमारतीचा कांहीं भाग सर झाला. परंतु शेवटीं पुष्कळ, नाश होऊन त्यास परतावें लागलें. निःशक्त झालेल्या लष्करास आतां कारेस्काकीस याची कुमक येऊन पोंचली. तो ४५० लढवय्ये बरोबर घेऊन आला. त्याच्या दोन साहसी मदतनिसांच्या शिक्षेंत या लोकांनीं आक्रापोलिसांत प्रवेश केला. वेढलेले लोक रोसि-दाचे प्रयत्न वरचेवर निर्फळ करीत असत; तथापि हें छोटेखानी लष्कर ही दिवसें दिवस खालवत चाललें होतें, इतकेंच नाहीं तर दारूगोळ्याची वाण ही त्यास आतां भासूं लागली होती. पण इतक्यांत फ्रान्सांतील सुप्रसिद्ध ग्रीसभक्त कर्नल फावि-यर ९५० ग्रीक शिपायांनिशीं येऊन दाखल झाला. हें कृत्य त्यानें मोठ्या धैर्यानें व व्यवस्थेशीरपणानें रात्रीच्या वेळीं तडीस नेलें. यापूर्वीच कारेस्काकीस हा इल्युसीस व साल्यामीस येथील बंदोबस्त करून आपला मुख्य उद्देश तडीस नेण्याच्या हेतुनें बिओशियांत शिरला. त्यानें तुर्कांस सर्व ठिकाणीं पळ काढण्यास लॉविलें आणि व्यवस्थित रीतीनें, पण वारंवार, तळ बदलून रेसिदाच्या कुमकेस जात असलेल्या १९०० स्वारांच्या तुकडीस आरकोव्ह नजीक अडवून धरिलें व तिची धूळधाण उडवून दिली. यावेळीं ग्रीक लोकांच्या हातीं किमतदार लूट लागली. तेथून तो थरमापिली येथें गेला व तेथें रेसिदाच्या लष्करांत जात असलेली सर्व सामुग्री लुटली. पुढें लवकरच तो इटोलिया, फो-कीस आणि लिव्हाडीन येथें गेला व त्यानें प्रत्येक ठिकाणाहून

तुर्कांस हाकून काढिलें व बंदोबस्ताचीं स्थानें बळकाविलीं. या प्रमाणें त्यानें रोसिदापुढें अर्धचंद्राकार व्युह उभा केला. नंतर आपले बेत सिद्धिस नेण्याकारितां तो पुनः साल्यामीसच्या किना-ऱ्यावर १००० लोकांनिशीं गेला. तो तेथे पोंचण्याच्यापूर्वीच सरकारानें पिरेइयस व फ्यालेरान येथे ६००० लोक जमविले होते; (इ. स. १८२७) कारेस्काकीस जवळ नसल्यामुळें या सैन्याचें रोसिदापुढें कांहीं चाललें नाहीं. नंतर लवकरच रोसिदानें कारेस्काकीस याजवर हल्ला केला; पण त्यास मागें हटावें लागलें. या नंतर आटिकांतील ग्रीक लष्कर लवकरच १०००० पर्यंत वाढलें. याच्या थोडावेळ पूर्वी जार्ज क्यानिंग याच्या देखरेखी खालीं इंग्लंडचा राज्यकारभार चालत असतां तो देश हेलनिक लोकाशीं स्नेहभावानें वागूं लागला होता; ह्मणून त्या देशाविषयींची आपली पूज्यबुद्धि व कृतज्ञता व्यक्त करण्याकारितां ग्रीक सरकारानें काक्रेन व चर्च या इंग्लिश गृहस्थांतून पहिल्यास आरमाराचें व दुसऱ्यास खुष्कीवरील लष्कराचें अधिपत्य दिलें. दोघेही फ्यालेरान येथें एकदम जाऊन पोंचलें. तिकडे एक ग्रीक आरमारही पाठविण्यांत आलें होतें. यांतच काक्रेनच्या हाताखालीं राहण्याचें पत्करून वृद्ध मायालीस हाही गेला होता. तुर्कांचे खंदक एकदम हल्ला करून सर करावे आणि रोसिदाच्या सर्व लष्करावर हल्ला करावा असें काक्रेनाचें मत होतें. त्याचा कल पाहून पुष्कळ ग्रीक सरदार तसेंच ह्मणूं लागले. परंतु शांत व विचारी कारेस्काकीस यास शत्रूची वागणूक इतरांपेक्षां चांगली कळत होती व अखेरीस जय प्राप्ती होण्यास अवश्य त्या सर्व योजना मागील बारा महिन्यांत त्यानें करून ठेविल्या होत्या; तरी नशिबावर हवाला देवून

काम करण्यापेक्षां आणखी कांहीं मजबूत ठिकाणें प्रथम स्वाधीन करून द्यावीं, असा त्याचा निश्चय ठरला होता. त्याचा मुख्य बेत शत्रूस जेरीस आणून त्यास वेढावा व हळू हळू त्याचा नाश करावा असा होता, हें पूर्वी दर्शविलेंच आहे. ग्रीक लोकांनीं हळू हळू फालेरानकडून पुढें चाल धरिली. आपण चोहोंकडून कोंडले जात आहों व लवकरच दाणागोटा व लढाईचें सामान मिळविण्याचा मार्ग रहाणार नाहीं, असें आतां रेसिदाच्या लक्षांत आलें. अशा स्थितींत हायड्राच्या व फ्रिटनच्या कांहीं लोकांनीं कारेस्काकीसच्या हुकूमाविरुद्ध ह्लिसास येथील तुर्कीं ठाण्यावर उतावळीनें हल्ला केला. त्यांनीं उजव्या बाजूच्या लष्कराची एक तुकडी आपणा बरोबर नेली. परंतु मैदानांत रेसिदानें त्यांच्या मोंवतें रिसाल्याचें कडें घातलें. कित्येकांस तोडून काढिले; कांहीं मोठ्या प्रयासाने जीव घेऊन पळाले. कारेस्काकीस या वेळीं दुखण्यानें तंबूत पडून होता. हा प्रकार त्यास समजतांच पळत असलेल्या लोकांचा बचाव व्हावा व घनघोर लढाई माजूं नये, म्हणून तो गदींत शिरला. त्यास भयंकर जखम लागली. आपला अंतकाळ समीप आला असें समजून व आपली योजना तडीस नेणें हाच काय तो ग्रीस देशाचें संरक्षण करण्याचा मार्ग आहे असें वाटून आपल्या हुय्यमास तीं अंमलांत आणण्याची त्यानें शिफारस केली. आतां कारेस्काकीसाचा दाब नाहींसा झाल्यामुळें काक्रेनानें उजव्या अंगच्या सर्व तुकडीस शत्रूवर चाल करण्याचा हुकूम केला. त्यांची ज्यास धड माहिती नाहीं अशा सरदाराच्या आज्ञेंत वागण्याचा प्रसंग येतांच ग्रीक लोक मोठ्या वेगानें पण अव्यवस्थितपणानें शत्रूवर चालून गेले आणि डाव्या अंगच्या तुकडीस

कांहीं हुकूम न मिळाल्यामुळें ती जागच्याजागींच राहिली. म्हणून जेव्हां मैदानांत तुर्की रिसाल्याची गांठ पडली तेव्हां पूर्वी कधीं झाला नव्हता असा त्यांचा पराजय झाला. पंधराशें लोक रणांगणीं पडले. त्यांत बहुतेक सर्व सुलिटसचे लोक व त्यांचे सरदार होते. सुलिटसाचा शूर सरदार ड्रेकास यास जखम लागून त्यास रेसिदासमोर नेला तेव्हां त्यानें आपल्या बिड्या तोडिल्या व आपलीच तलवार आपल्या पोटांत खुपसून घेतली. काक्रेन व चर्च हे पळून आरमारांत दाखल झाले; पाहिला हैड्रा येथें गेला व दुसरा ३००० लोकांनिशीं फालेरान येथेंच राहिला. तुर्क लोकांनीं त्यांजवर मारी छाप ठेविल्यामुळें जेथून त्यांस निघून जाणें भाग आलें. पुढें नऊ दिवसांनीं ग्राक्कापोलिस शत्रूस शरण गेलें.

कारेस्काकीस मरण पावला व अत्युत्तम अशा लष्कराचा नाश झाला, या वर्तमानानें त्याच्या उपक्रमापासून प्राप्त होणाऱ्या सर्वोत्कृष्ट फलाची ग्रीक लोकांची आशा व रसीदाचा निःपात होण्याची अपेक्षा हीं एकदम रसातळास गेलीं. आतां ग्रीस देशास कांहीं आशेचा भाग राहिला नसून त्याची स्थिती फार भयंकर झाली. युरोपांतील ग्रीस देशाचा सर्व भाग आतां तुर्कांच्या हातीं गेला. मिसर देशांतून इब्राहीमास मोठी कुमक येऊन पोंचली आणि या द्विपकल्पाचा त्यास सुलतानानें सुभेदार नेमिल्यामुळें त्यानें पेलापोनिसस भयंकर रीतीनें उध्वस्थ करण्याचा क्रम चालविला. सर्व ग्रीक वस्ती नाहींशी करून तिच्या ऐवजीं त्या देशांत मिसरी लोक व आरब लोक आणून भरावे असा त्याचा इरादा होता. धरिलेल्या सहस्रावधि पुरुषांस व स्त्रियांस त्यानें गुलाम करून मिसर देशांत पाठविलें.

ग्रीसास अशी दशा प्राप्त झाली असतां त्याच्या सुदैवानें युरोपांतील बलाढ्य राष्ट्रांच्या त्या देशाविषयींच्या विचारांत मोठा फरक पडला. ग्रीक लोक हे आपल्या हक्कदार राजाविरुद्ध फिसादबखेडे करणारे आहेत अशी या उलथापालथींच्या आरंभीच्या वर्षांत त्या राष्ट्रांतील सरकारांस वाटत होतें. यामुळेंच विशेषेंकरून आस्त्रियाचें सरकार उघडपणें तुर्कांची बाजू घेऊन होतें. परंतु ग्रीक लोकांचें शौर्य व स्वदेशार्थ सर्वस्वार्पण करण्याचा कल पाहून व मेसालांघी बुडाल्यानंतर तेथें जीं क्रूर कृत्यें घडून आलीं त्यांमुळें सन १८२५ सा नंतर सर्व युरोपखंड खवळून गेलें. महान् विख्यात् कवि, प्रसिद्ध वक्ते, तत्वज्ञानवेत्ते व विशेषेंकरून फ्रान्स देशांतील धर्मोपदेशक यांनीं लोकमत हालवून दिलें. सर्व युरोपांतील ख्रिस्ती राष्ट्रांतील पुष्कळ उत्सुक पुरुष तेथील लोकांच्या विपत्तीचे भागीदार व्हावें व त्यांच्या मुक्ततेच्या कामीं सहाय्य करावें म्हणून ग्रीस देशांत गेलें. असे गृहस्थ बहुधा 'फिल हेलनीस' या नामें करून प्रसिद्ध असत (फिलहेलनीस याचा अर्थ ग्रीस देशाचे मित्र असा आहे). इंग्लंडांत पुष्कळ पुढारी लोकांनीं सरकारचें वर्तन आपल्या देशास अनुचित असल्याबद्दल गवगवा केला. सन १८२५ त जार्जकयानिंग यानें तर असें करणें केवळ लज्जास्पद व राक्षसीपणाचें होय, असें म्हणून दाखविलें. ग्रीक लोक चोहोंकडून घेरले गेले आहेत हें चटकन त्याच्या लक्षांत आलें आणि कान्स्टान्टिनोपल येथील सर स्थाफर्ड कयानिंग याच्या मार्फत तुर्की लोकांनीं थोड्या मुदतीचा तह करावा म्हणून प्रयत्न चालविला. या खेरीज एक महिन्यांत तुर्कस्थान सरकार तह करण्यास कबूल न झाल्यास रशिया, फ्रान्स व इंग्लंड या तीन बलाढ्य राष्ट्रांनीं ग्रीस देशाचें स्वातंत्र्य मान्य

करावें आणि तुर्कस्थानास तह करणें भाग पाडावें अशा अशियाच्या लेखावर लंडनांत ता. ६ जून १८२७ रोजी पहिल्या दोन सरकारांकडून सह्या घेण्यांत आल्या. शिवाय या तीन राष्ट्रांनीं इब्राहीमाची अमानुषीय कृत्यें बंद करण्याच्या उद्देशानें आपलीं आरमारें पेलापोनीस येथें पाठविलीं. या तीनही आरमारांचें अधिपत्य आडमिरल एडवर्ड कार्डिंगटन याजकडेस असून तो सर्व तुर्की व मिसरी आरमार नांगरीं असलेल्या पायलास (डफनाव्हारिनो) बदरांत जाऊन दाखल झाला. मिसरी लोकांनीं इंग्रजी गलबतांवर गोळ्या टांकिल्याबरोबर कार्डिंगटन यानें लढाईची सूचना दिली. या सुप्रसिद्ध व लक्षांत ठेवण्यासारख्या लढाईंत संयुक्त आरमारानें तुर्की व मिसरी आरमार बहुतेक नाहींसें करून टांकून ६००० लोकास मृत्यूपंथास लाविले. आपल्या तटस्थ वृत्तिनें तुर्कांचे साथीदार बनलेल्या सुधारलेल्या ख्रिस्ती राष्ट्रांची बूज या लढाईनें राहिली. त्या लढाई नंतर ही तुर्कस्थानानें तह करण्याचें नाकारिल्यावरून ग्रीक लोकांनीं लढाईचा क्रम चालू ठेविला. नोव्हेंबर महिन्यांत सेनापति चर्च हा आपल्या गलबतांनिशीं आकारनेनिया येथें गेला. ग्रीसचा इंग्रेज स्नेही (फिलहेलनि) हेस्टिंग यानें व्हासिलोडियन नामक लहान बेट जिंकून मेसालांधीस वेढा दिला होता. तिकडेसच कोस्टास लोझेरीस हा ही तें शहर परत घेण्याच्या आशेनें गेला. ग्रीस देशाप्रित्यर्थ आपलें वित्त व जीवित खर्चणारा हा शूर पण निगर्वी दर्यावर्दी पुष्कळ झटपटींत जय मिळवून मेसालांधी शहरापुढें जून १८२८ त मरण पावला.

यापूर्वीच म्हणजे १८२८ साच्या ज्यानेवारी महिन्याचा पहिला पंधरवडा संपण्याच्या सुमारास ग्रीसच्या सार्वजनीक सभेनें

(न्याशनल कांग्रेस) ट्रिझन येथें ग्रीसच्या गव्हरनराच्या जागीं नेमणूक केलेला गृहस्थ जोतास कापोडिस्त्रियस हा सरकारची रचना करून सर्व सत्ता एकहातीं करण्याच्या योजनेसाठीं इजिना येथें गेला होता. हा गृहस्थ मूळचा केरकायरा उर्फ कार्फ्यु येथील रहाणारा असून पुष्कळ वर्षेंपर्यंत रशियांत राहिला होता. तो देशाभिमानी, प्रामाणिक, मेहनती व साराासार विचारी असल्यामुळें त्यानें राज्यकारस्थानसंबंधीं व लष्करी बाबतींत मितव्यय व व्यवस्था यांची एकदम सुरूवात केली. चर्च यानें व विशेषेंकरून इप्सिलयान्टीस यानें सन १८२९ च्या सप्टेंबर महिन्यांत ७००० लोकांच्या तुर्की लष्कराचा पूर्ण पराभव केला. यामुळें युरोपांतील ग्रीक प्रदेश बहुतांशीं तुर्की लोकांच्या सत्तेपासून मोकळा झाला होता. इब्राहीम यानें एकंदर जन संख्येच्या एकचतुर्थांशा इतके लोक मारिले होते किंवा गुलाम करून सोडिले होते. पण याच सुमारास दहाव्या चार्लस राजानें जनरल मेशन याच्या हाताखालीं पेलापोनीसास पाठविलेल्या १४००० लोकांच्या फ्रेंच लष्करानें इब्राहीमास गलबतावर चढून आलेक्झान्ड्रीयाकडे पळून जाण्यास लाविलें. (तारीख ४-१ अक्टोंबर.) याप्रमाणें तुर्की लोकांस ग्रीसांतून हुसकून लाविले.

मध्यंतरच्या अवधींत क्यापोडिस्त्रीयस यानें देशाची नूतन व्यवस्था करण्याचें काम चालविलें होतें; पण त्यास लोकांचें स्वभाव मुळींच न समजल्यामुळें व आपल्या स्नेह्यांच्या अपकारकारक सल्ल्यानें आडमार्गांत शिरल्यामुळें त्याजकडून अनेक बेकायदा व जुलमी कृत्यें घडलीं. त्यामुळें व परदेशच्या राजकीय कारस्थानांच्यायोगानें ता. ९ अक्टोबर सन १८३१ रोजीं त्यास

मृत्यू येऊन लोकांस फार दुःख झालें. अजून ग्रीस देशांत जिकडे तिकडे अव्यवस्थाच होती, हें उघड आहे. परंतु राजसत्ताक सरकाराची स्थापना करण्याचे व राजपदास योग्य इसम निवडण्याचे वर निर्दिष्ट केलेल्या तीन बलाढ्य राष्ट्रांचे अनेक प्रयत्न निर्फळ झाल्या नंतर अखेरीस ता. ७ मे सन १८३२ रोजीं त्यांनीं ग्रीसाचा राष्ट्रीयपणा लंडन येथील तहानें मान्य केला आणि बव्हेरीयाचा राजा व ग्रीसाचा अत्यंत अभिष्ट चिंतक जो लुई त्याचा पुत्र ओथो हा राजा निवडला गेला. ग्रीक लोकांच्या राष्ट्रीय सभेकडून ही निवड ता. ८ आगष्ट रोजीं पसंत करण्यांत आली व तें सर्व तुर्कस्थानास मान्य करावें लागलें.

आठ वर्षेपर्यंत संकटें सोसून स्वातंत्र्या करितां झटणाऱ्या ग्रीक प्रदेशाचा पागाससच्या आखाताच्या दक्षिणेकडील टिनारान भूशिरा पर्यंतचा एवढाच मुलुख स्वतंत्र झाला. युबिया व त्याच्या आसपासचीं बेटें आणि कायक्लाडीस बेटें यांचाही ग्रीसांत समावेश झाला. इपायरस, सुली, थेसली व म्यासिडोनिया यांनीं संकटें सोसून या प्रमाणें श्रम केले असतांही त्या प्रदेशांनीं व क्रिटा बेटानें तुर्कस्थानाची सूड उगाविण्याची वासना सहन करून त्या देशाचा अघोर जुलूम पत्करावा असें याच तहावरून ठरलें.

याप्रमाणें ग्रीस देशांतील राजक्रांतीचा शेवट झाला. स्वातंत्र्य प्राप्त्यर्थ चालविलेल्या या कलहांत ज्यास दुसरी उपमाच नाहीं अशा प्रकारचें शौर्य व सर्वस्वार्पण करण्याची सिद्धता ग्रीकांनीं प्रगट केली, हा गोष्ट इतिहास मान्य असली पाहिजे.

ओथो राजा तारीख ६ फेब्रुवारी रोजीं ग्रीस देशांत येऊन दाखल झाला.ज्यास भला,सौम्य व मेहनती म्हणतां येईल अशा प्रकारचा मनुष्य तो होता; परंतु त्याप्रमाणेंच तो मूर्ख, आपस्वार्थी व रोमन-

क्याथोलिक मताच्या धर्म वेडानें घेरलेला होता. शिवाय प्रत्येक प्रकारच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याविषयीं तो फार साशंक व मत्सरी असे व प्रत्येक स्वतंत्रताप्रिय व्यक्ती धोक्याची व आपल्या थोरवीस बट्टा आणणारी असें तो समजे. आस्त्रिया देशाच्या राजाचा कुटिल सल्ल्यानुरूप तो नेहमीं वागत असे. राष्ट्रीय सभेनें इच्छा प्रदर्शित केल्या प्रमाणें देशास नियमित हक्क देण्याचें त्यानें कबूल केलें होते, तरी त्यानें आपलें वचन कधीं पुरें केलें नाहीं. शेवटीं पुष्कळ प्रयत्न व्यर्थ गेल्यावर ता. १५ डिसेंबर १८४३ रोजीं ते हक्क देणें त्यास भाग पडलें. ते पाळण्याची शपत जरी त्यानें घेतली होती, तरी हमेशा तो तिचा अतिक्रमच करीत असे व क्षुद्र व अयोग्य अशा लोकांच्या तंत्रानें तो वागत असे. ग्रीसदेश या वेळीं आपआपसांतील तंटेबखेडे व राजकीय कारस्थानें यांची केवळ रंगभूमीच बनला. शेवटीं सर्व लोकांनीं मिळून केलेला प्रयत्न रक्तपातानें निरर्थक झाल्यावर सर्व ग्रीक लोक एक होऊन त्यांनीं बंडावा करून ता. २६ अक्टोबर सन १८६२ रोजीं ओथोस हद्दपार केला. आपल्या लोकांच्या स्वातंत्र्याच्या पहिल्या सुधारणेची वाढ त्यानें नष्ट केली, ती निव्वळ वाईट हेतुनीं केली असें नाहीं, तर त्याच्या नालायकीचा तो परिणाम घडला.

जरी त्याच्या कारकिर्दीत लोकांची स्वातंत्र्याची आभिरुची दाबण्यांत आली होती, तरी सन १८४१ त तिनें उचल घेतली व त्यामुळें क्रिटाच्या लोकांनीं बंड केलें. तथापि तुर्कस्थान व मिसर देश यांतील सैन्यांनीं त्याचें निर्मूळ करून टाकिलें. इपायरस व थेसली येथें सन १८४१ त बंडें उद्भवलीं, परंतु बंडवाल्यांनीं बरेंच शौर्य गाजविलें तरी इंग्लंड व फ्रान्स यांच्या मध्यस्तीमुळें त्यांस पुनः तुर्कस्थानाची ताबेदारी पत्करावी लागली

व तुर्की सरकारानें पिरेइपसचें बंदर आपल्या लष्करी ठाण्याची जागा करून सोडिलें.

ओथोस घालवून दिल्यानंतर लोकनियुक्त राज्यपद्धत आपणास प्रिय असून इंग्लंडावर आपला विश्वास आहे असें दर्शविण्याकरितां सर्व ग्रीक लोकांनीं एकमत होऊन इंग्लंडचा राजपुत्र आल्फ्रेड यास राजा निवडिला. परंतु त्या राष्ट्राची शाश्वती न दिसल्यामुळें त्यानें हा बहुमान नाकारिला. नंतर डेन्मार्कचा राजपुत्र जार्ज यास नेमण्याबद्दल इंग्लंडानें सूचना केल्यावर, त्यास सर्वानुमतें पसंत केला व ता. ३ अक्टोबर सन १८५३ रोजीं तो आथेन्स शहरीं येऊन दाखल झाला. त्याच वेळीं ग्ल्याडस्टन साहेबांच्या विचारें इंग्लंडानें आयओनी- यन बेटांवर देखरेख करण्याचा आपला अधिकार सोडून दिला व त्यामुळें आपल्या मूळ देशाशीं संबंध जडावा अशी त्या लो- कांची असलेली इच्छा पूर्ण झाली.

जार्ज राजाच्या कारकिर्दीत क्रिटन लोकांनीं पुनः बंड केलें व स्वदेश, स्वधर्म व लौकीक यां प्रीत्यर्थ ते तुर्की व मिसरी सैन्या बरोबर तीन वर्षें झुजले (सन १८५६ पासून सन १८५८). कांहीं खानदानाच्या व उदार अंतःकरणाच्या तरूण ग्रीकांचे एक पथक बाफी येथें शौर्यानें लढत असतां मरण पावलें व आ- स्त्रियाच्या राजाचा वध करणारा ओमर पाच्छा यास शरण जा- ण्याची पाळी येऊं नये म्हणून स्त्रिया, मुलें व कांहीं वृद्ध योद्धे मिळून १४०० माणसानीं आर्केलियन नामक बेटास आग लावून आपणास जाळून घेतलें. तरी तुर्की फौज फार पडल्यामुळें व व युरोपांतील बलाढ्य राष्ट्रें, व विशेषें करून फ्रान्स मध्यें पडल्या- मुळें या बंडाव्याचा उपशम झाला.

ग्रीस देशास स्वतंत्रता प्राप्त झाल्यास आज चाळीस वर्षे झालीं. या मुदतींत त्या देशांतील खासगी व्यक्तींचे उद्योग वाढत्या प्रमाणावर व शहाणपणाचे चालले आहेत; परंतु त्या प्रमाणेंच तेथील सरकार नालायक दिसत आहे. तुर्की लोकांस ग्रीस देशांतून घालवून दिल्या वेळीं फार मुदतपर्यंत चाललेल्या या कलहामुळें, देश त्यागदीं निःसत्व होऊन जनसंख्या ही पूर्वीपेक्षां एकदशांशाहून अधीक इतकी कमी झाली होती. परंतु सांप्रत काळांत्यराकडो नवीन शहरें व गांव वसले असून लोकसंख्याही दुप्पटीनें वाढली आहे. त्याच प्रमाणें मेसेनिया, अकाया, एलीस व कोरिन्थ या प्रांतांत बागायतताप्रमाणें लागवड होत आहे. इपायरस व थेसली येथील पाच्छा जरी दर वर्षी असंख्य तुर्की, आलबनी आणि वालाचियन लोकांस अरुंद डोंगराळ वाटांनीं अथेन्सने देशास पाठवित आहेत, तरी युरोपांतील ग्रीक राष्ट्राची स्थिती सुधारली आहे. ग्रीक आरमार भरभराटीच्या स्थितींत असून त्याचे बावटे दोन्ही गोलार्धांत फडकत आहेत. लोकशिक्षणाचें काम आथेन्सांतून सर्वत्र पसरत असून तें सर्व स्वतंत्र ग्रीक प्रजेस फुकट मिळत असतें. जे ग्रीक लोक तुर्की सरकारच्या अंमलांत आहेत त्यांच्यांत ही वरीष्ट प्रकारचें शिक्षण व शौर्यही वृद्धिंगत होत आहेत आणि चालू ग्रीक भाषा दिर्घस्वरानें सांगत आहे कीं, १००० वर्षें गुलामगिरींत घालविल्यावर ही प्राचीन हेलासाच्या कांहीं भागानें आपलें पहिलें स्वातंत्र्य संपादन केलें आहे.

समाप्त.